# <u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)</u>

**सभा क्र. ०८/ २०१४** **दिनांक १२.०६.२०१४**
**स्थळ- शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक १२.०६.२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ १२१३/ २०१४, दिनांक ११ जुन, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक १२.०६.२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २३.०५.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.४५१** दिनांक २३.०५.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली-

**निर्णय क्र.२९३ मध्ये-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, दिवसेंदिवस संस्थानच्या आर्थिक कामकाजात झपाटयाने लक्षणीय वाढ होत असल्यामुळे प्रस्तावात नमुद केलेल्या अधिनियमातील तरतूदींना अनुसरुन मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या रु.२५,०००/- मात्र रकमेच्या मर्यादेऐवजी रु.२,००,०००/- मात्र पर्यंतचे धनादेश, बँकेस देण्यात येणाऱ्या धनाकर्ष व NEFT, RTGS वगैरे पत्रांवरील स्वाक्षरीचे अधिकार अबाधित ठेवुन मा.उपकार्यकारी अधिकारी यांना सदरचे (प्रस्तावात नमुद केलेले) अधिकार प्रदान करणेत यावे, असे ठरले.

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दिवसेंदिवस संस्थानच्या आर्थिक कामकाजात झपाटयाने लक्षणीय वाढ होत असल्यामुळे व कामकाज अधिक गतिमान होण्याच्या दृष्टीने मा.कार्यकारी अधिकारी यांचे सर्व आर्थिक अधिकार अबाधित ठेवणेत येऊन, मा.उपकार्यकारी अधिकारी यांना रक्कम रु.५,००,०००/- मात्र पर्यंतचे धनादेश, बँकेस देण्यात येणारे धनाकर्ष तसेच NEFT, RTGS वगैरे पत्रांवरील स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी/ कार्यकारी, उपकार्यकारी अधिकारी कक्ष/ सर्व प्रशासकीय अधिकारी)

---

**विषय नं.०२** **दिनांक ०३.०६.२०१४ व दिनांक ०७.०६.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.४५२ (अ) दि.०३.०६.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

**०१.** **<u>श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवास व साईआश्रम परिसरातील रस्त्यावर स्पीडब्रेकर बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.८,३७,२००/-)</u>**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही

प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठरावः**

(१) मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १७/०९/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६२७ अन्वये श्री साई आश्रम-०१ परिसरातील रोडवर स्पीड ब्रेकर व कॅट आय बसविणेकामी येणारे अंदाजे रुपये ४,५४,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

(२) मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १७/०९/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६२४ अन्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व व्दारावती भक्तनिवास परिसरातील रोडवर स्पीड ब्रेकर बसविणेकामी येणारे अंदाजे रुपये २,०१,६००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

(३) मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १८९ अन्वये साई धर्मशाळा परिसरात गतीरोधक बसविणेकामी येणारे अंदाजे रु. १,८१,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्ताविकः** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे दक्षिण बाजूकडील शैक्षणिक संकुल समोरील रस्त्यावर, श्री साईनाथ रुग्णालय, व्दारावती भक्तनिवास इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर साई धर्मशाळा तसेच श्री साई आश्रम-०१ परिसरातील रोडवर स्पीड ब्रेकर व कॅट आय बसविणेकामी उपरोक्त निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावः** उपरोक्त ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवून घेणेकामी इकडील जा. नं. २८२३/२०१३ दि. २६ नोव्हेंबर, २०१३ व जा. नं. २८२३/२०१३ दि. ०२ डिसेंबर, २०१३ रोजीचे कोटेशन मागणी पत्र देऊन दिनांक १० डिसेंबर, २०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. विहीत मुदतीत सहा ठेकेदारांनी कोटेशन सादर केले होते. प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स दिनांक ०८ जानेवारी, २०१३ रोजीचे सभेत उघडणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक ०२ (०२) खालील प्रमाणे संमत करणेत आला आहे.

*".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवास, द्वारावती भक्तनिवास व साईआश्रम परिसरातील रस्त्यावर स्पीडब्रेकर बसविणेकामी मे. संजय बी.सुनात, पुणे यांचे कोटेशनमधील दर निम्नतम आहेत. परंतु मे. संजय बी.सुनात, पुणे व इतर कोटेशनधारकांनी दिलेले दर यामध्ये जास्त तफावत दिसून येते. त्यामुळे वरील कोटेशन्स रद्द करुन प्रस्तावित कामी सविस्तर स्पेसिफीकेशन्स नमुद करुन त्यानुसार वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे निविदा मागविणेत याव्यात, अशी शिफारस मान्य करण्यात आली."*

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार सदरहू कामी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, दि. ०१/०४/२०१४ ते दि. १०/०४/२०१४ अखेर कोरे निविदा विक्री व सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. १६/०४/२०१४ अशी मुदत देणेत आली होती. विहीत मुदतीत एकुण चार ठेकेदार/ संस्थांनी निविदा फॉर्म विकत घेतले होते व त्यापैकी खालील तिन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या आहेत.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | श्री. संजय बी. सुनात, पुणे | १०१३ / १६.०४.२०१४ |
| ०२. | महीमा कन्स्ट्रक्शन, पुणे | १०१४ /१६.०४.२०१४ |
| ०३. | व्हरटेक्स रबर प्रोडक्टस्, पुणे | १०५९ /१६.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या तीनही निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१. | श्री. संजय बी. सुनात, पुणे | ६,२९,११८/- | अनुपस्थित |
| ०२. | महीमा कन्स्ट्रक्शन, पुणे | ६,९४,८२०/- | अनुपस्थित |
| ०३. | व्हरटेक्स रबर प्रोडक्टस्, पुणे | ६,३६,७२०/- | **६,२०,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवास व साईआश्रम परिसरातील रस्त्यावर स्पीडब्रेकर बसविणे अत्यावश्यक असल्याने सदरकामी मे.व्हरटेक्स रबर प्रोडक्टस्, पुणे यांचे रु.६,२०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२. **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांच्या दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.६,०८,५६५/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** *"...अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे."*

**मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णयः** दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८८ अन्वये *"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांचे दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणी करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात पसिध्द करुन निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ६,०८,५६५/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली."*

**प्रस्तावः** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये काम करत असलेले अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरीता दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी साईनगर मैदान परिसरामध्ये उत्तर बाजूने शेडची उभारणी करणेत आलेली असून, सदरची व्यवस्था कमी पडत असल्याने दुचाकी वाहने पार्किंगसाठी नव्याने करावयाचे ४.७० x २४ मीटर साईजचे शेड उभारणी व त्याअंतर्गत करावयाचे कामांसाठी येणारे अंदाजे रुपये ६,०८,५६५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात पसिध्द करुन निविदा मागवून करुन घेणेस मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार सदरहू कामी दि. ०५/०४/२०१४ रोजीचे दैनिक देशदुत व दैनिक पुढारी या वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन करुन दि.०७/०४/२०१४ ते दि.१५/०४/२०१४ अखेर कोरे निविदा विक्रीची मुदत देण्यात आली होती. सिलबंद निविदा सादर करणेचे दि.१८/०४/२०१४ पर्यन्तचे अंतीम मुदतीत खालील तीन ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गिरीधर कन्स्ट्रक्शन, अहमदनगर | १०१५ / १६.०४.२०१४ |
| ०२. | रत्ना इंजिनिअर्स, पुणे | ११२७ / १८.०४.२०१४ |
| ०३. | श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव | ११३९ / १८.०४.२०१४ |

**उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदांमधील लिफाफा क्र.०१ आजचे उपसमिती सभेत उघडणेत आला असता, अ.नं. ०२ व ०३ चे ठेकेदारांनी निविदेसोबत आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली नसल्यामुळे ते अपात्र ठरले. यामुळे दरांचा लिफाफा क्र.०२ उघडणेत आला नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिकारी/ कर्मचारी यांच्या दुचाकी वाहने पार्किंग करणेसाठी शेड उभारणीकामी एकच कोटेशन पात्र असल्यामुळे याकामी फेर कोटेशन मागविण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०३. **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता Epoxy Flooring चे काम करणेसाठी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.३७,६९५/-)**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ मधील Epoxy Flooring सध्या निघालेले आहे. कारण सदर Epoxy Flooring हे २०११-१२ या वर्षी केले होते. सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ मध्ये शस्त्रक्रियेच्या कामामुळे ते साधारणतः ३ ते ४ वर्षात खराब होऊन जाते. त्यामुळे त्यात पाणी जाऊन शस्त्रक्रिया गृहात जंतु संसर्ग निर्माण होण्याची शक्यता असते. पर्यायाने याचा त्रास रुग्णांना लवकर बरे न होण्यास (Recover) होतो त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ विभागाने दि.३०/०४/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२०/०६/२०१३) चे मागणी पत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे.

त्यानुसार ऑपरेशन थिएटर विभागाने दिलेल्या मोजमापानुसार अंदाजे खर्चासाठी M/s. Al-med Equipments, Mumbai यांचेकडुन दुरध्वनीद्वारे दरपत्रक मागविले होते. त्यानुसार त्यांनी दि.२९/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये (औषध भांडार ई-मेल प्राप्त दि.०३/१०/२०१३) खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | विभागाचे नाव | साईज | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ | ३१३.५ sq. ft. | १२०.२४ / sqft. | ३७६९५.२४ |

वरीलप्रमाणे काम करुन घेणेकामी अंदाजे ३७६९५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. १३/१२/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.९५७ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ करिता Epoxy Flooring चे काम विहित पद्धतीने कोटेशन मागवून करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे पुर्णांकित रक्कम रु. ३७,६९५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार, इकडील पत्र क्र. ६१९१ दि. ०३/०१/२०१४ अन्वये ९ कोटेशनधारकांकडून दि. १४/०१/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले असून त्यास अनुसरुन ३ कोटेशनधारकांकडून कोटेशन प्राप्त झालेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणेः-

१. M/s. SSB Infrastructure Pvt. Ltd., Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि. ०५/०५/२०१४)
२. M/s. Excel Enterprises, Navi Mumbai (E-mail कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)
३. M/s. AL-MED Equipments, Mumbai (E-mail कोटेशन प्राप्त दि. २५/०४/२०१४)

वरील ०३ कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले असून अ. नं. १ व २ यांना कोटेशन मागणीपत्र नसताना त्यांनी स्वतःहून कोटेशन पाठविलेले आहे, परंतु सदरचे खरेदीकामी कोटेशनधारकांना तगादा करुन देखील कोटेशन प्राप्त होत नाहीत, त्यामुळे तुलनात्मक दर मिळणेकामी त्यांचा फायदा होऊ शकेल.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०१ बंद कोटेशन आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, तीनही कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, दरपत्रकधारक चर्चेसाठी उपस्थित नव्हते. त्यांच्या दरपत्रकधारकामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटैशनधारकाचे नाव | कोटेशनमधील मुळ दर प्रति स्क्वे.फुट रु. |
|---|---|---|
| 1 | M/s. Al-Med Equipments, Mumbai | 112.5 |
| 2 | M/s. Excel Enterprises, Navi Mumbai | 202.50 |
| 3 | M/s. SSB Infrastructure Pvt. Ltd., Mumbai | 180.00 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता Epoxy Flooring चे काम करणेकामीच्या चर्चा/ वाटाघाटीसाठी दरपत्रकधारक सभेसमोर उपस्थित नव्हते, त्यामुळे संबंधीत दरपत्रकधारकांना दरांबाबत चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.-१ करिता Heater Cooler मशिनसाठी Warmer Blanket खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.४८,४१६/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं १ विभागात Heater Cooler मशिन सन २००५ मध्ये खरेदी करण्यात आलेली असून त्यावर रुग्णाचे ऑपरेशन चालू असतांना रुग्णाच्या शरीरातील तापमान कमी झाल्यावर त्यांचे तापमान वाढवणेसाठी उपरोक्त Blanket वापरण्यात येते. सध्या त्यांच्याकडे असलेले Heater Cooler मशिनसाठी लागणारे Blanket हे सन २०१३ मध्ये खरेदी केलेले असून सध्या ते वापरुन लीक (Puncture) झालेले असल्यामुळे त्यांनी दि.२४/०३/२०१४ चे मागणीपत्रान्वये एक नग Warmer Blanket ची मागणी केलेली आहे.

सदर Heater Cooler मशिन हे Maquet कंपनीचे असल्यामुळे सदर मशिनकरिता Maquet कंपनीचेच Blanket खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे सदरचे Blanket खरेदीकामी M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. यांनी पत्र क्र.MCP-WR/०१९/२०१४ दि.२९/०४/२०१४ चे पत्रान्वये सदर Warmar Blanket चे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Warmer Blanket | 1 | 48416.00 | 48416.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **48416.00** |

उपरोक्त १ नग Heater Cooler मशिनसाठी लागणारे Blanket खरेदीकामी अंदाजे रु. ४८४१६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर १ नग Blanket हे M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांचेकडुनच खरेदी करावे लागणार असल्यामुळे त्यांचेकडुन दरात अजुन सुट मिळणेकामी त्यांना मा. त्रीसदस्य समिती सभेपुढे समक्ष बोलावून चर्चा / वाटाघाटी करुन अंतीम निर्णय घेता येईल.

तरी M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांना आजचे सभेपुढे दरात सुट मिळणेकामी चर्चा/ वाटाघाटी साठी बोलविण्यात आलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०१ दरपत्रक आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकास समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| 01 | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 48,416/- | 43,574/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.-१ करिता Heater Cooler मशिनसाठी Warmer Blanket खरेदीकामी मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा.लि., मुंबई यांचे रु.४३,५७४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०५. सन २०१३-१४ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीमधील दर प्राप्त न झालेल्या साबण, निरमा, बॅटरी सेल इ.साहित्य खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.४,९४,६८७/-)**

श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरिता दैनंदिन वापरासाठी लागणारे साबण, निरमा, बॅटरी सेल, पेन्सील सेल, गम बुट इ.साहित्य दरवर्षी वार्षिक औषधे खरेदीमध्ये निविदा मागवून खरेदी करण्यात येतात. त्याचप्रमाणे यावर्षी वार्षिक औषधे खरेदीमध्ये देखील सदर साहित्याचे ई- निविदा मागविण्यात आली होती.

परंतु सदर साहित्याकरिता ई- निविदेद्वारे कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही. सदरचे साहित्य किरकोळ स्वरुपाचे असल्यामुळे त्याकरीता कोणीही निविदा भरत नाही, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. ह्यासाठी दरवर्षी आवश्यकतेनूसार, स्थानिक पुरवठा धारकांकडून कोटेशन मागवून खरेदी करण्यात येत असतात. दोन्ही रुग्णालयांच्या दैनंदिन वापरासाठी वार्षिक मागणीतील खालीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Simple Shaving Blades Qty. in Nos. | 15,000 | 0.95 | 14,250.00 |
| 02. | Torch Stainless steel/Plastic of 2 Cell | 50 | 196.88 | 9,844.00 |
| 03. | Lifebuoy Soap 125 GM | 1,500 | 19.37 | 29,055.00 |
| 04. | Nirma Washing Powder Packing in KG | 700 | 35.83 | 2,50,810.00 |
| 05. | Steel Battery Cell Hyper (Pencil) | 600 | 12.70 | 7,620.00 |
| 06. | Steel Battery Cell Hyper (Big) | 400 | 10.00 | 4,000.00 |
| 07. | Steel Battery Cell Hyper (Medium) | 600 | 4.10 | 2,460.00 |
| 08. | Battery Cell 9.0 Volt (For Pacemaker) | 100 | 20.00 | 2,000.00 |
| 09. | Shoes For O.T. & ICU Staff (Pair) No. 6, 7, 9 (Each 35) | 105 | 300.00 | 31,500.00 |
| 10. | Shoes For CVTS Of Staff | 100 | 29.48 | 2,948.00 |
| 11. | Plastic Slipper for O.T. & Wards (X Type) size 6,7,8,9, 10 (Each 100 Pair) | 500 | 132.75 | 53,200.00 |
| 12. | Rubber Slipper Size 6, 7, 8, 9, 10 each 100 pair | 500 | 150.00 | 75000.00 |
| 13. | Gum Boot No. 9, 10 below knee Rubber each 12 | 24 | 500.00 | 12000.00 |
| | **Total** | | | **4,94, 687.00** |

उपरोक्तप्रमाणे, खरेदीस अंदाजे रु. ४,९४,६८७/- (अक्षरी रुपये चार लाख चौऱ्याण्णव हजार सहाशे सत्याऐंशी मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खरेदीस वार्षिक औषधे २०१३-१४ खरेदीमध्ये दि.२६/०७/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समिती सभेच्या निर्णय क्र.५६४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

दि.०७/०३/२०१४ रोजीचे मंजुर टिपणीन्वये उपरोक्त साहित्य खरेदीकामी कोटेशन मागविण्यास मंजुरी मिळालेली असून त्यानुसार एकूण ९ कोटेशनधारकांकडून दि. १९/०४/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरुन ५ कोटेशन प्राप्त झाले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

१. M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. २०/०४/२०१४)
२. M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. १४/०४/२०१४)
३. M/s. Royal Shoes, Shirdi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)
४. M/s. Global Enterprises, Sangamner (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)
५. M/s. Bafana General Stores, Shirdi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)

अ. नं. २ ते ५ हे मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे. तर अ. नं. २ व ४ ह्यांना कोटेशन मागणी पत्र पाठविले नसून त्यांनी स्वतःहून कोटेशन पाठविले आहे. तुलनात्मक दर मिळणेच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकतो, त्यामुळे वरील दोन कोटेशन विचारात घ्यावे असे मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०५ कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, एकही कोटेशनधारक सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित नव्हते. त्यांनी कोटेशनमध्ये दिलेल्या मुळ दरांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | कोटेशनमधील मुळ दर प्रती नग रु. |
|---|---|---|
| 1 | **Simple Shaving Blades (1,500 Nos.)** | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 0.80 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 0.85 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 0.88 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | 1.24 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| 2 | **Torch Stainless steel/Plastic of 2 Cell (500 Nos.)** | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 70.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | |
| 3 | **Lifebuoy Soap 125 GM (1,500 Nos.)** | |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | 19.38 |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 21.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 22.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 23.00 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| 4 | **Nirma Washing Powder Packing in KG (700 Nos.)** | |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | 35.56 |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 40.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 41.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 42.50 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| 5 | **Steel Battery Cell Hyper (Pencil) (600 Nos.)** | |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | 5.78 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 6.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 6.50 |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 6.50 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| 6 | **Steel Battery Cell Hyper (Big) (400 Nos.)** | |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | 13.33 |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 15.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 16.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 18.00 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| 7 | **Steel Battery Cell Hyper (Medium) (600 Nos.)** | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 12.00 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | 12.44 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | |
| 8 | **Battery Cell 9.0 Volt (For Pacemaker) (100 Nos.)** | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | 15.00 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | 28.44 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 34.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 35.00 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| 9 | **Shoes For O.T. & ICU Staff (Pair) No. 6, 7, 9 (Each 35) (105 Nos.)** | |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 150.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 160.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 240.00 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | |

| | | |
|---|---|---|
| 10 | **Shoes For CVTS Of Staff (100 Nos.)** | |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 125.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 130.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 150.00 |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | 160.00 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | |
| 11 | **Plastic Slipper for O.T. & Wards ( X Type) size 6, 7, 8, 9, 10 (Each 100 Pair) (500 Nos.)** | |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 100.00 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | |
| 12 | **Rubber Slipper Size 6,7,8,9,10 each 100 pair (500 Nos.)** | |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | 80.00 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | 85.00 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | 90.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 95.00 |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | 95.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 100.00 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | |
| 13 | **Gum Boot No. 9, 10 below knee Rubber each 12 (24 Nos.)** | |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 200.00 |
| | M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar | 375.00 |
| | M/s. Gangwal A. S. & Co., Shirdi | |
| | M/s. Royal Shoes, Shirdi | |
| | M/s. Global Enterprises, Sangamner | |
| | M/s. Bafana General Stores, Shirdi | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीमधील दर प्राप्त न झालेल्या साबण, निरमा, बॅटरी सेल इ.साहित्य खरेदीकामीच्या चर्चा/ वाटाघाटीसाठी कोटेशनधारक सभेसमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे संबंधीत कोटेशनधारकांना दरांबाबत चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०६. <u>श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागाकरिता Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.५३,५९२/-)</u>**

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेली कोटेशन्स दि.२६.०४.२०१४ रोजीचे उपसमिती सभेत उघडलेली होती. आजचे सभेत दरांवर चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी एकही कोटेशनधारक सभेसमोर उपस्थित नसल्यामुळे सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०७. <u>सी.टी. स्कॅन मशिनचे १६० के.व्ही.ए. यु.पी.एस. च्या बॅटरीज खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.७,४६,७६०/-)</u>**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन मशिन करीता सोकोमॅक कंपनीचे ०१ नग १६० KVA यु.पी.एस. च्या बॅटरीज बदलणेकामी मा. व्य. समिती सभेच्या दि. ०८/०१/२०१४ चे सभेतील विषय क्र. २२ व निर्णय क्र. २१ अन्वये सविस्तर चर्चा होउन, सी.टी.स्कॅन मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज विहीत पध्दतीने निवीदा मागवून खरेदी करणेसाठी दर निश्चीत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु.७,४६,७६०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील विविध पुरवठा धारक कंपन्यांना इकडील पत्र क्र.१७३/ २०१४, दि.०८/०४/२०१४ अन्वये निवीदा बाबत सुचित करणेत आले.

1) M/s. Choice Solutions Limited, Pune
2) M/s. Consul Consolidated Pvt. Ltd, Mumbai
3) M/s. M/s. Socomec Innovative Powar Soultions Pvt. Ltd, Chennai
4) M/s. Saitrons Medical Equipments, Loni
5) M/s. Tejas Electronics, Ahmednagar
6) M/s. Anuradha Agro Service, Loni Khurd

7) M/s. Shri Sai Battery Service, Shirdi
8) M/s. Borawke Electricals, Kopargaon
9) M/s. Exide-point , Nagar
10) M/s. Shri Sai Agro Agency, Loni
11) M/s. Switching AVO Electropower ltd. Mumbai
12) M/s. Hariom Electronics & Electricals, Loni

तसेच विविध वर्तमान पत्रामध्ये सदर निवीदा बाबत जाहिरात देण्यात आली होती.सदर निवीदा श्री साईबाबा हॉस्पीटलचे बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागात व श्री साईबाबा संस्थानचे मुंबई कार्यालयात दि. १०/०४/२०१४ ते २५/०४/२०१४ या कालावधीत विक्री साठी ठेवणेत आल्या होत्या. सदर निवीदा स्वीकारण्याची अंतिम तारीख २८/०४/२०१४ ही होती. दि. २८/४/२०१४ अखेरीस खालीलप्रमाणे निवीदा प्राप्त झालेल्या आहेत.

1) M/s. Southern Batteries Pvt. Ltd. Bangalore
2) M/s. Silvex Exports Pvt. Mumbai
3) M/s. Socomec Innovative power Solutions Pvt. Mumbai
4) M/s. Tejas Electronics, Ahmednagar
5) M/s. Exide-point , A. Nagar
6) M/s. Shri Sai Agro Agency, Loni

तरी सी.टी.स्कॅन मशिनचे १६० KVA यु.पी.एस. च्या बॅटरीज खरेदी करणेसाठी दर निश्चित करणेस प्राप्त निवीदा उघडुन संबंधीत कंपनींच्या प्रतिनीधीसोबत प्रत्यक्ष चर्चा/ वाटाघाटी करून निर्णय घेणेबाबत मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| 01 | M/s. Southern Batteries Pvt. Ltd. Bangalore | 11272/- | अनुपस्थित | ०२ वर्षे **(अपात्र)** |
| 02 | M/s. Silvex Exports Pvt. Mumbai | 10890/- | 10778.23 | ०३ वर्षे |
| 03 | M/s. Socomec Innovative power Solutions Pvt. Mumbai | 11313.06 | 10437.50 | ०२ वर्षे |
| 04 | M/s. Tejas Electronics, Ahmednagar | 10687.00 | **10152.65** | ०३ वर्षे |
| 05 | M/s. Shri Sai Agro Agency, Loni | 9618.75 | 9618.75 | ०२ वर्षे **(अपात्र)** |
| 06 | M/s. Exide-point, A. Nagar | 11250.00 | अनुपस्थित | **(अपात्र)** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदेमध्ये Rocket कंपनीच्या बॅटरीज करीता दर मागविणेत आले होते, परंतु M/s. Southern Batteries Pvt. Ltd., Bangalore, M/s. Shri Sai Agro Agency, Loni व M/s. Exide- Point, A. Nagar या निविदाधारकांनी Rocket कंपनीच्या बॅटरीज करीता निविदा सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे या तीन निविदांचा विचार करण्यात आला नाही.**

**सी.टी. स्कॅन मशिनचे १६० के.व्ही.ए. यु.पी.एस. च्या Rocket कंपनीच्या ६४ नग बॅटरीज खरेदीकामी M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांचे ३ वर्षांच्या वॉरंटीसह प्रती नग रु.१०,१५२.६५ मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,४९,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०८. क्ष-किरण निर्मिती करणाऱ्या मशिन्सचे Quality Assurance Test करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत. (रु.७५,२८१/-)**

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागांमध्ये क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे Quality Assurance Test करणेकामी मा. व्य. समिती सभेच्या दि. ०८/०१/२०१४ चे सभेतील विषय क्र. २१ व निर्णय क्र. २० अन्वये सविस्तर चर्चा होउन, क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे Quality Assurance Test विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून विहीत पध्दतीने QA Test निम्नतम दराने करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे किंमत रु.७५,२८१/-चे खर्चास तसेच पुढील पाच वर्षांकरीता दर निश्चीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील विविध QA Test करणाऱ्या खालील कंपन्यांना इकडील पत्र क्र.७७४२/ २०१४, दि.१२/०३/२०१४ अन्वये कोटेशनची मागणी करण्यात आली होती.

१) मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे
२) मे. रेडीओलॉजिकल प्रेसिजन लॅब्स इं. प्रा. लि. ठाणे
३) मे. ओमेगा बायोमेडीकल सर्व्हीसेस, मुंबई
४) मे. टीबीएस इंडिया टेलेमॅटीक ॲन्ड बायोमेडीकल सर्व्हीसेस प्रा. लि. बैंगलोर
५) मे.हिया मेडिकल सिस्टीम,मुंबई
६) मे.रेननटेक लॅब्रोटरीज् प्रा.लि.,मुंबई

वरील पैकी खालील प्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१) मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे
२) मे. ओमेगा बायोमेडीकल सर्व्हीसेस, मुंबई
३) मे. टीबीएस इंडिया टेलेमॅटीक ॲन्ड बायोमेडीकल सर्व्हीसेस प्रा. लि. बैंगलोर
४) मे.हिया मेडिकल सिस्टीम,मुंबई
५) मे.रेननटेक लॅब्रोटरीज् प्रा.लि.,मुंबई

क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे Quality Assurance Test करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०५ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ. क्र. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशन मधील दर रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे | Rs.57,500/-(10% escalation every year) | Rs.47,000/- (10% escalation every year) |
| ०२ | मे.रेननटेक लॅब्रोटरीज् प्रा.लि.,मुंबई | Rs.51,000/- (10% escalation every year) | **1st year Free & 2nd year Rs.48,450/- after that 10% escalation every year** |
| ०३ | मे. ओमेगा सर्व्हीसेस, मुंबई | Rs.74,000/- | Rs.66,600/- (10% escalation every year) + Service Tax |
| ०४ | मे. टीबीएस इंडिया टेलेमॅटीक ॲन्ड बायोमेडीकल सर्व्हीसेस प्रा. लि. बैंगलोर | Rs.1,12,365/- | Rs.1,12,365/- |
| ०५ | मे.हिया मेडिकल सिस्टीम, मुंबई | Rs.64,607/- | Rs.55,000/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकण करता, क्ष-किरण निर्मिती करणाऱ्या मशिन्सचे Quality Assurance Test करणेकामी मे.एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुण यांचे दर निम्नतम आहेत. परंतु मे.रेननटेक लॅब्रोटरीज् प्रा. लि. मुंबई ही कंपनी पहिल्या वर्षाकरीता मोफत Quality Assurance Test करणार असुन दुसऱ्या वर्षाकरीता सर्व करांसहीत Rs.४८,४५०/- व त्यापुढे प्रत्येक वर्षाकरीता १०% वाढ याप्रमाणे Quality Assurance Test करणार असल्यामुळे मे.रेननटेक लॅब्रोटरीज् प्रा. लि. मुंबई यांनी दिलेल्या दराने पुढील पाच वर्षांकरीता Quality Assurance Test करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०९. <u>द्वारावती भक्तनिवास इमारतीकरीता लोखंडी बॅरीकेडस् तयार करुन देणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.३७,६५०/-)</u>**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४-०२-२०१४ चे सभेतील विषय क्र.४० निर्णय क्र.११९ निर्णयानुसार व्दारावती भक्तनिवास इमारतीकरीता लोखंडी बॅरीकेडस् तयार करुन देणेकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३७,६५०/- मात्र चे खर्चास तसेच बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत/ ३७२/ २०१४ दि.२१-०४-२०१४ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत. कोटेशनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.आशा इंजिनिअरींग वर्क्स, अहमदनगर |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०३) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे व्दारावती भक्तनिवास इमारतीकरीता लोखंडी बॅरीकेडस् तयार करुन देणेकामी प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.आशा इंजिनिअरींग वर्क्स, अहमदनगर | ५७,२१८/- | अनुपस्थित |
| ०२ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. | ७७,२८८/- | ५७,२८८/- |
| ०३ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ५५,५९८/- | **५०,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीकरीता लोखंडी बॅरीकेडस् तयार करुन देणेकामी मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव यांचे रु.५०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**१०. श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, साईनिवास अतिथीगृह व द्वारावती इमारत याठिकाणी बसविण्यात आलेल्या संपुर्ण सोलर प्लॉट यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन फेर ई- निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत. (रु.१०,००,०००/-)**

मा.व्य.समितीच्या दिनांक २१.०६.२०१३ चे सभेतील विषय क्र. ५६ निर्णय क्र. ४८९ अन्वये. श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी बसविण्यात आलेल्या संपूर्ण सोलर प्लांट यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०३-२०१४ ते दिनांक २८-०२-२०१५ या कालावधीकरीता देणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.३०-०१-२०१४ रोजी, दै.नवाकाळ, मुंबई,दै.संध्यानंद पुणे व दै.सामना औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३१-०१-२०१४ ते दि.१५.०२.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत.तसेच तांत्रिक लिफाफा (Technical Bid) दि.१७.०२.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात एकच निविदाधारकांचे (हार्ड कॉपी) तांत्रिक लिफाफा प्राप्त झालेला होता.

दि.०७.०३.२०१४ रोजी सदर कामाकरिता भरलेले एकच ऑनलाईन दरपत्रक (कमर्शियल बीड) मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढ उघडणेकामी विद्युत विभागामार्फत टिपणी सादर करणेत आली होती. सदर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी RETENDERING करा असे आदेश दिले आहे.

त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन फेर-निविदा मागविणेकामी दि.१०-०४-२०१४ रोजी दै.पुढारी, या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११-०४-२०१४ ते दि.२५.०४.२०१४ अखेर फेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत.तसेच तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफा (Technical Bid ) दि.२८.०४.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात ०५ निविदाधारकांचे (हार्ड कॉपी ) तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त ०५ निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे दि.२८.०४.२०१४ रोजी मा.प्रशासकिय अधिकारी (विद्युत) यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाशाखा व संस्थानचे अंतर्गत लेखातपासणीस यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख २८.०४.२०१४ अशी होती. सदर ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा आय.टी.विभागामार्फत दि.२८.०४.२०२४ रोजी उघडण्यात आल्या.

दि.२५.०४.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारक

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.नोवस रेमिडीज प्रा.लि., अंधेरी (ईस्ट ) मुंबई |
| ०२) | मे.जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव |
| ०३) | मे. अश्विनीकुमार कृषी सेवा केन्द्र , नारायणगांव |
| ०४) | श्री. व्ही.व्ही. तवले , अहमदनगर |
| ०५) | मे. युनिक सोलर सिस्टीम, नाशिक |

श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी बसविण्यात आलेल्या संपूर्ण सोलर प्लांट यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामाकरिता प्राप्त झालेल्या ऑनलाईन फेर ई-निविदा (कर्मशियल बीड) आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.नोवस रेमिडीज प्रा.लि., अंधेरी (ईस्ट ) मुंबई | १९,५५,०००/- | १०,९९,९००/- |
| ०२ | मे.जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव | १३,९६,७५०/- | १२,२९,१४०/- |
| ०३ | मे. अश्विनीकुमार कृषी सेवा केन्द्र, नारायणगांव | २१,०२,५००/- | २१,००,०००/- |
| ०४ | श्री. व्ही.व्ही. तवले , अहमदनगर | १९,५२,०००/- | अनुपस्थित |
| ०५ | मे. युनिक सोलर सिस्टीम, नाशिक | ११,०५,०००/- | **९,९०,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, साईनिवास अतिथीगृह व द्वारावती इमारत याठिकाणी बसविण्यात आलेल्या संपुर्ण सोलर प्लॅंट यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मे.युनिक सोलर सिस्टीम, नाशिक यांचे रु.९,९०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**११. परांच्या (Scaffolding) खरेदी करणेकामी प्राप्त झालेली फेर कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.१,५०,०००/-)**

मा.त्रीसदस्य समितीच्या दिनांक ३०.०३.२०१३ चे सभेतील विषय क्र. २८ निर्णय क्र. २८९ अन्वये परांच्या (Scaffolding) खरेदी करणेकरीता येणाऱ्या रु. १,५०,०००/- इतक्या अंदाजित खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती.त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत /१२८३ /२०१३ दि.१४-०६-२०१३ अन्वये १४ ठेकेदारांकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. त्यानुसार ०२ कोटेशन्स प्राप्त झाली होती.परतू या दोन कोटेशन्समधील मे.मारुती स्टील फॅब, पुणे यांनी ई.एम.डी.चा डि.डि.सोबत जोडलेला नसल्याने ते अपात्र झाले होते, त्यामुळे परांच्या (Scaffolding) खरेदी करणेकामी पुन्हा फेर-कोटेशन बोलविणेकामी मा.त्रीसदस्य समितीच्या दि.०८.१०.२०१३ चे सभेतील विषय क्र.३२ निर्णय क्र. ७३४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस /विद्युत /५७७ /२०१४ दि.०३-०५-२०१४ अन्वये बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून पत्र पाठवून पुन्हा फेर कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत.

परांच्या (Scaffolding) खरेदी करणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून प्राप्त झालेली फेर- कोटेशन्सचा तपशील अनुक्रमे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | फेर कोटेशन धारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०२) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०३) | मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे परांच्या (Scaffolding) खरेदी करणेकामी प्राप्त झालेली ०३ फेर- कोटेशन्स आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. | ३,१५,०००/- |
| ०२ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | १,६८,०००/- |
| ०३ | मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक | २,००,०००/- (ईएमडी नसल्याने अपात्र) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, परांच्या (Scaffolding) खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ०३ फेर कोटेशनमधील मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक हे अपात्र ठरल्यामुळे दोनच कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते, चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी कमीत-कमी तीन कोटेशन असणे आवश्यक असल्यामुळे, याकामी फेर निविदा मागविणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**१२. चेंज ओव्हर स्विचेस खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.३,७४,०००/-)**

मा.त्रीसदस्य समितीचे दि.१२-१२-२०१३ चे सभेतील विषय क्र.३२ निर्णय क्र.९६४ अन्वये चेंज ओव्हर स्विचेस खरेदी करणेकामी कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,७४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत /५७५/ २०१४ दि.०३-०५-२०१४ अन्वये विद्युत ठेकेदाराकडून पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. कोटेशन सबमिट करतेवेळी ठेकेदारांनी अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम रु.३,८००/- व कोटेशन फॉर्म रक्कम रु.५००/- अशा प्रकारे दोन्ही रकमा भरल्याचा पुरावा कोटेशन फॉर्म सोबत जोडणे आवश्यक राहील असे त्यांना पाठविलेल्या कोटेशन फॉर्मच्या सोबतच्या पत्रात नमुद करण्यात आलेले आहे. तसेच संस्थानच्या वेबसाईटवर कोटेशन नोटीस दि.०५-०५-२०१४ रोजी अपलोड केलेली होती. वेबसाईटवर ही जाहिरात दि.१५-०५-२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती. कोटेशनची विक्री दिनांक ०५-०५-२०१४ ते दि. १३-०५-२०१४ अशी होती.

चेंज ओव्हर स्विचेस खरेदी करणेकामी विद्युत ठेकेदारांकडून प्राप्त झालेल्या कोटेशनचा तपशील अनुक्रमे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशन धारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव |
| ०२) | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं., अंबड, नाशिक |
| ०३) | मे.गुरु इंजिनिअरिंग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स ,नाशिक |
| ०४) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक |
| ०५) | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे चेंज ओव्हर स्विचेस खरेदी करणेकामी प्राप्त झालेली ०५ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव | ४,११,४००/- | ४,११,४००/- |
| ०२ | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं., अंबड, नाशिक | ४,३०,१००/- | **३,८७,०९०/-** |
| ०३ | मे.गुरु इंजिनिअरिंग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स ,नाशिक | ४,११,४००/- | अनुपस्थित |
| ०४ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक | ४,५२,५४०/- | ४,५२,५४०/- |
| ०५ | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ४,०७,६६०/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, चेंज ओव्हर स्विचेस खरेदी करणेकामी मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं., अंबड, नाशिक यांचे रु.३,८७,०९०/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**१३. सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलकरिता रिव्हॉल्वींग चेअर (खुर्ची) खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.१,३३,०००/-)**

मा.त्रीसस्य समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३९ नुसार सिक्युरीटी कंट्रोल सेलसाठी आवश्यक असलेल्या १४ नग Revoling Chair with Hand देणगी स्वरुपात मिळाल्यास घेणेत याव्यात अथवा विहित पद्धतीने खरेदी करणेत याव्यात. तसेच याकामी येणारे अंदाजे रु.१,३३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचा प्रस्ताव दि.०३.०५.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता. त्यामध्ये सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभागाने गोदरेज कंपीनचे Bravio MID Black, Colour- Grape Riot or Wild Flemingo मॉडेलच्या खुर्च्या खरेदी करुन मिळणेबाबत कळविलेले होते.

त्यानुसार संस्थानचे नियमीत पुरवठा धारक यांचे पत्यावर उपरोक्त खुर्ची खरेदी कामी कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून दरपत्रके मागणी करणेत आलेली होती.त्याची अंतीम मुदत दि.१७.०५.२०१४ अशी ठेवलेली होती. मुदतीअंती तीन दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **दरपत्रकधारकाचे नांव** | **आवक नंबर व दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | मे.खंडेलवाल स्टिल फर्निचर, अहमदनगर | २६८१/१६.०५.२०१४ |
| ०२. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | २६८२/१६.०५.२०१४ |
| ०३. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | २७७३/१७.०५.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील प्रती नग दर रु. | चर्चेअंती देऊ प्रती नग केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.खंडेलवाल स्टिल फर्निचर, अहमदनगर | ८२२०/- | अनुपस्थित |
| ०२ | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | ७५४५/- | ७३९०/- |
| ०३ | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ७३३९/- | **७२९९/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलकरिता १४ नग रिव्हॉल्वींग चेअर (खुर्च्या) खरेदीकामी मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर यांचे प्रती नग रु.७,२९९/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही-प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१४. साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी उशा व उशी कव्हर खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून दरपत्रकधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.२,००,०००/-)**

मा.त्रीसदस्य समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४५ नुसार साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी आवश्यक उशा व उशी कव्हर खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.२,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि. २१.०४.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता. त्यामध्ये साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी उशा व उशी कव्हर खरेदी करुन मिळणेबाबत कळविले होते.

त्यानुसार संस्थानचे नियमीत पुरवठा धारक यांचे पत्यावर उशा व उशी कव्हर खरेदी कामी कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून उशा व उशी कव्हर खरेदीकामी दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्याची अंतीम मुदत दि.१३.०५.२०१४ अशी ठेवलेली होती. मुदतीअंती एकच दरपत्रक प्राप्त झालेले होते. लेखापरिक्षणाचे दृष्टीकोनातुन कोणतीही खरेदी करणेसाठी कमीत कमी तीन दरपत्रके असणे आवश्यक असते.

त्यामुळे इतर दरपत्रकधारकांना दुरध्वनीवरुन दरपत्रके पाठविणेबाबत कळविले असता मुदतीनंतर चार दरपत्रकधारकांनी दरपत्रके पाठविली आहेत. त्यामुळे मुदतीअंती एक व मुदतीनंतर चार असे एकुण पाच दरपत्रके प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **दरपत्रकधारकाचे नाव** | **आवक नंबर व दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | मे.कॉन्टॅक कंफोर्टस प्रा.लि., वडगाव आमली | २४४१/१२.०५.२०१४ |
| ०२. | मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे | २५८४/१४.०५.२०१४ |
| ०३. | मे. गोदरेज अँण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि. पुणे | २५८१/१४.०५.२०१४ |
| ०४. | मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे | २८८३/१९.०५.२०१४ |
| ०५. | मे.बिन्नी शो रूम, पुणे | २८३७/१९.०५.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता एकही दरपत्रक धारक उपस्थित नव्हते.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी उशा व उशी कव्हर खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे हे एकमेव दरपत्रकधारक उपस्थित होते. चर्चा/ वाटाघाटीसाठी कमीत-कमी ०३ दरपत्रकधारक उपस्थित असणे आवश्यक असल्यामुळे उघडणेत आलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा व संबंधीत दरपत्रकधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१५. फुटाणे, विडयाची पाने व पावडर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी प्राप्त झालेले बंद निविदा उघडणे व न्युनतम दर निश्चित करणेबाबत.**

प्रति वर्षाप्रमाणे माहे-एप्रिल-२०१४ ते माहे-मार्च-२०१५ अखेर या आर्थिक वर्षाकरिता फुटाणे, विड्याची पाने, पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्यीय समिती दि.०४/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ११६ नूसार जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात दि.२९/०३/२०१४ रोजी जाहिरात देवून बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविण्यात आलेले आहेत. निवीदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.०५/०४/२०१४ अशी अंतिम तारीख नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा (दरपत्रके) जमा झालेले आहेत.

**अ) फुटाणे प्रसाद कोटेशन** (अंदाजे मागणी- ४५० किलो, अंदाजे खर्च रु.२७,०००/-)

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं. प्रो.प्रा.किशोर गंगवाल, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर- ४२३ १०९ | ०२९४/ ०४.०४.२०१४ |
| ०२ | श्री.ईश्वर आधार साटोटे, मु.पो.ता.कोपरगाव, जि.अहमदनगर | ०३३५/ ०४.०४.२०१४ |
| ०३ | सचिन जनरल स्टोअर्स, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर | ०३५१/ ०५.०४.२०१४ |
| ०४ | दिपाली एन्टरप्रायजेस, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३५२/ ०५.०४.२०१४ |

**ब) विड्याच्या पानांचे कोटेशन** (अंदाजे मागणी- ४,००,००० नग अंदाजे खर्च रु.१,२०,०००/-)

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.किशोर चित्ते, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३४९/०५.०४.२०१४ |
| ०२ | श्री.दिपक देवराम आहेर, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर (मो. ९०११९००९९९) | ०३५०/०५.०४.२०१४ |
| ०३ | श्री.श्याम बाळासाहेब लोंढे, मु.पो.गणेशनगर, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३९१/०५.०४.२०१४ |

**क) पावडर मार्बल मूर्तीचे कोटेशन** (अंदाजे मागणी- ५०+१००+७५ नग, अंदाजे खर्च रु.६१,०००/-)

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.विरेश जैस्वाल, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर | ०३२७/०४.०४.२०१४ |
| ०२ | साई चैतन्य स्टोअर्स, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३९२/०५.०४.२०१४ |
| ०३ | द्वारकामाई स्टोअर्स, प्रो.प्रा.जे.के.संकलेचा, द्वारकामाईचे जवळ, शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३९०/०५.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे गोवरीचे ०६ कोटेशन्स, फुटाणे प्रसाद ०४ कोटेशन्स, विड्याच्या पानांचे ०३ कोटेशन्स, पावडर मार्बल मूर्तीचे ०३ कोटेशन्स असे सर्व कोटेशन्स मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेस व न्युनतम दर निश्चित करणे करीता मा त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

उपरोक्त अ) प्रमाणे फुटाणे प्रसाद खरेदी प्राप्त झालेली ०४ कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील दर प्रती किलो रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर प्रती किलो रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं. प्रो.प्रा.किशोर गंगवाल, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, | ५०.०० | ५०.०० |
| ०२ | श्री.ईश्वर आधार साटोटे, मु.पो.ता.कोपरगाव, जि.अहमदनगर | ४५.०० | **४५.००** |
| ०३ | सचिन जनरल स्टोअर्स, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर | ६५.०० | ६५.०० |
| ०४ | दिपाली एन्टरप्रायजेस, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ६०.०० | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागासाठी आवश्यक असलेले फुटाणे खरेदी करणेकामी श्री.ईश्वर आधार साटोटे, मु.पो.ता.कोपरगाव यांचे विना टरफल फुटाण्यासाठीचे प्रती किलो रु.४५/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच विड्याची पाने व पावडर मार्बल मुर्ती खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी एकही कोटेशनधारक उपसमिती सभेसमोर उपस्थित नसल्यामुळे, उघडलेल्या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा व संबंधीत कोटेशनधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलाविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

१६. **बसेसच्या शिटांचे कामाकरीता प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून पुढील निर्णय होणेबाबत. (रु.३,५०,०००/-)**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१३४ नुसार, वाहन विभागाकडील वापरात असलेल्या ७ बसेसच्या शिटांचे कुशन व त्यावरील कापडी खोळी सततच्या वापरामुळे खराब झालेल्या असलेने शिटांना कुशन करणे कामी रेक्झीन व खोळी शिवणे कामी कापड खरेदी करणेस तसेच नवीन कुशन करणे व कापडी खोळी शिलाई मजुरी या कामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार बसेस करीता नवीन रेक्झीन व कापड खरेदी कामी परिसरातील पुरवठाधारक यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/५७८/२०१४ दि.०२/०५/२०१४ चे पत्राने तसेच बसेसच्या शिटांना कुशन करुन कापडी खोळी शिवणे याकामी परिसरातील कुशन वर्क्स यांचेकडुन जा.नं.एसएसएस/ वाहन/ ६६२/ २०१४ दि.०८/०५/२०१४ चे पत्राने कोटेशन बोलाविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेली कोटेशन्स खालील प्रमाणे.

**अ) नवीन रेक्झीन व कापड खरेदी कामी प्राप्त झालेली कोटेशनः-**

| **अ.नं.** | **पुरवठधाकारचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|---|
| ०१ | तलवार फर्निशींग, श्रीरामपुर | २५२५-१३/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०२ | आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर | २५२६-१३/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०३ | राहुल रेग्झीन हाऊस, श्रीरामपुर | २५८३-१४/०५/२०१४ | बंद कोटेशन |

**ब) शिटांना नवीन कुशन करुन कापडी खोळी शिवणे कामी मजुरीचे प्राप्त झालेली कोटेशनः-**

| **अ.नं.** | **पुरवठधाकारचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|---|
| ०१ | सदगुरु कुशन, कोपरगांव | २४४६-१२/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०२ | जावेद कुशन, कोपरगांव | २४४७-१२/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०३ | कमल कुशन, कोपरगांव | २४४८-१२/०५/२०१४ | बंद कोटेशन |

तरी वरील प्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून पुढील निर्णय घेणे बाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णया करीता सविनय सादर.

शिटांना नवीन कुशन करुन कापडी खोळी शिवणे कामी प्राप्त झालेली ०३ कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** | **कोटेशनमधील दर रु.** | **चर्चेअंती देऊ केलेला दर रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | सदगुरु कुशन, कोपरगांव | १,४९,३१०/- | १,४६,३१०/- |
| ०२ | जावेद कुशन, कोपरगांव | १,६०,६५०/- | अनुपस्थित |
| ०३ | कमल कुशन, कोपरगांव | १,४०,२३८/- | **१,३९,२३८/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बसेसच्या शिटांना नविन कुशन करुन कापडी खोळी शिवणेकामी मे.कमल कुशन, कोपरगांव यांचे रु.१,३९,२३८/- मात्र निम्नतम मजुरी दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच, बसेसच्या शिटांकरीता नवीन रेक्झीन व कापड खरेदी कामी उघडणेत आलेल्या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा व संबंधीत कोटेशनधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे बोलाविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही -वाहन विभागप्रमुख)

---

१७. **दोन्ही साईनिवास करीता पडदे शिलाईकामी प्राप्त दरपत्रके उघडणेबाबत. (रु.१,००,०००/-)**

मा.त्रीसदस्यीय समितीचे दि.१७/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६७० नुसार साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील दोन्हीही साईनिवास करीता पडदे शिलाई करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार आयलेट प्रकारचे पडदे शिलाई करणारे टेलर्स यांचे पत्यांवर इकडील विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-सा.प्र.नि/५१७/२०१४ दि.२९/०४/२०१४ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचे कडून दोन्हीही साईनिवास करीता पडदे शिलाई कामाचे दि.०८/०५/२०१४ अखेर ०५ दरपत्रके मागणी करण्यात आली होती. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे फक्त ०३ कोटेशन्स धारकांचे कोटेशन्स इकडील कार्यालयास प्राप्त झालेली आहेत.

| अ नं | कोटेशन धारकाचे नाव, गाव | प्र.शाखा आवक नं. व दिनांक | प्राप्त बाबतचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.व्यंकटेश फर्निशिंग, राहाता | २२१९, दि.०७/०५/२०१४ | बंद पाकीट | विहीत मुदतीत |
| ०२ | मे.सुवर्णा हायटेक गारमेंट्स, पुणे | वशी/आय.टी./१९७५ दि.०८/०५/२०१४ | ई - मेल द्वारे | विहीत मुदतीत |
| ०३ | मे.मद्रास हॅन्डलुम हाऊस, नाशिक | २५१५, दि.१३/०५/२०१४ | उघडलेले प्राप्त | मुदती नंतर |

उपरोक्त पैकी अ.नं.०३ मे.मद्रास हॅन्डलुम हाऊस, नाशिक यांचे कोटेशन्स मुदतीनंतर दि.१३/०५/२०१४ रोजी उघडलेल्या स्थितीत इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. मात्र तीनच कोटेशन्स आली असल्याने त्याचा विचार करणेस हरकत नाही. त्यामुळे उपरोक्त पैकी फक्त एकच कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ. नं | तपशिल | मे.व्यंकटेश फर्निशिंग, राहाता | | मे.सुवर्णा हायटेक गारमेंट्स, पुणे | | मे.मद्रास हॅन्डलुम हाऊस, नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन मधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्रती नग दर रु. | कोटेशन मधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्रती नग दर रु. | कोटेशन मधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्रती नग दर रु. |
| ०१ | साईनिवास अतिथीगृह सर्व रुममधील खिडक्या | ६००/- | ६००/- | १७५/- | **१७५/-** | ७५०/- | अनुपस्थित |
| ०२ | साईनिवास अतिथीगृहातील रुम नं.० मधील पार्टीशनचा पडदा, | ९००/- | ९००/- | १७५/- | **१७५/-** | ९००/- | अनुपस्थित |
| ०३ | साईनिवास बैठक कक्ष मोठे दरवाजे | ४५०/- | ४५०/- | १७५/- | **१७५/-** | ४५०/- | अनुपस्थित |
| ०४ | साईनिवास बैठक कक्ष लहान दरवाजे | ३००/- | ३००/- | १७५/- | **१७५/-** | ३००/- | अनुपस्थित |
| ०५ | साईनिवास बैठक कक्ष मिटींग हॉल खिडक्या | ४५०/- | ४५०/- | १७५/- | **१७५/-** | ४५०/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दोन्ही साईनिवास करीता ५५ सेट (प्रती सेट ०२ नगाचा) पडदे शिलाईकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले मे.सुवर्णा हायटेक गारमेंट्स, पुणे यांचे प्रती नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**निर्णय क्र.४५२ (ब) दि.०७.०६.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

०१. **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता Epoxy Flooring चे काम करणेसाठी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.३७,६९५/-)**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ मधील Epoxy Flooring सध्या निघालेले आहे. कारण सदर Epoxy Flooring हे २०११-१२ या वर्षी केले होते. सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ मध्ये शस्त्रक्रियेच्या कामामुळे ते साधारणत: ३ ते ४ वर्षात खराब होऊन जाते. त्यामुळे त्यात पाणी जाऊन शस्त्रक्रिया गृहात जंतु संसर्ग निर्माण होण्याची शक्यता असते. पर्यायाने याचा त्रास रुग्णांना लवकर बरे न होण्यास (Recover) होतो त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ विभागाने दि.३०/०४/२०१३

(औषध भांडार प्राप्त दि.२०/०६/२०१३) चे मागणी पत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे.

त्यानुसार ऑपरेशन थिएटर विभागाने दिलेल्या मोजमापानुसार अंदाजे खर्चासाठी M/s. Al-med Equipments, Mumbai यांचेकडुन दुरध्वनीद्वारे दरपत्रक मागविले होते. त्यानुसार त्यांनी दि.२९/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये (औषध भांडार ई-मेल प्राप्त दि.०३/१०/२०१३) खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | विभागाचे नाव | साईज | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ | ३१३.५ sq. ft. | १२०.२४ / sqft. | ३७६९५.२४ |

वरीलप्रमाणे काम करुन घेणेकामी अंदाजे ३७६९५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. १३/१२/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.९५७ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. २ करिता Epoxy Flooring चे काम विहित पद्धतीने कोटेशन मागवून करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे पुर्णांकित रक्कम रु. ३७,६९५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार, इकडील पत्र क्र. ६१९१ दि. ०३/०१/२०१४ अन्वये ९ कोटेशनधारकांकडून दि. १४/०१/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले असून त्यास अनुसरुन ३ कोटेशनधारकांकडून कोटेशन प्राप्त झालेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

१. M/s. SSB Infrastructure Pvt. Ltd., Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि. ०५/०५/२०१४)
२. M/s. Excel Enterprises, Navi Mumbai (E-mail कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)
३. M/s. AL-MED Equipments, Mumbai (E-mail कोटेशन प्राप्त दि. २५/०४/२०१४)

वरील ०३ कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले असून अ. नं. १ व २ यांना कोटेशन मागणीपत्र नसताना त्यांनी स्वत:हून कोटेशन पाठविलेले आहे, परंतु सदरचे खरेदीकामी कोटेशनधारकांना तगादा करुन देखील कोटेशन प्राप्त होत नाहीत, त्यामुळे तुलनात्मक दर मिळणेकामी त्यांचा फायदा होऊ शकेल.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०१ बंद कोटेशन दि.०३.०६.२०१४ रोजीचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, तीनही कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, सर्व कोटेशनधारक अनुपस्थित होते.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता Epoxy Flooring चे कामी कोटेशनमधील दरांवर सभेसमोर चर्चा/ वाटाघाटी करणेकरीता सर्व कोटेशनधारक अनुपस्थित होते. त्यामुळे संबंधीत कोटेशनधारकांकडून ई-मेल/ फॅक्सव्दारे अंतिम दराचे पत्र मागविणेत येऊन, त्याचा मा.कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेसमोर तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा आणि त्यातील निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०२. सन २०१३-१४ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीमधील दर प्राप्त न झालेल्या साबण, निरमा, बॅटरी सेल इ.साहित्य खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.४,९४,६८७/-)**

श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरिता दैनंदिन वापरासाठी लागणारे साबण, निरमा, बॅटरी सेल, पेन्सील सेल, गम बुट इ. साहित्य दरवर्षी वार्षिक औषधे खरेदीमध्ये निविदा मागवून खरेदी करण्यात येतात. त्याचप्रमाणे यावर्षी वार्षिक औषधे खरेदीमध्ये देखील सदर साहित्याचे ई- निविदा मागविण्यात आली होती.

परंतु सदर साहित्याकरिता ई- निविदेद्वारे कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही. सदरचे साहित्य किरकोळ स्वरुपाचे असल्यामुळे त्याकरीता कोणीही निविदा भरत नाही, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. ह्यासाठी दरवर्षी आवश्यकतेनूसार, स्थानिक पुरवठा धारकांकडून कोटेशन मागवून खरेदी करण्यात येत असतात. दोन्ही रुग्णालयांच्या दैनंदिन वापरासाठी वार्षिक मागणीतील खालीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Simple Shaving Blades Qty. in Nos. | 15,000 | 0.95 | 14,250.00 |
| 02. | Torch Stainless steel/Plastic of 2 Cell | 50 | 196.88 | 9,844.00 |
| 03. | Lifebuoy Soap 125 GM | 1,500 | 19.37 | 29,055.00 |
| 04. | Nirma Washing Powder Packing in KG | 700 | 35.83 | 2,50,810.00 |
| 05. | Steel Battery Cell Hyper (Pencil) | 600 | 12.70 | 7,620.00 |
| 06. | Steel Battery Cell Hyper (Big) | 400 | 10.00 | 4,000.00 |
| 07. | Steel Battery Cell Hyper (Medium) | 600 | 4.10 | 2,460.00 |
| 08. | Battery Cell 9.0 Volt (For Pacemaker) | 100 | 20.00 | 2,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 09. | Shoes For O.T. & ICU Staff (Pair) No. 6, 7, 9 (Each 35) | 105 | 300.00 | 31,500.00 |
| 10. | Shoes For CVTS Of Staff | 100 | 29.48 | 2,948.00 |
| 11. | Plastic Slipper for O.T. & Wards ( X Type) size 6, 7, 8, 9, 10 (Each 100 Pair) | 500 | 132.75 | 53,200.00 |
| 12. | Rubber Slipper Size 6, 7, 8, 9, 10 each 100 pair | 500 | 150.00 | 75000.00 |
| 13. | Gum Boot No. 9, 10 below knee Rubber each 12 | 24 | 500.00 | 12000.00 |
| | **Total** | | | **4,94, 687.00** |

उपरोक्त प्रमाणे, खरेदीस अंदाजे रु. ४,९४,६८७/- (अक्षरी रुपये चार लाख चौऱ्याण्णव हजार सहाशे सत्याऐंशी मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खरेदीस वार्षिक औषधे २०१३-१४ खरेदीमध्ये दि.२६/०७/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समिती सभेच्या निर्णय क्र.५६४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

दि.०७/०३/२०१४ रोजीचे मंजुर टिपणीन्वये उपरोक्त साहित्य खरेदीकामी कोटेशन मागविण्यास मंजुरी मिळालेली असून त्यानुसार एकुण ९ कोटेशनधारकांकडून दि. १९/०४/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरुन ५ कोटेशन प्राप्त झाले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

१. M/s. Dattakrupa General stores, Babhaleshwar (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. २०/०४/२०१४)
२. M/s. Gangwal A.S.&Co., Shirdi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. १४/०४/२०१४)
३. M/s. Royal Shoes, Shirdi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)
४. M/s.Global Enterprises, Sangamner (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)
५. M/s. Bafana General Stores, Shirdi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०७/०५/२०१४)

अ. नं. २ ते ५ हे मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे. तर अ. नं. २ व ४ ह्यांना कोटेशन मागणी पत्र पाठविले नसून त्यांनी स्वतःहून कोटेशन पाठविले आहे. तुलनात्मक दर मिळणेच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकतो, त्यामुळे वरील दोन कोटेशन विचारात घ्यावे असे मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०५ कोटेशन्स दि.०३.०६.२०१४ रोजीचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता सर्व कोटेशनधारक अनुपस्थित होते.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीमधील दर प्राप्त न झालेल्या साबण, निरमा, बॅटरी सेल इ.साहित्य खरेदीकामी सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीकरीता सर्व कोटेशनधारक अनुपस्थित होते. त्यामुळे संबंधीत कोटेशनधारकांकडून ई-मेल/ फॅक्सव्दारे अंतिम दराचे पत्र मागविणेत येऊन, त्याचा मा.कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेसमोर तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा आणि त्यातील निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०३. <u>श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागाकरिता Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.५३,५९२/-)</u>**

श्री साईबाबा रुग्णालयातील Dental या विभागाने दि.०५/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये NSK कंपनीचे Air Rotar Handpiece ¾Ö Fiber Optic Air Rotar Handpiece प्रत्येकी ०१ नग याप्रमाणे एकुण ०२ नगांची मागणी केलेली आहे. यापुर्वी सन २००६ या वर्षात Handpiece खरेदी करण्यात आले होते, परंतु दैनंदिन वापरामुळे ते खराब झालेले आहेत व दुरुस्त देखील होत नाहीत त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहेत.

उपरोक्त Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Confident Sales India Pvt. Ltd., Bangalore यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.१०/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Air Rotar Handpiece | 01 No. | 26796.00 | 26796.00 |
| 2 | Fiber Optic Air Rotar Handpiece | 01 No. | 26796.00 | 26796.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **53592.00** |

वरील प्रमाणे Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी अंदाजे ५३,५९२/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. ०४/०२/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय क्र.१०५ अन्वये उपरोक्त Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ५३,५९२/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ७८२६ दि. १४/०३/२०१४ अन्वये एकुण १२ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.१५/०४/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१. M/s. Suz Dent (India) Pvt. Ltd., Ahmedabad (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२९/०३/२०१४)
२. M/s. Confident Sales India Pvt. Ltd. Bangalore (ई-मेल कोटेशन प्राप्त दि.१८/०४/२०१४)
३. M/s. CSIPL, Pune (ई-मेल कोटेशन प्राप्त दि.१८/०४/२०१४)

वरीलपैकी अ. नं. ३ यांचे कोटेशन त्यांनी कोटेशन मागणीपत्र नसताना स्वत:हून दिलेले आहे. तुलनात्मकदर मिळणेच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे ते देखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त बंद कोटेशन दि. २६/०४/२०१४ रोजीचे उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेले असून त्याच दिवशी सर्व प्राप्त कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु सदरहू सभेपुढे एकही कोटेशनधारक उपस्थित नव्हते. त्यामुळे सदरचे खरेदीकामी प्राप्त कोटेशनधारकांना पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

तरी प्रस्तावित खरेदीकामी संबंधीत कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता सर्व कोटेशनधारक अनुपस्थित होते.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील डेंटल विभागाकरिता Air Rotar Handpiece व Fiber Optic Air Rotar Handpiece खरेदीकामी सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीकरीता सर्व कोटेशनधारक अनुपस्थित होते. त्यामुळे संबंधीत कोटेशनधारकांकडून ई-मेल/ फॅक्सव्दारे अंतिम दराचे पत्र मागविणेत येऊन, त्याचा मा.कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेसमोर तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा आणि त्यातील निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०४. <u>बगीचा विभागासाठी सन २०१४-२०१५ करीता वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.१,३५,५००/-)</u>**

मा. त्रीसस्य समितीचे दि.०४०२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३३ नुसार सन २०१४-१५ करीता बगिचा विभागासाठी आवश्यक वार्षिक साहित्य खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,३५,५००/- (अक्षरी रूपये एक लाख पस्तीस हजार पाचशे मात्र) खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमित पुरवठाधारक यांचे पत्त्यावर इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ ६०५८/ २०१४ दि.२६.०३.२०१४अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून सन २०१४-१५ करीता बगिचा विभागासाठी आवश्यक वार्षिक साहित्य खरेदीकामी दिनांक ०५.०४.२०१४ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती एकही दरपत्रक प्राप्त न झाल्याने पुरवठाधारकांशी वारंवार दुरध्वनीव्दारे दरपत्रके पाठविणेबाबत कळविले असता मुदतीनंतर तीन पुरवठाधारकांचे दरपत्रके प्राप्त झालेले आहेत, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.न. | पुरवठाधारकाचे नाव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| १. | मे.साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | ०५१४/०८.०४.२०१४ |
| २. | मे.श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | ०५१५/०८.०४.२०१४ |
| ३. | मे. अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी | ०६५२/०९.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकास समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | साहित्याचा तपशिल | मागणी | साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | | श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव | | अरविंद सेल्स एजन्सीस, साकुरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकातील दर प्रती लि/ कि. व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर प्रती लि./ कि. व्हॅटसह रु. | दरपत्रकातील दर प्रती लि/ कि. व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर प्रती लि./ कि. व्हॅटसह रु. | दरपत्रकातील दर प्रती लि/ कि. व्हॅटसह रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर प्रती लि./ कि. व्हॅटसह रु. |
| १ | राऊन्ड अप | १०० लि. | ३९०.०० | अनुपस्थित | ३५०.०० | ३५०.०० | ३२५.०० | **३२५.००** |
| २ | कॉन्टाफ | ०५ लि. | ७००.०० | अनुपस्थित | ६२४.०० | ६२४.०० | ४८६.०० | **४८६.००** |
| ३ | रोगर | ०५ लि. | ३७०.०० | अनुपस्थित | ३३६.०० | **३००.००** | ३०६.०० | ३०६.०० |
| ४ | लिडेन पावडर (फॉली डस्ट) | २० लि. | २५.६० | अनुपस्थित | २४.०० | **२२.००** | ८८.०० | २४.०० |
| ५ | लिफान | ०३ लि. | ६५०.०० | अनुपस्थित | ६०६.०० | ६०६.०० | ५५०.०० | **५५०.००** |
| ६ | डि.ए.पी. | ७५०कि. | ३२.२० | अनुपस्थित | २८.४० | २८.४० | २३.६० | **२३.६०** |
| ७ | युरिया | १०००कि. | ९.०० | अनुपस्थित | ६.७६ | ६.७६ | ६.०० | **६.००** |
| ८ | निंबोळी पेंड | ३०००कि. | २२.२५ | अनुपस्थित | १६.२५ | १६.२५ | ९.४० | **९.४०** |
| ९ | १०:२६:२६ | ५००कि. | ३९.८० | अनुपस्थित | ३७.०० | ३७.०० | २२.१८ | **२२.१८** |
| १० | सुपर फॉस्फेट | ५००कि. | ३०.७० | अनुपस्थित | ३०.०० | ३०.०० | ७.२६ | **७.२६** |
| ११ | पोटॅश | १०००कि. | २४.२० | अनुपस्थित | २२.४० | २२.४० | १६.८० | **१६.८०** |
| १२ | गेरु | १०० कि. | ९०.०० | अनुपस्थित | ६८.०० | ६८.०० | १२.०० | **१२.००** |
| १३ | चुना | १०० कि. | ९०.०० | अनुपस्थित | ६०.०० | ६०.०० | १२.०० | **१२.००** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बगीचा विभागासाठी सन २०१४-२०१५ करीता वार्षिक साहित्य खरेदीकामी उपरोक्त तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०५. साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी उशा व उशी कव्हर खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून दरपत्रकधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.२,००,०००/-)**

मा.त्रीसस्य समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४५ नुसार साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी आवश्यक उशा व उशी कव्हर खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.२,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि. २१.०४.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता. त्यामध्ये साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी उशा व उशी कव्हर खरेदी करुन मिळणेबाबत कळविले होते.

त्यानुसार संस्थानचे नियमीत पुरवठा धारक यांचे पत्यावर उशा व उशी कव्हर खरेदी कामी कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून उशा व उशी कव्हर खरेदीकामी दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्याची अंतीम मुदत दि.१३.०५.२०१४ अशी ठेवलेली होती. मुदतीअंती एकच दरपत्रक प्राप्त झालेले होते. लेखापरिक्षणाचे दृष्टीकोनातुन कोणतीही खरेदी करणेसाठी कमीत कमी तीन दरपत्रके असणे आवश्यक असते.

त्यामुळे इतर दरपत्रकधारकांना दुरध्वनीवरुन दरपत्रके पाठविणेबाबत कळविले असता मुदतीनंतर चार दरपत्रकधारकांनी दरपत्रके पाठविली आहेत. त्यामुळे मुदतीअंती एक व मुदतीनंतर चार असे एकुण पाच दरपत्रके प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.कॉन्टॅक कंफर्टस प्रा.लि., वडगाव आमली | २४४१/१२.०५.२०१४ |
| ०२. | मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे | २५८४/१४.०५.२०१४ |
| ०३. | मे. गोदरेज अँण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि. पुणे | २५८१/१४.०५.२०१४ |
| ०४. | मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे | २८८३/१९.०५.२०१४ |
| ०५. | मे.बिन्नी शो रूम, पुणे | २८३७/१९.०५.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत आली, त्यामध्ये मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे यांनी उशी व उशीकव्हरसाठी वेगवेगळी ०२ दरपत्रके भरलेली होती व मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे यांनी ई-मेलव्दारे दरपत्रकामधील दरावर ३% सुट देऊ केली. उर्वरित दरपत्रकधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहे.

| अ. नं | साहित्याचा तपशिल | मे.कॉन्टॅक कंफोर्टस प्रा.लि., वडगाव आमली | | मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे | | मे. गोदरेज अँण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि. पुणे | | मे.बिन्नी शो रूम, पुणे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन मधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर प्रती नग रु. | कोटेशन मधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर प्रती नग रु. | कोटेशन मधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर प्रती नग रु. | कोटेशन मधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर प्रती नग रु. |
| ०१ | फायबर पिलो ६१०मी.मी. x ४१० मी.मी. (२४" x१६") | २०६/- | अनुपस्थित | ३८५.०० | ३७३.४५ | १६८.७५ | अनुपस्थित | ५२५.०० | अनुपस्थित |
| ०२ | पिलो कव्हर १८" x२७" १००% Cotton, Mafatlal, with Interlock | - | - | ६२.०० | ६०.१४ | - | | ७४.३० | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, फायबर उशी खरेदीकरीता मे.गोदरेज अँण्ड बॉईज मॅन्यु.कं.लि., पुणे यांचे रु.१६८.७५ प्रती नग निम्नतम दर असल्याने त्यांचेकडून उशीचा नमुना बोलावून त्याची पाहणी करावी व योग्य असल्यास फायबर उशी पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत यावा.**

**तसेच, उशीकव्हरसाठी मे.बांठीया एंटरप्रायझेस, पुणे यांचे रु.६०.१४ प्रती नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०६. <u>आरोग्य विभागाकरीता स्वच्छता साहित्य खरेदीकामी प्राप्त निविदातील तांत्रिक लिफाफा क्र.०१ उघडणेबाबत. (रु.६,००,०००/-)</u>**

आरोग्य विभागाकरीता साहीत्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख) मात्रचे खर्चास मा.त्रीसदस्य समिती सभा दि.१५.०३.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.२४२ नुसार मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०७.०५.२०१४रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन उपरोक्त खरेदीकामी निविदा प्रसिद्ध केली होती. सदर निविदा विक्री दि.०८.०५.२०१४ ते दि.१९.०५.२०१४ रोजी सायं.०५.०० वा. पावेतो होती. तसेच निविदा प्रत्यक्ष स्विकारण्याची अंतिम दिनांक २२.०५.२०१४रोजी सायं.०५.०० वा. पावेतो होती. सर्व निविदाधारकांनी मुदतीअंती शिर्डी कार्यालयात भरलेल्या निविदा सादर केलेल्या आहेत. प्राप्त निविदांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ .नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक | नमुना आहे/नाही |
|---|---|---|---|
| १. | मे. भिंगारवाला एंटरप्रायझेस, अहमदनगर | २६८०/१६.०५.२०१४ | **नाही** |
| २. | मे. आर.के. एंटरप्रायझेस, सिन्नर | २८७८/१९.०५.२०१४ | आहे |
| ३. | मे. निलकमल लिमिटेड, नाशिक | २९०३/२०.०५.२०१४ | आहे |
| ४. | मे. विरभद्र ट्रेडर्स, कोपरगाव | ३०१९/२१.०५.२०१४ | आहे |
| ५. | मे. महावीर सोप ॲन्ड डिटर्जंट, अहमदनगर | ३०२१/२१.०५.२०१४ | आहे |
| ६. | मे. गांधी केमिकल्स, अहमदनगर | ३०२२/२१.०५.२०१४ | आहे |
| ७. | मे. मगनलाल देवशंकर, नाशिक | ३०२३/२१.०५.२०१४ | आहे |
| ८. | मे. हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई | ३०४५/२२.०५.२०१४ | आहे |
| ९. | मे. मिनिटेक सिस्टिमस् प्रा लि, नाशिक | ३०७६/२२.०५.२०१४ | **नाही** |
| १०. | मे. आनंद एंटरप्रायझेस, श्रीरामपूर | ३०७८/२२.०५.२०१४ | **नाही** |
| ११. | मे. स्वामी समर्थ एजन्सीज कोपरगाव | ३०९५/२२.०५.२०१४ | आहे |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त अकरा निविदाधारकांपैकी फक्त आठ निविदाधारकांनी मालाचे नमुने सादर केलेले आहे.

उपरोक्त प्राप्त अकरा निविदापैकी खालील तीन निविदाधारकांच्या निविदेचा विचार करता येणार नाही.

**अ)** मे.मिनिटेक सिस्टिमस् प्रा.लि.,नाशिक व मे.आनंद एंटरप्रायझेस, श्रीरामपूर यांनी निविदाची खरेदी वेगळया नावाने केलेली आहे व जमा वेगळया नावाने केलेल्या आहेत.

**ब)** मे. भिंगारवाला एंटरप्रायझेस, अहमदनगर यांनी मालाचे नमुने दिलेले नाही. त्यामुळे अ.नं. १,९ व १० चे निविदाधारकांच्या निविदेचा विचार करता येणार नाही.

उर्वरीत आठ निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे क्रं.१ मा.कार्यकारी अधिकारी/उपकार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडून त्यातील कागदपत्रांची लेखाशाखेमार्फत तपासणी करणेस व तांत्रिक कागदपत्रांचे तपासणी अंती पात्र निविदाधारकांना पुढील येत्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करुन मुळ निविदा (लिफाफा क्र.२) उघडून दराबाबत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेकामी सादर

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागाकरीता स्वच्छता साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेले तांत्रिक लिफाफे क्रं.१ चे उघडणेत येऊन, त्यातील कागदपत्रांचे तपासणीअंती पात्र निविदाधारकांना पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------------

०७. **फुटाणे, विडयाची पाने व पावडर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी प्राप्त झालेले बंद निविदा उघडणे व न्युनतम दर निश्चित करणेबाबत.**

प्रति वर्षाप्रमाणे माहे-एप्रिल-२०१४ ते माहे-मार्च-२०१५ अखेर या आर्थिक वर्षाकरिता फुटाणे, विड्याची पाने, पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्यीय समिती दि.०४/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ११६ नूसार जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात दि.२९/०३/२०१४ रोजी जाहिरात देवून बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविण्यात आलेले आहेत. निवीदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.०५/०४/२०१४ अशी अंतिम तारीख नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा (दरपत्रके) जमा झालेले आहेत.

**अ) फुटाणे प्रसाद कोटेशन** (अंदाजे मागणी- ४५० किलो, अंदाजे खर्च रु.२७,०००/-)

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मे.गंगवाल ए.एस.ऍण्ड कं. प्रो.प्रा.किशोर गंगवाल, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर- ४२३ १०९ | ०२९४/०४.०४.२०१४ |
| ०२ | श्री.ईश्वर आधार साटोटे, मु.पो.ता.कोपरगाव, जि.अहमदनगर | ०३३५/०४.०४.२०१४ |
| ०३ | सचिन जनरल स्टोअर्स, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर | ०३५१/०५.०४.२०१४ |
| ०४ | दिपाली एन्टरप्रायजेस, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३५२/०५.०४.२०१४ |

**ब) विड्याच्या पानांचे कोटेशन** (अंदाजे मागणी- ४,००,००० नग अंदाजे खर्च रु.१,२०,०००/-)

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.किशोर चित्ते, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३४९/०५.०४.२०१४ |
| ०२ | श्री.दिपक देवराम आहेर, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर (मो. ९०११९००९९९) | ०३५०/०५.०४.२०१४ |
| ०३ | श्री.श्याम बाळासाहेब लोंढे, मु.पो.गणेशनगर, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३९१/०५.०४.२०१४ |

**क) पावडर मार्बल मूर्तीचे कोटेशन** (अंदाजे मागणी- ५०+१००+७५ नग, अंदाजे खर्च रु.६१,०००/-)

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.विरेश जैस्वाल, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर | ०३२७/०४.०४.२०१४ |
| ०२ | साई चैतन्य स्टोअर्स, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३९२/०५.०४.२०१४ |
| ०३ | द्वारकामाई स्टोअर्स, प्रो.प्रा.जे. के.संकलेचा, द्वारकामाईचे जवळ, शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ०३९०/०५.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे गोवरीचे ०६ कोटेशन्स, फुटाणे प्रसाद ०४ कोटेशन्स, विड्याच्या पानांचे ०३ कोटेशन्स, पावडर मार्बल मूर्तीचे ०३ कोटेशन्स असे सर्व कोटेशन्स मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेस व न्युनतम दर निश्चित करणे करीता मा त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स दि.०३.०६.२०१४ रोजीच्या उपसमिती सभेमध्ये उघडणेत येऊन, प्रसाद फुटाणे खरेदीबाबत निर्णय झालेला असून विडयाची पाने व पावडर मार्बल मुर्ती खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटीसाठी कोटेशनधारक उपस्थित नसल्याकारणाने त्यांना पुढील सभेमध्ये बोलविणेत आले होते. त्यानुसार विड्याच्या पाने खरेदीसाठीचे ०३ व पावडर मार्बल मूर्ती खरेदीकामीचे ०३ कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

**विड्याचे पाने-**

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील प्रती शेकडा दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्रती शेकडा दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.किशोर चित्ते,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ६५.०० | ६५.०० |
| ०२ | श्री.दिपक देवराम आहेर,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर<br>(मो. ९०११९००९९९) | ५५.०० | **५०.००** |
| ०३ | श्री.श्याम बाळासाहेब लोंढे,<br>मु.पो.गणेशनगर, ता.राहाता, जि.अ.नगर | ७०.०० | ६५.०० |

**पावडर मार्बल मूर्ती-**

| अ. नं | मुर्तीचा प्रकार | श्री.विरेश जैस्वाल, मु.पो.शिर्डी, | | साई चैतन्य स्टोअर्स, मु.पो.शिर्डी | | द्वारकामाई स्टोअर्स, शिर्डी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन मधील प्रती नग दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्रती नग दर रु. | कोटेशन मधील प्रती नग दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्रती नग दर रु. | कोटेशन मधील प्रती नग दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्रती नग दर रु. |
| ०१ | ०३ नंबर मुर्ती (उंची ७.५ इंच) | १००/- | **१००/-** | १६०/- | अनुपस्थित | २००/- | २००/- |
| ०२. | ०४ नंबर मुर्ती (उंची ९ इंच) | १४०/- | **१४०/-** | २५०/- | अनुपस्थित | ३५०/- | ३५०/- |
| ०३. | ०५ नंबर मुर्ती (उंची १३.५ इंच) | ४४०/- | **४४०/-** | ७००/- | अनुपस्थित | ७५०/- | ७५०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आवश्यक असलेले विड्याच्या पाने खरेदी करणेकामी श्री.दिपक देवराम आहेर, मु.पो.शिर्डी, यांचे प्रती शेकडा रु.५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच, प्रस्तावात नमुद केलेल्या पावडर मार्बल मुर्ती खरेदीकामी श्री.विरेश जैस्वाल, मु.पो.शिर्डी यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले प्रती नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**०८. बसेसच्या शिटांचे कामाकरीता प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून पुढील निर्णय होणेबाबत. (रु.३,५०,०००/-)**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१३४ नुसार, वाहन विभागाकडील वापरात असलेल्या ७ बसेसच्या शिटांचे कुशन व त्यावरील कापडी खोळी सततच्या वापरामुळे खराब झालेल्या असलेने शिटांना कुशन करणे कामी रेक्झीन व खोळी शिवणे कामी कापड खरेदी करणेस तसेच नवीन कुशन करणे व कापडी खोळी शिलाई मजुरी या कामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार बसेस करीता नवीन रेक्झीन व कापड खरेदी कामी परिसरातील पुरवठाधारक यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/५७८/२०१४ दि.०२/०५/२०१४ चे पत्राने तसेच बसेसच्या शिटांना कुशन करुन कापडी खोळी शिवणे याकामी परिसरातील कुशन वर्क्स यांचेकडुन जा.नं.एसएसएस/ वाहन/ ६६२/ २०१४ दि.०८/०५/२०१४ चे पत्राने कोटेशन बोलाविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेली कोटेशन्स खालील प्रमाणे.

**अ) नवीन रेक्झीन व कापड खरेदी कामी प्राप्त झालेली कोटेशनः-**

| **अ.नं.** | **पुरवठधाकारचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|---|
| ०१ | तलवार फर्निशींग, श्रीरामपुर | २५२५-१३/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०२ | आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर | २५२६-१३/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०३ | राहुल रेग्झीन हाऊस, श्रीरामपुर | २५८३-१४/०५/२०१४ | बंद कोटेशन |

**ब) शिटांना नवीन कुशन करुन कापडी खोळी शिवणे कामी मजुरीचे प्राप्त झालेली कोटेशनः-**

| **अ.नं.** | **पुरवठधाकारचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|---|
| ०१ | सदगुरु कुशन, कोपरगांव | २४४६-१२/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०२ | जावेद कुशन, कोपरगांव | २४४७-१२/०५/२०१४ | बंद कोटेशन |
| ०३ | कमल कुशन, कोपरगांव | २४४८-१२/०५/२०१४ | बंद कोटेशन |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स दि.०३.०६.२०१४ रोजीच्या उपसमिती सभेमध्ये उघडणेत येऊन, शिटांना नवीन कुशन करुन कापडी खोळी शिवणबाबत निर्णय झालेला असून नवीन रेक्झीन व कापड खरेदीकामीचे कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित नसल्याकारणाने त्यांना पुढील सभेमध्ये बोलविणेत आले होते. त्यानुसार नवीन रेक्झीन व कापड खरेदीकामीचे ०३ कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ. नं | मालाचा तपशिल | तलवार फर्निशींग, श्रीरामपुर | | आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर | | राहुल रेग्झीन हाऊस, श्रीरामपुर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन मधील प्र.मीटर दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्र.मीटर दर रु. | कोटेशन मधील प्र.मीटर दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्र.मीटर दर रु. | कोटेशन मधील प्र.मीटर दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला प्र.मीटर दर रु. |
| ०१ | रेक्झीन | १४५/- | अनुपस्थित | १४०/- | **१३९/-** | १४०/- | अनुपस्थित |
| ०२. | कापड | ११७/- | अनुपस्थित | ९९/- | **९८/-** | ११५/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बसेसच्या शिटांना नवीन रेक्झीन व कापड खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले मे. आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर यांचे प्रती मिटर निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही -वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३ नोंद घेण्याचे विषय-**

**(१) माहे मे, २०१४ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे**

श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीमधून माहे मे-२०१४ मध्ये प्राप्त झालेल्या रक्कम रु.२,२७,३१०/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४५३ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**(२) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल, २०१४ या महिन्यात वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात माहे एप्रिल-२०१४ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.६७,०५,४५५/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४५३ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**(३) श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल, २०१४ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल- २०१४ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये ३१,६७,९७५/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४५३ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**(४) बांधकाम प्रगती तक्ता. (तक्ता- ब, अंतीम बीले).**

बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४५३** (D) **नोंद घेण्यात येऊन, तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**०१)** ठेकेदार मे.एम.के. येवले ॲण्ड कंपनी, संगमनेर यांचे संस्थानचे गट नं.१९५ मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील हेलीपॅडचे विस्तारीकरण व डांबरीकरण कामाचे अंतिम बील रु.६०,६३,३१७/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.

**०२)** ठेकेदार मे.एम.एस.शेल्टर्स, नाशिक यांचे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलच्या छतावरील पॉलीकार्बोनेट डोमचे शिट बदलणे व टर्बो व्हेंटीलेटर बसविणे कामाचे पहिले व अंतिम बील रु.४,४२,१६९/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **साई आश्रम प्रकल्पाचे भाग-२ येथील डॉरमिटरी हॉल्समध्ये ठेवणेसाठी लॉकर्स खरेदीकरीता प्राप्त ई- निविदांचे लिफाफा क्र.०२ (Envelope No. 02- Commercial Bid) उघडून चर्चा/ वाटाघाटीव्दारे निर्णय होणेबाबत. (रु.१,०३,६८,०००/-)**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती निर्णयः १. दि.२८/०४/२०१२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र.३६५ संमत करण्यात आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साई आश्रम भाग-२ चे हॉलसाठी एकूण ५७६ नग लॉकर्स युनिट (३४५६ नग लॉकर्स) खरेदीकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,०३,६८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. "

२. दि.१७/०९/२०१३ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.६२५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करण्यात आलेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरकामी Minimum Qualifying Criteria शिथिल करुन नव्याने ई-टेंडर पध्दतीने निविदा मागविणेचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०९/२०१३ चे वरील निर्णयानुसार इकडील विभागामार्फत निविदा व ई-टेंडर नोटीस तसेच नव्याने किमान पात्रता निकष (Minimum Qualifying Criteria) तयार करणेत आले होते. त्यानुसार दि.१४/०१/२०१४ चे दै. पुण्यनगरी या वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहु ई-निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. निविदा प्रक्रियेच्या तारखांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | Document download start date: | 15/01/2014 from 11:00 Am onwards to 30/01/2014 upto 5:00 pm. |
| 2 | Online Bid submission start date: | 15/01/2014 from 11:00 Am onwards to 30/01/2014 upto 5:00 pm. |
| 3 | Online Bid submission closing date : | 30/01/2014 upto 5:00 pm. |
| 4 | Last date & time for submission of technical bid hard copies : | 06/02/2014 upto 05:00 pm. |
| 5 | Bid opening (Technical) date : | 11/02/2014 on 11:00 Am. |

उपरोक्त नमूद तारखांनुसार Envelope No.01 (Technical Bid) उघडण्याची तारीख ही दि.११/०२/२०१४ होती. त्यानुसार दि.०८/०२/२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये सदर प्राप्त ई- निविदांचे कागदपत्रांची (Envelope No.०१) ची सिलबंद पाकीटे मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष दि.११/०२/२०१४ रोजी उघडण्यात आली आहेत. Envelope No.०१ उघडलेनंतर त्याचा अहवाल दि.१८/०२/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता त्यानुसार पात्र होणाऱ्या निविदासादरकर्त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Agency/ Supplier | Remarks |
|---|---|---|
| 1 | Steel Fab Furniture, Pune | Qualify |
| 2 | Finex Kitchen Pvt Ltd; Nashik | Qualify |
| 3 | Pawar Electro Systems Pvt. Ltd; Nashik | Qualify |

वर नमूद केलेप्रमाणे पात्रताधारक ठेकेदारांचे निविदेतील Envelope No.०२ (Commercial Bid) आजचे सभेपुढे उघडणेत येऊन, ठेकेदारांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १ | स्टिल फॅब फर्निचर, पुणे | ८०,३५,२००/- | ७४,८८,०००/- |
| २ | फिनेक्स किचन प्रा.लि., नाशिक | ६५,००,१६०/- | **६४,८०,०००/-** |
| ३ | पावर इलेक्ट्रो सिस्टीम प्रा.लि., नाशिक | ७९,४८,८००/- | ६३,६४,८००/- |

**निर्णय क्र.४५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम प्रकल्पाचे भाग-२ येथील डॉरमिटरी हॉल्समध्ये ठेवणेसाठी आवश्यक असलेले लॉकर्स देणगी स्वरुपात मिळणेसाठी देणगीदार साईभक्तांना विचारणा करणेत यावी. सदरहू लॉकर्स देणगी स्वरुपात मिळाले नाही, तर याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०५ सन २०१४-१५ करीता साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबिंग इ. मेन्टनन्स कामांसंबंधी आलेल्या निविदाधारकांपैकी पात्र निविदाधारकांचे ई-निविदेद्वारे आलेले बीडस् ऑफ कोटेशन (प्राइज बीड) उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४- १५ या वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी, आवश्यक हाऊसकिपींग कामासाठी फेर ई- निविदाची जाहीरात देऊन ई- निविदा मागविण्यास मा. व्यवस्थापन समिती दि. १५/०२/२०१४ चे सभेतील निणर्य क्र.१६४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

हाऊसकिपींग कामासंबंधी जनसंपर्क कार्यालयामार्फत विविध वर्तमान पत्रातून व श्री साईबाबा हॉस्पिटल ई.डी.पी., विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या संकेतस्थळावर फेर ई- निविदा बाबतची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या संकेतस्थळावर फेर ई- निविदामध्ये तांत्रिक बीडचे (Technical Bid) कागदपत्र ऑनलाईन दाखल करण्याची अंतीम मुदत दि.२१/०४/२०१४ रोजी सायं.०५.०० वा. ठेवण्यात आलेली होती. तद्नंतर स्कॅन केलेले कागदपत्राचे व इतर मागणी केलेले कागदपत्राच्या सत्यप्रती (Soft copy) शिर्डी किंवा मुंबई कार्यालयात दि. २२/०४/२०१४ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत सादर करावेत, अशी प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

खालील तक्त्यात दर्शविले प्रमाणे ६ कंपन्याचे टेक्नीकल बीड व प्राइज बीड ऑनलाईनव्दारे कार्यालयीन वेळेपुर्वी जमा झालेले आहेत.

**अ) शिर्डी कार्यालयात जमा झालेल्या ई- निविदेचा तपशील**

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **आवक नंबर व दिनांक** | **लिफाफा संख्या** |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रिलायन्स एंटरप्रायजेस, पुणे | १२९३ दि.२१/०४/२०१४ | ०१ |
| ०२ | मे. बीएसए कॉर्पोरेशन लि. पुणे | १३११ दि.२२/०४/२०१४ | ०१ |
| ०३ | मे.अपडेटर सर्व्हिसेस प्रा.लि. चेन्नई | १३७२ दि.२२/०४/२०१४ | ०१ |
| ०४ | मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे | १३७३ दि.२२/०४/२०१४ | ०१ |

**ब) मुंबई कार्यालयात जमा झालेल्या ई- निविदेचा तपशील**

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **आवक नंबर व दिनांक** | **लिफाफा संख्या** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. अपशॉट युटीलिटी सर्व्हिसेस, चेन्नई | ८९ दि.२१/०४/२०१४ | ०१ |
| ०२ | मे.संजय मेन्टनेन्स सर्व्हिस प्रा.लि.मुंबई | ९१ दि.२१/०४/२०१४ | ०१ |

Nit Document निविदेच्या अटी शर्ती ०२ मध्ये निविदा ऑनलाईन भरावयाची असल्याने टेक्नीकल बीडचा ०१ लिफाफा मागविण्यात येत आहे सदर लिफाफ्यामध्ये प्राइस बीडची माहिती देऊ नये.

तसेच अटी शर्ती मधील अ.नं. १७ तांत्रिक कागदपत्रांची (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून Soft copy लिफाफा नं. ०१ मध्ये सादर करावेत. व अ.नं. १८ नुसार अ.नं. १७ मध्ये दिलेल्या तपशीला व्यतिरिक्त आवश्यक कागदपत्रे लिफाफा नं. ०१ मध्ये सादर करावे.

लिफाफा नं. ०१ प्रथम उघडुन त्यातील कागदपत्रे व बयाणा रक्कम मागणीप्रमाणे असल्यास व Technical Document निविदे मधील पा.नं. ०३ वरील तक्ता भरून सदरचे पान स्कॅन करून Soft copy लिफाफा नं. ०१ मध्ये सादर करावेत व त्यामध्ये,

(१) उपरोक्त माहिती वरून कंपनीस गुण देण्यात येतील. ज्या कंपनीस ७० % व त्यापेक्षा जास्त गुण मिळतील अशा कंपनीचे प्राइस बीड मा. त्रीसदस्य समितीचे समोर समक्ष उघडुन अशाच कंपनी प्रतिनिधींना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात येईल.

(२) ज्या कंपनीचे दर कमी असतील किंवा चर्चा वाटाघाटीमध्ये ज्याचे सर्वात कमी दर असतील अशा कंपनीला संपुर्ण ३० गुण देऊन त्या कंपनीला L१ असे नमुद करुन त्या पुढील इतर निविदाधारकांना L२,L३ या प्रमाणे ३०% पैकी गुण दिले जाते. असे नमुद केलेले आहे.

निविदाधारकांचे शंका अडी /अडचणी निरसन करणे कामी दि. १२/०४/२०१४ रोजी शिर्डी येथे प्री - बीड मिटींग आयोजीत केली होती सदर मिटींगसाठी निविदाधारक उपस्थित होते. त्यावेळीही त्यांना कॅग रिपोर्ट प्रमाणे गुण देण्यात येतील. असे चर्चेत सांगीतले होते.

दि.२४/०४/२०१४ रोजीचे मंजुर प्रस्तावानुसार, लिफाफा नं. ०१ (टेक्नीकल बीड) दि.२६/०४/२०१४ रोजी उघडण्यात आले असुन, निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला, सर्व निविदाधारकांचे कागदपत्रे असून, Nit Document मधील अटी शर्ती अ.नं. १२ निविदाधारकांचे हाऊसकिपींगचे क्षेत्रात मागील दोन वर्षा पासुन १० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असावी अशी अट आहे. त्यामुळे फक्त मे. रिलायंन्स एन्टरप्राईझेस, पुणे. यांचे मागील दोन वर्षापासुन १० कोटी पेक्षा कमी उलाढाल आहे. सोबत कागदपत्राचा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

Technical Document मध्ये दिलेल्या अटी शर्तीनुसार कॅग रिपोर्ट प्रमाणे निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रावरून Technical Scores देण्यात येऊन ज्या कंपनीला ७० व त्या पेक्षा जास्त गुण मिळेल अशा कंपनीचे बीड ऑफ कोटेशन उघडण्यात येईल. त्यानुसार निविदाधारकांना खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे गुण मिळालेले आहेत. त्याचा सविस्तर गुणाचा तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | मिळालेले गुण | पात्र/ अपात्र |
|---|---|---|---|
| १ | रिलायंन्स एटरप्राईझेस, पुणे | ३१ | अपात्र |
| २ | बी.एस.ए.कॉर्पोरेशन लि.,पुणे | ४४ | अपात्र |
| ३ | अपडेटर सर्व्हिसेस, चेन्नई | ७५ | **पात्र** |
| ४ | बी.व्ही.जी.लि.,पुणे | ८५ | **पात्र** |
| ५ | अपशॉट युटिलिटी सर्व्हिसेस, चेन्नई | ५२ | अपात्र |
| ६ | संजय मेटेनन्स सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई | ८५ | **पात्र** |

७० व ७० पेक्षा जास्त गुण मिळालेले उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०३, ०४ व ०६ अशा तीन पात्र निविदाधारकांचे बीड ऑफ कोटेशन (प्राइज बीड) आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १ | अपडेटर सर्व्हिसेस, चेन्नई | ८,९३,८८,०००/- | ८,२०,००,०००/- |
| २ | बी.व्ही.जी.लि.,पुणे | ८,९९,६७,८५२/- | ८,१०,००,०००/- |
| ३ | संजय मेटेनन्स सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई | ११,१६,३६,९७२/- | **८,००,००,०००/-** |

**निर्णय क्र.४५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०६ संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०२-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३७ नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांची दि.०१-०४-२०११ पासून ते दि.३१-०३-२०१३ अखेर ०२ वर्षे कालावधीसाठी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार अनुक्रमे **१)** मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे **२)** मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी), **३)** मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, **४)** मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि., पुणे व **५)** मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांची दि.०१-०५-२०११ पासून ते दि.३०-०४-२०१३ अखेर ०२ वर्षे या कालावधीसाठी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजुर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

| अ. नं. | एजन्सीचे नांव | संबंधीत एजन्सीला नेमून दिलेला परिसर | पुरविणेत येणारी प्रतिदिनी कंत्राटी कर्मचारी संख्या | | | विभागांना दिलेल्या मंजुरीप्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अकुशल | कुशल | **एकुण** | अकुशल | कुशल | **एकुण** |
| १. | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे **(लेबर कॉन्ट्रॅक्टर)** | संस्थानचे सर्व संबंधीत विभाग | ८९० | ३४६ | **१२३६** | ११२० | ४३१ | **१५५१** |
| २. | मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | हॉस्पीटल, द्वारावती धर्मशाळा इ.परिसर | १०३ | ०५ | **१०८** | ११६ | ०५ | **१२१** |
| ३. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी) **(महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | मंदिर व महाद्वार परिसर | ५४ | १९ | **७३** | ८२ | ३४ | **११६** |
| ४. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | मंदिर व मंदिर परिसर | ८६ | ०६ | **९२** | ९८ | ०६ | **१०४** |
| ५. | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि., पुणे **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | नविन पिंपळवाडीरोड दर्शनलाईन, साई प्रसाद-०१ व ०२, प्रसादालय, साई आश्रम इ.परिसर | २८६ | ०९ | **२९५** | ३९१ | २२ | **४१३** |
| ६. | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि., पुणे **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | साईबाबा भक्तनिवासस्थान, वाहन व शैक्षणिक संकुल परिसर | ७४ | ०४ | **७८** | ७६ | ०४ | **८०** |
| | | **एकुण (२ ते ६)** | **६०३** | **४३** | **६४६** | **७६३** | **७१** | **८३४** |
| | | **एकुण (१ ते ६)** | **१४९३** | **३८९** | **१८८२** | **१८८३** | **५०२** | **२३८५** |

उपरोक्तप्रमाणे पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना व सिव्हीलियन सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नंबर-०३ (मुंबई, सिकंदराबाद कार्यालयासाठी झोन नं.०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर, तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचाऱ्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील चर्चा/ वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर, अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेसह (मालकाचा हिस्सा-१३.६१%) अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतनदराचे रक्कमेवर लेबर-०.१०%, सिक्युरिटी-०.५०% व ईगल सिक्युरिटी-२% इतका सर्व्हिस चार्ज अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर १२.३६% इतका सर्व्हिस टॅक्स, अधिक सानुग्रह अनुदान-८.३३%, अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रृप इंन्शुरन्स प्रिमियम (अंशदान) याप्रमाणे रक्कम संस्थानकडून देण्यात येते.

सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कामाची (कॉन्ट्रॅक्टची) मुदत अनुक्रमे दि.३१-०३-२०१३ व दि.३०-०४-२०१३ अखेर संपुष्टात आलेली आहे. म्हणून मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई या सुरक्षा एजन्सी व्यतिरिक्त इतर लेबर व ०४ सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांना करारनाम्यातील व वर्क आर्डर्समधील सध्याचेच अटी, शर्तीस व दरपत्रकास अनुसरून अनुक्रमे दि.०१-०४-२०१३ व दि.०१-०५-२०१३ पासून ते नविन कॉन्ट्रॅक्टर्सच्या नेमणुका होईपर्यंत (पुढील आदेश होईपर्यंत) मुदतवाढ मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०२-२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६६ व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-११-२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३१ अन्वये देणेत आलेली आहे.

त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-११-२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३१ यास यास अनुसरून पुढील तीन वर्षे कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/ माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलीत पध्दतीप्रमाणे नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी पात्र ठेकेदारांकडुन"सिलबंद निविदा" मागविणेकामी विविध वर्तमानपत्रात, तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दी करणेत आली. जाहिरातीप्रमाणे "सिलबंद निविदा" विक्रीची मुदत दि.०१-०२-२०१४ पासून ते दि.१२-०२-२०१४ पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा" स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.१३-०२-२०१४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार, अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून विक्री झालेल्या ३७ निविदांपैकी संस्थानचे मुंबई कार्यालयास-०७ व शिर्डी कार्यालयास-१४ अशा एकूण-२१ "सिलबंद निविदा " प्राप्त झालेल्या आहेत. सदर प्राप्त झालेल्या २१ "सिलबंद निविदा " मा.उपसमितीचे दि.०३-०३-२०१४ रोजीचे सभेमध्ये समक्ष उघडणेत आलेल्या असुन, सदर निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करून तो निर्णयासाठी यासोबत सादर केलेला आहे.

तरी संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या ठेकेदारांपैकी अ.नं.११,१३ व १५ हे ०३

निविदाधारक अपात्र असलेमुळे त्यांचे व्यतिरिक्त ज्या निविदाधारकांची/ठेकेदाराची वार्षिक उलाढाल किमान रूपये ०३ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे. ज्यांना किमान ०३ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त पुर्वानुभव आहे अशाच पात्र १८ ठेकेदारांना चर्चा/वाटाघाटीसाठी मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे उपस्थित राहणेबाबत कळविणेत आलेले आहे.

सबब, संबंधीत पात्र निविदाधारकांशी/ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरांसंदर्भात चर्चा/वाटाघाटी होवुन, संस्थानला पुढील ०३ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स नेमणुकीबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**उपरोक्तप्रमाणे संस्थानला अकुशल, कुशल, सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी प्राप्त झालेल्या २१ सिलबंद निविदा दि.०३.०३.२०१४ चे उपसमिती सभेसमोर उघडणेत आल्या होत्या व त्या उघडलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, त्यातील पात्र निविदाधारकांना मा.त्रिसदस्य समिती सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, असे ठरले होते.**

**त्यानुसार पात्र १८ निविदाधारकांना समक्ष बोलविणेत येऊन, कर्मचाऱ्यांना सध्या मिळत असलेल्या रोजगारापेक्षा कमी रोजगार देता येणार नाही, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन दराप्रमाणे वेतन व त्या नियमाप्रमाणे टॅक्स वगैरे यासाठी सर्वांचे दर एकच राहतील, फक्त सर्व्हिस चार्जेस वरच चर्चा/ वाटाघाटी केल्या जातील, त्यामुळे पुन्हा एकदा बंद पाकिटामध्ये फक्त सर्व्हिस चार्जचा दर देणेत यावा, असे सांगणेत येऊन निविदांमधील दर वाचून दाखविणेत आले व पुनश्च संधी म्हणून सर्व निविदाधारकांना अंतीम दर देणेसाठी पाकिटे पुरविणेत आली आणि त्यांचेकडून पुन्हा बंद पाकिटामध्ये अंतीम दर घेण्यात आला. निविदाधारकांनी निविदेमध्ये दिलेल्या मुळ सर्व्हिस चार्जेस दरांचा तपशील खालील तक्त्यातील कॉलम नं.६ मध्ये नमुद केलेला असून चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर कॉलम नं.७ मध्ये नमुद केला आहे.**

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रूपये) | कंत्राटदाराची वार्षिक उलाढाल (रूपये) | कामाचा पुर्वानुभव (वर्षे) | सर्व्हिस चार्जेस दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | निविदेतील मुळ दर टक्केवारी | चर्चा/वाटाघाटी नंतरचे बंद पाकीटातील दर (टक्केवारी) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | **मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,** विले पार्ले(पश्चिम), मुंबई-४०००५६ (निविदा क्र.०६) | सध्या देय्य असणारे वेतनदर/ किमान वेतनदर यापुढेही लागु राहतील | १२,७२,०२,६९७/- | २१ | ०.५० % | ०.००१ % |
| २) | **मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड** आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव (पुर्व) मुंबई-४०००६५ | ----”----- | ३,१२,५१,११,०००.००/- | ४३ | ०.०५ % | ०.००१ % |
| ३) | **मे.श्रीकृपा सर्व्हिसेस प्रा.लि.** जुना मुंबई-पुणेरोड,आकुर्डी, पुणे-४११ ०३५ (निविदा क्र.१५) | ----”----- | ४५,२३,५०,१६३/- | १४ | ४.५ % | ४.५ % |
| ४) | **मे.ग्रुप सेवन गार्ड्स (इंडिया)** पी.बी.मार्ग, वरळी, मुंबई-४०००१३(निविदा क्र.१२) | ----”----- | २३,२६,३०,१४७.००/- | १४ | ८ % | ८ % |
| ५) | **मे.सिंग इंटेलिजंन्स सिक्युरिटी प्रा.लि.**अंधेरी (पुर्व) मुंबई-४०० ०९३ (निविदा क्र.०१) | ----”----- | २३,१८,९९,०६३/- | ३० | २ % | २ % |
| ६) | **श्रीमती रूख्मीनी सखाराम मोरे,** कोर्ट नाका, ठाणे (प)-४०००६०१ (निविदा क्र.१६) | ----”----- | ३,७२,५३,२२९.००/- | १८ | १० % | १० % |
| ७) | **मे.बक्शी सिक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हिसेस प्रा.लि.,** लिंक रोड, मालाड (वेस्ट), मुंबई-४०००६४ (निविदा क्र.०७) | ----”----- | १३,३१,२२,३७९/- | १९ | २.४९ % | ०.०१ % |
| ८) | **मे.ईगल आय एन्टरप्राईज,** दाबेल, वापी-दमनरोड, दमन (यु.टी.) (निविदा क्र.५६) | ----”----- | ३,२०,००,०००/- | ३३ | २.०० % | २.०० % |

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रूपये) | कंत्राटदाराची वार्षिक उलाढाल (रूपये) | कामाचा पुर्वानुभव (वर्षे) | सर्व्हिस चार्जेस दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | निविदेतील मुळ दर टक्केवारी | चर्चा/वाटाघाटी नंतरचे बंद पाकीटातील दर (टक्केवारी) |
| ९) | **मे.ट्रिगर फॅसिलिटी प्रा.लि.** ओशिवरा,जोगेश्वरी (प), मुंबई-४००१०२ (निविदा क्र.१०) | ----”----- | ४,६५,००,०००/- | ०९ | १६.६५ % | ०.० १/२ % |
| १०) | **मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि.,** डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे-४११०४१ (निविदा क्र.५५) | ----”----- | ६,७३,८५,६४१/- | ०९ | ०.०१ % | ०.०१ % |
| ११) | **मॅक इंडस्ट्रियल सिक्युरिटी ॲन्ड डिटेक्टीव्ह सर्व्हिसेस प्रा.लि.,** सिडको, नविन नाशिक-४२२००९ (निविदा क्र.६४) | ----”----- | ३,५४,८७,९३३/- | १५ | २.५ % | २.५ % |
| १२) | **मे.प्रखर सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस** अरोरा टावरजवळ, पुणे-४११००१ (निविदा क्र.५२) | ----”----- | ३,४१,८१,२०३/- | ११ | ४७.४८ % | ४७.४८ % |
| १३) | **मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,** पुणे-मुंबई रोड, चिंचवड, पुणे-४११ ०१९ (निविदा क्र.५१) | ----”----- | ५,३९,६६,५७,०००/- | १७ | ०.१० % | ०.०१ % |
| १४) | **मे.जय भवानी एन्टरप्राईजेस,** चिंचवड, पुणे-४११०१९ (निविदा क्र.६६) | ----”----- | १४,६३,२८,५८०/- | १० | ०.२२ % | **०.०००१ %** |
| १५) | **मे.स्वराज एन्टरप्राईजेस** गवळीनगर, भोसरी, पुणे-४११ ०३९ (निविदा क्र.६३) | ----”----- | ६,९८,७१,५३६.००/- | १० | ०.५० % | ०.०० १/२ % |
| १६) | **मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा. लि.,** औंध, पुणे-४११ ००७. (निविदा क्र.५९) | ----”----- | ८८,५६,२९,९०४/- | २२ | ०.०१ % | **०.०००१ %** |
| १७) | **मे.सी हॉक सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लिमिटेड** नविन पनवेल-(वे), नवि मुंबई-४१० २०६ (निविदा क्र.०४) | ----”----- | ६,९१,००,०००/- | ०७ | ३ % | ०.००१ % |
| १८) | **मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस,** दिप बंग्लो चौक, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६ (निविदा क्र.५८) | ----”----- | ७,७५,८२,७७१/- | २९ | १.५० % | १/२ % |

**निर्णय क्र.४५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०७ गोवरी खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या बंद निविदा उघडणे व न्युनतम दर निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रति वर्षाप्रमाणे माहे-एप्रिल-२०१४ ते माहे मार्च, २०१५ अखेर या आर्थिक वर्षाकरिता रानशेणी व थापील गोवरी खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्यीय समिती दि.०४/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ११६ नूसार जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात दि.२९/०३/२०१४ रोजी जाहिरात देवून बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविण्यात आलेल्या आहेत. निवीदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.०५/०४/२०१४ अशी अंतिम तारीख नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा (दरपत्रके) जमा झालेल्या आहेत.

**राणशेनी व थापील गोवरी कोटेशन-**

(अंदाजे मागणी १५०००० + ५०००० किलो अंदाजे खर्च रु.१५,००,०००/-)

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र,<br>प्रो.प्रा.श्री.रविंद्र विजय देवरे,<br>रा.पंचशील नगर, मा.कॅम्प, मालेगाव,<br>जि.नाशिक (मो.०९८२३८६५८८२) | ०१६४/०२.०४.२०१४ |
| ०२ | श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र,<br>प्रो.प्रा.श्री.रविंद्र विजय देवरे,<br>रा.पंचशील नगर, मा.कॅम्प, मालेगाव,<br>जि.नाशिक (मो.०९८२३८६५८८२) | ०१६९/०२.०४.२०१४ |
| ०३ | श्री.सिताराम आनंदा तिपायले,<br>मु.पो.ता.कोपरगाव, जि.अहमदनगर | ०२५५/०३.०४.२०१४ |
| ०४ | श्री.प्रभाकर चिंतामण चव्हाण,<br>मु.पो.ता.मालेगाव, जि.नाशिक<br>मो.९४२३५४३१२० | ०२५६/०३.०४.२०१४ |
| ०५ | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव, जि.नाशिक<br>(मो.९७६४९५४८१९) | ०२५७/०३.०४.२०१४ |
| ०६ | श्री.योगेश संतोष सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव, जि.नाशिक<br>(मो. ८४०८०६९७०२) | ०२५८/०३.०४.२०१४ |

गोवरी खरेदीकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०७ कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र | कोटेशनधारक नाव व पत्ता | गोवरी प्रकार | अंदाजे मागणी | कोटेशनमधील दर (प्रति किलो) रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर (प्रति किलो) रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र,<br>प्रो.प्रा.श्री.विजय पितांबर देवरे,<br>मा.कॅम्प, मालेगाव, जि- नाशिक | राणशेणी | १,००,००० | ६.९० | **६.४५** |
| | | थापील | २५,००० | ६.९० | **६.४५** |
| ०२ | श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र,<br>प्रो.प्रा.श्री.विजय पितांबर देवरे,<br>मा.कॅम्प, मालेगाव, जि. नाशिक | राणशेणी | १,००,००० | ६.९० | --- |
| | | थापील | २५,००० | ६.९० | --- |
| ०३ | श्री.सिताराम आनंदा तिपायले,<br>मु.पो.ता.कोपरगाव,<br>जि.अहमदनगर | राणशेणी | १,००,००० | ७.८० | अनुपस्थित |
| | | थापील | २५,००० | --- | अनुपस्थित |
| ०४ | श्री.प्रभाकर चिंतामण चव्हाण,<br>मु.पो.ता.मालेगाव, जि.नाशिक | राणशेणी | १,००,००० | ७.५० | अनुपस्थित |
| | | थापील | २५,००० | --- | अनुपस्थित |
| ०५ | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने,<br>ता.मालेगाव, जि.नाशिक | राणशेणी | १,००,००० | --- | अनुपस्थित |
| | | थापील | २५,००० | ६.८० | अनुपस्थित |
| ०६ | श्री.योगेश संतोष सुर्यवंशी,<br>मु.लुल्ले, पो.विराने,<br>ता.मालेगाव, जि.नाशिक | राणशेणी | १,००,००० | ६.५० | अनुपस्थित |
| | | थापील | २५,००० | --- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.४५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे द्वारकामाई मध्ये धुनी ज्वलनासाठी आवश्यक असणाऱ्या गोवरीपैकी मागील आर्थिक वर्षातील ८२,००० किलो गोवरी आजमितीस शिल्लक असल्यामुळे सन २०१४-१५ साठी १,५०,००० किलो (रानशेणी १,२५,००० + थापील २५,०००) गोवरी खरेदीकामी श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र, प्रो.प्रा.श्री.विजय पितांबर देवरे, मा.कॅम्प, मालेगाव हे एकच कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते. तसेच सध्या पावसाळयाचे दिवस जवळ आले असल्या कारणांमुळे त्यांचेबरोबरच चर्चा/ वाटाघाटी करणेत आल्या व त्यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**जर निम्नतम दरधारक पुरवठा करणेस असमर्थ ठरले, तर द्वितीय निम्नतम दरधारकास गोवरीचा पुरवठा आदेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.०८** **दैनंदिन कामकाजासाठी २० नग संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.** (रु.९,५०,०००/-)

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :** कलम १७ (२) झ नुसार

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५५.

**प्रास्ताविकः** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५५ नुसार २० नग संगणक संच खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये ९,५०,०००/- + टॅक्सचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक संगणके, प्रिंटर्स्, युपीएस व इतर अनुषांगिक साहित्य वेळोवेळी खरेदी करुन देण्यात आलेले आहेत. बहुतेक संगणक हे सरासरी ६ ते १० वर्षापासून वापरात आहेत. सदर संगणकाचे साहित्य दैनंदिन वापरामुळे निकामी/ खराब व कालबाह्य झाल्याने तसेच तंत्रज्ञानात वेळोवेळी बदल झाल्याने, काही साहित्यांचे उत्पादन बंद झालेले आहे. त्यामुळे नादुरुस्त झालेले साहित्य दुरुस्त करणेसाठी आवश्यक स्पेअर पार्टस् बाजारात उपलब्ध होत नाही. सबब अनेक विभागांमध्ये कार्यालयीन कामकाजासाठी नविन संगणकांची उपलब्धता करुन देणे गरजेचे आहे. संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर आयटी उपकरणांचे आयुष्यमान (Life) ठरविणेबाबत शासन निर्णय क्रमांक मातंस/ नस्ती०७/ प्र.क्र.८९/३९ मंत्रालय, मुंबई दिनांक ०१ ऑगस्ट २०११ नुसार नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यातील कलम १ व २ नुसार संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणांचे वयोमान ५ वर्ष निश्चित करण्यात आलेले आहे. सद्यस्थिती ५ वर्षापेक्षा जास्त वयोमान झालेले १२६ संगणके असून त्यांचे स्पेअरपार्ट मिळत नाही. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५५ नुसार २० नग संगणक संच खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर दिनांक १२/०५/२०१४ ते दि. २४/०५/२०१४ अखेर जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा/ कोटेशन दिनांक ३१/०५/२०१४ अखेर निविदा स्विकारणेकामी दिनांक ०९/०५/२०१४ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये मान्यता घेण्यात आलेली होती.

**मागणीः** त्यानुसार २० नग संगणक संच खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा/ कोटेशन तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदा / कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रं. व दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मिनीटेक सिस्टीमस् इं. प्रा. लि., नाशिक | आवक क्रं. ३०४४ दि. २२/०५/२०१४. |
| ०२ | इन्फोवर्ड टेक्नॉलॉजी प्रा. लि., पूणे | आवक क्रं. ३२३५दि. २६/०५/२०१४. |
| ०३ | Orbit Peripherals (Pune) Pvt. Ltd. | आवक क्रं. ३४९० दि. ३०/०५/२०१४. |
| ०४ | सुजता कॉम्प्युटर्स प्रा. लि. पूणे | आवक क्रं. ३४९६ दि. ३१/०५/२०१४. |
| ०५ | KJM Group System Solutions, Bhayander. | आवक क्रं. ३५३९ दि. ३१/०५/२०१४. |
| ०६ | Infoserve Technologoies, Aurangabad. | आवक क्रं. ३५४० दि. ३१/०५/२०१४. |
| ०७ | Racca Info Tech Pvt. Ltd. Nashik | आवक क्रं. ३५४१ दि. ३१/०५/२०१४. |
| ०८ | M J Systems & Services, Manmad. | आवक क्रं. ३५५४ दि. ०२/०५/२०१४. |

२० नग संगणक संच खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा / कोटेशन आवक विभागाकडुन प्राप्त झालेले आहे. उपरोक्त प्राप्त मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडुन संबधीत उवरोक्त पुरवठा धारकांशी चर्चा तथा वाटा-घाटी अंती त्यातील न्युन्नत्तम निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडून संगणक संच खरेदी करण्यात यावे, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः** शासन निर्णय क्रमांक मातंस/नास्ती ०७/प्र.क्र.८९/३९ मंत्रालय मुंबई यांचा दिनांक ०१ ऑगस्ट, २०११ रोजीचा निर्णय.

२० नग संगणक संच खरेदी करणेसाठी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कंपनीचे नांव | निविदेमधील दर | | |
|---|---|---|---|---|
| | | HP चे दर | Dell चे दर | Lenovo चे दर |
| 01 | Minitech Systeems India Pvt. Ltd., Nashik | - | 7,79,000/- | - |
| 02 | Infoward Technology Pvt. Ltd., Pune | 8,80,000/- | - | - |
| 03 | Cribi Peripherals (Pune) Pvt.Ltd., | 8,75,700/- | - | - |
| 04 | Sujata Computers Pvt. Ltd., Pune | 9,05,541/- | 8,32,020/- | 7,81,494/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 05 | KJM Group System Solutions, Bhayander | - | 7,38,000/- | - |
| 06 | Infoserve Technologoies, Aurangabad | - | 7,84,266/- | - |
| 07 | Racca Info Tech Pvt.Ltd., Nashik | - | - | **7,50,000/-** |
| 08 | M.J. Systgems & Services, Manmad | 8,75,000/- | 6,71,000/- + Windows Extra | - |

**निर्णय क्र.४५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील विविध विभागांमध्ये दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेली संगणके व संगणकीय साहित्य खरेदीकामी मे.राक्का इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांचे २० नग लेनोव्हो कंपनीच्या संगणक व संगणकीय साहित्याकामीचे रु.७,५०,०००/- मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच, यापुढे संगणके खरेदीसाठी संगणकांची एकच कंपनी व मॉडेल निश्चित करणेत येऊन, त्यासाठीच दर मागविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन दरपत्रक निविदा (कमर्शियल बीड) उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.१४,७५,०००/-)**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २१.०६.२०१३ चे सभेतील विषय क्र. ५२ निर्णय क्र.४८५ अन्वये. मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०३-२०१४ ते दिनांक २८-०२-२०१५ या कालावधीकरीता देणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१४,७५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.३०-०१-२०१४ रोजी, दै.नवाकाळ, मुंबई, दै.संध्यानंद पुणे व दै.सामना औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३१-०१-२०१४ ते दि.१५.०२.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत. तसेच तांत्रिक लिफाफा (Technical Bid) दि.१७.०२.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात ०६ निविदाधारकांचे (हार्ड कॉपी) तांत्रिक लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त ०६ निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे दि.२४.०२.२०१४ रोजी मा. प्रशासकिय अधिकारी (विद्युत) यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाशाखा व संस्थानचे अंतर्गत लेखातपासणीस यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. कागदपत्रांची पडताळणी करतांना खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

०१) मे.केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांनी सदर कामाचे बयाणा रक्कमेचा व टेंडर फीचा डी.डी. जोडलेला नसलेचे आढळून आलेले आहे.त्यामुळे ते निविदेसाठी अपात्र होत आहे,असे मत आहे.

ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख २४.०२.२०१४ अशी होती. सदर ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा आय.टी.विभागामार्फत दि.२८.०२.२०२४ रोजी उघडण्यात आल्या.

**अ)** दि.१५.०२.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन निविदा Upload केलेले निविदाधारक

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे. ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे |
| ०२) | मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स , वडाळा,मुंबई |
| ०३) | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, प्रा.लि., मुंबई |

**ब)** दि.१५.०२.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन निविदा Upload न केलेले निविदाधारक-

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.श्री व्यंकटेश्वरा एच.व्ही.ए.सी. ॲण्ड आर ,पुणे |
| ०२) | मे.केलव्होल्ट (इंडिया ) प्रा.लि., मुंबई |
| ०३) | मे.विघ्नेश्वर एअर कंडीशनिंग प्रा.लि., मुंबई |

मे.श्री व्यंकटेश्वरा एच.व्ही.ए.सी. ॲण्ड आर,पुणे, मे.विघ्नेश्वर एअर कंडीशनिंग प्रा.लि.,मुंबई व मे.केलव्होल्ट(इंडिया) प्रा.लि., मुंबई या तिन निविदाधारकांनी दि.१५.०२.२०१४ रोजी सायं.०५.००

वा.पावेतो ऑनलाईन निविदा Upload केलेल्या नाही. मात्र ०३ निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा वेळेत Upload झालेल्या आहेत. त्यामुळे ज्यांनी ऑनलाईन निविदा Upload केलेल्या नाही त्या निविदाधारकांच्या निविदेचा विचार करता येणार नाही, तसेच त्यांनी दिलेले कागदपत्रे व बयाणा डी.डी. त्यांना परत करावीत, असे मत आहे.

मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामाकरिता प्राप्त झालेली ०३ ऑनलाईन दरपत्रक (कमर्शियल बीड) आजचे सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | मे. ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे | ८,३१,०४०/- | ८,३१,०४०/- |
| ०२) | मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, वडाळा, मुंबई | १०,८४,१९५/- | **६,००,०००/-** |
| ०३) | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, प्रा.लि., मुंबई | १२,९८,७००/- | ८,१०,०००/- |

**निर्णय क्र.४५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व मंदिर परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे दि.०१.०७.२०१४ ते दि.३०.०६.२०१५ या कालावधीसाठी कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, वडाळा, मुंबई यांचे रु.६,००,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन दरपत्रक निविदा (कमर्शियल बीड) उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.१६,००,०००/-)**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २१.०६.२०१३ चे सभेतील विषय क्र. ५८ निर्णय क्र.४९१.अन्वये. श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०३-२०१४ ते दिनांक २८-०२-२०१५ या कालावधीकरीता देणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.३०-०१-२०१४ रोजी, दै.नवाकाळ, मुंबई, दै.संध्यानंद पुणे व दै.सामना औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३१-०१-२०१४ ते दि.१५.०२.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत.तसेच तांत्रिक लिफाफा (Technical Bid) दि.१७.०२.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात ०६ निविदाधारकांचे (हार्ड कॉपी) तांत्रिक लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त ०६ निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे दि.२४.०२.२०१४ रोजी मा. प्रशासकिय अधिकारी (विद्युत ) यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाशाखा व संस्थानचे अंतर्गत लेखातपासणीस यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.त्याचा तपशिल सोबतच्या **"परिशिष्ठ ब"** मधील तक्त्यात दर्शविलेला आहे.कागदपत्रांची पडताळणी करतांना खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

०१) मे.केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांनी सदर कामाचे बयाणा रक्कमेचा व टेंडर फीचा डी.डी. जोडलेला नसलेचे आढळून आलेले आहे.त्यामुळे ते निविदेसाठी अपात्र होत आहे,असे मत आहे.

ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख २४.०२.२०१४ अशी होती. सदर ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा आय.टी.विभागामार्फत दि.२८.०२.२०२४ रोजी उघडण्यात आल्या.

**अ)** दि.१५.०२.२०१४ रोजी सायं.०५.०० वा. पावेतो ऑनलाईन निविदा Upload केलेले निविदाधारक

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे. ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे |
| ०२) | मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स , वडाळा,मुंबई |
| ०३) | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, प्रा.लि., मुंबई |

**ब)** दि.१५.०२.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन निविदा Upload न केलेले निविदाधारक

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.श्री व्यंकटेश्वरा एच.व्ही.ए.सी. ॲण्ड आर ,पुणे |
| ०२) | मे.केलव्होल्ट (इंडिया ) प्रा.लि., मुंबई |
| ०३) | मे.विघ्नेश्वर एअर कंडीशनिंग प्रा.लि., मुंबई |

मे.श्री व्यंकटेश्वरा एच.व्ही.ए.सी. ॲण्ड आर,पुणे, मे.विघ्नेश्वर एअर कंडीशनिंग प्रा.लि.,मुंबई व मे.केलव्होल्ट (इंडिया ) प्रा.लि., मुंबई या तिन निविदाधारकांनी दि.१५.०२.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन निविदा Upload केलेल्या नाही.मात्र ०३ निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा वेळेत Upload झालेल्या आहेत. त्यामुळे ज्यांनी ऑनलाईन निविदा Upload केलेल्या नाही त्या निविदाधारकांच्या निविदेचा विचार करता येणार नाही, तसेच त्यांनी दिलेले कागदपत्रे व बयाणा डी.डी. त्यांना परत करावीत, असे मत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामाकरिता प्राप्त झालेली ०३ ऑनलाईन दरपत्रक (कमर्शियल बीड) आजचे सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | मे. ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे | १४,५०,८१६/- | १०,४०,०००/- |
| ०२) | मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, वडाळा, मुंबई | ११,८२,१६५/- | **१०,००,०००/-** |
| ०३) | मे.स्पीड फ्रॉस्ट सर्व्हिसेस, प्रा.लि., मुंबई | १५,९९,२१०/- | ११,००,०००/- |

**निर्णय क्र.४६० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे दि.०१.०७.२०१४ ते दि.३०.०६.२०१५ या कालावधीसाठी कॉम्प्रेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, वडाळा, मुंबई यांचे रु.१०,००,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.११ एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी तिसरे वेळेस प्राप्त झालेले एकच ऑनलाईन फेर ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय घेणेबाबत.** (रु.१३,८०,०००/-)

**प्रस्ताव-** मा.व्य.समितीच्या दिनांक २६.०७.२०१३चे सभेतील विषय क्र.४९ निर्णय क्र. ५७८ अन्वये श्री साईबाबा संस्थानमधील एअर सर्कीट ब्रेकर्सचे दि.०१.०९.२०१३ ते दि.३१.०८.२०१४ या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१३,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती .

या नुसार उपरोक्त संदर्भ क्र ०२ नुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.०४-११-२०१३ रोजी, दै. सार्वमत व दै. केसरी या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५-११-२०१३ ते दि.१८.११.२०१३ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या होत्या. तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख २६.११.२०१३ अशी होती. दि.२६.११.२०१३ रोजी ई-टेंडर पध्दतीने ठेकेदारानी भरलेल्या तांत्रिक निविदा आय.टी. विभागामार्फत उघडण्यात आली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये एकही निविदा प्राप्त झालेली आढळून आले नाही.

त्यामुळे उपरोक्त संदर्भ क्र.०३ दि.१७.१२.२०१३ चे टिपणिनुसार दुस-यांदा वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर-ई-निविदा मागविणेकामी मान्यता मिळालेली होती.सदर कामाचे ऑनलाईन फेर ई-निविदा मागविणेकामी दि.३०-०१-२०१४ रोजी दै.नवाकाळ, मुंबई, दै.संध्यानंद, पुणे व दै.सामना, औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३१-०१-२०१४ ते दि.१५.०२.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या होत्या. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक निविदा लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या कॉपी स्कॅन करुन पाठविणेकरिता दि.१७.०२.२०१४ रोजी साय.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार मे.केलव्होल्ट (इंडिया ) प्रा.लि., मुंबई या एकाच ठेकेदाराची तांत्रिक निविदेची हार्ड कॉपी प्राप्त झाली होती.तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख २४.०२.२०१४ अशी होती दि.२४.०२.२०१४ रोजी ई-टेंडर सिस्टीममध्ये टेंडर भरलेल्या पार्टीजचे तांत्रिक निविदा आय.टी. विभागामार्फत उघडण्यात आली होती ई-टेंडर सिस्टिममध्ये दुस-यांदा एकही निविदा प्राप्त झालेली नव्हती. तसेच मे. केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांनी ई-टेंडर Upload केल्याचे आढळुन आले नव्हते.

त्यामुळे उपरोक्त संदर्भ क्र.०४ दि.०५.०३.२०१४ चे टिपणिनुसार नुसार तिस-यांदा वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर-ई-निविदा मागविणेकामी मान्यता घेऊन त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन फेर ई-निविदा मागविणेकामी दि.१०-०४-२०१४ रोजी,दै पुढारी ,या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११-०४-२०१४ ते दि.२५.०४.२०१४ अखेर फेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत.तसेच तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफा (Technical Bid) दि.२८.०४.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत

ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात पुन्हा तिसरे वेळेस मे.केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांची एकच तांत्रिक फेर ई- निविदेची हार्ड कॉपी प्राप्त झाली आहे.

प्राप्त एकच निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफा दि.३०.०४.२०१४ रोजी मा. प्रशासकिय अधिकारी (विद्युत) यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाशाखा व संस्थानचे अंतर्गत लेखातपासणीस यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख ३०.०४.२०१४ अशी होती. सदर ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा आय.टी.विभागामार्फत दि.३०.०४.२०२४ रोजी उघडण्यात आली.

दि.२५.०४.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारक

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.केलव्होल्ट (इंडिया ) प्रा.लि., मुंबई |

श्री साईबाबा संस्थानमधील एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) कामाकरिता तिसरे वेळेस फेर ई-निविदा बोलविल्यानंतर मे.केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांची एकच ऑनलाईन फेर निविदा (कमर्शियल बीड) प्राप्त झालेली आहे. मा.त्रीसदस्य समितीसमोर प्राप्त झालेली निविदा उघडावे लागणार आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१३ चे सभेतील विषय क्र.४९ व निर्णय क्र.५७८ नुसार सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करीता दि.०१.०९.२०१३ ते दि.३१.०८.२०१४ या एक वर्ष कालावधीकरीता मान्यता दिलेली होती. निविदांची संख्या पुरेशी न आल्यामूळे तिन वेळेस फेर निविदा मागवाव्या लागल्या यामुळे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करीता दिलेला कालावधी सपुंष्टात आलेला आहे. तरी कृपया सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी कार्यादेशाचे तारखेपासून पुढे एक वर्ष असण्याकरीता मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे तिस-या वेळेस फेरनिविदा बोलावून सुध्दा प्राप्त झालेली एकच निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन, संबंधीतांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | मे.केलव्होल्ट (इंडिया ) प्रा.लि., मुंबई | १२,३६,२६५/- | **<u>१०,००,०००/-</u>** |

**निर्णय क्र.४६१ यावर सविस्तर चर्चा होऊन, एअर सर्कीट ब्रेकर्सचे दि.०१.०७.२०१४ ते दि.३०.०६.२०१५ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी तीन वेळेस ई-निविदांची मागणी करुन, तिसऱ्या वेळेसही एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे याकामी मे.केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांचे रु.१०,००,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२ साईआश्रम भाग-०१ कडील १३ इमारतींमध्ये तसेच साईआश्रम भाग-२ कडील ०७ इमारतींमध्ये प्रत्येकी एक लिफ्ट याप्रमाणे एकूण २० नग स्टॅण्डबाय लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन फेर ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.** (रु.३,२०,००,०००/-)

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५-०९-२०१२ चे सभेतील विषय नं. ४४ निर्णय क्र.७६५ अन्वये साईआश्रम भाग-०१ कडील १३ इमारतीमध्ये तसेच साईआश्रम भाग-०२ कडील ०७ इमारतीमध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण २० नग लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत. एक लिफ्ट नादुरुस्त झाल्यास पर्यायी व्यवस्थेकरीता साईआश्रम भाग-०१ कडील १३ इमारतींमध्ये तसेच साईआश्रम भाग-०२ कडील ०७ इमारतींमध्ये प्रत्येकी एक लिफ्ट याप्रमाणे एकुण २० नग स्टॅण्डबाय लिफ्ट बसविणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ३,२०,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची दि.२०.०२.२०१३ रोजी खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.३०-०१-२०१४ रोजी, दै.नवाकाळ, मुंबई, दै.संध्यानंद, पुणे व दै.सामना, औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३१-०१-२०१४ ते दि.१५.०२.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या होत्या. तसेच तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख २४.०२.२०१४ अशी होती.

दि.२४.०२.२०१४ रोजी ई-टेंडर सिस्टीममध्ये टेंडर भरलेल्या पार्टीजचे तांत्रिक निविदा आय.टी. विभागामार्फत उघडण्यात आली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये लिफ्टची एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने उपरोक्त संदर्भ क्र.०४ दि.०५.०३.२०१४ चे टिपणीनुसार साईआश्रम भाग-०१ व भाग-०२

कडील इमारतींमध्ये प्रत्येकी एक लिफ़्ट याप्रमाणे एकुण २० नग स्टॅण्डबाय लिफ़्ट बसविणेकामी पुन्हा वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर-ई-निविदा मागविणेकामी मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन फेर ई-निविदा मागविणेकामी दि.१०-०४-२०१४ रोजी, दै पुढारी, या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११-०४-२०१४ ते दि.२५.०४.२०१४ अखेर फेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत. तसेच तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफा (Technical Bid) दि.२८.०४.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात ०२ निविदाधारकांचे (हार्ड कॉपी) तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त ०२ निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफा दि.३०.०४.२०१४ रोजी मा.प्रशासकिय अधिकारी (विद्युत) यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाशाखा व संस्थानचे अंतर्गत लेखातपासणीस यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख ३०.०४.२०१४ अशी होती. सदर ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा आय.टी.विभागामार्फत दि.३०.०४.२०२४ रोजी उघडण्यात आल्या.

दि.२५.०४.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारक

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे. जॉन्सन लिफ्टस प्रा.लि., पुणे |
| ०२) | मे. ओमेगा इलेव्हेटर्स , अहमदाबाद |

साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील इमारतींमध्ये प्रत्येकी एक लिफ़्ट याप्रमाणे एकुण २० नग स्टॅण्डबाय लिफ़्ट बसविणेकामी प्राप्त झालेल्या दोन ऑनलाईन फेर ई- निविदा (कमर्शियल बीड) आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | मे. जॉन्सन लिफ्टस प्रा.लि., पुणे | ६,०८,९६,७१८/- | ६,०८,९६,७१८/- |
| ०२) | मे. ओमेगा इलेव्हेटर्स , अहमदाबाद | ३,०४,३०,०००/- | ३,०४,३०,०००/- |

**निर्णय क्र.४६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग-०१ कडील १३ इमारतींमध्ये तसेच साईआश्रम भाग-२ कडील ०७ इमारतींमध्ये प्रत्येकी एक लिफ्ट याप्रमाणे एकूण २० नग स्टॅण्डबाय लिफ्ट बसविणेचे काम जास्त खर्चाचे आहे व याकामी फक्त ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. चर्चा/ वाटाघाटीसाठी कमीत कमी ०३ निविदा असायला हव्यात, त्यामुळे सदरहूकामी फेर ई-निविदा मागविणेत याव्यात व यापुढे चर्चा/ वाटाघाटी होणार नाहीत, निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येईल, याकरिता अंतीम दर देण्यात यावे, याबाबतचा स्पष्ट उल्लेख ई-निविदेमध्ये करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३ साईआश्रम भाग-०१ व साईधर्मशाळा या इमारतीमधील लिफ्टचे (AMC) वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत. (रु.२५,४२,४६०/-)**

**प्रस्ताव-** साईभक्तांना अधिक अधिक सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेकरिता साईआश्रम व साई धर्मशाळा या इमारतींमध्ये भक्तांना तळमजल्यावरुन वरील मजल्यावर ये-जा करणेकरिता मे.जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांचे मार्फत स्टेनलेस स्टील ऑटोमॅटीक डोअर्सच्या वीस (२०) लिफ्ट बसवून देण्यात आलेल्या आहेत.

लिफ्ट चालू झाल्यानंतर मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांनी दि.०१-०८-२०१२ ते दि.३१-०७-२०१३ या कालावधीत एक वर्ष फ्री सर्व्हिस उत्तम प्रकारे दिली आहे. मे.जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांची फ्री सर्व्हिसिंगची मुदत संपल्यानंतर ही त्यांनी आज पर्यंत जादा ५ महिने फ्री सर्व्हिसींग करुन दिलेली आहे.

लिफ्टचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) दिलेले नसल्यास लिफ्टचे स्पेअर पार्ट खराब होऊन लिफ्ट बंद पडल्यास स्पेअर पार्ट वेळेवर स्थानिक दुकानदारांकडे मिळत नसल्याने लिफ्ट काही दिवसांपर्यंत बंद ठेवावी लागते.

रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये मेकॅनिकल स्पेअर्सची कोणतीही किंमत न देता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून दरमहा कंपनीचा प्रशिक्षित एक्स्पर्ट मेकॅनिक येऊन मशिनरीची सर्व्हिसिंग व क्लिनींग करून सेटींग करून देत असतो. जेणेकरून लिफ्ट सुरळीत चालू राहू शकतात. सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) पिरिअडमध्ये मशिनरीचा कोणताही

मेकॅनिकल पार्ट नैसर्गिकरित्या (मशिनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास तो बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे. मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे हे त्यांचे स्पेअर पार्ट इतर कोणत्याही ऑपरेटर्स/ मेंटनन्सधारकांना विकत देत नाहीत. लिफ्टचे होणारे अपघात टाळण्यासाठी ज्या त्या मशिनरीकरिता त्याच उत्पादक कंपन्याचे स्वत:चे स्पेअर पार्ट वापरणे अधिक सुरक्षित असतात.

मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांनी दि.०१-०१-२०१४ ते दि.३१-१२-२०१४ या एक वर्षाकरिता सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामाच्या खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे कळविलेला आहे.

| अ.नं. | तपशील | संख्या | कालावधी | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईआश्रम -०१ - A बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५१ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०२ | साईआश्रम -०१ - B बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५२ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०३ | साईआश्रम -०१ - C बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५३ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०४ | साईआश्रम -०१ -D बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५४ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०५ | साईआश्रम -०१ -E बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५५ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०६ | साईआश्रम -०१ -F बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५६ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०७ | साईआश्रम -०१ -G बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५७ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०८ | साईआश्रम -०१ -H बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६१ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ०९ | साईआश्रम -०१ -I बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६२ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १० | साईआश्रम -०१ - J बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५९ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| ११ | साईआश्रम -०१ -K बिल्डींग लिफ्ट क्र. ९९५८ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १२ | साईआश्रम -०१ L बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६० | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १३ | साई धर्मशाळा- A बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६४ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १४ | साई धर्मशाळा- B बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६५ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १५ | साई धर्मशाळा- C बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६६ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १६ | साई धर्मशाळा- D बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६७ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १७ | साई धर्मशाळा- E बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६८ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १८ | साई धर्मशाळा- F बिल्डींग लिफ्ट क्र. ९९६३ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| १९ | साईआश्रम-०१ R ब्लॉक लिफ्ट क्र. ९९६९ | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| २० | साई धर्मशाळा- R ब्लॉक लिफ्ट क्र. ९९७० | ०१ | एक वर्ष | रु.१,२७,१२३/- | रु.१,२७,१२३/- |
| | **एकुण** | | | | **रु.२५,४२,४६०/-** |

दिनांक २०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३३ निर्णय नं.३८६ अन्वये (ठरावाची प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे) दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनरस्, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे, असे ठरलेले आहे.

तरी लिफ्टची उत्पादक कंपनी मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांना दि.०१-०१-२०१४ ते दि.३१-१२-२०१४ या एक वर्ष कालावधीकरीता साईआश्रम-०१ व साई धर्मशाळा लिफ्टचे सर्व्हिस

कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) देणेकामी रक्कम रुपये २५,४२,४६०/- इतकी रक्कम आदा करावी लागणार आहे. या कामास व खर्चास मा.त्रीसदस्य समितीची प्रशासकीय मान्यता घ्यावी लागेल. तसेच मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांना दराचे निगॉशिएनसाठी मा. त्रिसदस्य समितीपुढे बोलविणे योग्य राहील.

साईआश्रम भाग-०१ व साईधर्मशाळा या इमारतीमधील लिफ्टचे (AMC) वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी लिफ्टची उत्पादक कंपनी मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांचे कोटेशन घेऊन, त्यांना सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | मे. जॉन्सन लिफ्टस प्रा.लि., पुणे | २५,४२,४६०/- | **२२,५०,०००/-** |

**निर्णय क्र.४६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१४ श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन दरपत्रक निविदा (कमर्शियल बीड) उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.२५,००,०००/-)**

**प्रस्ताव-** मा.व्य.समितीच्या दिनांक २१.०६.२०१३ चे सभेतील विषय क्र. ५० निर्णय क्र. ४८३ अन्वये. श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.३०-०१-२०१४ रोजी, दै.नवाकाळ, मुंबई, दै.संध्यानंद पुणे व दै.सामना औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.३१-०१-२०१४ ते दि.१५.०२.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत.तसेच तांत्रिक लिफाफा (Technical Bid) दि.१७.०२.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात ०३ निविदाधारकांचे (हार्ड कॉपी) तांत्रिक लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त ०३ निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे दि.२४.०२.२०१४ रोजी मा. प्रशासकिय अधिकारी (विद्युत) यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाशाखा व संस्थानचे अंतर्गत लेखातपासणीस यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख २४.०२.२०१४ अशी होती. सदर ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा आय.टी.विभागामार्फत दि.२८.०२.२०२४ रोजी उघडण्यात आल्या.

दि.१५.०२.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन निविदा Upload केलेले निविदाधारक

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.मधुनिल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, नवी मुंबई |
| ०२) | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस,औरंगाबाद |
| ०३) | मे.मिडलॅण्ड डिझेल सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस प्रा.लि.,नागपूर |

श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामाकरिता उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ ऑनलाईन दरपत्रके (कमर्शियल बीड) आजचे सभेत उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | मे.मधुनिल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, नवी मुंबई | ३५,५३,५००/- | ३५,५३,५००/- |
| ०२) | मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस,औरंगाबाद | ३३,०१,९२९/- | **३३,००,०००/-** |
| ०३) | मे.मिडलॅण्ड डिझेल सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस प्रा.लि.,नागपूर | ३३,१६,२००/- | ३३,१६,२००/- |

**निर्णय क्र.४६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१५ साईनिवास अतिथीगृहामधील व्ही.आय.पी. सुटचे जुने २.० टन स्प्लिट ए.सी. बायबॅक करुन नवीन खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या ऑनलाईन फेर ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.११,२२,०००/-)**

**प्रस्ताव-** मा.व्य.समितीच्या दिनांक २७.०४.२०१३चे सभेतील विषय क्र. ४१ निर्णय क्र.३८४ अन्वये श्री साईनिवास अतिथीगृह मधील व्हीआयपी सुटचे जुने २.० टन स्प्लिट ए.सी. बायबॅक करुन नविन खरेदी करुन बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.११,२२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.१८-०७-२०१३ रोजी,दै. सार्वमत या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२२-०७-२०१३ ते दि.०३.०८.२०१३ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या होत्या. दि.०९.०८.२०१३ रोजी साय.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते.त्यानुसार चार तांत्रिक निविदा प्राप्त झाल्या होत्या.तसेच तांत्रिक लिफाफा (Technical Bid) दि.१४.०८.२०१३ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती.

दि.१४.०८.२०१३ रोजी आय.टी. विभागामार्फत निविदा Open करणेसाठी प्रयत्न केले असता, ते Open झाले नाही त्यामुळे फेर ई-निविदा बोलविण्यात याव्यात असे दि.२३.०८.२०१३ नुसार आय.टी. विभागाने मा.का.अ.साहेब यांचे मान्यतेने कळविले होते.

त्यानुसार दि.०५.०३.२०१४ चे टिपणीनुसार श्री साईनिवास अतिथीगृह मधील व्हीआयपी सुटचे जुने २.० टन स्प्लिट ए.सी. बायबॅक करुन नविन खरेदी करुन बसविणेकामी पुन्हा वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर-ई-निविदा मागविणेकामी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन फेर-निविदा मागविणेकामी दि.१०-०४-२०१४ रोजी, दै. पुढारी, या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११-०४-२०१४ ते दि.२५.०४.२०१४ अखेर फेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या आहेत.तसेच तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफा (Technical Bid) दि.२८.०४.२०१४ रोजी समक्ष सादर करण्याची मुदत ठेवण्यात आली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात ०२ निविदाधारकांचे (हार्ड कॉपी) तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त ०२ निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे दि.३०.०४.२०१४ रोजी मा.प्रशासकिय अधिकारी (विद्युत) यांचे समक्ष उघडून निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाशाखा व संस्थानचे अंतर्गत लेखातपासणीस यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा (Technical Bid) उघडण्याची तारिख ३०.०४.२०१४ अशी होती. सदर ऑनलाईन तांत्रिक फेर ई-निविदा आय.टी.विभागामार्फत दि.३०.०४.२०२४ रोजी उघडण्यात आल्या.

०१) श्री साईनिवास अतिथीगृह मधील व्हीआयपी सुटचे जुने २.० टन स्प्लिट ए.सी. बायबॅक करुन नविन खरेदी करुन बसविणेकामी दि.२५.०४.२०१४ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | **फेर ई-निविदा Upload केलेल्या निविदाधारकाचे नांव** |
|---|---|
| ०१) | मे. आदर्श एअरकॉन , घाटकोपर , मुंबई |
| ०२) | मे.श्री व्यंकटेश्वरा एच.व्ही.ए.सी. ॲण्ड आर ,पुणे |

०२) दि.२५.०४.२०१४ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कार्यालयातून इनवर्ड मार्फत (इनवर्ड क्र.१५४०दि.२५.०४.२०१४) अन्वये मे.रजत सेल्स प्रा.लि., मुंबई यांचे टेंडर प्राप्त झाले असून त्यांनी ई-निविदा न भरता टेंडर स्पेसिमेन कॉपी करुन त्यानुसार टेंडर भरुन दिलेले आहे. टेंडर सोबत त्यांनी डी.डी. जोडलेला नाही. उपरोक्त अ.क्र.०१ ऑनलाईन Upload फेर ई-निविदा व अ.क्र.०२ चे प्राप्त टेंडर मा.त्रिसदस्य समितीसमोर उघडणेस मान्यता मिळणेस विनंती.

श्री साईनिवास अतिथीगृह मधील व्हीआयपी सुटचे जुने २.० टन स्प्लिट ए.सी. बायबॅक करुन नविन खरेदी करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या दोन ऑनलाईन फेर ई- निविदा (कमर्शियल बीड) व १ इनवर्ड मार्फत प्राप्त टेंडर उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०२ फेर ई-निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन, निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | मे.आदर्श एअरकॉन, घाटकोपर, मुंबई | १६,३१,७८०/- | अनुपस्थित |
| ०२) | मे.श्री व्यंकटेश्वरा एच.व्ही.ए.सी. ॲण्ड आर, पुणे | १७,७९,७३५/- | १७,७९,७३५/- |

**निर्णय क्र.४६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१६ निवासस्थाने विभागाकरीता बेडशीट व उशीकव्हर खरेदीकामी दरांबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.३१,०४,५००)**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान विभागांसाठी आवश्यक असलेले नवीन बेडशिट, उशी कव्हर, फोम उशी आदी खरेदीस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.३१,०४,५००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.०४.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.४०१ व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडून दि.०२.०८.२०१३ चे मंजुरी मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील दि.२१.०९.२०१३ रोजीचे पत्रानुसार पुढील कार्यवाहीसाठी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.०४.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.४०१ मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणे शक्य नसल्यामुळे सदरचा निर्णयामध्ये दुरुस्ती करणेकामी पुर्ण प्रस्ताव सबंधीत विभागास दि.२४.१०.२०१३ रोजी परत पाठविला होता.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.०४.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.४०१ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.३१ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. संस्थान भक्तनिवासांमधील बेडशीट, उशी कव्हर व गादीकव्हर दर दीड वर्षांनी (१८ महिने) बदलणेस मान्यता देण्यात आली, तसेच संस्थानचे भक्तनिवासांसाठी आवश्यक नविन बेडशीट, उशीकव्हरसह, तथा फोम उशी, गादी कव्हर खरेदीस निविदा मागवून सबंधित विभागाचे मागणीनुसार व मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील ॲप्लीकेशन क्र.९४२१/२०१३ दि.०२.०८.२०१३ चे मान्यतेनुसार एकदम करण्यात यावी. सबंधित विभागांनी त्यांचे आवश्यकतेनुसार आलेल्या वस्तुंचा वापर करावा. पुर्वीचे बदललेले बेडशीट, उशीकव्हरसह, गादीकव्हर यांचा निर्णयाप्रमाणे लिलाव/वार्षिक निश्चित केलेल्या दराने विक्री करण्यात यावी असे ठरले. तसेच उपरोक्त खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

सदरचा दुरुस्ती केलेला प्रस्ताव खरेदी विभागास पुढील कार्यवाहीसाठी दि.१४.०२.२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.३१,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सदर खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली आहे. ई-निविदा संकेतस्थळावर व प्रत्यक्ष नमुन्यांसह सादर करण्याची अंतिम दि.२९.०३.२०१४ अशी ठेवण्यात आलेली होती.

मुदतीअंती खालील निविदाधारकांच्या निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदा Submitted दिनांक |
|---|---|---|
| ०१. | खादी ग्रामोद्याग विकास समिती, नवी दिल्ली | दि.२६.०३.२०१४, सायं.०४.५० वा. |
| ०२. | देवांशी एंटरप्रायझेस, मुंबई | दि.२८.०३.२०१४ सायं.०३.०७ वा. |
| ०३. | राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी | दि.२९.०३.२०१४ दु.०१.३२ वा. |
| ०४. | तुलसी एम्पोरियम, सोनाई | दि.२९.०३.२०१४ दु.०२.२१ वा. |
| ०५. | एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | दि.२९.०३.२०१४ सायं.०४.४१ वा. |

उपरोक्त प्राप्त निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे व नमुने दि.२९.०३.२०१४ अखेर सादर होणे गरजेचे होते, मुदतीअंती खरेदी विभागाकडे खालील तीन निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे व नमुने प्राप्त झालेले होते.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक | नमुने |
|---|---|---|---|
| ०१. | मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी | २२२१८/२९.०३.२०१४ | आहे. |
| ०२. | मे.तुलसी एम्पोरियम, सोनाई | २२२२०/२९.०३.२०१४ | आहे. |
| ०३. | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | २२२२१/२९.०३.२०१४ | आहे. |

मे.खादी ग्राम उद्योग विकास समिती, नवी दिल्ली व मे.देवांशी एंटरप्रायझेस, मुंबई यांचेकडून नमुने व तांत्रिक लिफाफे खरेदी विभागास मुदतीत प्राप्त झालेले नसल्यामुळे उपरोक्त प्राप्त झालेले तीन निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने दि.०१.०४.२०१४ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात आले, त्यामध्ये मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी व मे.तुलसी एम्पोरियम, सोनाई यांनी कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेले नव्हते, त्याबाबत त्यांना दुरध्वनीद्वारे विचारणा केली असता, त्यांनी त्याच दिवशी ई-मेलद्वारे सदरचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या निविदा ग्राह्य धरण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांनी सादर केलेल्या नमुन्यातून उत्तम प्रतीचे नमुने निवडण्यात आलेले आहेत, त्याचे नंबर व रंगाबाबतचा तपशिल सोबत जोडलेला आहे.

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलने दि.०५.०४.२०१४ रोजी मे.खादी ग्राम उद्योग विकास समिती, नवी दिल्ली व मे.देवांशी एंटरप्रायझेस, मुंबई यांचे तांत्रिक लिफाफे व नमुने इकडील कार्यालयाकडे पाठविले, त्यामधील मे.खादी ग्राम उद्योग विकास समिती यांचा तांत्रिक लिफाफा उघडलेल्या स्थितीत प्राप्त झालेला होता. दोन्ही निविदाधारकांच्या पाकिटांवरील आवक नंबर पाहाता मे.देवांशी एंटरप्रायझेस, मुंबई यांनी मु.का.आ.नं.८९५ दि.२८.०३.२०१४ रोजी मुंबई कार्यालयात तर खादी ग्राम उद्योग विकास समिती यांनी आ.नं.६२१८ दि.२८.०३.२०१४ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल आवक विभागात निविदा सादर केलेल्या आहेत. म्हणजे दोन्हीही निविदा संस्थानला विहित मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे सदरच्या निविदांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. केवळ हॉस्पिटल विभागाने सदर निविदा वेळेत इकडील कार्यालयास न पाठविल्यामुळे सदरच्या निविदेतील तांत्रिक लिफाफे दि.०१.०४.२०१४ रोजी उघडलेली नाहीत.

तरी सदरचे दोन्ही तांत्रिक लिफाफ्यामधून मे.देवांशी एंटरप्रायझेस, मुंबई यांचे निविदेसोबतचा तांत्रिक लिफाफा दि.०७.०४.२०१४ रोजी प्रशासकीय अधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात आलेला आहे, तसेच मे.खादी ग्राम उद्योग विकास समिती यांचा तांत्रिक लिफाफा उघडलेले स्थितीत प्राप्त झालेला आहे.

तांत्रिके लिफाफे उघडलेल्या सर्व निविदाधारकांच्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात आलेली आहे. त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

१. अ.क्र.४ मे.खादी ग्राम उद्योग विकास समिती, नवी दिल्ली यांनी बयाणा रक्कमेचा डी.डी.सादर केलेला नाही, तसेच त्यांचेकडे Bombay Dyeing कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबतचे प्रमाणपत्र सादर केलले नाही, त्यामुळे त्यांचे निविदेचा विचार करता येणार नाही.

२. उर्वरीत ०४ निविदाधारकांनी मागणी केलेप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यामुळे त्यांच्या निविदा पात्र आहेत.

उपरोक्तप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ०३ पात्र ई-निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन, चारही निविदाधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **तपशील** | **देवांशी एंटरप्रायझेस, मुंबई** | | **राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी** | | **तुलसी एम्पोरियम, सोनाई** | | **मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **मुळ दर रु.** | **चर्चेअंती देऊ केलेला दर रु.** | **मुळ दर रु.** | **चर्चेअंती देऊ केलेला दर रु.** | **मुळ दर रु.** | **चर्चेअंती देऊ केलेला दर रु.** | **मुळ दर रु.** | **चर्चेअंती देऊ केलेला दर रु.** |
| **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग** | | | | | | | | | |
| १ | Bedsheet with Pillowcover (bedsheet 60x90, pillow 18x24) Bombay dying cotton (Badami, Aboli) 6000 nos. | ३६५/- | --- | ३७८/- | --- | ३७२/- | --- | ३२४/- | **३२४/-** |
| **श्री साईप्रसाद निवासस्थान विभाग** | | | | | | | | | |
| १ | Bedsheet with Pillowcover (Single bed) (bedsheet 60x90, pillow 18x24) Bombay dying cotton (plan white) 100 nos. | ३५०/- | **३५०/-** | ३७८/- | --- | ३७२/- | --- | ४९५/- | --- |
| २ | Bedsheet with Pillowcover (Double bed) (bedsheet 90x100, pillow 18x24) Bombay dying cotton (plan white) 100 nos. | ४४०/- | **४४०/-** | ६३७/- | --- | ६२७/- | --- | ६९३/- | --- |

| द्वारावती भक्तनिवासस्थान विभाग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Bedsheet for Non A/C room (Single bed) (bedsheet 60x90) Bombay dying cotton (plan green) 2200 nos. | २७५/- | --- | २९४/- | **२६४/-** | २८९/- | --- | ४०५/- | --- |
| २ | Pillowcover for Non A/C room (pillow 18x24) Bombay dying cotton (plan green) 2200 nos. | ७०/- | **७०/-** | ९७/- | --- | ९६/- | --- | ९६/- | --- |
| ३ | Bedsheet for A/C room (Single bed) (bedsheet 60x90) Bombay dying cotton (plan white) 250 nos. | २८५/- | --- | २९४/- | --- | २८९/- | **२८४/-** | ४०५/- | --- |
| ४ | Bedsheet for A/C room (Double bed) (bedsheet 90x100) Bombay dying cotton (plan white) 250 nos. | ३८०/- | **३८०/-** | ४७४/- | --- | ४६६/- | --- | ६०३/- | --- |
| ५ | Pillowcover for A/C room (18x27) Bombay dying cotton (plan white) 250 nos. | ८०/- | **८०/-** | ९७/- | --- | ९६/- | --- | ९६/- | --- |

**निर्णय क्र.४६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, निवासस्थाने विभागाकरीता बेडशीट व उशीकव्हर खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मा.खंडपीठाच्या दि.०२.०८.२०१३ रोजीचे आदेशान्वये मान्यता मिळालेली असल्याने संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी)

---

**विषय नं.१७ श्री साई प्रसादालयाकरीता हाऊसकिपींग/ पेस्टकंट्रोल व स्वच्छतेच्या कामासाठी प्राप्त झालेली दरपत्रके उघडणे व निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाकडील स्वच्छता व हाऊसकिपींगची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन जाहीर निविदा मागविणेबाबत मा.व्यवस्थापन त्रिदस्य समिती दिनांक ०८/०१/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय झालेला आहे. त्याकामी दिनांक १३/०१/२०१४ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत वृत्तपत्रात व आय टी विभागामार्फत संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानूसार दिनांक ३०/०१/२०१४ रोजी मुबई प्रहार व पुण्यनगरी, पुणे या वृत्तपत्रांत जाहीरात प्रसिध्द झालेली आहे.

दिनांक ३०/०१/२०१४ रोजीचे वृत्तपत्रातील जाहीरातीनूसार खालीलप्रमाणे कोऱ्या निवीदांची विक्री झालेली आहे.

| | |
|---|---|
| १) बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे | ७) सी हॉक सिक्युरिटी ॲण्ड फॅसिलिटीज मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पनवेल, मुंबई |
| २) शार्प हाऊसकिपींग सर्व्हीसेस, शिरडी | ८) फाईन सोल्युशन, मुंबई |
| ३) नेक्सस मल्टी सर्व्हीसेस कॉर्पोरेशन, पुणे | ९) चेकमेट फसिलिटी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक सोल्युशन प्रा.लि., बांद्रा, मुंबई |
| ४) टायगर एच आर सोल्युशन्स प्रा.लि. औरंगाबाद | १०) संजय मेन्टेन्नंस सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई |
| ५) फेबर सिंदुरी मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., चेन्नई | ११) श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे |
| ६) अर्मस् इंडीया प्रा.लि., पुणे | |

जाहीरात व निविदेतील अटी/शर्तीनूसार दिनांक १५/०२/२०१४ रोजी उपरोक्त निविदाधारकांची मा.प्र.प्रशासकीय अधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली व संस्थानचे सबंधीत अधिकाऱ्यांचे उपस्थितीत "प्री बीड" सभा झालेली आहे. प्री बीड सभेमध्ये हजर असलेल्या निविदाधारकांचे शंकेचे निरसन केलेले असून दिनांक १८/०२/२०१४ या विहीत मुदतीत खालील निविदाधारकांनी दरपत्रक सादर केलेले आहे.

१) अर्मस् इंडीया प्रा.लि., पुणे (Allied Resource Management Services India Pvt.Ltd.)
२) बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे
३) संजय मेन्टेन्नंस सर्व्हीसेस प्रा.लि.,परेल, मुंबई
४) श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि., अकुर्डी,पुणे

५) चेकमेट फसिलिटी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक सोल्युशन प्रा.लि., बांद्रा, मुंबई

श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छतेची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी वरीलप्रमाणे ०५ निवीदा सादरकर्त्यांची टेक्नीकल बीड (पाकीटे) दिनांक २४/०२/२०१४ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडणेत आलेली असून त्यांचा पात्र/अपात्र टेक्नीकल बीडचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**<u>श्री साई प्रसादालय हाऊसकिपींग टेंडर टेक्नीकल बीड तुलनात्मक तक्ता-</u>**

| **अ. नं.** | **तपशिल** | **अर्मस् इंडीया प्रा.लि., पुणे** | **बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे** | **संजय मेन्टेनंस सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई** | **श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि., अकुर्डी,पुणे** | **चेकमेट फॅसिलिटी सोल्युशन प्रा.लि., मुंबई** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १. | बयाणा रक्कम | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २. | पॉवर ऑफ ॲटर्नी दिलेली आहे/नाही | X | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३. | दोन वर्षाचे इन्कमटॅक्स चलनाची झेरॉक्स प्रत | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ४. | क्वॉलिटी ॲशुएर्ड प्लॅन दिलेला आहे/नाही | X . | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ५. | ज्या ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट चालू आहे त्यांचे कार्यादेश प्रती व काम समाधानपुर्वक केल्याचे दाखले | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ६. | दोन वर्षाची वार्षिक उलाढाल माहीती पत्रक | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ७. | सेंट्रल सेल्स टॅक्स रजिस्ट्रेशन नं. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ८. | आयकर पॅन नंबर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ९. | औद्यो. रजिस्ट्रेशन नोंदणी पत्र | ✓ | ✓ | ✓ | नंबर नमूद केला आहे जोडलेला नाही. | ✓ |
| १०. | ISO-14000 चे प्रमाणपत्र | ✓ OHSAS 18001:2007 14001:2004 | ✓ ISO 14001:2004 | ✓ OHSAS 18001:2007 14001:2004 | X Under Process | ✓ ISO 14001:2004 |
| ११. | मशिनरी व उपकरणे यादी | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १२. | टेंडरमधील मनुष्यबळ व यांत्रिकी तक्ता (पान नं.१९) | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १३. | वार्षिक उलाढाल रु.१० कोटी आहे/नाही | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १४. | मोठया प्रमाणात कामाचे दाखले | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| १५. | निविदेसोबत जोडलेले कागदपत्र साक्षांकित केलेली आहेत/नाहीत | कागदपत्र स्वत:चे सहीने साक्षांकित केलेले आहे | कागदपत्र विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने साक्षांकित केलेले आहे. | कागदपत्र स्वत:चे सहीने साक्षांकित केलेले आहे. | कागदपत्र स्वत:चे फर्मचे शिक्क्याने साक्षांकित केलेले आहे. | कागदपत्र CA च्या सहीने साक्षांकित केलेले आहे. |
| **शेरा** | | एकूण १५ अटी/शर्ती पैकी १३ ची पुर्तता आहे. | एकूण १५ अटी/शर्ती पैकी संपुर्ण अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे.<u>सध्या प्रसादालयातील हाऊसकिपींग चे काम सदर कंपनीला दरमहा रु.११,००,०००/- या रक्कमेस देण्यात आलेले आहे.</u> | एकूण १५ अटी/शर्ती पैकी संपुर्ण अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे. | एकूण १५ अटी/शर्ती पैकी १३ ची पुर्तता आहे. | एकूण १५ अटी/शर्ती पैकी संपुर्ण अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे. |

वरील तक्त्याचे अवलोकन करता, अ.नं. १) अर्मस् इंडिया प्रा.लि, पुणे यांनी एकुण १५ अटी/शर्ती पैकी १३ अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे. २) बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे यांनी संपुर्ण १५ अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे.३) संजय मेन्टेन्नंस सर्व्हीसेस प्रा.लि., परेल मुंबई यांनीही संपुर्ण १५ अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे. ४) श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि., अकुर्डी पुणे यांनी एकुण १५ अटी/शर्ती पैकी १३ अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे. ५) चेकमेट फॅसिलिटी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक सोल्युशन प्रा.लि., बांद्रा मुंबई यांनी एकुण १५ अटी/शर्ती पैकी संपुर्ण अटी/शर्तीची पुर्तता केलेली आहे.

सबब, वरील ०५ ही निविदा सादरकर्त्यांनी टेक्नीकल बीडमधील महत्वाच्या सर्व अटी/शर्तीची पुर्तता केलेली असल्यामुळे ते पात्र ठरतात. त्यामुळे वरील निविदा सादरकर्त्यांना मा.त्रिसदस्यीय व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटी साठी हजर रहाणेबाबत कळविता येईल.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस इंडीया प्रा.लि., पुणे | १२,३१,७०२.०० | **<u>११,८४,०००.००</u>** |
| ०२ | बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे | १७,७६,१११.४२ | १७,७६,१११.४२ |
| ०३ | संजय मेन्टेन्नंस सर्व्हीसेस प्रा.लि.,परेल, मुंबई | १५,५६,५२०.०० | ११,८५,०००.०० |
| ०४ | श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि., अकुर्डी,पुणे | १३,५५,९०१.५१ | अनुपस्थित |
| ०५ | चेकमेट फसिलिटी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक सोल्युशन प्रा.लि., बांद्रा, मुंबइ | २८,१७,३८७.०० | अनुपस्थित |

**निर्णय क्र.४६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१८ श्री साई प्रसादालयातील स्वामीनारायण चपाती व पुरी, मोतीचुर लाडू व बर्फी तसेच अन्नपाकिटे उक्ते ठेकेदार पध्दतीने तयार करुन घेणेकरीता आलेल्या निविदा उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामधील स्वामी नारायण चपाती व पुरी, मोतीचूर लाडू व बर्फी तसेच अन्नपाकीटे बनविणेचे काम उक्ते ठेकेदारी पध्दतीने करुन घेण्यात येत आहेत. सन २०१३ ते २०१४ करीता देण्यात आलेल्या टेंडर्सची मुदत दि.३१/०३/२०१४ रोजी संपणार आहे. सन २०१४-२०१५ या वर्षाकरीता सदर कामे उक्ते ठेकेदारी पध्दतीने करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ चे सभेतील निर्णय क्रं.२९ ने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन जाहिर निविदामागविणेत याव्यात असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार श्री साई प्रसादालयाकडील दि.१३/०१/२०१४ चे मंजूर टिपणी अन्वये जाहीर निविदा मागविणेकामी दि.३०/०१/२०१४ रोजी दैनिक प्रहार, मुंबई, पुण्यनगरी, पुणे व दिव्यमराठी, औरंगाबाद या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ चे सभेतील निर्णय क्रं.२९ चे मान्यतेप्रमाणे श्री साई प्रसादालयाकडील दि.१३/०१/२०१४ चे मंजूर टिपणी अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार दि.०१/०२/२०१४ ते ०८/०२/२०१४ अखेर खालीलप्रमाणे निवीदांची विक्री झालेली आहे.

**अ) <u>स्वामी नारायण चपाती व पुरी</u> :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर मु.पो.शिर्डी, (साईबाबानगर) निमगांव- शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर | ४. | पांडूरंग एकनाथ पारे, मु.पो.जामखेड मो.नं.९५४५३७२७५६ |
| २. | श्री साई केटरर्स, मु.पो. श्रीरामपूर कुंभार गल्ली, वार्ड न. ०३, श्रीरामपूर | ५. | अकार एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट, शाम सदन,चारकोप, कांदिवली, मुंबई |
| ३. | श्री साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते , श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर | | |

**ब) मोतीचूर लाडू व बर्फी :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर निमगाव-शिर्डी मु.पो.शिर्डी, (साईबाबानगर) निमगांव-शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर | ६. | श्री दिपक माधव नाईकवाडे मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत) ता.राहाता |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री साई केटरर्स, मु.पो. श्रीरामपूर कुंभार गल्ली, वार्ड न. ०३, श्रीरामपूर | ७. | श्री साई गणेश महिला बचत गट, मु.पो. शिर्डी गणेश वाडी, ता.राहाता जि.अहदमनगर |
| ३. | सच्चिदानंद केटरर्स, अहमदनगर प्रो.प्रा. श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी, गुजरगल्ली,स्वामी विवेकानंद चौक, | ८. | सेवा सर्व्हीसेस, शिरडी हस्ते- अभिजीत मोहन कोते |
| ४. | श्री साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते, श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर | ९. | श्री संदीप मच्छिंद्र चौधरी मु.पो. शिंगवे, ता.राहाता जि.अहमदनगर |
| ५. | जोशी बंधू केटरर्स, चिंचवड, पुणे | १०. | साई प्रयाग केटरर्स व सप्लायर्स, मु.पो. शिरडी, ता.राहाता, जि.अहमदनगर |

**क) अन्नपाकीटे :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर निमगाव-शिर्डी मु.पो.शिर्डी, (साईबाबानगर) निमगांव-शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर | ३. | श्री साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी व्दारा,रोहीणी राजेंद्र कोते,श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर |
| २. | श्री साई केटरर्स, मु.पो. श्रीरामपूर कुंभार गल्ली, वार्ड न. ०३, श्रीरामपूर | ४. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह. संस्था, अ.नगर आनंद निवास, भवानीनगर, जि.अहमदनगर |

दि.१५/०२/२०१४ या निर्धारीत मुदतीत उपरोक्त पैकी खालील निवीदाधारकांनी निविदाभरुन (दरपत्रक) सादर केलेल्या आहेत.

**अ) <u>स्वामी नारायण चपाती / पुरी</u> :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सिध्दी महीला बचत गट, शिरडी व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते, श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर | ३. | श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर निमगाव-शिर्डी मु.पो.शिर्डी, (साईबाबानगर) निमगांव-शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर |
| २. | श्री साई केटरर्स, मु.पो. श्रीरामपूर कुंभार गल्ली, वार्ड न. ०३, श्रीरामपूर प्रो.शंकुतला शिंदे, | | |

**ब) मोतीचूर लाडू बर्फी :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संदीप मच्छिंद्र चौधरी मु.पो. शिंगवे, ता.राहाता जि.अहमदनगर | ५. | श्री साई केटरर्स, मु.पो. श्रीरामपूर कुंभार गल्ली, वार्ड न. ०३, श्रीरामपूर प्रो.शंकुतला शिंदे, |
| २. | श्री साई सिध्दी महीला बचत गट, शिरडी व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते, श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर | ६. | श्री साई गणेश महिला बचत गट, मु.पो. शिर्डी गणेश वाडी, ता.राहाता जि.अहदमनगर |
| ३. | श्री सच्चिदानंद केटरर्स, अहमदनगर प्रो.प्रा. श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी, गुजरगल्ली,स्वामी विवेकानंद चौक,अ.नगर | ७. | श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर निमगाव-शिर्डी मु.पो.शिर्डी,(साईबाबानगर) निमगांव-शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर |
| ४. | श्री दिपक माधव नाईकवाडी मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत) ता. राहाता, | | |

**क) अन्नपाकीटे :-**

| | |
|---|---|
| १. | श्री साई सिध्दी महीला बचत गट , शिरडी व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते , श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर |
| २. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह. संस्था, अ.नगर आनंद निवास, भवानीनगर, जि.अहमदनगर |
| ३ | श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर निमगाव-शिर्डी मु.पो.शिर्डी, (साईबाबानगर) निमगांव-शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे दिनांक १५/०२/२०१४ अखेर निर्धारीत वेळेत वरीलप्रमाणे अ) स्वामीनारायण चपाती/ पुरीसाठी-०३, ब) मोतीचूरलाडू/ बर्फीसाठी -०७, क) अन्नपाकीटासाठी-०३ निवीदाधारकांनी निवीदा (दरपत्रके) सादर केलेले आहेत. सदर निवीदा सादरकर्त्यांना मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा/

वाटाघाटीसाठी हजर रहाणेबाबत कळविता येईल. तरी सदर प्राप्त निवीदा (दरपत्रक) उघडणे व चर्चा/ वाटाघाटीद्वारे अंतीम दर निश्चीत होणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.**

**अ) स्वामी नारायण चपाती/ पुरी:-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | चपाती दर प्र.क्विं कोरडा आटा+मैदा (रुपये) | | पुरी दर प्र.क्विं आटा + मैदा (रुपये) | | चपाती मशिनवर दर प्र.क्विं आटा+मैदा (रुपये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
| १ | श्री साई सिध्दी महीला बचत गट, शिरडी व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते, श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर | १०००/- | ८४५/- | ८५०/- | ८५०/- | ६००/- | ४४५/- |
| २ | श्री साई केटरर्स, मु.पो. श्रीरामपूर कुंभार गल्ली, वार्ड न. ०३, श्रीरामपूर, प्रो.शंकुतला शिंदे, | ९५०/- | ८१०/- | ८२५/- | ८२५/- | ५००/- | **४१०/-** |
| ३ | शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर मु.पो.शिर्डी, (साईबाबानगर) निमगांव- शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर | ८५०/- | **८००/-** | ८२५/- | **८००/-** | ९००/- | ४५०/- |

**स्वामीनारायण चपाती तसेच पुरी बनविणेकामीच्या ठेकेदारांना खालीलप्रमाणे सुचना करणेत आल्या.**

**(१) साईभक्तांना श्री साई प्रसादालयामध्ये प्रसादभोजन घेतेवेळी चपाती पुरविण्याचा प्रशासनाचा उद्देश आहे, त्यामुळे जास्त प्रमाणात चपात्या बनविणेत याव्यात.**

**(२) उत्सव काळात अथवा गर्दीचे प्रमाण वाढल्यास प्रशासनाच्या मार्गदर्शनानुसारच पुऱ्या तयार करणेत येऊन, साईभक्तांना प्रसादभोजनामध्ये देण्यात याव्यात.**

**(३) पुरी साईभक्तांपर्यंत पाहोचेपर्यंत नरम असावी, जेणेकरुन पुऱ्यांबाबत साईभक्तांच्या तक्रारी येणार नाहीत, याची आपण काळजी घ्यावी.**

**(४) मशिनवरील चपात्या योग्य पध्दतीने तयार करुन साईभक्तांसाठी प्रसादभोजन हॉलमध्ये पुरवाव्यात.**

**स्वामी नारायण चपाती/ पुरी बाबतीत ठेकेदाराची नेमणूक करणेकामी चर्चा/ वाटाघाटी झाल्यानंतर समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, वाटाघाटी कमी पैशात करताना ठेकेदार दर्जावर लक्ष ठेवत नाहीत. त्याकरिता पुढील लाडू/ बर्फी व अन्नपाकिटांचे कॉन्ट्रॅक्ट देताना दर्जाबाबत कोणतीही तडजोड न करता जागेवर समितीच्या सदस्यांनी एकमुखाने निर्णय घेतला की, यासंबंधी वाटाघाटी न करता निविदेमधील निम्नतम दर स्विकारणेत यावेत. त्यामुळे उपस्थित ठेकेदारांबरोबर चर्चा/ वाटाघाटी न करता त्यांचे आभार मानून सभागृहाच्या बाहेर पाठविण्यात आले. निम्नतम दराचा तपशील खालीलप्रमाणे-**

**ब) मोतीचूर लाडू/ बर्फी :-**

| **अ.नं.** | **निविदासादरकर्त्याचे नांव** | **निविदेतील दर (सर्व करांसह) रुपये** | |
|---|---|---|---|
| | | **लाडू दर प्रति हजारी रुपये** | **बर्फी दर प्र.क्वि. साखर रुपये** |
| ०१. | श्री संदीप मच्छिंद्र चौधरी मु.पो. शिंगवे, ता.राहाता जि.अहमदनगर | २२९/- | १९९/- |
| ०२. | श्री साई सिध्दी महीला बचत गट, शिरडी व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते, श्रीकृष्णनगर, नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर | **२२५/-** | २२०/- |
| ०३. | श्री सच्चिदानंद केटरर्स, अहमदनगर प्रो.प्रा. श्री नरेंद्र सच्चिदानंद कुलकर्णी, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर | ४००/- | ५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४. | श्री दिपक माधव नाईकवाडी<br>मु.पो.साकुरी (गोदावरी वसाहत) ता. राहाता, | ३४५/- | ३४५/- |
| ०५. | श्री साई केटरर्स, मु.पो. श्रीरामपूर<br>कुंभार गल्ली, वार्ड न. ०३, श्रीरामपूर<br>प्रो.शंकुतला शिंदे, | **२२५/-** | **१९०/-** |
| ०६. | श्री साई गणेश महिला बचत गट, मु.पो. शिर्डी<br>गणेश वाडी, ता.राहाता जि.अहदमनगर | (अपात्र) | (अपात्र) |
| ०७. | श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर<br>मु.पो.शिर्डी, (साईबाबानगर) निमगांव-शिर्डी<br>ता.राहाता जि.अहमदनगर | २३०/- | --- |

**क) अन्नपाकीटे :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर रुपये (प्र.पाकिट) |
|---|---|---|
| ०१. | श्री साई सिध्दी महीला बचत गट, शिरडी<br>व्दारा, रोहीणी राजेंद्र कोते, श्रीकृष्णनगर,<br>नांदुर्खी रोड ता.राहाता जि.अ.नगर | १.६० |
| ०२. | सदगुरु हरिहर महाराज स्वयंरोजगार सह. संस्था,<br>अ.नगर, आनंद निवास, भवानीनगर, जि.अहमदनगर | १.६० |
| ०३. | श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर,<br>निमगाव-शिर्डी मु.पो.शिर्डी, ता.राहाता जि.अहमदनगर | **१.४५** |

**निर्णय क्र.४६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ प्र.अधिक्षक, लाडू निर्मिती विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट/ कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी प्राप्त ई-कमर्शियल निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट /कन्झुमेबल स्पेअर्स पार्ट खरेदीकामी दैनिक सामना- औरंगाबाद, पुढारी- पुणे, लाकशाही वार्ता- नागपूर, Free Press या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे संकेत स्थळावर दि.०५/०८/२०१३ ते १५/०८/२०१३ या कालावधीत देण्यात येऊन दि.२२/०८/२०१३ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यास अनुसरुन एकूण १७ निविदा प्राप्त झाल्या होत्या.

परंतु माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि.२९/०४/२०१३ रोजीचे मंजूर टिप्पणी अन्वये घेण्यात आलेल्या Digital Signature Certificate पैकी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे Certificate ची मुदत संपुष्टात आलेली होती तसेच श्री. दिनेश दिलीप कानडे- लिपीक यांची Digital Signature Certificate खराब झालेली होती, त्यामुळे वरील तारखेच्या सदर निविदा Open झाल्या नाहीत.

त्यानंतर सदरचे खरेदीकामी पुन्हा Re-Schedule करण्यात यावे असे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दि.२३/०८/२०१३ रोजीची मंजूर टिप्पणीन्वये औषध भांडार विभागास कळविण्यात आलेले होते त्यानुसार पुन्हा तारखा निश्चित करण्यात आल्या होत्या व त्यानूसार संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत Free Press- Mumbai, प्रहार- मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.२३/०९/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

परंतु IT विभागाकडून Digital Signature Certificate वेळेत तयार न झाल्यामुळे वरील अ तक्त्यातील तारखेप्रमाणे सदर ई निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द होऊ शकल्या नव्हत्या.

त्यामुळे पुन्हा सुधारीत तारखा देऊन त्याप्रमाणे IT विभागाकडून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा देण्यात येऊन दि. ०९/१०/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

उपरोक्त तारखेप्रमाणे Online निविदा दि.०९/१०/२०१३ अखेर बंद होणार होत्या परंतू IT विभागाकडून दि.०२/१०/२०१३ अखेर अशी तारीख झाल्यामुळे दि.०२/१०/२०१३ रोजीच संकेत स्थळावरुन निविदा बंद झाल्या होत्या. त्यामुळे बऱ्याच निविदाधारकांना निविदा पाहून देखील निविदा सादर करता आल्या नाहीत. सदरचे खरेदीकामी पुन्हा फेर ई निविदा मागविणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात तसेच www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर फेर जाहीरात देण्यात येऊन दि.३०/११/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

ज्या निविदा धारकांनी पहिल्या जाहिरातीस अनूसरुन निविदा सादर केल्या होत्या त्यांना पुन्हा फक्त कमर्शियल निविदा Online सादर करणेबाबत दि. १३/११/२०१३ रोजीचे ई मेल पत्रान्वये अन्वये

कळविण्यात आले होते. कारण त्यांनी तांत्रिक निविदेचे बंद पाकिट सादर केलेले होते. परंतू काही निविदा धारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनूसरुन Online निविदा सादर केलेली नव्हती.

सुरुवातीच्या जाहिरातीस अनूसरुन प्राप्त झालेल्या १७ तांत्रिक निविदा व नंतरच्या जाहीरातीस अनूसरुन ६ तांत्रिक निविदा अशा एकूण २३ तांत्रिक निविदांचे बंद पाकिट सादर झाले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| **S.N.** | **Name of Supplier** | **S.N.** | **Name of Supplier** |
|---|---|---|---|
| 1 | Cyronics Instruments Pvt, Ltd., Pune. | 7 | Laxmi Surgicals & Pharma, Jalgaon |
| 2 | Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. | 8 | Matrix Medicals Pvt. Ltd., Thane |
| 3 | Excel Corporation, Nashik | 9 | Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. |
| 4 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai | 10 | Megastar Engineering, Pune. |
| 5 | Kalelkar Surgicals Industries, Mumbai. | 11 | Sairam Biomedics, Mumbai |
| 6 | Kanchan Drugs, Pune | 12 | Health Ware Pvt. Ltd., Mumbai |
| 13 | Janak healthcare Pvt.Ltd., Valsad - Gujrat | 19 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai |
| 14 | Lub Dub Medical Tech., Chennai | 20 | Cher Medical Technoligies, Mumbai |
| 15 | Meditron Systems, Mumbai | 21 | Cher Medical Technoligies, Mumbai |
| 16 | Saitrons Medical Equipments, Loni | 22 | Mitra Industries (P) Ltd., Faridabad |
| 17 | Unimmedss, Kolkata | 23 | Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. |
| 18 | Saitrons Medical Equipments, Loni | | |

सदरच्या प्राप्त बंद तांत्रिक निविदा दि. ०५/१२/२०१३ रोजी वैद्यकिय संचालक यांचे समोर उघडण्यात आल्या होत्या. तसेच ज्या निविदा धारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनूसरुन कमर्शियल निविदा सादर केल्या आहे किंवा कसे याबाबत त्यांना दूरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली होती, परंतू काही निविदाधारकांनी त्या Online सादर केलेल्या नाही.

सदरचे खरेदीकामी तीन वेळेस जाहिरात देण्यात आली होती. त्यामुळे सद्यपरिस्थितीत प्रत्येक मशिनरी उपकरणांची काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन पेक्षा जास्त निविदा प्राप्त झालेल्या आहे त्यामुळे आहे त्या प्राप्त कमर्शियल निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्यावर निर्णय व्हावा असे नम्र मत आहे.

प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे -

A **General Instruments**

| Sr.No. | Name of Bidder | Technical submitted | Commercial submitted | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Kalelker Surgical, Mumbai | Yes | No | |
| 2 | Kanchan Drugs, Pune | No | No | |
| 3 | Laxmi Surgical, Jalgaon | Yes | No | |

B **Video Gastroscope**

| Sr.No. | Name of Bidder | Technical submitted | Commercial submitted | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Healthware Pvt. Ltd., Mumbai | Yes | No | |
| 2 | Cher Medical Tech. Mumbai | Yes | Yes | |
| 3 | Mitra Industries, Haryana | Yes | Yes | |

C **High Intensity Shadowless lamp (LED)**

| Sr.No. | Name of Bidder | Technical submitted | Commercial submitted | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Unimeddss, Kolkatta | Yes | Yes | |
| 2 | Matrix, Thane | Yes | Yes | |
| 3 | Esbee Dynamed, Mumbai | Yes | Yes | |
| 4 | Meditron, Mumbai | Yes | Yes | |
| 5 | Sairam, Mumbai | Yes | Yes | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | Maquet, Mumbai | Yes | Yes | |
| 7 | Laxmi Surgical, Jalgaon | Yes | No | |
| 8 | Janak Healthcare, Mumbai | Yes | No | |

| D | **6 Body Mortuary Cabinet against Buyback of 4 Body Mortuary Cabinet** | | | |
|---|---|---|---|---|
| Sr.No. | Name of Bidder | Technical submitted | Commercial submitted | Remark |
| 1 | Unimeddss, Kolkatta | Yes | Yes | |
| 2 | Megastar Engineering, Pune | Yes | Yes | |
| 3 | Laxmi Surgical, Jalgaon | Yes | No | |

E **Electromechanical Operation Table with Remote**

| Sr.No. | Name of Bidder | Technical submitted | Commercial submitted | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Esbee Dynamed, Mumbai | Yes | Yes | |
| 2 | Unimeddss, Kolkatta | Yes | Yes | |
| 3 | Janak Healthcare, Mumbai | Yes | No | |
| 4 | Laxmi Surgical, Jalgaon | Yes | No | |

F **Fibre Optic Bronchoscope**

| Sr.No. | Name of Bidder | Technical submitted | Commercial submitted | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Hi-tech, Mumbai | Yes | Yes | |
| 2 | Cher Medical Tech. Mumbai | Yes | Yes | |

| G | **Consumable Spares Parts** | | | |
|---|---|---|---|---|
| Sr.No. | Name of Bidder | Technical submitted | Commercial submitted | Remark |
| 1 | Sairam, Mumbai | Yes | Yes | |
| 2 | Saitrons, Loni | Yes | Yes | |
| 3 | Excel Corporation, Nashik | Yes | No | |
| 4 | Cyronics Inst. Pune | Yes | No | |
| 5 | Lub Dub, Mumbai | Yes | No | |

तरी सदरच्या Online १६ कर्मशियल निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून ज्यांनी Online कर्मशियल निविदा सादर केलेली आहे त्या निविदा धारकांना चर्चा/ वाटाघाटी करणेकामी बोलविण्यात आलेले असून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६९** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट/ कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी मागविणेत आलेल्या ई-निविदा मागिल आर्थिक वर्षातील असल्यामुळे व त्या प्राप्त होऊन सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे सदर निविदा ऑनलाईन बंद झालेल्या आहेत. त्यामुळे आजचे सभेमध्ये या निविदा उघडू शकल्या नाही व चर्चेसाठी बोलविणेत आलेल्या निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊ शकल्या नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये वेगवेगळया सात प्रकारच्या साहित्यांची खरेदीबाबत उल्लेख आहे. त्यापैकी रु.१० लाख मात्रपेक्षा कमी खर्च येणारे व त्यापेक्षा जास्त खर्च येणाऱ्या साहित्यांची विभागणी करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा/ ई-निविदांची मागणी करणेत यावी.**

**तसेच यापुढे हॉस्पिटल साहित्य खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी होणार नाहीत, निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येईल, याकरिता अंतीम दर देण्यात यावे, याबाबतचा निविदेमध्ये स्पष्ट उल्लेख करावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन १०१३-२०१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त ई-कमर्शियल निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.** (रु.५६,६८,०००/-)

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समिती सभा दि.१४/११/२०१३ रोजीचे सभेत -

(अ व ब) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वार्षिक (सन २०१३-१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.५६,६८,५२९/- चे खर्चास,

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी पुण्यनगरी- औरंगाबाद, पुढारी- पुणे, आपला वार्ताहार- मुंबई, सार्वमत- अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तसेच www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१७/०३/२०१४ ते २९/०३/२०१४ या कालावधीत ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच दि.०१/०४/२०१४ अखेर तांत्रीक निविदा व नमुने मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण ०८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

**अ) छपाई -**

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०५ |
| २ | मुंबई कार्यालय | ०१ |
| | **एकूण निविदा** | **०६** |

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव | (१ बंद निविदा प्राप्त २९.०३.२०१४) |
| २ | मे. प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव | (२ बंद निविदा प्राप्त २९.०३.२०१४) |
| ३ | मे. कृष्णा एंटरप्रायजेस, अहमदाबाद | (२ बंद निविदा प्राप्त ३१.०३.२०१४) |
| ४ | मे. राका प्रिंटर्स , नाशिक | (१ बंद निविदा प्राप्त ३१.०३.२०१४) |
| ५ | मे. रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | (२ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |
| ६ | मे. क्लासीक स्टेशनर्स, मुंबई | (१ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |

**ब) कार्यालयीन स्टेशनरी-**

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०० |
| २ | मुंबई कार्यालय | ०२ |
| | **एकूण निविदा** | **०२** |

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | मे. क्लासीक स्टेशनर्स, मुंबई | (१ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |
| २ | मे. श्री एंटरप्रायेस, ठाणे | (२ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रीक निविदा मा. त्रिसदस्य समिती सभा दि. ०८/०१/२०१४ चे निर्णय क्र. २३ अन्वये वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार उपरोक्त प्राप्त झालेल्या ई तांत्रीक निविदा वैद्यकीय संचालक यांचे समक्ष दि. ४/०४/२०१४ रोजी उघडण्यात आल्या असून, एकूण ०८ प्राप्त ऑन लाईन कमर्शियल निविदा पैकी कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी फक्त दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तेंव्हा सदर निविदा उघडून त्यावर निर्णय घ्यावा किंवा कसे ? याबाबद निर्णय होणेस विनंती.

तसेच छपाईकामी एकूण ६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत सदर प्राप्त ऑन लाईन कमर्शियल निविदा हया आजचे सभेपुढे समक्ष उघडून निविदाधारकांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन १०१३-२०१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त झालेल्या ई-कमर्शियल निविदा तांत्रिक कारणांमुळे उघडणेस विलंब झाल्यामुळे निविदेमधील दर समजू शकले नाही व वेळेअभावी निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत. यामुळे उशीराने उघडलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा व त्यामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेकामी सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश खरेदीकरणेकामी प्राप्त ई-कमर्शियल निविदा उघडणेबाबत व चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.** (रु.१८,०३,४७९/-)

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समिती सभा दि.१८/१०/२०१३ रोजीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.१८,०३,४७९/- चे खर्चास, व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता खरेदीकामी आपला वार्ताहर-मुंबई, पुढारी-पुणे, पुण्यनगरी-औरंगाबाद, सार्वमत-अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यानुसार दि.१७/०३/२०१४ ते २९/०३/२०१४पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होते तर दि. ०१/०४/२०१४ अखेर तांत्रिक सिलबंद निविदा स्विकारणेची मुदत होती. त्यास अनुसरुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदीकामी एकूण ०३ सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **ठिकाण** | **प्राप्त झालेल्या निविदा** |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०३ |
| २ | मुंबई कार्यालय | -- |
| **एकूण निविदा** | | **०३** |

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| १ | मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर | (२ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |
| २ | मे.तुलसी एम्पोरीयम | (२ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |
| ३ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी | (२ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** सदरच्या तांत्रिक बंद निविदा दि.०४/०४/२०१४ वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात येऊन त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली त्यानुसार त्यांनी निविदेसोबत मागणी केलेली सर्व कागदपत्रे सादर केलेली असुन त्या सर्व पात्र आहे. त्यामुळे सर्व ३ हि ई कमर्शियल निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यास व निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटीसाठी करुन निर्णय घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश खरेदीकरणेकामी प्राप्त झालेल्या ई- कमर्शियल निविदा काही तांत्रिक कारणास्तव उघडल्या गेल्या नाहीत, त्यामुळे निविदाधारकांनी निविदेमध्ये दिलेले दर समजू शकले नाही. या कारणांमुळे प्रस्तावितकामी आलेल्या निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करणेत आल्या नाही. त्यामुळे सदरहू खरेदीबाबत पुढील सभेमध्ये निर्णय घेण्यात येईल, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदी करणेकामी प्राप्त ई- कमर्शियल निविदा उघडणेबाबत व चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (४८,८७,९१६/-)**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समिती सभा दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.४८,८७,९१६/- चे खर्चास, व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी आपला वार्ताहर-मुंबई, पुढारी-पुणे, पुण्यनगरी-औरंगाबाद, सार्वमत-अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यानुसार दि.१७/०३/२०१४ ते २९/०३/२०१४ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होते तर दि.०१/०४/२०१४ अखेर तांत्रिक सिलबंद निविदा स्विकारणेची मुदत होती. त्यास अनुसरुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी एकूण ०७ सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **ठिकाण** | **प्राप्त झालेल्या निविदा** |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०५ |
| २ | मुंबई कार्यालय | ०२ |
| **एकूण निविदा** | | **०७** |

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| १ | मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती | ४ बंद निविदी प्राप्त २८/०३/२०१४ |
| २ | मे.कॉन्टॅक कंफोर्ट प्रा.लि. | २ बंद निविदी प्राप्त २८/०३/२०१४ |
| ३ | मे.केसीएम इंटरनॅशनल | १ बंद निविदी प्राप्त ०१/०४/२०१४ |
| ४ | मे.राहुल ब्रदर्स | २ बंद निविदी प्राप्त २८/०३/२०१४ |
| ५ | मे.क्रिटीकल केअर सिस्टीम | ४ बंद निविदी प्राप्त ०१/०४/२०१४ |
| ६ | मे.तुलसी एम्पोरीयम | २ बंद निविदी प्राप्त ०१/०४/२०१४ |
| ७ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी. | २ बंद निविदी प्राप्त ०१/०४/२०१४ |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** सदरच्या तंात्रिक बंद निविदा दि.०४/०४/२०१४ वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात येऊन त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली त्यानुसार त्यांनी निविदेसोबत मागणी केलेली सर्व कागदपत्रे सादर केलेली असुन त्या सर्व पात्र आहे. उपरोक्त निविदांमध्ये मे.सेवा मेडीकल अॅन्ड इक्वीपमेंट,पुणे यांची ऑन लाइन निविदा आहे परंतु त्यांचे तांत्रिक निविदेच्या बंद पाकीटवर त्यांचे नाव नमुद केलेले नव्हते, परंतु दि.०४/०४/२०१४ रोजी निविदा उघडल्यानंतर सदरची निविदा त्यांची आहे.

त्यामुळे सर्व ८ हि ई कमर्शियल निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यास व निविदा धारकांशी चर्चा/वाटाघाटीसाठी करुन निर्णय घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी प्राप्त झालेल्या ई-कमर्शियल निविदा काही तांत्रिक कारणांमुळे उघडणेस विलंब झाल्यामुळे निविदेमधील दर समजू शकले नाही व वेळेअभावी निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे उशीराने उघडल्या गेलेल्या निविदांच्या तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दर व कापडाचा नमुना पाहून उपकार्यकारी अधिकारी व वैद्यकिय संचालक यांनी अंतीम निर्णय घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३ संस्थान रुग्णालय पॅथॉलॉजी विभागात होत नसलेल्या लॅब तपासण्या तुलनात्मक दरपत्रक मागवून वार्षिक दर निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये स्वतंत्र पॅथॉलॉजी विभाग कार्यरत आहे. रुग्णांच्या काही तपासण्या कधीतरी करण्यात येतात. यासाठी लागणारी Reagent व किटस् यांचा वापर कायम स्वरुपी नसल्याने एकदा फोडलेले किट विहीत मुदतीत वापर न झाल्याने मुदतबाह्य होते. त्याचा पुर्णपणे वापर करण्यासाठी इतक्या तपासण्या नसतात. अशा तपासण्या आपल्या पॅथालॉजी लॅबमध्ये करण्यापेक्षा इतर नामवंत लॅबमधुन करुन घेंण्यास कमी खर्च येतो. सध्या आपल्या येथे न होणाऱ्या तपासण्या इतर लॅब्स्चे प्रतिनिधी येऊन सॅम्पल्स घेऊन जातात व रुग्ण त्यांना थेट रक्कम अदा करतात. या तपासण्यांचे दर हे कमी-जास्त आहेत.

रुग्णालयात राजीव गांधी आरोग्य योजना लागु झाली आहे. पुढील काही दिवसांत ती श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सुध्दा कार्यरत होईल. या योजनेच्या नियमानुसार आयपीडी रुग्णांच्या सर्व तपासण्या रुग्णालयाने करणे बंधनकारक आहे. अशा तपासण्या रुग्णालयाने इतर पॅथॉलॉजीला पाठवुन करुन घेण्यास अनुसरुन इतर नामवंत लॅब्स्कडुन तुलनात्मक दरपत्रके मागवुन वार्षिक दर निश्चिती केल्यास निम्नतम दर मिळतील व लॅब्स् च्या गुणवत्ता सर्टीफिकेटस् नुसार नामवंत लॅबशी वार्षिक दर निश्चिती करुन कार्यादेश दिल्यास आर्थिक बचत होऊन अचुक तपासण्यांचे रिपोर्ट मिळतील व राजीव गांधी आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांना सुरळीत वैद्यकीय सेवा देता येईल. त्या अनुषंगाने मा. वैद्यकीय संचालक यांचे स्वाक्षरीने संबंधित सर्व लॅब्स्ला दि.२२ जानेवारी २०१४ रोजीच्या पत्राने अंतिम निम्नतम दरपत्रक व गुणवत्ता सर्टीफिकेटस् देणेबाबत कळविण्यात आले होते. त्यांचेकडुन प्राप्त झालेली बंद पाकीटे आजच्या त्रिसदस्य समितीच्या सभेत उघडुन गुणवत्ता सर्टीफिकेटस् व निम्नतम दर पाहुन पुढील एक वर्षासाठी दर निश्चिती करून कार्यादेश देणेबाबत प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालय पॅथॉलॉजी विभागात जास्तीत-जास्त तपासण्या करण्यात याव्यात व काही तपासण्यांसाठी जास्त खर्च येत असेल, तर तसा प्रस्ताव तसेच संस्थान रुग्णालयांमध्ये कोण-कोणत्या लॅब तपासण्या व काय कारणांमुळे होत नाहीत, याबाबत चौकशी करणेत येऊन, त्याचाही सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४ श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पाबाबत.**

**निर्णय क्र.४७४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५ श्री साईबाबांच्या महासमाधीस सन- २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने कृती आराखडा तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** थोर संत श्री साईबाबा हे श्री क्षेत्र शिर्डी येथे विजयादशमी (दसरा) या शुभदिनी मंगळवार, दिनांक १५ऑक्टोबर, १९१८ रोजी पंचत्वात विलीन झाले. श्री साईंचे महानिर्वाणास सन २०१८ मध्ये एक शतक पूर्ण होईल. त्यानिमित्त संस्थान तर्फे "श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८ (विजया दशमी)अखेर" साजरा करण्याचे प्रस्तावित आहे. "श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सव- सन २०१८" हा शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव म्हणून साजरा करण्यात येईल.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षात लाखो साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देतील. तसेच शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव काळात ३० ते ४० लाख साईभक्त श्री साईबाबांचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करणे व नवीन सुविधा उभारणे अत्यावश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील पायाभूत सुविधांचा समावेश असणे गरजेचे आहे.

१. शिर्डी शहरातील अंतर्गत रस्ते व शिर्डीला जोडणारे राज्यमार्ग व इतर प्रमुख रस्ते रुंदीकरण व विकसीत करणे.
२. शिर्डी शहर व लगतचे परिसरात वाहनतळांची निर्मिती करणे.
३. शिर्डी शहर व लगतचे परिसरात पुरेशा सार्वजनिक प्रसाधनगृहांची उभारणी करणे.
४. संभाव्य गर्दी विचारात घेऊन सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करणे.
५. घनकचरा व्यवस्थापन व मलनि:सारण व्यवस्था करणे.
६. विद्युत वितरण व्यवस्थेचे नुतनीकरण व विस्तारीकरण करणे.

यापुर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे मा.अध्यक्ष यांनी दि.०७/१२/२०१० रोजी चे निवेदनाव्दारे सन्मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडेस सन २०१७ -२०१८ मधील शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षानिमित्त विकास प्रकल्प राबविणेसाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करुन देणेसाठी विनंती केली होती. तसेच तत्कालीन सन्मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सन्मा.नगरविकास मंत्री (भारत सरकार) यांना सदरहू विषयाबाबत चर्चा करणेसाठी वेळ मिळणेबाबत दि.०६/११/२०१० रोजीचे निवेदनाव्दारे विनंती केली होती.

साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष साजरे करण्यासाठी पुर्वतयारी करण्याचे दृष्टीने श्री साईबाबा संस्थान,शिर्डी. नगरपंचायत तसेच शासनाचे नगरविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर संबंधित विभाग मिळून एकत्रितरित्या कृती आराखडा तयार करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक असलेबाबत संस्थानतर्फे दिनांक ३०/०३/२०१३ व दिनांक १३/०५/२०१३ रोजीचे प्रस्तावांव्दारे शासनाकडे पाठपुरावा करणेत आला होता. त्यास अनूसरुन महाराष्ट्र शासनाने विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सांसवि २०१३/ प्र.क.१/का.१६ दिनांक २२ ऑक्टोबर २०१३ अन्वये अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली कृती आराखडा समिती स्थापन केली आहे. सदरहू शासन निर्णय सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

श्रींचे शतकमहोत्सवी पुण्यतिथी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्थांना नेमणेकामी मा.त्रीसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील नि.क्र.९४३ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय समंत करणेत आला आहे.

"श्री" साईंचे शतक महोत्सवी पूण्यतिथी वर्षानिमित्त शिर्डी व लगतचे परिसराचा विकास आराखडा तयार करणेकामी या क्षेत्रातील नामांकीत अनुभवी व मोठ्या स्वरुपाची कामे केलेल्या ०५ सल्लागार संस्थांना निमंत्रीत करणेत यावे, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली."

त्यानुसार सल्लागार संस्थांना आमंत्रित करणेसाठी कार्यवाही करणेत येत आहे.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे क्र. सासंवि २०१३/१/प्र.क्र.-१/का.१६ दि.१९/११/२०१३ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"श्रीसाईबाबांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असल्याने साईभक्तांच्या सुविधांसाठी कृती आराखडा तयार करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची बैठक आयोजित करण्यासंदर्भात शतकमहोत्सवी पुण्यतिथी वर्षामध्ये शिर्डीत येणाऱ्या भाविकांच्या सोयी सुविधांसाठी स्वयंस्पष्ट कच्चा आराखडा मराठी व इंग्रजीमध्ये तयार करुन तीन प्रतीत शासनास तातडीने सादर करावा. "

याकामी इकडील विभागामार्फत प्रारुप कृती आराखडा तयार करणेत आला असून तो सोबत अवलोकनार्थ ठेवला आहे. तरी सदरचा प्रारुप कृती आरखडा शासनाकडे सादर करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या महासमाधीस सन- २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने संस्थानमार्फत तयार करणेत आलेला प्रारुप कृती आराखडा शासनास सादर करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयांकरीता बसविणेत आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) संस्थानमार्फत चालविणेकामी आऊट सोर्सिंगमार्फत कर्मचारी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-</u>** अधिनियमाचे कलम - २१ मधील पोटकलम (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल," अशी तरतुद आहे.

**<u>प्रस्ताविक:-</u>** श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ रुग्णालयाचे परिसरामध्ये ठेकेदार डेक्कन एन्व्हायरोमेंटल कन्सल्टटस्, प्रा.लि.पुणे यांचे मार्फत रुग्णालयाचे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी दोन सांडपाणी प्रक्रीया संयंत्र (STP) सन २००९ मध्ये पूर्ण केले असून, सदरचे प्रकल्प पूर्ण झालेनंतर निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांनी दि.१०/०२/२०११ अखेर पर्यंत सदर दोन्ही प्लान्टचे O & M केलेले आहे. ठेकेदार यांनी सदरचे कालावधी मध्ये प्लॅन्ट व्यवस्थीत चालविला आहे. त्यानंतर सदर प्रकल्प देखभाल दुरुस्तीसाठी (O & M) साठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये ठेकेदार मे. डेक्कन एन्व्हायरोमेंटल सर्व्हिसेस, पुणे यांना खालील कालावधीसाठी देणेत आलेला होता.

| अ.नं. | वार्षिक देखभाल व दुरुस्ती कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | दि.०१ मार्च २०११ ते दि.२८ फेब्रुवारी २०१२ अखेर एक वर्षासाठी | ५,८६,९६३/- |
| ०२ | दि.०१ मार्च २०१२ ते दि.२८ फेब्रुवारी २०१३ अखेर एक वर्षासाठी | ६,४५,६५२/- |
| ०३ | दि.०१ मार्च २०१३ ते दि.२८ फेब्रुवारी २०१४ अखेर एक वर्षासाठी (रु.६०,०००/- प्र.महिना) | ७,२०,०००/- |

**<u>प्रस्तावना:-</u>** उपरोक्त प्रमाणे दोन्ही प्रकल्प सद्यस्थितीत सुव्यवस्थित चालू असून, सदर प्रकल्पाद्वारे प्रक्रीया केलेले पाणी तेथील परिसरातील बागेसाठी दैनंदिन वापरात येत आहे. सदर प्रकल्पाचे O & M चा कालावधी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपुष्टात आला होता. सदरहू प्रकल्प O & M वर चालविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आल्या होत्या. याकामी निविदे सुचनेनुसार विहीत मुदतीत ०४ ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केल्या होत्या. सदर प्राप्त ०४ सिलबंद निविदा मा. उप समितीचे दि.१०/०४/२०१४ रोजीचे सभेत उघडणेत आल्या होत्या. परंतू Minimum Qualifying Criteria नुसार एकही ठेकेदार पात्र होत नसल्याने याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

त्यानुसार इकडील विभागामार्फत Minimum Qualifying Criteria शिथिल करुन फेर निविदा मागविणेची कार्यवाही करणेत येत आहे. दरम्यानचे कालावधीत सदरचे दोन्ही प्लॅन्ट चालु ठेवणे गरजेचे आहे. करिता याकामासाठी ०५ कर्मचाऱ्यांची नेमणूक संस्थानचे लेबर ठेकेदारामार्फत करुन सदर कर्मचारी आऊट सोर्सिंगपध्दतीने नेमणे आवश्यक आहे. याकामी प्रती महिना अंदाजे रुपये ३८,६००/- मात्रचे खर्चानुसार ५ महिन्यांचे कालावधीकरीता एकूण रक्कम रुपये १,९३,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी पुढील निविदा प्रक्रियेची कार्यवाही होई पावेतो सदर ०५ कर्मचाऱ्यांची नेमणूक आऊट सोर्सिंगमार्फत दि.०१/०३/२०१४ ते ३०/०९/२०१४ अखेर साई आश्रम विभागामार्फत होणेस विनंती. तसेच याकामी येणारे उपरोक्तप्रमाणे रुपये १,९३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता बसविणेत आलेल्या सांडपाणी संयंत्र (STP) प्रकल्प संस्थानमार्फत चालविणेकामी नवीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेत येऊ नये. सदरकामी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडे आऊट सोर्स पध्दतीने पुरविणेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून ०५ कर्मचारी पुढील निविदा प्रक्रियेची कार्यवाही पुर्ण होई पावेतो पुरविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.२७ संस्थानचे बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा विभागामार्फत मागविण्यात येणाऱ्या निविदांचे तांत्रिक मुल्यमापनासाठी (Technical Evaluation Committee) समिती नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** सदर अधिनियमातील कलम १७ चे पोटलकलम (२) मधिल खंड (झ) व (त्र) अन्वये वरील विषयाशी संबंधित खालिल तरतूदी आहेत.

*"(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. "*

*(त्र) संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे प्रशासन व व्यवस्थापन यांच्याशी संबंधित बाबीकरिता तिला सल्ला देण्यासाठी आवश्यक वाटल्यास, तिच्या सदस्यांची किंवा बाहेरील व्यक्तींची उप-समिती घटित करील आणि तिची रचना, सभा घेण्याबाबतची कार्यपध्दती आणि समिती सदस्यांहून अन्य असतील अशा उप समितीच्या सदस्यांना बैठक भत्ता आणि प्रवास व दैनिक भत्ता यांचे प्रदान करण्याबाबतच्या तरतुदींसह तत्संबंधित बाबींची कार्यपध्दती निर्धारित करील; आणि आपल्या कार्यामध्ये सहाय्य करण्यासाठी छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे तिला सनदी लेखापालाची नियुक्तीही करता येईल: आणि कलम २१ च्या पोट-कलम(२)अन्वये, कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेला संस्थान विश्वस्तव्यवस्थेने मंजूर केलेल्या वित्तीय सहाय्याचा योग्य, पूर्णांशाने तसेच वेळेवर विनियोग होत आहे यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी व ते समितीला कळवण्यासाठी, विशेषीकृत व व्यावसायिक ज्ञान असलेल्या क्षेत्रातील तिच्या सदस्यांमधून पाचपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांची उपसमितीही नियुक्त करता येईल आणि अशा विश्वस्तव्यवस्थांकडून वित्तीय सहाय्याचा कोणताही दुर्विनियोग होत असेल तर ते मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये आवश्यक ती शिस्तविषयक किंवा शिक्षार्थ कारवाई करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांना कळवील;"*

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:-** वरील विषयाबाबत मा. त्रीसदस्य समितीचे दि.२७/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.४२८ संमत कण्यात आलेला आहे.

*"संस्थान ऑडीटरने सूचना केलेप्रमाणे बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा या विभागांसाठी घेण्यात येणाऱ्या वस्तुंसाठी व त्या वस्तुंची बिले तपासणीसाठी तीन इंजिनिअरची एक उपसमिती (Technical Evaluation Committee) नेमण्यात यावी."*

**प्रस्तावना :-** संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे. कोचर अॅण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांनी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अहवालात खालिलप्रमाणे मुद्दा नमूद केलेला आहे.

"It is observed that at times projects have been revised and there is delay in execution of the Projects. It is suggested that the Projects before implementation, be properly evaluated by technical committee. It is essential that the Sansthan has good technical team to visualise and execute capital projects. The revision in project not only leads to delay in execution of the project but the cost of the project also goes up due to time escalation."

त्यानंतर संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे. कोचर अॅण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांनी आर्थिक वर्ष सन २०११-२०१२ चे लेखापरिक्षण अहवालात खालिलप्रमाणे मुद्दा नमूद केलेला आहे.

Proper tendering process and evaluation system should be followed. It is our humble submission that the technical evaluation and financial evaluation should be done by sub-committee consisting of technically qualified in the field and finance field.

**प्रस्तावना :- अ)** विद्यमान कार्यपद्धतीत बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या मोठ्या स्वरुपाच्या बांधकामांसाठी संस्थानतर्फे आर्किटेक्ट अथवा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात येते. ठेकेदार यांची बिले सदर आर्किटेक्ट अथवा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, यांचेमार्फत तपासणी करुन प्रमाणित करण्यात येतात. सदर बिले लेखाशाखेत अदायगीसाठी गेल्यानंतर लेखाशाखेमार्फत नेमण्यात आलेले लेखापरिक्षक (चार्टर्ड अकौंटंट) हे बिलाची तपासणी करतात व त्यानंतर बिल अदा करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येते. याप्रमाणे मोठ्या स्वरुपाचे बांधकामांची बिले आर्किटेक्ट / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत तसेच चार्टर्ड अकौंटंटं संस्थेमार्फत तपासण्यात येतात. अशा प्रकारे मोठ्या स्वरुपाचे बांधकामांचे बाबतीत बिलांची तपासणी तांत्रिक व वित्तीय क्षेत्रातील तज्ञांमार्फत करण्यात येते.

**ब)** बांधकाम विभागामार्फत अलिकडेच साईआश्रम प्रकल्पासाठी सिंगल बेडस् (वस्तु) ची मोठ्या स्वरुपाची खरेदी करणेत आलेली आहे. तसेच सध्या साईआश्रम धर्मशाळा इमारतींसाठी सिंगल बेडस् व लॉकर्सच्या मोठ्या स्वरुपाचे खरेदीसाठी निविदा प्रक्रिया चालू आहे. या वस्तु खरेदीसाठी संस्थानतर्फे कुठल्याही सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली नाही. तथापी भविष्यात अशा मोठ्या स्वरुपाच्या (रु.१० लक्ष पेक्षा जास्त खर्चाच्या) वस्तु खरेदीसाठी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करता येईल.

**क)** वर नमूद केलेप्रमाणे मोठी बांधकामे व मोठ्या स्वरुपाची वस्तु खरेदी यांच्या निविदा मागवितांना ठेकेदार/ पुरवठादार यांचेकरीता किमान पात्रता निकष (Minimum Qualifying Criteria) ठरविण्यात येतात व त्याचे आधारावर निविदा सादरकर्त्या ठेकेदारांचे मुल्यमापन करण्यात येते. वर नमूद व्यवस्थापन समिती निर्णय व वैधानिक लेखापरिक्षक यांचे मुद्यानुसार सदर मुल्यमापन प्रक्रीयेसाठी तज्ञांची समिती स्थापन करणे अभिप्रत आहे. तथापी सदर सेवा प्राप्त करणेसाठी समिती स्थापन करणेऐवजी सल्लागार यांचे पॅनेल (Panel of Consultants) नियुक्त करणे् कामकाजाच्या दृष्टीने सोयीचे होईल असे मत आहे. या पॅनेलवरील सल्लागारांकडून खालिल सेवा घेता येतिल.

संस्थानतर्फे करण्यात येणारी रु.१० लक्ष पेक्षा जास्त खर्चाची मोठ्या स्वरुपाची बांधकामे व मोठ्या स्वरुपाचे वस्तु खरेदीकरीता ठेकेदार, उत्पादक व पुरवठादार यांचेसाठी पूर्वपात्रता निकष ठरविणे.

ठरविणेत आलेल्या पूर्वपात्रता निकषांनुसार बांधकाम अथवा वस्तु खरेदीसाठी आलेल्या निविदांतील तांत्रिक माहिती व कागदपत्रांची छाननी व मुल्यमापन करुन पात्रताधारक निविदा सादरकर्त्यांबाबत अभिप्राय सादर करणे.

संस्थानतर्फे करण्यात येणाऱ्या रु.१० लक्ष पेक्षा जास्त खर्चाची बांधकामे व वस्तु खरेदीची अंतिम बिलांची तपासणी (Peer Review) करुन त्याबाबत अभिप्राय सादर करणे.

प्रकल्पाचे आर्किटेक्ट अथवा सल्लागार यांनी तयार केलेले अंदाजपत्रक व निविदा प्रपत्रे तपासून (Peer Review) त्याबाबत अभिप्राय सादर करणे.

वरीलप्रमाणे सेवा प्राप्त करणेसाठी सल्लागारांचे पॅनेल (Panel of Consultants) तयार करणेसाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे अनुभवी व नामांकीत सल्लागारांकडून अर्ज मागविता येतिल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित सेवा प्राप्त करणेसाठी सल्लागारांचे पॅनेल (Panel of Consultants) तयार करणेकामी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे अनुभवी व नामांकीत सल्लागारांकडून अर्ज मागविणेत यावे. तसेच, अशा प्रकारची सेवा देणाऱ्या सल्लागार संस्थांची माहिती प्राप्त करुन त्यांना पत्राद्वारे अर्ज सादर करणेविषयी कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८ श्री साईनाथ रुग्णालय इमारतीच्या पश्चिमेकडील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः</u>** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविकः** श्री साईनाथ रुग्णालय आवारात जवळ जवळ सर्वच ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविल्यामुळे रुग्णालयातील रुग्ण/ नातेवाईकांकरीता चांगली सोय करण्यात आली आहे. परंतू रुग्णालय इमारत नं. ०२ चे पश्चिमेकडील विहीरीजवळ मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे बाकी आहे. सदरहू मोकळ्या जागेत बरेच ठिकाणी वृक्ष आहेत त्यामुळे मोकळ्या जागेत सर्वत्र सावली असते. मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले तर त्या ठिकाणी स्वच्छता राहील तसेच तिथे रुग्ण/ नातेवाईकांना जेवण व विश्रांती घेणे सोयीचे होईल व रुग्णालय परीसरातील गर्दी कमी होणेस मदत होईल.

**मागणीः** वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०१३ रोजीचे पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालय इमारत नं. २ चे पश्चिमेकडील विहीरीजवळ मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

**प्रस्तावः** श्री साईनाथ रुग्णालय इमारत नं. २ चे पश्चिमेकडील विहीरीजवळ मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसवून घेणेकामी इकडील विभागामार्फत सन २०१३-१४ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार सदरहू कामी रुपये १६,१७,७५८/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्रायः** तरी श्री साईनाथ रुग्णालय इमारत नं. ०२ चे पश्चिमेकडील विहीरीजवळच्या मोकळ्या भागात पेव्हिंग ब्लॉक्स बसविल्यास सदरचा भाग सुशोभित दिसेल. तसेच या भागामध्ये रुग्णांचे नातेवाईकांना विश्रांती घेता येऊन, रुग्णालया समोरील गर्दी कमी होणेस मदत होईल असे मत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये १६,१७,७५८/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७८ सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन, नवीन प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९ दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परीसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेकामी मागविणेत आलेल्या प्रस्तावांबाबत.**

**प्रस्ताव-** थोर संत श्री साईबाबा हे श्री क्षेत्र शिर्डी येथे विजयादशमी (दसरा) या शुभदिनी मंगळवार, दिनांक १५ऑक्टोबर, १९१८ रोजी पंचत्वात विलीन झाले. श्री साईंचे महानिर्वाणास सन २०१८ मध्ये एक शतक पूर्ण होईल. त्यानिमित्त संस्थान तर्फे "श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक १९ऑक्टोबर, २०१८ (विजया दशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे." श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सव- सन २०१८" हा शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षात लाखो साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देतील. तसेच शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव काळात ३० ते ४० लाख साईभक्त श्री साईबाबांचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करणे व नवीन सुविधा उभारणे अत्यावश्यक आहे.

श्री साईबाबां महासमाधी शताब्दी वर्षात शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दिर्घकालीन गरजा विचारात घेऊन सर्व संबंधित विभागांचा एकत्रित कृती आराखडा तयार करुन त्यानुसार कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र/ राज्य शासन व संस्थानमार्फत आवश्यक निधी/ अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि-२०१३/ प्र.क्र.१/ का.१६, दिनांक २२/१०/२०१३ अन्वये सन्मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

याप्रमाणे हाती घ्यावयाच्या प्रकल्पांचे स्वरुप ठरविणेसाठी सर्वांगिण अभ्यास व सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. याबाबतचा प्रस्ताव मा.त्रीसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील नि.क्र. ९४३ खालील प्रमाणे समंत करणेत आला आहे.

*"श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षानिमित्त शिर्डी व लगतचे परिसराचा विकास आराखडा तयार करणेकामी या क्षेत्रातील नामांकित, अनुभवी व मोठ्या स्वरुपाची कामे केलेल्या ०५ सल्लागार संस्थांना निमंत्रित करणेत यावे असे ठरले. तसेच याकामी येणारे सर्वसमावेशक अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली".*

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार या क्षेत्रातील नामांकित, अनुभवी व मोठ्या स्वरुपाची कामे केलेल्या सल्लागारांची नांवे व पत्ते इंटरनेटच्या माध्यमातून प्राप्त करण्यात आले आहेत. सदर २१ सल्लागार संस्थांकडून त्यांचे संस्थेबाबतची सविस्तर माहिती, पुर्वानुभव याबाबत संस्थानचे जा.क्र.५६४४/२०१४ दि.०८/०३/२०१४ रोजीचे पत्रान्वये दि.२०/०३/२०१४ अखेर माहिती सादर करणेस कळविणेत आले होते.

याकामी खालील संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

| **अ.नं.** | **सल्लागार संस्थेचे नांव** |
|---|---|
| 01 | Tata Consulting Engineers Limited, Noida |
| 02 | Intercontinental Consultants & Technocrats pvt ltd, New Delhi |
| 03 | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai |
| 04 | STUP cosultants pvt. Ltd. Navi Mumbai |
| 05 | Ernst & Young LLP, Hyderabad |
| 06 | Knowarch, Mumbai |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त सल्लागार संस्थांबद्दलच्या तांत्रिक माहितीचे बंद लिफाफे मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष दि.१४/०४/२०१४ रोजी उघडणेत आले असून त्यामधिल तांत्रिक माहितीचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Name & Adress of the Applicant Firm** | **Avg. Annual Turnover of last three years** | **Largest Project handled recently** |
|---|---|---|---|
| 1 | **Tata Consulting Engineers Limited,** Ground Floor Tower B & C, Green Boulevard, Plot No. B9A, Sector 62, Noida 201 301 | 433.57 Crores | Planning, Development and Design of Infra Structure works (Phase I and Phase 2 for Bengal Aerotropolis project limited (BAPL) Project cost: Rs.10,000 crores. |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | **STUP Consultants Pvt. Ltd.,** 1004-5-6, Raheja Chambers, 213, Nariman Point, Free Press Journal Marg, Mumbai 400 021, India | 131.57 Crores | Preparation of feasibility report, detailed project report, design engineering, approval of report from CPHEFO, financial analysis, preparation of Tender documents, bid process management etc., for augmentation of water supply system in Patana on PPP basis. Project Cost Rs.: 426.98 Crores. |
| 3 | **Intercontinental Consultants and Technocrats Pvt. Ltd.,** A-8, Green Park,New Delhi-110 016, India | 179.94 Crores | Preparation of City Development Plans and city Investment Plans for (Cluster-7) Three towns (Purnea, Kishanganj and Katihar) in Bihar (DFID funded) Project Cost Rs.: 2651 Crores |
| 4 | **FORTRESS Infrastructure Advisory Services, (FORTRESS Financial Services Ltd.,)** Daryanagar House, 2nd Floor, 69, Maharshi Karve Road, Marine Lines, Mumbai-400 002 | 11.15 Crores | Nanded City Infrastructure Development for Gur-Ta-Gaddi Tercentenary Celebration 2008 at Nanded. Project Cost Rs.:733.11 Crores |
| 5 | **ERNST & YOUNG LLP,** 6th Floor, Hindustan Times House 18-20, Kasturba Marg, New Delhi- 110 001 | 1004.34 Crores | City Development Plan for Chhindwara, Junardeo and Seoni city of Madhya Pradesh. Project cost not mentioned. |
| 6 | **KnowArch,** 152, Parag, 3rd floor, M. B. Raut Marg, Shivaji Park, Dadar (W), Mumbai- 400 028 | Not mentioned | Simillar type of Work not Mentioned |

वरीलप्रमाणे तांत्रिक माहितीवरुन असे दिसून येते की, अ.नं. १ ते ५ च्या सल्लागार संस्थाची उलाढाल मोठ्या स्वरुपाची असून त्यांनी मोठ्या स्वरुपाची कामे केलेली आहेत. तरी श्री साईबाबांचे महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेसाठी वरील अ.नं. १ ते ५ चे सल्लागार संस्थांकडून फीबाबतचे वाणिज्यिक प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेतील संस्थान निधीतून प्रथम प्राधान्यगटीतील ०६ रस्ते विकसीत करणेकामी ठेकेदार रोमन टारमॅट लि. व सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ०४ दि.०४/०६/२०११ अन्वये अध्यादेश क्र.१४ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ यात करण्यात आलेल्या सुधारणेनुसार कलम २१ ची खालील प्रमाणे सुधारणा करणेत आली. समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल अशी तरतुद आहे.

" (१ क) पोटकलम (१) च्या तरतुदीना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, आणी राज्यशासनाकडून राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करणेत येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळाना, शासकीय कंपन्यांना किवा शासकीय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल.

त्यातील पोटकलम (दोन) अन्वये स्थानिक नागरी सेवा व सुविधांमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे."

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय** :

१. मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.२६३ दि.२४/०४/२००६

२. मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.१६ (ब) दि.१०/०१/२०१०

**प्रस्तावना:**

**अ) <u>ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांचे मुदतवाढ मागणीबाबत-</u>** शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत संस्थान निधीतुन प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्ते विकसीत करणेचे अंदाजे रुपये ८८.६७ कोटी मात्र इतक्या रकमेचे काम संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत अंतिम टप्प्यात आहे. मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांन्वये मान्यता मिळालेनुसार प्रथम प्राधान्यगटातील अकरा रस्ते विकसित करणेकामी संस्थानमार्फत सादर केलेल्या प्रस्तावास दि.१९/०९/२००८ रोजीचे शासन निर्णयान्वये रुपये २८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. याकामी सुधारीत खर्चाचे प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी तत्कालीन विधी व न्याय मंत्री (महाराष्ट्र शासन) मा.राधाकृष्ण विखे पा.यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार या प्रकल्पाचे वाढीव खर्चासह एकूण रुपये ८८ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर मा.विधी व न्याय मत्री व मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल असे ठरले आहे.

सदर बैठकीत ठरलेप्रमाणे सुधारीत प्रस्ताव (रुपये ८८ कोटी खर्चाचा) इकडील पत्र क्र. ७४९३/२०१० दि. २६/०५/२०१० अन्वये सादर करणेत आलेला असून याकामी शासनाचे विधी व न्याय विभागाच्या विविध पत्रान्वये मागविण्यात आलेल्या पुर्तता/ खुलासे करण्यात आलेले आहेत. तसेच याकामी दि. ०७/०१/२१४ रोजी रु.८८.६७ कोटी खर्चाचा सुधारीत प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेत आला असून मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. दरम्यान मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र. ६४० दि. ०७/०८/२०१० अन्वये खालीलप्रमाणे ठरले आहे.

*" ..तसेच शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्यगटातील ११ रस्ते विकसित करणेसाठी येणारा सर्व खर्च संस्थानमार्फत करणेत येणार आहे व त्यासाठी शासनाकडे या प्रकल्पाच्या रक्कम रु.८८ कोटी मात्रच्या वाढीव व सुधारीत खर्चाच्या मान्यतेसाठी यापुर्वीच प्रसताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावात वाढीव सुधारीत खर्चाचा अंतर्भाव आहे. सदर रु.८८ कोटी मात्रच्या प्रस्तावास शासनमान्यता मिळणेसाठी वरिष्ठ स्तरावरुन पाठपुरावा करावा, दरम्यानचे कालावधीत काम प्रगतीत व सुरु ठेवावे असे ठरले. "*

त्यानुसार काम सुरु ठेवण्यात आले असून आजअखेर सदरहु प्रकल्पावर रु. ६६.७२ कोटी रक्कम खर्च करणेत आलेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र. १६(ब) दि.१०/०१/२०१० अन्वये ठरल्यानुसार सदर प्रकल्पातील ११ रस्त्यांपैकी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचेमार्फत विकसित करणेत आलेल्या २.५६ कि. मी. लांबीचे ०५ रस्त्यांपैकी ०४ विकसीत करणेचे काम किरकोळ बाबी वगळता पूर्ण करण्यात आले असून द्वारकामाई ते ताजिमखानबाबा चौक या भागातील रस्ता शिर्डी नगरपंचायतीकडून पुर्ण रुंदीत उपलब्ध न झाल्याने काम करणेस रस्ते विकास महामडळाने असमर्थता दर्शविली आहे. उर्वरीत ७.१७ कि.मी. लांबीचे ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणेत येत आहेत. सदर प्रकल्पाचे काम ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवि मुंबई यांना देणेत आलेले आहे. सदरहू कामी ठेकेदार यांचेशी झालेले करारनाम्यानुसार सदरचे कामाची १५ महिने मुदत दि.०५/११/२०११ पर्यंत होती. मात्र ठेकेदार यांना ऑगस्ट २०१० पासुन अद्यापपर्यंत शिर्डी नगरपंचायतीमार्फत काही रस्ते पुर्णपणे लांबी-रुंदीत ताब्यात देण्यात आलेले नाहीत. नगरपंचायतीमार्फत जसजसे रस्ते उपलब्ध होतील तसतसे ठेकेदार यांनी काम केले आहे. सदरहु कामाची वाढीव मुदत दि.३० एप्रिल २०१४ अखेर संपुष्टात आली आहे. सदरचे कामांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| ०१ | बांधकाम ठेके दार | मे.रोमन टारमॅट लि.,नवी मुंबई |
| ०२ | सल्लागार | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे. |
| ०३ | मंजूर निविदा रक्कम | रु. ३३,८३,२६,१९९/- |
| ०४ | निविदा टक्केवारी | १०% कमी |
| ०५ | कार्यादेश क्रमांक / दिनांक | जा.क्र. ८८३७ दि. ०६/०८/२०१० |
| ०६ | कामाची मुदत | १५ महिने- ०५ नोव्हेंबर २०११ अखेर |
| ०७ | मुदतवाढ | प्रथम मुदतवाढ- मार्च २०१२ अखेर (मा.व्य.स.सभा निर्णय क्र.१७३(०७) दि. १९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये) |

| | | |
|---|---|---|
| | | द्वितीय मुदतवाढ- मे २०१३ अखेर (मा.व्य.स.सभा निर्णय क्र.७४६ (फ) दि. १५ सप्टेंबर, २०१२ अन्वये)<br>तृतीय मुदतवाढ- दि.३१ डिसेंबर २०१३ अखेर (मा.व्य.स.सभा निर्णय क्र.५४३ दि. २६ जुलै, २०१३ अन्वये)<br>चतुर्थ मुदतवाढ- दि.३० एप्रिल २०१४ अखेर (मा.व्य.स.सभा निर्णय क्र.१८४ दि. १५ मार्च, २०१४ अन्वये) |
| ०८ | प्रमाणित झालेल्या कामाची रक्कम | बिल क्र.०८ ए अखेर एकूण रु. २१,०४,९८,२३०/-<br>(भावफरक बिल क्र.०७ सी अखेर बिल रकमेसह) |
| ०९ | कामाचे प्रगतीबाबत | १. रस्ता क्र.०३ (नांदूर्खी रस्ता)- कॉक्रीटीकरण (लांबी- १८७० मीटर व रुंदी १८ मीटर)- रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे व रस्त्याचे दोन्ही बाजूकडील उपलब्ध जागेतील फुटपाथचे व स्ट्रीट लाईट पोलचे काम पूर्ण. इलेक्ट्रीकल, फिनीशिंगचे व मेडियनचे काम प्रगतीपथावर आहे. चेनेज १००० नंतरचे काही भागात लगतचे मालमत्ताधारकांचे हरकतीमुळे फुटपाथचे काम प्रलंबित आहे.<br>२. रस्ता क्र.०६ (नविन पिंपळवाडी रस्त्याचे दक्षिणे कडील रस्ता- कॉक्रीटीकरण लांबी ५६५ मीटर व रुंदी १५ मीटर), रस्ता क्र.०७ (साई आश्रम दक्षिण बाजूकडील रस्ता- डांबरीकरण- लांबी ४५० मीटर व रुंदी २४ मीटर) व रस्ता क्र.०८ (निमगाव शिव ते जुना पिंपळवाडी रस्ता - कॉक्रीटीकरण- लांबी ४५० मीटर व रुंदी १८ मीटर)- या रस्त्यांचे किरकोळ बाबी वगळता काम पूर्ण आहे.<br>रस्ता क्र. ०५ (आ.क्र. ३१ ते नाला रस्ता- डांबरीकरण लांबी १५४० मीटर व रुंदी १८ मीटर)- हस्तांतरीत झालेल्या रस्त्याचे चेनेज क्र. ३१५ (कनकुरी रस्ता) ते १२८० (नगर-मनमाड रस्ता) या भागातील डांबरीकरणाचे काम पूर्ण . नगर-मनमाड रस्ता ते चेनेज क्र.१५०० या भागात खोदाई व रिटेनिंग वॉलचे काम प्रगतीपथावर आहे. रस्त्याचे रुंदीत येणारी इमारत पूर्णपणे काढलेली नसल्यानेत्या भागात काम बंद आहे. नगर-मनमाड रस्ता ते चेनेज क्र.०- या भागात नगरपंचायतीकडून झाड, इलेक्ट्रीक पोल शिफ्टींग न झाल्याने तसेच कब्रस्तानजवळील रस्त्याची पुर्ण रुंदी उपलब्ध न झाल्याने उपलब्ध रुंदीत WBM चे काम सुरु आहे. तसेच चेनेज क्र.० ते ३१५ या अंतरातील सुरु करण्यात आलेले खडीकरणाचे काम लगतचे मालमत्ताधारकांनी हरकत घेतल्याने कॅरिएजवे पुरतेच करणेत येत असून फुटपाथ, रिटेनिंग वॉलचे काम करता येत नाही.<br>३. रस्ता ०९ (लक्ष्मीनगर ते कंधारी हॉटेल प.बाजू कॉक्रीटीकरण लांबी ८४० मीटर व रुंदी १८ मीटर) - चेनेज क्र. ० ते १६५ या अंतरातील काम रस्ता हस्तांतरीत न झाल्याने सुरु करता आले नाही. उर्वरीत चेनेज क्र. १६५ ते ८४० या अंतरातील रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण. रस्त्याचे दोन्ही बाजूकडील फुटपाथचे काम प्रगतीपथावर<br>४. रस्ता क्र.०९ अ (कंधारी हॉटेल प. बाजू ते आ. क्र. ३१- लांबी १५०० मीटर व रुंदी १८ मीटर)- काम करणेसाठी रस्ता हस्तांतरीत न झाल्याने सुरु करता आले नाही. |

ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि., मुंबई यांचेकडील दि.२९/०४/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविलेल्या बांबींचा संक्षिप्त गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

१. रस्ता क्र.०३ नांदुर्खी रस्ता व रस्ता क.०६ नविन पिंपळवाडी रस्ता ते १८ मी. रिंग रोड- MORTH स्पेसिफिकेशन व सल्लागार यांचे सुचनांनुसार सदरहु रस्त्याचे काम दि. ३०/०४/२०१४ रोजी पुर्ण झालेले असुन सदर रस्ता हस्तांतरीत करून घ्यावा.
२. रस्ता क्र.०७ - नगर मनमाड रस्ता ते साईश्रद्धा हौसिंग सोसा.रस्ता - दि. ३०/०४/२०१४ रोजी पुर्ण होणे अपेक्षित असलेले फुटपाथचे ६० मि.मी. पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम वगळता काम पुर्ण झालेले आहे.
३. रस्ता क्र. ०८- निमगाव शिव ते पिंपळवाडी रोड- MORTH स्पेसिफिकेशन व सल्लागार यांचे सुचनांनुसार सदरहु रस्त्याचे काम दि. ३०/०४/२०१४ रोजी पुर्ण झालेले असुन सदर रस्ता हस्तांतरीत करून घ्यावा.

४. रस्ता क्र. ०९- रस्ता क्र.०८ ते रस्ता क्र.०९ ए- कॅरिएजवे व ८० मि.मी. पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम पुर्ण असून कर्ब स्टोन, इलेक्ट्रीकल व इतर कामे दि.१५/०५/२०१४ अखेर पुर्ण होतील.

५. रस्ता क्र.०५- पश्चिम बाजू १८ मी. रिंगरोड- रस्ता १४/०९/२०११ रोजी काम करणेस मिळाला.सदर रस्ता सलगपणे काम करण्यासाठी मिळाला नाही. सदर रस्त्याचे काम जो भाग काम करणेसाठी मिळेल त्या भागात करणेत आलेले आहे. अजुनही नाला रस्ता व चेनेज ० ते २४० या अंतरात पुर्ण रुंदीत व सलगपणे काम करता येत नाही.

उपरोक्त कारणांमुळे सदरहु काम पूर्ण करणेस अडचण येत असल्याने दि.३० जुन, २०१४ अखेर मुदतवाढ मिळणेबाबत विनंती ठेकेदार यांनी केली आहे. सल्लागार यांनी दि.१२/०५/२०१४ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अभिप्राय दिला आहे.

" ..As per above reference letter M/s. RTL has not completed the roadwork in all respect of Road no.3,6,7,8 & 9. The balance works are as under ..

| ROAD No. | Balance activities |
|---|---|
| 03 | 1. Median circular brickworks, internal plaster and external painting<br>2. Assembling of feeder pillar and supply of electric<br>3. Painting of speed breakers<br>4. Cleaning & maintenance |
| 05 | 1. Ch.0/00 to 0/60m & 1/250 to 1/800 BT work<br>2. Ch.0/00 to 0/80m retaining wall & Ch.0/300 to 0/460m retaining wall<br>3. Ch.0/00 to 0/460m - 4 nos.utility crossing<br>4. Electrical work totally balance (Ch.0/00 to 1/800m<br>5. Paver block fixing (Ch.0/00 to 0/850m, Ch.1/250 to1/800m both sides<br>6. Compound wall at Dwaravati & hospital<br>7. Sign boards & thermoplast<br>8. Toilet block at garden<br>9. Kerb stone in median & painting Ch.0/00 to 0/605m<br>10. Cleaning & maintenance |
| 06 | 1. Assembling of feeder pillar and electric supply<br>2. Cleaning & maintenance |
| 07 | 1. Paver blocks & median soil filling<br>2. Canal chamber slabs & covers<br>3. Sign boards<br>4. Cleaning & maintenance |
| 08 | 1. Assembling of feeder pillar and electric supply<br>2. Cleaning & maintenance |
| 09 | 1. Assembling of feeder pillar and electric supply<br>2. Sign boards<br>3. Cleaning & maintenance |

..The project road no.9A is still to be handed over to the contractor. Except Road no.09A the balance project works are hampered due to adjacent landowners/ SNP problems mostly of Road no.05.(Ch.0/0 to 0/605m & 1/250 to 1/800). The WBM works are completed of the above stretches which will disturb the traffic in coming monsoon. Therefore we must complete the carriageway of the road (Ch.0/0 to 0/605m & 1/250 to 1/800).

It is proposed that the request of contractor for extension upto 30/06/2014 may be considered appropriately. In this period the contractor must complete the balance road works in all respect .

If he fails to complete the balance works, actions may be taken as per the contract."

**ब) <u>सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि. यांचे मुदतवाढ मागणीबाबत-</u>** सदर प्रकल्पाचे सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांचे सेवेचा वाढीव कालावधीही ३१ मे, २०१४ अखेर संपुष्टात येत आहे. करीता सल्लागार यांनाही त्यांचेकडील दिनांक १२/०५/२०१४ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांचे काम ३० जुन, २०१४ पर्यत पूर्ण होणे अपेक्षित असल्याने, ठेकेदार यांचे कामाचे बिल तपासणी कामी दिनांक ३१ जुलै, २०१४ अखेर मुदतवाढ देता येइल.

**विभागाचा अभिप्राय/ मत:** रस्ता क्र. ०३, ०९,०५ चे या रस्त्यांचे लगतचे मालमताधारकांनी वारंवार अडचणी आणल्याने ठेकेदार यांना कामाची गती राखता आलेली नाही. तथापि उर्वरीत भागात ठेकेदार यांचे कामाची प्रगती समाधानकारक आहे. सध्याचे प्रगतीवरून व सल्लागार यांचे अभिप्राय विचारात घेता ठेकेदार यांना दि.३० जुन, २०१४ पर्यन्त मुदतवाढ देणेस तसेच सदरहू प्रकल्पाचे सल्लागार

मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांना दिनांक ३१ जुलै, २०१४ पर्यन्त मुदतवाढ देणेस व सदरचे कालावधीत सलागार यांची फी अदा करणेस हरकत नाही असे मत आहे.

तरी उपरोक्त **अ** ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांना दिनांक ३० जुन, २०१४ अखेर अखेर मुदतवाढ देणेस व **ब** प्रमाणे सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांना दिनांक ३१ जुलै, २०१४ अखेर मुदतवाढ देणेस व त्यांची फी अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८० यावर सविस्तर चर्चा होऊन, रस्ता क्र. ०३, ०५ व ०९, या रस्त्यांच्या लगतचे मालमताधारकांनी वारंवार अडचणी आणल्याने ठेकेदार यांना कामाची गती राखता आलेली नाही त्यामुळे शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेतील संस्थान निधीतून प्रथम प्राधान्यगटीतील ०६ रस्ते विकसीत करणेकामीचे ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांना दिनांक ३० जुन, २०१४ अखेर अखेर व सदर प्रकल्पाचे सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांना दिनांक ३१ जुलै, २०१४ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, कार्यकारी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी याबाबत शिर्डी नगरपंचायत व संबंधीत अधिकारी यांचेबरोबर बैठक घेऊन रस्ता उपलब्ध करुन देणेची कार्यवाही करावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३१ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) सभोवतालच्या परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविकः** संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स्) इमारतीचे बाहेरील बाजूने डांबरी रस्ता करण्यात आलेला आहे. सदर रस्त्याचे बाजुने तसेच इमारतीचे भोवताली असलेल्या मोकळ्या जागेत डांबरीकरण केलले नसल्याने/ पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आलेले नसल्याने परिसर साफसफाई करणेस अडचण येते त्यामुळे परिसर अस्वच्छ राहतो. घुशी, सरपटणारे प्राणी इत्यादींचा काही वेळा त्रास होतो तसेच पावसाळ्याचे दिवसात चिखल होतो. त्यामुळे नेहमीच मुरुम टाकावा लागतो. तसेच खोल्यांमध्ये धुळही येते करीता सदरचा परिसर स्वच्छ राहून सुंदर दिसावा यासाठी सदरहू इमारतीचे बाजूने मोकळ्या असलेल्या भागात पेव्हिंग ब्लॉक बसवून घेता येतील.

**प्रस्तावः** सदरहू इमारतीचे बाजूने मोकळ्या असलेल्या भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी सन २०१३-१४ चे जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असून, त्यानुसार सदरहू ठिकाणी ३८२६३.०० चौ.फुट क्षेत्रावर सोलींग करून एम-२० ग्रेडचे ८० मि.मी. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक (लॅकर फिनिश) बसविणेकामी अंदाजे रुपये ४५,७९,०३५/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच परीसर स्वच्छ राहील.

**विभागाचा अभिप्रायः** इमारतीत धुळ येऊ नये, परिसरात चिखल होवू नये तसेच ड्रेनेज व इतर दुरुस्ती देखभालीची सोय विचारात घेता पेव्हिंग ब्लॉक बसविणे योग्य होईल असे मत आहे.

तरी याकामी येणारे रुपये ४५,७९,०३५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८१ सदरहू प्रस्ताव रद्द करणेत येऊन, नवीन प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२ साई आश्रम भक्तनिवास येथील परिसरात कर्मचाऱ्यांचे दुचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद :-

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना :-** साई आश्रम येथील संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचारी, आऊट सोर्सिंग कर्मचारी, सुरक्षा विभागाकडील कर्मचारी व इतर विभागाचे संस्थान कर्मचारी यांची दुचाकी वाहन पार्किंगव्यवस्था साई आश्रम भक्तनिवास येथील मुख्य प्रवेशद्वाराचे बाहेर करणेबाबत अधिक्षक, साई आश्रम यांनी दि.०४/०६/२०१३ रोजीचे पत्राव्दारे कळविले होते. परंतू त्यांनी प्रस्तावीत केलेल्या ठिकाणी मंजूर रेखांकनानुसार १२ मीटर सर्व्हीस रोड दर्शविणेत आलेला आहे. त्यामुळे सदरहू पार्किंग शेड त्याठिकाणी करणेऐवजी पर्यायी जागा म्हणून साई आश्रम येथील OAT चे पुर्वेस व STP चे दक्षिणेस असलेल्या

मोकळया जागेत दुचाकी पार्किंगची व्यवस्था करता येईल असे अधिक्षक साई आश्रम यांना इकडील दि.१८/०१/२०१४ चे पत्राद्वारे कळविले होते.

तद्नंतर मा.अधिक्षक, साई आश्रम भक्तनिवास, यांनी दि.१२/०३/२०१४ रोजीचे पत्राद्वारे, नियोजीत १२ मीटर सर्व्हिस रोडचे जागेत दुचाकी पार्किंग व्यवस्था करणेकामी मान्यता घेणेत आली आहे. तसेच दि.१७/०५/२०१४ रोजीचे पत्राद्वारे सदर ठिकाणी तातडीने कर्मचारी वाहन पार्किंग व्यवस्था करणेचे कळविले आहे.

**प्रस्ताव :-** याकामी इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी करण्यात आली आहे. सदर ठिकाणी ८१ मीटर लांबीचे, ५.५ मीटर रुंदीचे व २.५० मीटर सरासरी उंची असलेले शेड तयार केल्यास, या ठिकाणी एकूण १६० ते १८० इतक्या दुचाकींची पार्किंग व्यवस्था होईल. सदरहु शेडकरिता एम. एस. स्ट्रक्चरचे कॉलम तसेच छतास टेंसाईल फॅब्रीक शिट वापरता येईल. सदरचे शेड हे नंतर पाहीजे त्यावेळी स्थलांतरीत व आवश्यक त्याठिकाणी फिटींग करता येईल. यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | दुचाकी पार्किंग व्यवस्थेकरीता टेंसाईल फॅब्रीक शिट रुफींगमध्ये शेड तयार करणे. | ८१.००m x ५.५m. | ४४५.५० sqm | ५९००/- Per sqm | २६,२८,४५०/-. |
| | **एकूण रक्कम रूपये..** | | | | **२६,२८,४५०/-** |

साई आश्रम भक्तनिवास येथे दुचाकी पार्किंग शेड तयार करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.२६,२८,४५०/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर नियोजित शेड Design & Build तत्वावर निविदा मागवून करुन घेता येईल. सध्या सदरहु शेड साई आश्रम परिसराचे समोरील नगर-मनमाड रस्त्यालगतचे जागेत करता येईल, सदर जागा ही नियोजीत सर्व्हिस रोडखालील आहे. भविष्यात सर्व्हिस रोड कार्यान्वित होतेवेळी हे शेड खोलून दुस-या योग्य त्या ठिकाणी उभारता येईल.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी पी.आय.एल.नं.१८/२०११ मधिल सिव्हिल ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदरहू प्रकल्पाकरीता प्रथम मा.त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

तरी वरील विषयांकीत कामासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.२६,२८,४५०/- मात्रचे अपेक्षित खर्चास व सदर कामासाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे ई - निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३३ साईधर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टेनन्स/ स्वच्छता कामाबाबतचे (सन २०१४-१५) दि.१६.०७.२०१४ ते दि.१५.०७.२०१४ अखेरचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१८/०७/२०१३ पासुन साई धर्मशाळा हा विभाग सुरू झालेला असुन, त्यामध्ये एकुण ६ इमारती असुन त्यापैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलित कनिष्ठ महाविद्यालय यांना वापरा साठी देण्यात आली असून उर्वरीत पाच इमारतीमध्ये प्रत्येकी ३२ हॉल असे एकुण १६० हॉलमध्ये साईभक्त, पालखी, पदयात्रीतील सहभागी साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते.

मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेने व मा.कोर्टाचे मंजुरीने जा.क्र.एसएसएस/वशी-साई-धर्मशाळा/ १७९३/ २०१३, दि.१५/०७/२०१३ अन्वये मे.बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे यांना यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग इ. मेन्टेनन्स/स्वच्छता कामकाजाचा सन २०१३-१४ या सालासाठी दिंनाक १६/०७/२०१३ ते दिनांक १५/०७/२०१४ अखेर एक वर्ष कालावधीसाठी साई धर्मशाळा (साई आश्रम-२)साठी कार्यादेश देणेत आला. त्यास दि.१७/०९/२०१३ रोजीचे मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय क्र.६६६ अन्वये मान्यताही घेण्यात आलेली आहे. मे.बी.व्ही.जी.इं.लि.पुणे.यांची यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग इ. मेन्टेनन्स/स्वच्छता कामकाजाची मुदत दिनांक १५/०७/२०१४ रोजी संपुष्ठात येत आहे. पुढील वर्षाच्या उपरोक्त कामासाठी मे.बी.व्ही.जी.इं.लि.पुणे यांनी मुदत वाढ मिळणेबाबत पत्र पाठविलेले आहे. सदर पत्रात

हाऊसकिपींग सर्व्हिसेसचे चार्जेस महाराष्ट्र शासनाचे ०१/०६/२०१२ चे किमान वेतन दरानुसार कॅल्क्युलेट करण्यात आलेला आहे. त्यात १७.२० टक्के वाढ किमान वेतन दरामध्ये ग्राह्य धरण्यात

आलेली आहे. आता पुर्वीच्या दरामध्ये १५ टक्के वाढ करून पुढील मुदतवाढ देण्यात यावी. आम्ही अशी खात्री देतो की आम्ही काम चांगल्या प्रकारे करण्याचा प्रयत्न करू.

मे. बी.व्ही.जी. इं.लि.पुणे. यांना दिनांक १६/०७/२०१३ ते १५/०७/२०१४ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी साई धर्मशाळेकडे १६५ मनुष्यबळ संख्या व स्वच्छता कामी १०८ मशिनरी/ उपकरणाचे दरमहा भाडे, स्वच्छतेसाठी लागणारे केमीकल मटेरियल सर्व करासह दरमहा देय रक्कम रूपये २२,३२,५००/- चे दराने वर्षाची देय रक्कम रूपये २,६७,९०,०००/- नुसार आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार मे.बी.व्ही.जी. इं.लि.पुणे. यांनी १६/०७/२०१३ पासुन आजतागायत आऊट सोर्सिंगचे काम व्यवस्थीत रित्या करीत आहेत. त्यांचे बाबत साफसफाई कामी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. मे.बी.व्ही.जी.इं.लि.पुणे. यांनी मागणी केलेल्या १५ टक्के प्रमाणे म्हणजे २५,६७,३७५/- दरमहा नुसार एका वर्षासाठी रक्कम रुपये ३,०८,०८,५००/- ही रक्कम द्यावी लागणार आहे. तथापी त्यांना सदर बाबतीत मा.व्यवस्थापन समितीपुढे चर्चा करणेकामी बोलवता येईल व चर्चे अंती जो काही निर्णय होईल त्यानुसार कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी बी.व्ही.जी.इं.लि.पुणे यांचे पत्राचे मागणीनुसार त्यांना पुढील मुदतवाढ म्हणजे दि.१६/०७/२०१४ ते दि.१५/०७/२०१५ अखेर द्यावी किंवा कसे याबाबत आदेश होणेस विनंती. वा बी.व्ही.जी.इं.लि. पुणे यांना साई धर्मशाळा (साई आश्रम-२) विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टेनन्स/ स्वच्छता कामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेस बोलवावे किंवा कसे याबाबत आदेश होणेस विनंती.

तरी साई धर्मशाळा (साई आश्रम-२) विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टेनन्स/ स्वच्छता कामाबाबतचे दि.१६/०७/२०१४ ते १५/०७/२०१५ अखेरचे मुदतवाढी बाबतचा विषय व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ३,०८,०८,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सादर. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खर्चास मान्यता मिळाले नंतर खर्चाचे मान्यतेसाठी मा. कोर्टाची परवानगी घेण्यास विधी विभागामार्फत कार्यवाही होणेचे मान्यतेसाठी सादर.

**किंवा**

मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी म्हणजे सन २०१४-२०१५ या सालासाठी म्हणजे दिनांक १६/०७/२०१४ ते १५/०७/२०१५ अखेरचे कालावधीसाठी दैनिक वृत्तपत्रात साई आश्रम-२ (साई धर्मशाळा) मधील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेंटेनन्स/ स्वच्छताचे कामासाठी ई निवीदाबाबतचे प्रक्रीयेकामी तसेच संस्थानचे वेबसाईडवर प्रक्षेपण करणेकामीचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.**

**तसेच, नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत सध्या यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टेनन्स/ स्वच्छतेचे आऊट सोर्सिंग पध्दतीने काम करत असलेले मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांना प्रत्येक महिन्यास मुदतवाढ देणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३४ रुग्णवाहीका सेवा आकार दर वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णाकरीता डिस्चार्ज मिळालेनंतर घरी सोडविणे अथवा पुढील उपचाराकरीता मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद इत्यादी ठिकाणी दुसरे रुग्णालयात दाखल करणे कामी टाटा विंगर-०२, मारुती इको-०२, तवेरा-०१ कार्डीयाक रुग्णवाहीका-०१ तसेच शववाहीका-०१ अशी एकुण ०७ वाहने वापरात आहेत.

दि.२७/०२/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१६६ नुसार रुग्णवाहीका वाहनांचे वापराकरीता खालील प्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | वाहन प्रकार | इंधन | सेवाआकार दर |
|---|---|---|---|
| ०१ | विंगर / तवेरा / टाटा-४०७ | डिझेल | रु.५/- |
| ०२ | मारुती इको | पेट्रोल | रु.६/- |
| ०३ | कार्डीयाक | डिझेल | रु.७/- |

सेवाआकार दर निश्चित केलेनंतर इंधन दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे वाहनांचे वापरापोटी संस्थानला मिळणारी सेवाआकार रक्कम व इंधन खर्चाची रक्कम या मधील तफावत दिवसेंदिवस वाढत आहे.

दि.२७/०२/२०११ रोजी ठरविण्यात आलेल्या प्रति कि.मी. सेवाआकाराचे वेळी असलेला इंधन दर व सध्याचा इंधन दर व झालेली वाढ टक्केवारी यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.नं. | इंधन प्रकार | दर निश्चितीचे वेळचे इधन दर (प्रती लि.) | आज रोजीचा इंधन दर (प्रती लि.) | झालेली वाढ (टक्के) |
|---|---|---|---|---|
| ०१ | डिझेल | ४१.१२ | ६३.८६ | ५५.३० % |
| ०२ | पेट्रोल | ६१.०७ | ७८.२६ | २८.१४ % |

वरील प्रमाणे इंधन दरात वेळोवेळी झालेली वाढीचा विचारकरता रुग्णवाहीकेच्या सेवाआकार दरात खालील प्रमाणे वाढ करणे योग्य होईल, असे मत आहे.

०१) डिझेल रुग्णवाहीका वाहन प्रति कि.मी. रु. ७/- प्रमाणे.
०२) शववाहीका वाहन ए.सी. प्रति कि.मी. रु.८/- प्रमाणे
०३) पेट्रोल रुग्णवाहीका वाहन प्रति कि.मी. रु. ८/- प्रमाणे
०४) कार्डीयाक रुग्णवाहीका ए.सी. प्रति कि.मी. रु.१०/- प्रमाणे.

तरी उपरोक्त प्रमाणे इंधन दरात झालेली वाढ विचारात घेऊन रुग्णवाहीका वापराचे सेवाआकार दरात वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णांना सेवा पुरविणे हा संस्थानच्या कार्याचाच एक भाग आहे, त्यामुळे रुग्णवाहिका सेवा आकार दर वाढविणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५ साई मंदिर सुरक्षेकरिता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई मंदिर शिर्डीचे सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांना मंदिर व मंदिर परिसर, महाद्वार सुरक्षिततेकरीता प्रतिदिनी ३०६ सुरक्षा रक्षक आवश्यक आहे.सदर ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे झाल्यास त्याकामी किती खर्च येणार, किती रक्कम आगाऊ भरावी लागणार या विषयाची सविस्तर माहिती मिळणे बाबत जा नं.एसएसएस/वशी-संरक्षण/३६८/२०१४ दि.२१.०४.२०१४ रोजीचे पत्राद्वारे कळविण्यात आले होते

त्यानुसार महाराष्ट्र सुरक्षा महामंडळ यांनी जा.क्रं.मरामुस /७१५/२०१४ दि.१३.०५.२०१४ रोजीचे पत्र खालील मुद्दे नमुद केले आहे.

साई मंदिर,मंदिर परिसर आणि महाद्वार सुरक्षिततेकरीता प्रतिदिनी ३०६ सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असल्याबाबत कळविले आहे.त्याचप्रमाणे नमुद सुरक्षा रक्षक पुरविणे झाल्यास त्याकरीता किती खर्च येणार तसेच मरामुसमच्या पॉलिसीप्रमाणे किती रक्कम आगावु भरावी लागणार यासाठी साई मंदिर,मंदिर परिसर,महाद्वार आणि आजुबाजुच्या परिसराचा संयुक्त सुरक्ष आढावा करुन घेणे उचित राहिल त्याकरीता संयुक्त सुरक्षा आढावा फी भरुन आढावा करुन घेणे हे मरासुमच्या ॲक्ट कलम १५ (२)प्रमाणे अनिवार्य राहिल असे कळविले आहे.

**१)** तसेच सदर बाबत Financial Implication चा तक्ता तसेच संयुक्त सुरक्षा आढावा फी + रजिस्ट्राशन फी व इतर याबाबतची माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे.

**(A)**

| | |
|---|---|
| Registration fees | 5,000/- |
| Security Survey fees | 50,000/- |
| Total | 55,000/- |
| Add Service Tax @ 12.36 % | 6,798/- |
| Total | 61,798/- |

**(B)** Financial Proposal of MSF Manpower to be deployed at SHIRDI TRUST, SHIRDI

| Sr. no. | Name of Post | No of Personnel | Charges | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | Security Officer | 1 | 31,000 | 31,000.00 |
| 2 | Astt Security Officer | 1 | 25,000 | 25,000.00 |
| 3 | Security Supervisor | 8 | 24,000 | 1,92,000.00 |
| 4 | Armed Security Guard | 23 | 21,000 | 4,83,000.00 |
| 5 | Head Guard | 3 | 19,000 | 57,000.00 |
| 6 | Security Guard | 270 | 18,000 | 48,60,000.00 |
| | Total | 306 | | 56,48,000.00 |
| | Service Tax @ 12.36% | | | 6,98,092.80 |
| | Total With Service Tax | | | 63,46,093.00 |

**NOTE :-**

| | | |
|---|---|---|
| 1 | One Month Advance salary with Service Tax | 63,46,093.00 |
| 2 | Three Months Advance Payment As a security deposit without service Tax | 1,69,44,000.00 |
| | Total Receivable | 2,32,90,093.00 |

| | |
|---|---|
| Bank Name -- AXIS BANK | ACCOUNT No- 913010010006131 |
| Branch CUFFE PARADE | IFS Code - UTIB0000447 |
| | MICR Code - 400211039 |

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांनी मंदिर व मंदिर परिसरात सिक्युरिटी ऑफिसर, असिस्टंट सुपरवायझर, सिक्युरिटी सुपरवायझर, आर्म सिक्युरिटी गार्ड, हेड गार्ड, सिक्युरिटी गार्ड असे एकुण ३०६ सुरक्षा कर्मचारी पुरविणेझाल्यास त्याकामी येणारा खर्च व इतर माहिती नमुद केलेली आहे.

त्याअनुषंगाने श्री साईमंदिर व मंदिर परिसरात महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

**१)** सर्वप्रथम महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत साई मंदिर, मंदिर परिसर, महाद्वार आणि आजुबाजुच्या परिसराचा संयुक्त सुरक्षाआढावा करुन घेण्यासाठी तसे पत्र त्यांना द्यावे लागणार आहे तसेच संयुक्त सुरक्षा आढावा फी भरुन आढावा करुन घेणे हे मरासुमच्या ॲक्ट कलम १५ (२)प्रमाणे अनिवार्य असल्यामुळे त्यासाठी ५०००/- Registration fees + ५०,००० /- Security Survey fees त्यावर १२.३६ % Service Tax अशी एकत्रित रक्कम रुपये ६१,७९८/- रुपये मात्र फी भरावी लागणार आहे. त्यासाठी म.रा.सुरक्षा महामंडळ यांनी AXIS BANK ACCOUNT No-913010010006131 दिलेला आहे.

**२)** तसेच एक महिणा ॲडव्हान्स पगार सर्व्हीस टॅक्ससह रक्कम रुपये- ६३,४६,०९३/- मात्र (अक्षरी रुपये त्रेसष्ठहजार शेहचाळीस हजार त्र्यानौ मात्र) पत्रात नमुद केलेला आहे.तसेच तिन महिण्याचा ॲडव्हान्स पगार सिक्युरिटी डिपॉझिट सर्व्हीस टॅक्ससह रक्कम रुपये १,६९,४४,०००/-(अक्षरी रुपये एक कोटी एकोणसत्तर हजार चौरेचाळीस हजार मात्र) अशी एकत्रित रक्कम रुपये २,३२,९०,०९३/- (अक्षरी रुपये दोन कोटी बत्तीस लाख नव्वद हजार त्र्यानौ रुपये मात्र) भरावी लागणार असले बाबत नमुद केलेली आहे.

तरी श्री साई मंदिर, मंदिर परिसर येथे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे तक्ता ब मध्ये नमुद केले प्रमाणे एकुण ३०६ सुरक्षा रक्षक, अधिकारी नियुक्त करणेकामी उपरोक्त १ व ०२ प्रमाणे खर्च येणार आहे त्यामुळे नमुद केलेल्या ०१ व ०२ मुद्दयावर निर्णय होणेसाठी मान्यता असावी.

**निर्णय क्र.४८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव जास्त खर्चाचा असल्यामुळे स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६ वॉकीटॉकी सिस्टीम अपग्रेड करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानकडे जुनी वॉकी-टॉकी सिस्टीम असुन त्यात साधारणतः ३० वॉकी-टॉकी सध्या वापरात आहे. तसेच मंदिर सुरक्षा विकसीत करणेकामी व्हेन्टेज कंपनीमार्फत २५ वॉकी-टॉकी घेण्यात आलेल्या होत्या. परंतु असे निदर्शनास आले आहे की, वाढणारा वर्कलोड व नादुरुस्त झालेले संच लक्षात घेता संपुर्ण वॉकी-टॉकी सिस्टीम अपग्रेड करणे आवश्यक आहे.

त्याअनुशंगाने श्री ढगे, कंन्सलटंट यांचा अभिप्राय घेतला असता, श्री ढगे यांनी त्याचे जागी नविन अद्यावत स्वरुपाची Tetra system recommended केलेली आहे. यामुळे जुनी सिस्टीम बायबॅक करुन नविन सिस्टीम घेण्यात यावी असे नम्र मत आहे. Tetra systm model No. STP-8000/8100 (including base station) हे कंन्सलटंटद्वारा उपयुक्त असल्याचे सांगितले आहे. त्यास अनुसरुन ६० नग वॉकी-टॉकी खरेदीकामी अंदाजे रु.५५ लाख + Tax मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे जुनी सिस्टीम बायबॅक करुन नविन Tetra systm खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५५ लाख + Tax मात्रचे खर्चाचे मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे सध्या किती वॉकीटॉकी आहेत, त्या किती अंतरावर व कोठे, कशाप्रकारे तसेच किती सुरक्षा रक्षक वापर करतात याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल)

---

**विषय नं.३७ द्वारावती भक्तनिवासकरीता सीसीटीव्ही सिक्युरिटी सिस्टीम बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** सद्यस्थितीत मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. सदर यंत्रणेत कॅमेरे, फेस रेकोगनेशन सॉप्टवेअर, बॅगेजेस स्कॅनर इ. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन द्वारावती भक्तनिवासस्थान इमारतीत व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याअनुशंगाने श्री अशोक ढगे, कन्सलटंट यांचे समवेत प्राथमिक सर्वेक्षणही करण्यात आलेले आहे.

यासाठी साधारणत: १६० कॅमेरे बसविण्याचे नियोजन आहे. सदर द्वारावती भक्तनिवासस्थान सिक्युरीटी सिस्टीमकरीता अंदाजे ४.५ कोटी + Tax इतका खर्च अपेक्षित आहे. शिवाय बांधकाम विभागामार्फत NOC Room, UPS Room, Server Room यांचेमार्फत तयार करुन घेता येईल, तसेच सदरचे ठिकाणी विद्युत विभागामार्फत वातानुकूलित यंत्रणा बसविता येईल.

तरी द्वारावती भक्तनिवासस्थानकरीता सीसीटीव्ही सिक्युरीटी सिस्टीम बसविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ४.५ कोटी + Tax मात्र खर्चाचे मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने बसविणेत आलेली सीसीटीव्ही यंत्रणा कशाप्रकारे ऑपरेट करत आहात, याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करणेत यावा. तसेच ज्या-ज्या ठिकाणी नवीन सीसीटीव्ही यंत्रणा बसवावयाची आहे, त्याची विस्तृत माहिती तयार करणेत येऊन, प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल)

---

**विषय नं.३८ साईआश्रम भक्तनिवासकरीता सीसीटीव्ही सिक्युरिटी सिस्टीम बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** सद्यस्थितीत मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. सदर यंत्रणेत कॅमेरे कार्यान्वित करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन साईआश्रम-१ भक्तनिवासस्थान इमारतीत व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याअनुशंगाने श्री अशोक ढगे, कन्सलटंट यांचे समवेत प्राथमिक सर्वेक्षणही करण्यात आलेले आहे.

यासाठी साधारणत: २५० कॅमेरे बसविण्याचे नियोजन आहे. सदर साईआश्रम-१ भक्तनिवासस्थान इमारतीतील सिक्युरीटी सिस्टीमकरीता अंदाजे ७.५ कोटी + Tax इतका खर्च अपेक्षित आहे. शिवाय बांधकाम विभागामार्फत NOC Room, UPS Room, Server Room यांचेमार्फत तयार करुन घेता येईल, तसेच सदरचे ठिकाणी विद्युत विभागामार्फत वातानुकूलित यंत्रणा बसविता येईल.

तरी साईआश्रम-१ भक्तनिवासस्थानकरीता सीसीटीव्ही सिक्युरीटी सिस्टीम बसविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७.५ कोटी + Tax मात्र खर्चाचे मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४८८ उपरोक्त प्रस्तावाबाबत उपरोक्त विषय नं.३६ मधील निर्णय क्र.४८७ प्रमाणे चर्चा झालेली आहे.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल)

---

**विषय नं.३९ श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांचे संस्थान सेवेत पुर्ववत कामावर घेणे संदर्भातील विनंती अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा, हे दि.१४-०६-१९८९ पासून संस्थान सेवेत कार्यरत होते. श्री.उपासनी हे दि.१३-११-२००७ रोजी सकाळी ७.३० वाजेपासून कॅश काउंटींग हॉल येथे कॅश काउंटींगसाठी हजर होते. सदर दिवशी सकाळी ८.४५ वाजेच्या दरम्यान श्री.उपासनी हे बाथरूमचे कारणांसाठी कॅश काउंटींग हॉल मधून बाहेर जात असतांना तेथील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांची तपासणी केली. त्यावेळी श्री.उपासनी यांचे रूमालातुन प्रथम एक हजारची एक नोट व रूमाल झटकल्यानंतर एक हजार रूपयाच्या १९ नोटा खाली पडल्या. सदर रूपये एक हजारच्या २० नोटांचा रितसर पंचनामा करून, शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे श्री.उपासनी यांचे विरूध्द तक्रार दाखल करणेत आली होती. सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.उपासनी यांना दि.१३-११-२००७ रोजीचे आदेशान्वये खातेचौकशीकामी सेवा निलंबीत करण्यात येऊन, त्यांना जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३४२१/२००७ दि.२०-१२-२००७ अन्वये आरोपपत्र देण्यात आले होते. सदर आरोप पत्राची खातेनिहाय चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय. काळवाघे, चौकशी अधिकारी यांनी पुर्ण करुन, त्यांचा दि.११-०५-२००९ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला होता. त्यात श्री.उपासनी यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोप पत्रातील आरोप खाते चौकशीत सिध्द झाले असून, श्री.उपासनी हे दोषी आहेत असा चौकशी अधिकारी यांनी निष्कर्ष काढला होता. म्हणून सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०५-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्र.४६५नुसार श्री.उपासनी यांना जा.नं. एसएसएस/ वशी-

७ए/ १६१६/२००९ दि.१८/०५/२००९ अन्वये संस्थान सेवेतून बडतर्फ (Dismiss) का करण्यात येऊ नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस बजावण्यात आली होती.

उपरोक्त सेकंड शोकॉज नोटिसी संदर्भात श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार (यु.एल.पी)क्र.३०/२००९ ही कोर्ट केस दाखल केली आहे. मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी निशाणी-२ मनाई हुकूमाचे अर्जावर सुनावणी घेवून, उभयपक्षाचे म्हणने विचारात घेऊन, दि.३०-१२-२००९ रोजी आदेश देवून श्री.उपासनी यांचा मनाई हुकूमाचा अर्ज डिसमिस करून निकाली काढला आहे. त्यानंतर श्री.उपासनी यांना जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ ४६२८/ २००९ दि.३१-१२-२००९ रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतून दि.०१-०१-२०१० पासून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे.

मा.दुसरे कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मध्ये विभागीय चौकशी निष्कर्षा संदर्भात दि.१२-०४-२०१२ रोजी प्राथमिक मुद्दयावर आदेश देवून, "तक्रारदार श्री.उपासनी यांचेसंदर्भात केलेली खाते चौकशी कायदेशीर, योग्य व नैसर्गिक न्यायतत्वानुसार झाल्याचे जाहीर केले आहे." मा.कामगार न्यायालयाने तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मधील खाते चौकशी संदर्भातील प्राथमिक मुद्दयावर दि.१२-०४-२०१२ रोजी दिलेला आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द व्हावा तसेच तक्रारदारा बाबतची चौकशी बेकायदेशीर, अयोग्य, नैसर्गिक न्यायाविरूध्द असल्याचे जाहीर करून मिळावे. या मागणीसाठी श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे दि.३०-०४-२०१२ रोजी रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.----- चा अर्ज दाखल केला होता. तथापि, सदरचा रिव्हीजन अर्ज मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.३०-०४-२०१२ रोजी मेंन्टेनेबल नसल्यामुळे तो रजिस्टर्ड करून घेतला नाही. म्हणून श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रंमाक ४६९३/२०१२ ही कोर्ट केस दि.०९-०५-२०१४ रोजी दाखल केली आहे.

त्याचप्रमाणे श्री.उपासनी यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मध्ये मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे दि.२६-०४-२०१२ रोजीचा निशाणी क्र.यु-३६ चा अर्ज दाखल केला होता. सदरचा दुरूस्ती अर्ज मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०७-०६-२०१२ रोजी आदेश देवून, रद्द करून निकाली काढला आहे. सदर आदेशा संदर्भात श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.५८/२०१२ दाखल केले होते त्यावर मा.औद्योगीक न्यायालय,अहमदनगर यांनी दि.११-०७-२०१२ रोजी आदेश देवून रिव्हीजन ॲप्लिकेशन डिसमीस केलेले आहे.त्या संदर्भात श्री.उपासनी यांनी संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रंमाक ६५९१/२०१२ ही कोर्ट केस दाखल केली आहे.

अशाप्रकारे श्री.उपासनी यांनी संस्थान विरूध्द दाखल केलेली तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९, रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.११७/२०१२,रिट पीटीशन क्रं.६५९१/२०१२ हया तीन कोर्ट केसेस अनुक्रमे मा.कामगार न्यायालय, अहमदनगर, मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे.

यापुर्वी दि.२४-०९-२०११ रोजी श्री.उपासनी यांना पुर्ववत कामावर घेणेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये विषय नं.५८ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. "त्यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी कॅश काऊंटीगमधील पैसे चोरुन अर्थिक गैरव्यवहार केला असल्याने त्यांचे बडतर्फीबाबत फेरविचार करणेत येऊ नये. तसेच श्री.उपासनी यांचेबाबतचा प्रस्ताव ०२ वेळा मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवणेत आलेला असून समितीने तो अमान्य केलेला असल्यामुळे श्री.उपासनी यांचेबाबत कोणीही शिफारस केली तरी पुन्हा फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात येऊ नये, असे ठरले."असा निर्णय, निर्णय क्रं.७३१ अन्वये पारित झालेला आहे.

आता श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी "कामावर पुर्ववत हजर करुन घेवून जिवन वाचविणेबाबत दि.१९-०४-२०१४ रोजीचा दया अर्ज सादर केला आहे.त्यात त्यांनी,"मला मागील देय असलेले बॅक वेजेस मिळाले नाही तरी चालेल पण माझी नेमणूक वरिष्ठ लिपीक या पदावर असल्यामुळे त्याच पदावर करण्यात यावी. नेमणूक दिल्यास मी संस्थान विरुध्द दाखल केलेल्या कोर्ट केसेस त्वरीत मागे घेईल."असे म्हटलेले आहे.श्री.उपासनी यांचे विनंती अर्जाबाबत श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी दि.२१-०४-२०१४ रोजीचे शिफारस पत्र दिलेले असून त्यात त्यांनी, "श्री.उपासनी हयांनी विनंती अर्जात मागणी केली आहे की, त्यांना संस्थानने मागील देय असलेले वेतन (बॅक वेजेस) दिले नाही तरी चालेल तथापी त्यांना पुन्हा वरिष्ठ लिपीक पदावर हजर करुन घेऊन वेतनश्रेणी देऊन काम करण्याचा आदेश दिल्यास ते न्यायालयीन केसेस त्वरीत मागे घेण्यास तयार आहे.संस्थानचे विरोधात कोणतीही न्यायालयीन कारवाई करावयाची नाही. असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना नोकरीशिवाय दुसरे

कोणतेही उदर निर्वाहाचे साधन नाही आणि त्यांचेवर अवलंबून असलेली त्यांची पत्नी,शिक्षण घेणारी २ मुले तसेच सतत आजारी असणारे वडील यांची औषधपाण्याची जबाबदारी त्यांचेवरच आहे.

तरी एक खास बाब म्हणून मानवतेचा दृष्टीकोन ठेवून श्री.मोहन उपासनी यांचेबाबत विचार करण्यात येऊन त्यांची संस्थानमधील सन १९८९ ते २००७ पर्यंतची प्रामाणिक व निश्कलंक सेवा विचारात घेता संस्थान कर्मचारी युनियन अध्यक्ष या नात्याने मी पुन्हा आपणांस विनंती करतो की,श्री.मोहन उपासनी यांना वरिष्ठ लिपीक म्हणून नव्याने नेमणूक देऊन कामावर हजर करुन घेण्यात येऊन त्यांच्या मुलाबाळांचे भविष्य तसेच आजारी वडील यांचे औषधोपचाराकरीता एक संधी देण्यात यावी अशी विनंती." असे म्हटलेले आहे.

तथापी, मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री.राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर कोर्ट केस पी.आय.एल.नं.१८/२०११ मधील सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२०५६/२०१२,संदर्भात मा.उच्च न्यायालयाने अ.नं.६) "We direct that,without prior permission of this Court, the Commitee (d) shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies."असा श्री साईबाबा संस्थानला दि.१६-१०-२०१२ रोजी आदेश दिलेला आहे.

सबब, श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांचे कामावर पुर्ववत हजर करुन घेवून जीवन वाचविणेबाबत दि.१९-०४-२०१४ रोजीचे अर्ज व श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे दि.२१-०४-२०१४ रोजीचे पत्राबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करुन श्री.उपासनी यांचे बडतर्फीबाबत फेर विचार होऊन,त्यांना संबंधीत न्यायालयातून संस्थान विरुध्द न्यायप्रविष्ठ असलेल्या कोर्ट केसेस काढुन घेणेचे अटीवर पुन्हा वरिष्ठ लिपीक या पदावर फ्रेश नेमणूक देऊन, संस्थान सेवेत पुन्हा रुजू करुन घ्यावयाचे किंवा कसे ? याबाबत निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांना पुर्ववत कामावर घेण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला. तसेच अशाप्रकारे पूर्वी अमान्य झालेले व सदर प्रस्ताव यापुढे सभेसमोर सादर करणेत येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.४० श्री क्षेत्र दत्तमंदिर संस्थान मलकापूर, ता.कळंब, जिल्हा- उस्मानाबाद यांना लोक उपयोगी विकास कामांना निधी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** ह.भ.प.एकनाथ महाराज लोमटे, श्री क्षेत्र दत्तमंदिर संस्थान, मलकापुर, ता.कळंब, जिल्हा- उस्मानाबाद यांनी दि.३०.०४.२०१४ रोजी संस्थानला दिलेल्या पत्रात खालीलप्रमाणे कळविले आहे.

श्री क्षेत्र दत्तमंदिर संस्थान, मलकापुर, येथे भारत देशातुन मोठयाप्रमाणावर भाविक दर्शनासाठी येत असतात. सदरचे देवस्थान शासन मान्य क वर्ग पर्यटन स्थळ आहे. अल्पशा निधीमुळे शासन स्तरावरुन विकास कामे पुर्ण होतांना दिसुन येत नाही. त्यामुळे अडचणींना भाविकांना तोंड द्यावे लागते म्हणुन भाविकांकरीता खालील सोई उपलब्ध व्हाव्यात, अशी विनंती केली आहे.

| | |
|---|---|
| १) भक्त निवास | - ०३ कोटी रुपये |
| २) महाप्रसादालय | - ०१ कोट रुपये |
| ३) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | - ५० लाख रुपये |
| ४) संरक्षण भिंत | - ५० लाख रुपये |
| ५) परिसर सुशोभिकरण करणे | - ५० लाख रुपये |
| ६) अंतर्गत रस्ते तयार करणे | - ५० लाख रुपये |
| ७) सुलभ शौचालय व स्नानगृह | - ३० लाख रुपये |
| ८) विद्युतीकरण | - २५ लाख रुपये |
| ९) लोखंडी उड्डान पुल तयार करणे | - २० लाख रुपये |

एकूण खर्च रु.-०६ कोटी ७५ लाख रुपये

अधिनियमातील तरतुद-

श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चा कलम २१ (२) मध्ये नोंदणीकृत सार्वजनिक संस्थांना मा.छाननी समितीचे शिफारसीनुसार व राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे.

**विभागाचा अभिप्रायः- अ)** मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी PIL No.१८/२०११, date १३ March २०१२ Sr.No.१८ मध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. The existing Committee and the Committee constituted by this Court is directed not to take any major financial decision in respect of management of the affairs of the Sansthan without intimating this Court.

**ब)** CIVIL APPLICATION NO. 12056/2012 IN PIL NO.18/2011,date 16 Oct.2012 Sr.No. 6

(C) Shall not take any major financial decision of whatsoever nature.

**क)** नोंदणीकृत संस्थांना अनुदान देण्यासाठी छाननी समितीची शिफारस आवश्यक असते. परंतु मागिल छाननी समितीची मुदत संपलेली आहे व सध्या शासनाने नविन छाननी समितीची स्थापना केलेली नाही.

**ड)** दररोज वेगवेगळया कारणासाठी आर्थिक अनुदान मागणीकरीता अनेक अर्ज येत असतात, त्यापैकी एका अर्जाचा विचार करणे योग्य होणार नाही.

तरी उपरोक्त अ, ब, क, ड या बाबींचा विचार करता अर्जदाराच्या मागणीचा विचार करता येणार नाही, असे मत आहे.

प्रस्ताव निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.४९० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३)

---

**विषय नं.४१ आयटी मॅनेजर पदनाम व वेतनश्रेणी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री.किशोर साहेबराव गवळी, ज्यु.ईडीपी मॅनेजर (प्र.माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख) यांनी दि.१४/०४/२०१४ रोजीचे अर्जात प्रामुख्याने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था संचलित, श्री साईबाबा हॉस्पिटल विभागाकडे दि.०६/१२/२००६ पासून ज्यु.ईडीपी मॅनेजर या पदावर रुजू झालेलो आहे. संगणक क्षेत्रात काळानुसार होणारे बदल व संस्थानची गरज लक्षात घेता वेळोवेळी नेमुन दिलेली कामे मी वरिष्ठांच्या आदेशानुसार पुर्ण केलेली आहे. माझे शिक्षण B.E. (Electronics Engg.), AMIE, MCP, ITIL पर्यंत पूर्ण झालेले आहे.

सन २००६ पासून संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलचे ईडीपी विभागाकडील ईडीपी मॅनेजर, सिस्टिम ॲडमिनिस्ट्रेटर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, सीसीटीव्ही संबंधातील सर्व कामे व्यवस्थितरित्या व विनातक्रार पुर्ण केलेली आहे. आय.टी. मॅनेजर हे पदनाम व वेतनश्रेणी मिळणेबाबत मी यापुर्वी विनंती अर्ज केलेले आहेत. सध्या सदरचे पद रिक्त आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मी दि.२८/०१/२०१४ पासून माहिती तंत्रज्ञान विभागाकडे प्र.माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख म्हणून कार्यभार पाहत आहे. कार्यभार स्विकारल्यानंतर प्रलंबित सर्व प्रकारची कामे सध्यस्थितीत अंतिम टप्प्यात आहेत.

तसेच आय.टी.विभागाची कामे अतिशय जलद गतीने होत असल्याचे तसेच विभागाचे कामकाजाचे नियोजन व व्यवस्थापन हे अतिशय चांगले केलेले असुन सदर विभागास आपली विभागप्रमुख म्हणून यापुर्वीच नियुक्ती होणे अपेक्षित होते व यापुढेही आपणच विभागप्रमुख म्हणुन कामे पहावीत अशी शिफारस आय.टी.कमिटीचे अध्यक्ष, श्री.के.व्ही.रमणी साहेब यांनी ई-मेलद्वारे केली आहे. तरी कृपया माझ्या शैक्षणिक पात्रतेचा, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कामाचा व अनुभवाचा सकारात्मक विचार करुन मला आय.टी.मॅनेजर हे पदनाम व त्याची मंजुर वेतनश्रेणी मिळणेस विनंती केलेली आहे.

**ब)** श्री.राहुल वामन गलांडे, प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर (प्र.सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल प्रमुख) यांनी दि.१७/०४/२०१४ रोजीचे अर्जात प्रामुख्याने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

मी दि.२७/१२/२००१ पासून संस्थान सेवेत रुजू झालो आहे. त्यावेळी मला आयटी क्षेत्रातील ज्ञान व आवड असल्याने, माझी नेमणुक तत्कालीन अध्यक्ष साहेब यांनी आयटी सुपरवायझर या पदावर केली होती. मी Dip. In Electronics & Telecommunication, B.E.Electronics, Brain bench Certified, Microsoft Certified Professional, Oracle Certification etc. शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली आहे. संस्थानमध्ये काम करण्याचा गाढा अनुभव माझ्याकडे आहे.

अद्यापपावेतो संस्थानचे हितावह व साईभक्तांचे सुख व सोयीचे दृष्टीने वेबसाईटचे नुतनीकरण, लाईव्ह दर्शन, ऑनलाईन देणगी, ई टेंम्पल, हॉस्पीटल नेटवर्क, टेलीफोन यंत्रणा इत्यादी प्रकल्प राबविलेली आहेत. तसेच भविष्यात साईटेक नंतर किंवा साईटेक बरोबरच मोबाईल कॉमर्स-मोबाईलवरुन साईभक्तांना विविध सेवा सुरु करणे, ई-लोकशाहीसाठी साईभक्तांच्या तक्रार निवारण सुरु करणे, Led स्क्रीनवर भक्तांच्या मार्गदर्शनपर सुविधा सुरू करणे, Ipad Devices वर लाईव्ह दर्शन सुरू करणे, विविध माहिती केंद्रावर साईबाबांची Live आरती सुरू करणे इत्यादी.

तरी मला माझ्या शैक्षणिक अर्हता व असणारा कामाचा अनुभव याचा विचार करुन आयटी मॅनेजर या पदावर काम करण्याची पुनश्च संधी द्यावी अथवा माझे म्हणणे सादर करण्यास अनुमती असावी, ही विनंती.

**क)** मंजुर आकृतीबंधानुसार आयटी विभागाचे आस्थापनेवर खालीलप्रमाणे पदे मंजुर आहेत.

| Designation<br>पदनाम | Pay Scale<br>वेतनश्रेणी | Vacant Post<br>रिक्त पदसंख्या | Qualification<br>पात्रता |
|---|---|---|---|
| I.T.Manager | Pay Band 15600-39100 Grade Pay 5400 | 1 | By Nomination / By Promotion :-<br>1) B.E. Computer/ Electronics/ IT;<br>2) Microsoft certified professional (MCP);<br>3) Experience of minimum 5 years in Sansthan. |

(०१) यापुर्वी शासनाकडून सेवानियमांस मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून आकृतीबंधानुसार स्थायी मंजुर विविध रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबतचा विषय तत्कालीन मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता, त्यावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

"शासनाकडून सेवाप्रवेश नियमास मिळणाऱ्या मान्यतेच्या आधीन राहून मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार विविध हुद्देवरील रिक्तपदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. विविध रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना, पदोन्नती द्यावयाचे पद व त्या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेला संवर्ग, पदोन्नती पदाची शैक्षणिक पात्रता, पदोन्नती द्यावयाच्या कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल व पदोन्नतीच्या पदावर काम करण्याची त्यांची कुवत इत्यादी बाबी विचारात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून देशविदेशातून साईभक्त शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येतात. शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना दैनंदिन आवश्यक त्या सर्व पायाभूत सेवा सुविधा योग्य पध्दतीने देणे हा संस्थान प्रशासनाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने सध्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थानमध्ये जागतीक दर्जाचा आय.टी.प्रोजेक्ट राबविण्यात येत असून, संस्थानचे सर्व विभागांचे संगणीकरण करण्यात येत आहे या आधीची टाईपरायटरची जागा आता संगणकाने घेतली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले असून प्राप्त परिस्थितीत ही काळाची गरज आहे. त्यामुळे पदोन्नती द्यावयाचे पदावर, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधित पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी प्रात्यक्षिक संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेण्यात यावी व परिक्षामध्ये मिळणाऱ्या गुणानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन पदोन्नती देण्यात यावी. या परिक्षेत पदोन्नतीस अपात्र ठरणाऱ्या अथवा गुणवत्ता प्राप्त न होणाऱ्या कर्मचाऱ्यांना संधी देण्याचे दृष्टीने त्यांना सहा महिन्याची मुदत देऊन त्यांची पुन्हा समिती समोर फेर परिक्षा घेण्यात यावी."

या निर्णयानुसार लिपीक-टंकलेखक, दूरध्वनी चालक, कुपन विक्रेता, वायरमन, वेल्डर व इतर तांत्रिक पदावर वर्ग-०४ मधून १०० गुणांची लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेऊन उत्तीर्ण कर्मचाऱ्यांना गुणानुक्रमांकानुसार रिक्त पदांवर पदस्थापना देण्यात आलेल्या आहेत.

(०२) संस्थानमधील विविध तांत्रिक/अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीने I.T.Manager या पदाचे प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता पुर्वीप्रमाणेच ठेऊन सदरचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता दिलेली आहे. त्यात I.T.Manager या पदाचाही अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४१८३/२०१४ दि.१९/०५/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरचा प्रस्ताव विधी अधिकारी यांचेकडे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी पाठविण्यात आलेला असून संस्थान वकिलामार्फत कार्यवाही सुरू आहे.

(०३) श्री.किशोर गवळी यांनी B.E.(Electronics Engg.), AMIE, MCP. ITIL शैक्षणिक पात्रता धारण केलेली आहे. श्री.गवळी हे संस्थानमध्ये दि.०६/१२/२००६ पासून ज्यु.ईडीपी, श्री साईबाबा हॉस्पिटल या पदावर कार्यरत आहेत. त्यांचेकडे जा.नं.एसएसएस/वशी-०१/३५५९/२०१४ दि.२७/०१/२०१४ रोजीचे आदेशान्वये प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख म्हणून पदभार सोपविलेला आहे. मंजुर आकृतीबंधानुसार आय.टी.मॅनेजर पदासाठी प्रस्तावीत केलेली शैक्षणिक पात्रता श्री.किशोर गवळी यांनी देखील धारण केलेली आहे. सध्या श्री.गवळी यांना वेतनबँड ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४२०० अदा करण्यात येत आहे.

(०४) तसेच श्री.गलांडे यांनी D.E.C., B.E.(Electronics), M.C.P.Brain Banch Certified शैक्षणिक पात्रता धारण केलेली आहे. मंजुर आकृतीबंधानुसार आय.टी.मॅनेजर पदासाठी

प्रस्तावीत केलेली शैक्षणिक पात्रता श्री.गलांडे यांनी धारण केलेली आहे. मा.व्यवस्थापन समिती दि.८-९/१२/२००१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८८ अनुसरून जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४२२८/२००१ दि.२७/१२/२००१ चे आदेशान्वये श्री.राहुल गलांडे यांची अनुकंपा तत्वावर प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. श्री.गलांडे यांना वेतनबँड ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४३०० वेतन अदा करण्यात येत असून ते प्र.विभाग प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल म्हणून काम पाहत आहेत.

**ड) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता खालील बाबीं विचारात घ्याव्या लागतील.**

**ड-०१)** श्रींच्या दर्शनासाठी जगभरातून लाखोंच्या संख्येत साईभक्त शिर्डीत येत असतात. त्यांना दर्शन, निवासव्यवस्था, प्रसादभोजन, सुरक्षा इत्यादी सेवा-सुविधा पुरविण्याचे काम संस्थान प्रशासनाकडून केले जाते. त्याकामी शासनाने एकूण ३४ विविध विभागांचे आकृतीबंधास दि.०७/०८/२००९ रोजी मान्यता दिलेली आहे. भक्तांच्या संख्येत होणारी वाढ तसेच त्याअनुषंगाने आवश्यक सेवा-सुविधा पुरविणेकामी लागणारा उच्च प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग इत्यादी बाबी विचारात घेता तत्कालिन मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री.किशोर गवळी व श्री. राहुल गलांडे यांचेसह प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रित तज्ञांसमोर लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा तसेच मुलाखत घेऊन पात्र कर्मचाऱ्याला I.T.Manager या पदावर पदोन्नती देता येईल, असे मत आहे.

**ड-०२)** मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.७५ नुसार मंजुर आकृतीबंधात नव्याने निर्माण केलेली तांत्रिक पदे सरळसेवेने भरणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेनंतर विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन, पात्र उमेदवारांच्या तज्ञांसमोर लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेऊन गुणानुक्रमांकानुसार I.T.Manager या पदावर योग्य उमेदवाराची नेमणूक करता येईल.

**ड-०३)** तसेच I.T. Manager या पदावर पदोन्नती द्यावयाची झाल्यास श्री.राहुल वामन गलांडे, प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी. सुपरवायझर हे दि.२७/१२/२००१ पासून संस्थान सेवेत आहेत. तसेच श्री.किशोर गवळी, ज्यु.ईडीपी मॅनेजर हे दि.०६/१२/२००६ पासून संस्थान सेवेत काम करत आहेत. सदरचे दोन्ही उमेदवारांची शैक्षणिक पात्रता B.E. (Electronics) अशी आहे. सदरचे दोन्ही कर्मचाऱ्यांनी आय.टी.मॅनेजर या पदासाठी प्रस्तावीत केलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेली आहे. तसेच सदर पदावर पदोन्नती मिळणेकामी उपरोक्त संदर्भ क्र.०१ व ०२ अन्वये दोन्ही कर्मचाऱ्यांनी मागणी केलेली आहे. त्यामुळे आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती द्यावयाची झाल्यास सेवाज्येष्ठतेनुसार श्री.राहुल वामन गलांडे यांचा विचार करावा लागेल. तथापि, आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती द्यावयाची झाल्यास शैक्षणिक पात्रता व काम करण्याची कार्यक्षमता तसेच आय.टी.कमीटीचे अध्यक्ष, श्री.के.व्ही.रमणी सो. व तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडु यांचे अभिप्राय विचारात घेता श्री.किशोर गवळी यांचा विचार प्राधान्याने करावा लागेल, असे मत आहे.

उपरोक्त प्रस्तावीत "**ड-०१, ०२ व ०३**" मध्ये नमुद केलेल्या बाबींचा विचार करता I.T.Manager या पदासाठी प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या कर्मचाऱ्यांची विभागीय परिक्षा घेऊन कार्यवाही करावयाची **किंवा** दि.०८/०१/२०१४ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिलेनंतर सरळसेवेने नेमणूक करावयाची **अथवा** सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता, लगतचे पाच वर्षाचे गोपनीय अहवाल तसेच सदर पदावर काम करण्याची कार्यक्षमता विचारात घेऊन पात्र उमेदवाराची आय.टी.मॅनेजर या पदावर थेट पदोन्नती देणेत यावी किंवा कसे याबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम व नियमांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील तरतुदीस अनुसरून नियम, विनियमाचे मसुदे मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे यापुर्वी सादर करण्यात आलेले आहेत.

त्यास अनुसरून शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००८/१७७/(८१)/का.सोळा मंत्रालय, मुंबई-३२ दि.०३/१२/२००८ व निर्णय क्रमांक-सासंवि-२००८/१७७/(८१)/ का.सोळा मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४/०२/२०११ अन्वये मा.सह सचिव, कार्यासन सोळा, विधी व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दि.२८/०२/२०११, ०१/०३/२०११, १२-१३/ ०५/२०११, १८/०५/२०११, ७-८/०७/२०११ आणि ६-७/०१/२०१२ रोजी शासन स्तरावर बैठका घेण्यात येऊन

विनियम, सर्व्हिस रेग्युलेशन तसेच सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करण्यात आलेले असून अंतिम मान्यता मिळणेची बाब शासन स्तरावर प्रलंबीत होती.

आता, शासन क्रमांकः सासंवि-२०१२/प्र.क्र.१९/पुनर्बांधणी-७/का-सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८/१०/२०१३ चे शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

**२.** श्री साईबाबा संस्थानने सादर केलेल्या व यासाठी गठीत केलेल्या समितीने सादर केलेल्या खालील विनियम व नियमास काही सुधारणासह शासन मान्यता देण्यात आली असून सुधारित विनियम व नियम सोबत जोडले आहेत. तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियमातील तरतुदीनुसार ते प्रकाशित करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

1) Regulations for Meeting of the Committeee
2) Regulation of Sub Committee
3) Advisory Council Regulations
4) Regulation for Scrutiny Committee
5) Bhakta Mandal Regulations
6) Service Regulations- 2013
i) General Conditions of Service Regulations
ii) Conduct Regulations
iii) Discipline and Appeal Regulations
iv) Leave Regulations
v) Joining Time & Payments during Suspension, Dismissal & Removal Regulations
vi) Pay and Allowances Regulations

**३.** तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (वर्तणूक) विनियम, २०१३ मधील नियम १४ मध्ये संस्थान आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना मत्ता व दायित्व सादर करण्याबाबत व्यवस्थापन समिती ज्यावेळी सूचित करेल त्यावेळी आवश्यक माहिती देण्याबाबत नमूद केले आहे. व्यवस्थापन समितीने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमामध्ये मत्ता व दायित्व सादर करण्याचा कालावधी नमूद केलेला आहे त्यानुसार संस्थान आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचा कालावधी निश्चित करण्याचे सूचित करण्यात येत आहे.

**४.** तसेच श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करण्यात यावे. असे नमूद केलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम- २००४ मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

२ (झ) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम, असा आहे.

११ (६) समितीस, आपल्या कार्यपध्दतीचे नियमन करण्यासाठी व कामकाज चालविण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्यातील नियमांशी सुसंगत होतील असे विनियम करता येतील.

वरीलप्रमाणे विविध शर्ती-अटीस अधिन राहुन शासनाने संस्थानचे विनियम व नियमांचे मसुद्यास मान्यता दिलेली आहे. सदर मसुदे प्रकाशित करणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

**अ)** शासनाने मान्यता दिलेले विनियम व नियमांचे अंतिम मसुद्याप्रमाणे सन २०१३-२०१४ पासून अमलात आणेबाबतची कार्यवाही करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**ब)** शासनाने मान्यता दिलेले मसुदे इंग्रजी भाषेत आहेत. त्यांचे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१८/०१/२००८ चे शासन निर्णयान्वये इंग्रजी मजकूराचा मराठी अनुवाद करणेकामी अधिकृत व्यक्तीची नियुक्ती करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**क)** अधिकृत व्यक्तींकडून सदर मसुद्यांचे मराठीत भाषांतर केल्यानंतर सदर मसुद्यास विधी व न्याय विभागाची मान्यता घ्यावी लागेल.

**ड)** अधिनियमातील तरतुदीनुसार मराठी अनुवादास विधी व न्याय विभागाची मान्यता मिळालेनंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार शासकीय मुद्रणालयातून अंतिम इंग्रजी व मराठी मसुदे छपाई करुन ते प्रकाशीत करणेबाबतची कार्यवाही करता येईल. तसेच मराठी अनुवाद करणेकामी व अंतिम मसुदे शासकीय मुद्रणालयातून छपाई करणेकामी येणाऱ्या खर्चाबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम व नियमांना महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली असून ते मसुदे इंग्रजी भाषेमध्ये असल्यामुळे इंग्रजी मजकूराचा मराठी अनुवाद करणेकामी उचित मानधनावर अधिकृत व्यक्तीची नियुक्ती करणेत यावी व त्यांचेकडून मराठीमध्ये भाषांतर करुन घेतलेनंतर सदर मसुदे सभेच्या मान्यतेसाठी सादर करावेत. तोपर्यंत यापुर्वीचेच नियम कायम ठेवणेत यावे, असे ठरले.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.४३ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम (सेवाप्रवेश नियम) बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे कर्मचारी आकृतीबंधास अनुसरून दि.२८/१०/२०१३ व दि.३०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये शासनाने संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टांसह शासनास तातडीने सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ नुसार "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम, असा आहे.

शासनाने यापुर्वी संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता देतांना पदनाम, वेतनश्रेणी व पदसंख्या यांनाच मान्यता दिलेली असून सदर शासन निर्णयात खालीलप्रमाणे शर्ती-अटी नमुद केलेल्या आहेत.

**१)** समितीने पदनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

**२)** सेवा प्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

त्यानुसार संस्थानकडून यापुर्वी कर्मचारी सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टांसह तयार करुन ते शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले होते. परंतु शासनाने दि.२८/१०/२०१३ व दि.३०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन अंतिम प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करणेबाबत कळविलेले आहे.

मंजुर आकृतीबंधातील विविध संवर्ग, नियुक्ती-पदोन्नती, वेतनश्रेणी व इतर बाबींची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे दुरूस्त्या करणे आवश्यक आहे.

| **अ.नं.** | **विभाग** | **मंजुर आकृतीबंधातील नोंदी** | **विविध संवर्ग, वेतनश्रेणी, शैक्षणिक पात्रता, सरळसेवा भरती व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी केली असता खालीप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | लेखाशाखा विभाग | अ.नं.०४ Chief Cashier मुख्य कॅशिअर (अधिक्षक संवर्ग) (पाचव्या वेतनआयोगानुसार वेतनश्रेणी ६५००-१०५००) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४४०० | मुख्य कॅशिअर या पदाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य विचारात घेता सदरचे पद हे अधिक्षक संवर्गा ऐवजी वरिष्ठ लेखापाल या संवर्गातील ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदर पदासाठी पाचव्या वेतन आयोगानुसार (वेतनश्रेणी ५५००-९०००) व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४३०० याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. |
| २ | प्रसादालय विभाग | अ.नं. १ Manager मॅनेजर (पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ६५००-१०५००) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४४०० | प्रसादालय विभागात सुमारे एक हजार कर्मचारी काम करत आहेत. मॅनेजर (प्रसादालय) हे पद विभाग प्रमुखाचे आहे. सदर पदाचे कामाचा वर्कलोड, जबाबदारी व कर्तव्ये विचारात घेता या पदासाठी सहाव्या वतन आयोगानुसार वेतनबँण्ड १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४०० याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. |
| ३ | बांधकाम विभाग | अ.नं.१ Executive Engineer (कार्यकारी अभियंता) (पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी १०६५०-१५८५०) वेतनबँण्ड १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ६६०० | सदर पदाची निर्मीती ही बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, विद्युत विभाग, मेकॅनिकल विभाग इत्यादी प्रकारच्या तांत्रिक विभागाच्या फाईल्स कार्यकारी अभियंता यांचेमार्फत सादर करणेबाबत तसेच सर्व तांत्रिक विभागाचे पर्यवेक्षण करणेकामी आकृतीबंधात नव्याने निर्मीती केलेली आहे. सदरचे पद हे प्रशासकीय अधिकारी यांचे समकक्ष असल्यामुळे दैनंदिन कामाचे सोईसाठी हे पद सामान्य प्रशासन विभागाचे आस्थापनेवर घेणे आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | बांधकाम विभाग | अ.नं.१० Mistry मिस्त्री (पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ३०५०-४५९०) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० एकूण पदसंख्या- ०३ | बांधकाम विभागाचे आस्थापनेवर मुकादम, गवंडी, सुतार यासारख्या पदांची निर्मीती करण्यात आलेली आहे. परंतु संस्थानचा वाढता विकास विचारात घेता दैनंदिन चालणाऱ्या दुरूस्ती व देखाभालीचे कामासाठी पेंटर या पदाची निर्मीती करण्यात आलेली नाही. त्याकामी मंजुर आकृतीबंधातील बांधकाम विभागाचे आस्थापनेवरील Mistry या पदाऐवजी पेंटर असा पदनामात बदल करणे आवश्यक आहे. |
| ५ | मेकॅनिकल विभाग | अ.नं.१० Air Condintion & Refrigerator Supervisor प्रशितन व वातानुकूल पर्यवेक्षक (पाचव्या वेतनआयोगानुसार वेतनश्रेणी ४०००-६०००) वेतनबँण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २४०० | विद्युत विभाग अ.नं.४ विद्युत पर्यवेक्षक (पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ५०००-८०००) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४२०० मंजुर आहे. विद्युत पर्यवेक्षक व प्रशितन व वातानुकूल पर्यवेक्षक या दोन्ही पदाचे कामाची जबाबदारी व कर्तव्य सारखेच आहे. सबब, विद्युत पर्यवेक्षकाप्रमाणे प्रशितन व वातानुकूल पर्यवेक्षकाचे वेतनश्रेणीत बदल करणे आवश्यक आहे. |
| ६ | इंग्लिश मिडीयम स्कूल | अ.नं.३ संगणक शिक्षक (माध्यमिक) (पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४०००-६०००) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २४०० | शैक्षणिक स्कूल कोडनुसार सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) या पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४३०० याप्रमाणे अदा करण्यात येत आहे. परंतु मंजुर आकृतीबंधात संगणक शिक्षक (माध्यमिक) या पदासाठी वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २४०० नमुद केलेला आहे. शैक्षणिक स्कूल कोडनुसार सदर पदासाठी माध्यमिक शिक्षकाप्रमाणे वेतनबॅण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४३०० याप्रमाणे बदल करणे तसेच संगणक शिक्षक (माध्यमिक) ऐवजी सहा.शिक्षक संगणक (माध्यमिक) असा पदनामात बदल करणे आवश्यक आहे. |
| ७ | इंग्लिश मिडीयम स्कूल | अ.नं.६ संगणक शिक्षक (प्राथमिक) (पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ३०५०-४५९०) सहाव्या वेतनआयोगानुसार वेतनबँण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे १९०० | शैक्षणिक स्कूल कोडनुसार सहाय्यक शिक्षक (प्राथमिक) या पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २८०० याप्रमाणे अदा करण्यात येत आहे. परंतु मंजुर आकृतीबंधात संगणक शिक्षक (प्राथमिक) या पदासाठी वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे १९०० नमुद केलेला आहे. शैक्षणिक स्कूल कोडनुसार सदर पदासाठी प्राथमिक शिक्षकाप्रमाणे वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २८०० याप्रमाणे बदल करणे तसेच संगणक शिक्षक (प्राथमिक) ऐवजी सहा.शिक्षक संगणक (प्राथमिक) असा पदनामात बदल करणे आवश्यक आहे. |
| ८ | श्री साईबाबा हॉस्पिटल | Sr.No.४० Senior Biochemist (पाचव्या वेतन आयोगानुसार मंजुर वेतनश्रेणी ८०००-१३५००) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील सार्वजनिक आयोग्य विभाग पान नं.२८६(८२) नुसार Bio-Chemist या पदासाठी पाचव्या वेतन आयोगानुसार ६५००-१०५०० व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४४०० आहे. त्याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय | साईबाबा हॉस्पिटल Sr.No.९४ Social Worker व साईनाथ रुग्णालय Sr.No.५३ Social Worker | सदर पदांची निर्मीती ही रुग्णालय संबंधीत समाजसेवक असल्याने Medical Social Worker (वैद्यकीय समाजसेवक) असा बदल करणे आवश्यक आहे. |
| १० | श्री साईबाबा हॉस्पिटल | अ.नं.७७ Junior O.T. Assistant (पाचव्या वेतन आयोगानुसार २५५०-३२००) सहाव्या वेतन आयोगानुसार ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे १३०० | आकृतीबंधात श्री साईनाथ रुग्णालयाचे आस्थापनेवर सदर पदासाठी (पाचव्या वेतन आयोगानुसार २७५०-४४००) सहाव्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे १८०० याप्रमाणे मंजुर असून त्याप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यात येत आहे. संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकडील सदर पदाचे कामाची जबाबदारी व कर्तव्य एकच आहे. त्यामुळे एकाच संस्थेत एकाच पदासाठी दोन वेगवेगळया वेतनश्रेण्या ठेवणे योग्य नसल्याने सदर पदासाठी साईनाथ रुग्णालयाकडील वेतनश्रेणीप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. |
| ११ | श्री साईबाबा हॉस्पिटल | अ.नं.९८ Medical Record Keeper (पाचव्या वेतन आयोगानुसार ४०००-६०००) सहाव्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २४०० | महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील सार्वजनिक आयोग्य विभाग पान नं.२९४(२५०) नुसार Medical Record Keeper या पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे १९०० आहे. सबब, सदर नियमानुसार संस्थानचे Medical Record Keeper या पदासाठी वेतनश्रेणीत बदल करणे आवश्यक आहे. |

उपरोक्त अधिनियमातील तरतूद विचारात घेता मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादी बाबतचे कर्मचारी सेवाप्रवेश नियमाचे प्रारुप तयार करण्यात आलेले असून त्याची प्रत Schedule - I सोबत ९५ पाने जोडलेले आहे. त्यामध्ये उपरोक्त अ.नं.१ ते ११ बाबत स्तंभ क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते बदल करुन सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील अ.नं.१ ते ११ बाबत स्तंभ क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते बदल करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचा विनियम (सेवाप्रवेश नियम) मध्ये प्रस्तावित दुरुस्त्या करणेत येऊन, सदर सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.४४ श्री समाधी मंदिर व दर्शन हॉल वातानुकूलित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांनी दि. १२-१०-२०१३ रोजी पत्राव्दारे संपुर्ण समाधी मंदिर व दर्शन लाईन वातानुकूलित करण्याचे काम देणगी स्वरुपात करणेची ईच्छा प्रदर्शित केलेली होती. साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांनी शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग, समाधी मंदिर इ. ठिकाणी ए.सी. यंत्रणा देणगी स्वरुपात बसवुन देण्याची व त्यानंतर पुढील पाच वर्ष संपुर्ण यंत्रणेची दुरुस्ती खर्च मोफ़त करणार असल्याचे कळविलेले होते.

देणगीदार साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांचे पत्रानुसार श्रींचे समाधि मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेकरीता मा. त्रिसदस्य समिती यांचे दि. २७-१०-२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र. १५ निर्णय क्र.८६८ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार देणगीदार साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांना दि. १४-११-२०१३ तसेच दि. २३-११-२०१३ रोजी पत्र पाठवुन श्रींचे समाधि मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेची कार्यवाही त्वरीत करणेविषयी काळविण्यात आलेले होते. श्री चुनिलाल खन्ना, मुंबई यांना पत्र पाठवुन सहा महिनेपेक्षा जास्त कालवधी झालेला असुन वारंवार

दुरध्वनीवरुन संपर्क साधुनही श्री.चुनिलाल खन्ना, मुंबई यांचेकडुन अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही अथवा कोणताही पत्र व्यवहार झालेला नसल्याने श्रीं चे समाधि मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी श्री.चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांचेकडुन देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेकरीता मा. त्रिसदस्य समिती यांचे दिनांक २७-१०-२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र १५ निर्णय क्र.८६८ अन्वये झालेला ठराव रद्द करण्यात यावा, असे वाटते.

दरम्यानच्या काळात साईभक्त श्री. गुप्ता यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची भेट घेऊन श्री.चुनिलाल खन्ना, मुंबई यांचेऐवजी श्रींचे समाधि मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेची इच्छा व्यक्त केलेली आहे. तरी देणगीदार साईभक्त श्री चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांचेऐवजी साईभक्त श्री. गुप्ता यांचेकडून श्रीं चे समाधि मंदिर, व्दारकामाई, चावडी इ. ठिकाणी देणगी दाखल वातानुकूलित यंत्रणा बसविणेस मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांनी दि.१२-१०-२०१३ रोजीचे पत्राव्दारे संपुर्ण समाधी मंदिर व शांतिनिवास इमारतीचे चारही दर्शन हॉल, भुयारी मार्ग इ. ठिकाणी ए.सी. यंत्रणा देणगी स्वरुपात बसवुन देण्याची आणि त्यानंतर पुढील पाच वर्ष संपुर्ण यंत्रणेची दुरुस्ती खर्च मोफ़त करणार असल्याचे कळविलेले होते. त्यानुसार मा.त्रिसदस्य समितीच्या दि.२७-१०-२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६८ अन्वये त्यांना मंजुरी दिलेली आहे व तसे त्यांना लेखी कळविणेत आले होते. त्यांचेशी वारंवार संपर्क साधूनही अद्यापपर्यंत त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे समजते. त्यामुळे श्री.चुनिलाल खन्ना आणि कंपनी, मुंबई यांना नोटिस देण्यात येऊन त्यांचे म्हणणे मागविणेत यावे व त्यांना शक्य नसल्यास श्री. गुप्ता यांनी अशाच प्रकारची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. त्याकरीता श्री.गुप्ता यांना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५ शांतिनिवास दर्शन हॉलकरीता वायुवीजनकरीता डक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसरातील भक्तनिवास व शांतीनिवास इमारतीतील हॉलचा दर्शन लाईनकरीता वापर करण्यात येतो. दिनांक १९-०३-२०१४ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय अधिकारी व काही विभाग प्रमुख यांचे समवेत दर्शनरांग हॉलची पाहणी केली असता शांतीनिवास दर्शन हॉलमध्ये गरम होते. याकरीता शांतीनिवास इमारतीच्या पूर्व व पश्चिम बाजुने असलेल्या पुरष व महिलांचे शौचालयात ३` रुंद व २`- ६` उंच असे एकुण चार डक्ट तयार करणेबाबत चर्चा झाली आहे. त्यामुळे दर्शनरांग हॉलमधील हवा खेळती राहण्यास मदत होणार आहे. तथापी सदर ठिकाणी टॉयलेट ब्लॉक असल्याने हॉलमध्ये दुर्गंधी येऊ नये याकरीता दर्शनरांग हॉलचे भिंतीपासून टॉयलेट ब्लॉकचे पश्चिम बाजुचे बाहेरील भिंतीपर्यंत जी.आ.शिटमध्ये डक्टींग करणे आवश्यक आहे. सदरचे काम करुन मिळणेकामी बांधकाम विभागामार्फत मागणी करण्यात आली आहे. तरी जी.आय.डक्टींगचे कामासाठी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| ०१) | जी.आय.डक्ट,<br>२.६ x ३ फूट साईजचा ८४ फूट लांबीचा तयार करुन अनुषंगिक कामासह बसवून देणे. (२४० क्युबीक फीट) | रु. १,५०,०००/- |

उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास दर्शन हॉलकरीता वायुवीजनकरीता डक्टचे काम कोटेशन मागवून करावे लागणार आहे. त्याकामी अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. याकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन बोलविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतीनिवास दर्शन हॉलमधील वायुवीजनकरीता डक्टचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४६ श्री साईनाथ हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०१ व ०२ चे Landing गेटस बदली करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचमार्फत श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांचे सोयीकरीता तळमाळयावरुन ये-जा करणेकरीता हायड्रॉलिक लिफ्ट क्र.०१ सन-२००७ व लिफ्ट क्र.०२ सन २०१० मध्ये बसवून चालू करुन देण्यात आलेल्या आहेत. सदरील लिफ्ट दैनंदिन वापरामुळे विना अपघात तांत्रिक बिघाड न होता सुरक्षितरित्या चालाव्यात म्हणून मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना सन

२०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. कंपनीचे इंजिनिअर दरमहा शिर्डी येथे येऊन दोन्ही लिफ्टची सर्व्हिसिंग करुन देत असतात.

श्री साईनाथ हॉस्पीटलकडील लिफ्ट क्र.०१ व ०२ मिळून दोन्ही लिफ्टकरीता प्रत्येकी एकुण ०२ नग Landing गेटस आहेत. सदरील दोन्ही लिफ्टचा २४ तास वापर केला जातो. त्यामुळे दोन्ही लिफ्टचे दोनही Landing गेटस दिवसभर अनेक वेळा उघडझाप केले जात असल्याने, सततच्या वापराने तसेच रुग्णांना नेण्याकरीता असणारे स्ट्रेचर्स व रुग्णांकरीता प्रसादाची मोफत जेवण वाटप गाडीवाहतुकीच्या धडकेने Landing गेटस नादुरुस्त झाले आहेत. दरवेळी नादुरुस्त झालेले गेट तात्पुरते दुरुस्त करुन चालू करुन देण्यात आलेले आहेत. आता गेट संपूर्णतः खराब झालेले असून सदरील दोनही कोलॅप्सीबल गेट सुरक्षिततेच्या दृष्टीने नविन बसवून देणे अत्यंत गरजेचे आहे.

मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांनी जुने Landing गेटस काढून नविन बसविणेचे कामाचे कोटेशन सादर केले असून दोन्ही लिफ्टचे प्रत्येकी ०२ नग Landing Gates बसविणेकरीता रक्कम रुपये ४,१६,२७५/- इतका खर्च येणार असल्याचे कळविले आहे.

मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचेकडून श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दोन्ही लिफ्टचे प्रत्येकी ०२ नग Landing गेटस बसवून घेणे व याकामी येणा-या रक्कम रुपये ४,१६,२७५/- इतक्या खर्चास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचेकडून श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दोन्ही लिफ्टचे प्रत्येकी ०२ नग Landing गेटस बसवून घेणेस व याकामी येणाऱ्या रु. ४,१६,२७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७ मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयाचे विद्युतीकरणाचे कामास झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १२-०४-२०१४ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र.१८ निर्णय क्र.२८० अन्वये मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कार्यालयाचे विस्तारीकरण व नुतनीकरण कामामधील विद्युतीकरणाचे काम करणेसाठी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५१,२२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत/ २१६/ २०१४ दिनांक १५-०४-२०१४ अन्वये कोटेशन धारकांकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. सदरील काम अत्यंत तातडीचे असल्याने प्राप्त झालेली कोटेशन मा.प्रशासकिय अधिकारी यांचे समोर समक्ष उघडण्यात आलेली होती. त्यानुसार उघडण्यात आलेल्या कोटेशनमधील दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमध्ये दिलेले दर |
|---|---|---|
| ०१) | मे. आदिती इलेक्ट्रीकल्स , नाशिक | रु. ६४,०२५/- |
| ०२) | मे. स्वरांजली इलेक्ट्रीकल्स , नाशिक | रु. ६०,४३९/- |
| ०३) | मे. जाधव इलेक्ट्रीकल्स , कोपरगाव | रु. ४४,५६१/- |
| ०४) | मे. श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स , नाशिक | रु. ४६,०९८/- |

उघडण्यात आलेल्या कोटेशनमधील दरानुसार मे. जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगाव यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे त्यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन मे. जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगाव यांना मा. उप कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कार्यालयाचे विद्युतीकरणाचे काम करुन देणेसाठी जा.नं.एसएसएस/ विद्युत/ ८१७ /२०१४ दि.१४-०५-२०१४ अन्वये रक्कम रुपये ४४,५६१/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे. जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगाव यांनी मा. उप कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कार्यालयाचे विद्युतीकरणाचे काम पूर्ण केलेले असून याकामापोटी त्यांनी बील क्र. JE/SSS/०२/१४-१५ दि.२२-०५-२०१४ अन्वये रुपये ४४,४१२/- इतक्या रक्कमेचे बील सादर केलेले आहे. तरी मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगाव यांना दिलेल्या कार्यादेशास व झालेल्या रक्कम रुपये ४४,४१२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४८ राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण मंच, दिल्ली यांचे समोरील तक्रार नं.७००/ २०१३ श्री.मनोज आप्पासाहेब चव्हाण विरुध्द (०१) दि डीन श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी (०२) डॉ.सतिष रेड्डी, (०३) डॉ.किरण गोरे या केसबाबत.**

**प्रस्ताव-** १) श्री मनोज आप्पासाहेब चव्हाण यांनी यापुर्वी राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांचेकडे तक्रार अर्ज क्र. ९/२००८ दाखल केला होता. त्यामध्ये श्री चव्हाण संस्थानचे रुग्णालयात

ॲडमिट झाल्यानंतर त्यांचेवर डॉ.रेड्डी व डॉ. गोरे यांनी शस्त्रक्रिया केली. पंरतू त्यामुळे त्यांना बरे वाटले नाही. व त्यानंतर त्यांना के.ई.एम. हॉस्पीटलमध्ये उपचार घेणेसाठी दाखल व्हावे लागले. त्यामध्ये त्यांचे आर्थिक, शारीरीक व मानसिक नुकसान झाले. करीता त्यांनी राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांचेकडे रु. ३५,११,५००/- (अक्षरी रुपये-पस्तीस लाख, अकरा हजार, पाचशे) मात्रची नुकसान भरपाईची मागणी प्रस्तुतचे ०९/२००८ चे अर्जात केलेली होती. सदरची केस ०१) दि डीन श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी , ०२) डॉ.सतिष रेड्डी व ०३) डॉ. किरण गोरे यांचे विरुध्द दाखल केलेली होती. प्रस्तुतचे केस मध्ये संस्थानचे वतीने औरंगाबाद येथे ॲडव्होकेट श्री आर.एल. कुटे हे काम पहात होते. प्रस्तुत केस मध्ये मा. राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच औरंगाबाद यांनी मनोज अप्पासाहेब चव्हाण यांचा तक्रार अर्ज दि.१६/०७/२०१३ रोजी फेटाळला आहे.

२) आता मनोज अप्पासाहेब चव्हाण यांनी पुन्हा राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारन मंच, दिल्ली यांचे समोर फर्स्ट अपिल नं. ७००/२०१३ श्री मनोज आप्पासाहेब चव्हाण **विरुध्द** ०१) दि डीन श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी ०२) डॉ.सतिष रेड्डी, श्री साईबाबा हॉस्पीटल ०३) डॉ.किरण गोरे, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे विरुध्द दाखल केले आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे विनंती केली आहे. सदर प्रकरणी राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारन मंच, दिल्ली यांचेसमोर अंतीम सुनावणीची तारीख दि. ०१/०७/२०१४ रोजी सकाळी १०-३० वा. नेमण्यात आलेली आहे.

१) अर्जदाराने राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेला तक्रार अर्ज क्र.९/२००८ मा.न्यायालयाने दि. १६/०७/२०१३ रोजी Dismissed केले आहे. (अर्जदाराचे विरुध्द) त्यामुळे सदरचे अपिल दाखल केले आहे.

सदर अपिलाची नोटीस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीस प्राप्त झालेली नाही. डॉ. गोरे, श्री साईबाबा हॉस्पीटल यांना मिळालेली असून सदर नोटीसची प्रत इकडेस मागविणेत आलेली आहे.

२) अर्जदाराने मोबदला मिळण्यासाठी जो अर्ज राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांचेकडे दाखल केला होता. त्याचा मा.कोर्टाने विचार न करता निकाली काढला आहे.

३) मा.कोर्टाने ॲक्च्युअल फॅक्टचा विचार न करता दावा निकाली काढला आहे.

४) मा.कोर्टाने निकाल देतांना proper equity law and procedure of law चा विचार केलेला नाही. व चुकिचे अनुमान काढून निकाल दिला व ते कामकाजाचे दृष्टीने योग्य नाही. प्रस्तुत निकालामध्ये मा.कोर्टाने अर्जदार रुग्णालयात काम कारत असल्याचे कोर्टाने नमुद केले आहे. मा.कोर्टाने दाव्यात योग्य पध्दतीने न्याय दिला नाही.

५) राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांचेकडील केस मध्ये सामनेवाला नं. १ व ३ हजर होते सामनेवाला नं. २ चे विरुध्द एक्स पार्टी आदेश झालेला आहे.

६) सामनेवाला नं. १ व ३ यांनी निष्काळजीपणा केला व त्यामुळे सदरचे नुकसान भरपाईस सामनेवाला नं. १ व ३ वैयक्तीक रित्या व सामुहीक रित्या ते जबाबदार नाहीत असा निकाल दिला आहे. व सामनेवाला नं. ३ चे कर्मचारी आहेत त्यामुळे मा.कोर्टाने कुठलाही तर्कसंगत विचार केलेला नाही.

७) अर्जदारास वैद्यकीय सेवा घेणेकामी रक्कम रु. २,७८,५००/- तसेच के. ई.एम. हॉस्पीटल मुंबई येथे रक्कम रु. १७,४०,०००/- इतका खर्च आला आहे. तसेच अर्जदाराने जो अर्ज दाखल केला त्यावेळी त्यांचे वय ३० वर्ष होते. सामनेवाले नं. १ व ३ यांनी निष्काळजी पणाने केलेल्या शस्त्रक्रिये मुळे अर्जदाराची नोकरी चे नुकसान झाले आहे. तसेच त्यामुळे अर्जदाराचे मानसीक संतुलन बिघडले व शाररीक दृष्ट्या नुकसान झाले आहे याबाबतीचा विचार मा.कोर्टाने केलेला नाही.

८) दि. १७/११/२००६ रोजी साईबाबा हॉस्पीटल मध्ये केलेल्या सोनोग्राफी मध्ये डॉ. आशाताई जाधव, एम.एस.सर्जन कोल्हापुर यांचे एक्सपर्ट ओपिनियन व सामनेवाला नं. १ व ३ यांनी दिलेले डिसचार्ज समरी व के. ई.एम. हॉस्पीटल मुंबई यांचे डिसचार्ज समरी व एन्डस्कोपी सर्जरी ( ERCP) याबाबींचा विचार मा.कोर्टाने केलेला नाही. तसेच मा.कोर्टाने दिलेल्या ऑर्डर मधील पॅरा नं. २(e)- १ to ८ & ११ याचा विचार केला नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

९) प्रस्तुत प्रकरणात राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांनी एआयआर २००९ व एआयआर १९७१ चा दिलेला संदर्भ या दाव्याशी सुसंगत नाही. परंतू चुकीचा संदर्भ लावून सामनेवाला नं. १ ते ३ यांच्या निष्काळजी पणाकडे दूर्लक्ष करुन निकाल दिला आहे. असे अर्जदाराने म्हणाले आहे.

१०) प्रस्तुतचे अपिल चुकीची, हलगर्जीपणाची व सामनेवाला नं. १ व ३ यांचे निष्काळजीपणा सिध्द करु शकले नाही असा चुकीचा निकाल दिला म्हणून वैद्यकीय सेवा व राज्य ग्राहक तक्रार निवारण मंच, औरंगाबाद यांचे चुकीचे निकाला संदर्भात दाखल केले आहे.

११) सदरचे अपिल मुदतीत दाखल केले आहे असे नमुद करुन सुध्दा सदर दावा दाखल करतांना काही उशिर झाला असल्यास दावा ग्राह्य धरणेत यावा म्हणून सोबत Delay condonation चा अर्ज दाखल केला आहे.

प्रस्तुतचे अपिलाचे संदर्भात, संस्थानला राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण मंच, दिल्ली यांचे समन्स अद्याप प्राप्त झालेले नाही. परंतू डॉ. किरण गोरे यांना सदरचे समन्सची प्रत प्राप्त झालेली आहे. प्रस्तुत प्रकरणी सदरचे अपिलात श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डीला पार्टी केलेले असल्याने संस्थानचे वकीलपत्र दाखल करावे लागेल. दिल्ली येथे संस्थानचे पॅनलवर वकीलांची नेमणूक केलेली नाही. श्री संजय खर्डे, ॲडव्होकेट हे सर्व्हे नं. १ (३० आर मंदिर परिसराजवळील जागा) प्रकरणी काम पहात आहेत. व श्री के.पी. सुंदरराव अन्य एका Probate केस मध्ये काम पहात आहेत. तरी मा.अध्यक्ष सो. यांचेशी चर्चा करुन तसेच संस्थानचे औरंगाबाद येथील पॅनल ॲडव्होकेट यांचेकडून दिल्लीचे वकीलांची माहिती घेवून त्यानंतर वकीलपत्र देणेबाबत कार्यवाही करता येईल. प्रस्तुतचे केस मध्ये संस्थानचे वतीने वकीलाची नेमणूक करणे व त्याची होणारी वकील फी अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणाऱ्या ॲडव्होकेट पॅनेलवरील वकिलांना प्राधान्याने विचारणा करणेत यावी. जर संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवरील वकिल यासाठी तयार नसतील तर त्यांचेकडून दिल्लीमधील वकीलांची माहिती घेण्यात येऊन त्यांचेबरोबर चर्चा करुन, वकीलपत्र व त्यांची फी देणेबाबतची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.४९ विधी अधिकारी यांचेसाठी टेबल व खुर्ची खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** विधी विभागाची रुम प्रशासकीय अधिकारी यांना दिल्याने विधी अधिकारी यांची टेबल व खुर्ची प्रशासकीय अधिकारी यांचे कडे वर्ग झालेली आहे.

सध्या विधी अधिकारी यांना बसणेकामी इतर विभागाकडुन तात्पुरते टेबल व खुर्ची घेतलेली आहे व सदर खुर्ची नादुरुस्त आहे सध्या ते त्याचा वापर करत आहे.

विधी अधिकारी यांचेसाठी रिव्हॉल्वींग चेअर व ऑफिस टेबलची आवश्यकता आहे व ते खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी विधी अधिकारी यांचेकरीता गोदरेज मेक ऑफिस टेबल मॉडेल-T-१०४ अंदाजे किमंत रु. १८,०००/- व गोदरेज मेक रिव्हॉल्वींग चेअर Model PCH-७००१-D अंदाजे किमत रुपये १४,५००/- मात्र खरेदी करणेस व सदर खरेदी कामी एकुण अंदाजे रुपये ३२,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर गोदरेज मेक ऑफिस टेबल व रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३२,५००/- मात्रचे खर्चास तसेच सदर खरेदी, खरेदी विभागामार्फत करुन मिळणेस मान्यता असावी

**निर्णय क्र.४९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी विभाग हा नवीन ठिकाणी स्थलांतरीत झालेला असल्याने विधी अधिकारी यांचेकरिता आवश्यक गोदरेज मेक ऑफिस टेबल व रिव्हॉल्वींग चेअर विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.५० सोनचाफा प्लॉटला ठिबक सिंचन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** नवीन भक्त निवासचे पाठीमागील भागात बगीचा विभागा मार्फत गुलाब बागेऐवजी सोनचाफा बाग तयार करण्यात आलेली आहे. या बागेत विविध रंगाची झाडे लावण्यात आलेली आहे. सदरची बाग ही निवासस्थान इमारती पासून जवळ असल्याने भक्त निवास इमारतीत राहणारे साईभक्त फिरण्यासाठी या बागेत येतात, बागेत फोटो काढतात. सन २०१३ मध्ये या सोनचाफा बागेची लागवड केलेली आहे.

येथील क्षेत्र साधारणत: एक एकर असून त्या मध्ये १४ प्लॉट करुन त्यात ब्लॉकचे रस्ते तयार केलेले आहे. या बागेमध्ये विविध प्रकारचे व काही कमी उंचीचे हायब्रीड चाफे वेगवेगळया प्लॉट मध्ये लावलेले आहेत .चाफ्याची फुले ही सुगंधी असल्यामुळे ती 'श्रींचे' समाधीवर वाहण्यासाठी उपयोगी ठरतील. सदरच्या बागेसाठी रेनगनने पाणी दिले जाते. त्यामुळे बागेमध्ये मोठया प्रमाणात पाणी लागते. व जादा पाण्यामुळे गवताचे प्रमाणही जास्त असते.

सध्या उन्हाळा चालु असल्यामुळे पाण्याची टंचाई लक्षात घेता सदर बागेस ठिबक सिंचन करणे सोईचे व उपयुक्त ठरेल. यामुळे पाण्याची बचत होवुन गवताचे प्रमाणही कमी होईल. याकामी अंदाजे रु. ४५,०००/- (रु. पंचेचाळीस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

सदर बागेत ठिबक सिंचन करण्यासाठी वेगवेगळया कंपन्याकडुन दर पत्रक घेवुन ठिबक सिंचन करता येईल. ठिबक सिंचनासाठी लागणारा ४५,००० रु. खर्चास त्रिसदस्य समीतीच्या सभेपुढे सदर विषय मंजुर करुन मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे समोर कोटेशन उघडुन मान्यता घेता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१ सिलबंद केलेल्या महारतन गावरान तुपाचे लिलावाचे विक्रीपुर्वी प्रतिकिलो किमान मुल्य निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२८/०८/२०१२ रोजी मा.सहा. आयुक्त कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचे कार्यालयाकडील अन्न सुरक्षाअधिकारी श्री. का.सु.शिंदे यांनी "महारतन" गावरान तुप बॅच नं.१२ चे ४२७ डबे एकुण ६४०४.२ किलो किंमत रु. १३९१९५२.८७ व बॅच नं.१५ चे ९०४ डबे एकुण १३५५९.२ किलो किंमत रु. २९४७०९२.१२ असे एकूण १३३१ डबे भांडार विभागात येवून सिलबंद केले आहेत सिलबंद केलेल्या एकूण डब्यांची किंमत रू.४३,३९,०४५/- इतकी आहे.

सदरच्या जप्त केलेल्या गावरान तुपासंदर्भात पुरवठादार मे.बाफना बाजार, नासिक यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे अन्न व औषध प्रशासन कार्यालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर क्रिमिनल रिट पिटीशन नं.२९६/२०१३ दाखल केलेली होती. रिट पिटीशन नं.२९६/२०१३ संदर्भात दि.१२/०७/२०१३ रोजी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार, मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांनी " जप्त केलेल्या गावरान तुपाचा साठा अखाद्य असल्याने त्याचा वापर लिक्वीड सोफ तयार करणे इ. अखाद्य वापरासाठी करावयाचा आहे. याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देवून लिलावाव्दारे सदरच्या जप्त केलेल्या गावरान तुपाची विक्री करण्यात यावी विक्री केल्यानंतरची सर्व रक्कम मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा करण्यात यावी" असे सांगितले आहे.

उपरोक्तप्रमाणे झालेल्या आदेशानुसार श्री.का.सु.शिंदे, अन्न सुरक्षा अधिकारी, मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे पयर्वेक्षणाखाली जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहीरात देवून जप्त महारतन गावरान तुपाचे १३३१ डबे लिलावाव्दारे विक्री करणेस व सदरची रक्कम मा.सहा.आयुक्त कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांचे कार्यालयात जमा करणेस मा.व्यवस्थापन समितीची दि. १४.११.२०१३ रोजीचे सभेत निर्णयार्थ टिपणी सादर करण्यात आली होती.त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय क्र.९१०:-** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जप्त केलेले महारतन गावरान तुपाच्या १३३१ डब्यांची लिलावाव्दारे विक्री करणेकामी मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडून तारीख निश्चित करुन, त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देण्यात येऊन मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत सदरच्या तुपाची जाहिर लिलावाव्दारे विक्री करणेत यावी. याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच, उपरोक्त प्रमाणे जप्त केलेल्या महारतन गावरान तुपाच्या १३३१ डब्यांची लिलावाव्दारे विक्री केल्यानंतर सर्व रक्कम मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडे डी.डी. व्दारेजमा करणेत यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाबाबत मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांना जा.नं.एसएसएसटी/भांडार/५०३५/२०१३ दि.३१/०१/२०१४ अन्वये अवगत करण्यात आलेले आहे. तसेच वेळोवेळी त्यांचेशी संपर्क साधुन लिलावाचे प्रक्रिये संदर्भांत समक्ष तसेच दुरध्वनीव्दारे चर्चा करण्यात आलेली असुन झालेल्या चर्चेबाबत दि.३१/१२/२०१३ रोजीचे टिपणी सादर करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या या गावरान तुपाची किंमत मा.सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेकडे जमा करण्यात येणार असल्याने लिलावाव्दारे विक्री करणेपुर्वी जप्त केलेल्या गावरान तुपाचे किमान मुल्य निश्चित करणे आवश्यक आहे.

लिक्वीड सोप, साबन इत्यादींचे उत्पादकांकडे याबाबत चौकशी केली असता या पदार्थांकरीता ते स्वस्त मिळणारे अखाद्य तेलाचा उपयोग करतात. त्याचा दर अंदाजे रु.३०.०० ते रु.३५.०० प्रतिकिलो या दरम्यान आहे.

लिलावाव्द्वारे विक्री करणेपुर्वी गावरान तुपाचे प्रति किलो किमान मुल्य निश्चित करुन मिळणेबाबत मा. संशोधन संचालक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांना जा.नं. एसएसएस/ वशी/ भांडार/ ५८०७/२०१४ दि. १७.०३.२०१४ अन्वये विनंती वजा पत्र देण्यात आले होते. तथापी त्यांनी दि. १६.०४.२०१४ रोजी समक्ष चर्चेत, अखाद्य वापरासाठी करावयाचे गावरान तुपाचे किमान मुल्य निश्चित करणे हे काम आमच्या कार्यक्षेत्राचे बाहेर आहे, असे सांगीतले.

तदनंतर जा.नं. एसएसएस/ भांडार/ ५२६/२०१४ दि. २९.०४.२०१४ अन्वये मा.कार्यकारी अधिकारी, श्री शनैश्वर देवस्थान, श्रीक्षेत्र शिंगणापुर, पो.सोनई, ता.नेवासा यांना श्री शनैश्वर देवस्थानमध्ये भक्तांमार्फत श्रींचे चरणी वाहीलेल्या तेलाचा वापर/ विक्री प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती मागीतली होती. त्यांनी जा.नं. श्रीशदे/निविदा/९०/२०१४ दि.०६.०५.२०१४ रोजीचे पत्रान्वये श्री शनिदेवाचे स्वयंभू मुर्तीवर भाविकांनी श्रध्देने अर्पण केलेले तेलाचे विक्रीसाठी वर्तमानपत्रात सदर तेल खाण्या व धार्मिक विधी व्यतीरिक्त वापरासाठी घेउन जाण्यासाठी जाहीर निविदा नोटीस प्रसिध्दीस देउन

११ महिन्याचे कालावधीसाठी घेउन जाण्यासाठी सिलबंद निविदा मागविल्या जातात. सिलबंद निविदा मा.विश्वस्त मंडळाचे सभेत उघडल्या जातात व ११ महिन्यासाठी जमा होणाऱ्या अंदाजे निर्माल्य तेलाची जास्त रक्कम असलेली निविदा मंजुर केली जाते असे त्यांनी कळविले आहे.परंतु त्यांचेकडुनही प्रतिकिलो किमान मुल्य निश्‍चितीबाबत माहिती मिळालेली नाही

सिलबंद/जप्त केलेल्या एकुण १३३१ महारतन गावरान तुपाचे डब्यांची (१९,९६३.४०० कि/ग्रॅ) किंमत रु.४३,३९,०४५/- एवढी आहे. सदर सिलबंद तुपाचे डबे भांडार विभागात दि.२८.०८.२०१२ पासुन म्हणजे २१ महिन्यापासुन पडुन आहेत. सदरच्या तुपाचा साठा सुरक्षेच्या दृष्टिने जास्त दिवस ठेवणे योग्य नाही. प्रतिकिलो किमान मुल्य निश्‍चितीबाबत अधिकृत माहिती कोठेही उपलब्ध होत नाही. गावरान तुपाची खरेदी किंमत प्रतिकिलो रु. २१७.३५ इतकी आहे. तरी गावरान तुपाचे लिलावाव्दारे विक्री करणेपुर्वी प्रति किलो किमान मुल्य निश्‍चित करुन मिळणेस विनंती, म्हणजे त्या दरापासुन लिलाव प्रक्रिया सुरु करता येईल .

निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले सिलबंद/ जप्त महारतन गावरान तुप, मुळ किंमतीच्या २५ टक्के रक्कम कमी करुन उर्वरित शिल्लक रक्कम किमान मुल्य गृहीत धरणेत यावे व त्याची लिलावाव्दारे विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.५२** **माहे जुन, २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे जून, २०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | कॅनरा बँक, शिर्डी | १०/६/२०१४ | १२,०२,३९,१६६/- |
| २) | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | १२/६/२०१४ | ३७,१८,३०,०९७/- |
| ३) | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | २७/६/२०१४ | १३,१२,४६,९८५/- |
| ४) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जून २०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम** | **७२,३३,१६,२४८/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ७२.३३ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहेत.

प्रचलित कार्यपद्धतीनुसार उपलब्ध होणारी रक्कम उच्चतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांकडे गुंतविण्यात येते. त्यास अनुसरून सदर बँका संस्थानला चांगल्या बँकिंग सेवा देतात. वैधानिक लेखापरिक्षणात लेखापरिक्षकांनी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणाऱ्या बँकेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतविण्यात यावी असे सुचविले आहे. त्यास अनुसरून बँकिंग सेवा व आर्थिक फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसाठी वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या रकमेची, खाली नमूद केलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे गुंतवणूक करता येईल.

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडीयन बँक, शिर्डी
१४) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.७२.३३ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या स्थानिक, राष्ट्रीयीकृत व संस्थानला सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रु.७२.३३ मात्र कोटी रक्कमेची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५३** **संस्थानमध्ये सोने-चांदीचे मुल्यांकणकार म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दक्षिणा पेटी व काऊंटरवर श्री साईभक्त श्रींना सोने व चांदी अर्पन करीत असतात. या सोने-चांदीची शुध्दता मापून त्याचे बाजारभावाने त्या दिवशीचे मुल्यांकन केल्यानंतर सदर साईभक्तांना त्याची देणगी पावती दिली जाते. हे मुल्यांकन करण्यासाठी सध्या संस्थानने श्री गणेश नागरे, शिर्डी व श्री कमलाकर खरोटे, मनमाड या दोन मुल्यांकनकारांची नेमणूक केली आहे.

दक्षिणा पेटी व काऊंटरवर अर्पन करण्यात येणारे सोने-चांदीमध्ये सध्या सतत वाढ होत आहे. यासाठी शासन मान्यता प्राप्त असलेले आणखी मुल्यांकनकार नेमणे आवश्यक आहे. सध्या वरील संदर्भान्वये श्री सुधीर रमन वडनेरे, रा. संगमनेर यांचा संस्थानला दिनांक १६/०५/२०१२ रोजी दिलेला एक अर्ज दप्तरी आहे. संस्थानच्या वैधानिक लेखापरिक्षक यांनीही संस्थानमध्ये सोने-चांदी व मौल्यवान खडे यांचे मुल्यांकनासाठी आणखी मुल्यांकनकार नेमावेत, असा अभिप्राय दिलेला आहे. संस्थानलाही सध्या तशी गरज भासत आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे संस्थानमध्ये सोने-चांदी यांचे मुल्यांकनासाठी श्री सुधीर रमन वडनेरे, रा. संगमनेर यांची संस्थानचे अधिकृत मुल्यांकनकार म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना संस्थानच्या इतर मुल्यांकनकारांप्रमाणे मासिक मानधन देण्याच्या प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींना अर्पण होत असलेल्या सोने व चांदीमध्ये होणारी वाढ व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अभिप्राय विचारात घेता, सोने-चांदी, मौल्यवान खडे यांचे मुल्यांकनासाठी आणखी शासन मान्यता प्राप्त मुल्यांकणकार नेमणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात यावी व त्यानंतर येणाऱ्या अर्जांमधून शासन मान्यता प्राप्त मुल्यांकणकारांची नेमणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५४** **संस्थान मालमत्ता विमापॉलिसी व श्री साईभक्तांच्या अपघाती विमापॉलीसीचे नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचे मालमत्तेचे विमा संरक्षण व श्री साईभक्तांना अपघाती विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानने राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागवून न्युनतम दराच्या निविदा स्विकारून विमा संरक्षण घेतले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

**(अ) संस्थान मालमत्ता विमा-** संस्थानच्या मालमत्तेचा विमा दि.१० जुलै, २०१३ ते दि.०९ जुलै, २०१४ या एका वर्षासाठी न्युनतम दराने विमा कंपनीकडून आलेली निविदा दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी, श्रीरामपूर यांची रू.१०,११,०००/- अशी स्विकारण्यात आली होती. या विमापॉलिसीची मुदत दि.०९ जुलै,२०१४ रोजी संपत आहे.

**(ब) श्री साईभक्तांचा अपघात विमा-** संस्थान परिसरामध्ये श्री साईभक्तांना काही अपघात झाल्यास एका वेळेस २५ साईभक्तांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी संस्थानने त्यांची अपघाती विमापॉलिसी घेतली आहे. हा विमा आलेल्या निविदेतील न्युनतम दराप्रमाणे दि युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कंपनी लि. शिर्डी यांचेकडून २५ भक्तांना विमा संरक्षण देणेसाठी रू.११,००,०००/- ची विमापॉलिसी घेण्यात आली आहे. त्याचा कालावधी दि.१२ ऑगस्ट, २०१३ पासून दि.११ ऑगस्ट, २०१४ पर्यंत असल्याने सदर विमापॉलिसी दि.११ ऑगस्ट, २०१४ ला संपत आहे.

उपरोक्त **अ** आणि **ब** मध्ये नुमुद केल्याप्रमाणे विमापॉलिसींचे पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता नुतनीकरण करणे आवश्यक असल्याने विविध राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागवून त्या मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे समोर उघडून त्यातील न्युनतम दराच्या निविदा स्विकारण्यास व त्याप्रमाणे मालमत्ता विमा व कर्मचारी फिडीलिटी गॅरंटी तसेच श्री साईभक्तांच्या अपघाती विमा पॉलिसीचे पुढील १ वर्षाच्या कालावधीसाठी नुतनीकरण करून घेण्यास व त्यावर येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावास मा. त्रीसदस्य समितीचे सभेत मान्यता मिळणेस विंनती.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रू. २५,००,०००/- रक्कमेची एकत्रीत विमा खाती अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली आहे.

**निर्णय क्र.५०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील अ आणि ब मध्ये नुमुद केलेप्रमाणे संस्थान मालमत्ता विमा, कर्मचारी फिडीलिटी गॅरंटी तसेच श्री साईभक्तांच्या अपघाती विमा पॉलिसीची मुदत संपुष्टात येत असल्यामुळे पुढील १ वर्षाच्या कालावधीकरीता सदर विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणेकामी विविध राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५५ श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका- २०१४ ची खरेदी व विक्री किंमत कमी करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०८ व मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा दि.१२.०८.२०१३ चा हुकूमनामानुसार श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर २०१४ आकार (८ पेजेस) आकार २२"X३५" चे २५००० नग, प्रती नग रु.२१६/- प्रमाणे एकूण रु.५४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांना जा.नं.३३५२/२६.१०.२०१३ अन्वये श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर २०१४ आकार (८ पेजेस) आकार २२"X ३५" चे २५००० नग, प्रती नग रु.२१६/- प्रमाणे छपाई कामाचा आदेश देण्यात आला होता.

मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद, यांचेकडून उशीराने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मान्यता मिळाल्याने श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर १६९२५ नग स्विकारण्यात येऊन उर्वरित ८०७५ नगांचा पुरवठा करु नये असे संदर्भिय क्र.४ चे प्रस्तावानुसार मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांना कळविण्यात आले होते. टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांनी दुरध्वनीवरुन सांगितले की, ५०७५ नग कॅलेंडर पाठवितो सदर कॅलेंडरची विक्री झाल्यानंतर बिल आदा केले तरी चालेल त्यानुसार दि.१६.०१.२०१४ चे मंजूर प्रस्तावानुसार टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांचेकडील २२५० कॅलेंडर स्वीकारण्यात येऊन, कॅलेंडरची विक्री झाल्यानंतर बिल आदा करण्यात आले आहे.

आजरोजी काऊंटरवर श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर विक्री साठी उपलब्ध नाही. त्यांचेकडून प्राप्त झालेले सर्व कॅलेंडरची विक्री झालेली आहे.

टॅको व्हीजस् प्रा.लि., मुंबई यांनी दि.०३.०५.२०१४ चे पत्रान्वये त्यांचेकडे छपाई होऊन शिल्लक असलेले २५०० कॅलेंडर्स असंख्य साईभक्तांना विकत घेता यावे म्हणुन उर्वरीत कॅलेंडर्सची खरेदी किंमत रु २१६/- ऐवजी रु ८५ /- ठेवावी व विक्री किंमत २२५/- ऐवजी रु १००/- ठेवावी,त्यामुळे खरेदी किंमत रु.१३१/- व विक्री किंमत रु १२५/- ने कमी होईल. ह्यामुळे संस्थानचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही. उलट संस्थानला रु.३७५००/- जमा होतील. टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांना कॅलेंडरची पूर्ण विक्री झाल्यानंतर बिल आदा करता येईल.

सदरचे कॅलेंडर हे आकर्षीत व फोटोंची डिझाईन चांगल्याप्रकारे केलेली असल्याने, किंमत ही निम्म्याने कमी होत असल्यामुळे साईभक्तांना कॅलेंडर अल्प दरात मिळेल, विक्रीसाठी चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळू शकेल. त्यामुळे सदरचे २५०० नग कॅलेंडर्स टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून स्वीकारणेस व विक्री किंमत रु.२२५/- ऐवजी रु.१००/- प्रमाणे विक्री करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५६ श्री साईलिला द्वैमासिक मराठी, हिंदी-इंग्रजी अंक २०१४-२०१५ छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीचे वतीने श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाई करुन वर्गणीदारांना पाठविले जातात.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७०८ व मा.मुंबई उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद दि.१२.०८.२०१३ चे मान्यतेनुसार सन २०१३-२०१४ चे साईलीला अंक छपाईकामी मान्यता मिळाल्याने ई टेंडर पद्धतीने निविदा मागवून निम्नतम दराचे प्रेसधारक मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि.मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/३१४६/२०१३ दि.१५.१०.२०१३ नुसार कार्यादेश देण्यात आला असून, त्याची मुदत सप्टेंबर-ऑक्टोबर २०१४ अखेर संपत आहे.

**श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाई**

| अ. नं | तपशिल | प्रति महा छपाई संख्या | मंजूर दर रुपये पैसे | वार्षिक वर्गणी | किरकोळ विक्री |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (५अंक) ३२ + ४ पाने =३६ पाने | १५,००० नग | १०.७५ | ५०/- | ८/- |
| ०२ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४ +४ = ६८ पाने | १५,००० नग | १८.३० | | १५/- |
| ०३ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (५अंक) ३२ +४ =३६ पाने | १७,००० नग | १०.६५ | ५०/- | ८/- |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१ अंक) ६४ +४ =६८ पाने | १७,००० नग | १८.०० | | १५/- |

सन २०१४-१५ (माहे नोव्हेंबर- डिसेंबर २०१४ ते सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५) या कालावधीसाठी मुंबई कार्यालय यांनी मुंबई कार्यालय यांचे दि.१३.०५.२०१४ चे पत्रानुसार वर्गणीदारांची संख्या कळविलेनुसार प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

**श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाई**

| अ. नं | तपशिल | द्वैमासिक अंदाजे छपाई संख्या | एकूण छपाई संख्या | अंदाजे दर रुपये पैसे | अंदाजे दराने अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (५अंक) ३२ + ४ पाने =३६ पाने | ९,००० नग | ४५००० | १५.०० | ६७५०००.०० |
| ०२ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४ +४ = ६८ पाने | ९,००० नग | ९००० | २५.०० | २२५०००.०० |
| ०३ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (५अंक) ३२ +४ =३६ पाने | १४,००० नग | ७०००० | १५.०० | १०५००००.०० |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१ अंक) ६४ +४ =६८ पाने | १४,००० नग | १४००० | २५.०० | ३५००००.०० |
| | | | | **एकूण खर्च रु.** | **२३०००००/-** |

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औ ंगाबाद खंडपीठाने संदर्भीय हुकूमनाम्यान्वये दि.२१.१२.२०१२ पासून पुढे प्रकाशनांची छपाई करुन घेतांना वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन, निविदा मागवून प्रकाशनांची छपाई करुन घेणेबाबत आदेश आहेत. त्यानुसार प्रकाशने छपाईकामी वृत्तपत्रात जाहीरात देऊन निविदा मागणी कराव्या लागतील छपाईकामी अंदाजे रक्कम रु.२३,००,०००/- (अक्षरी रुपये तेविस लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे. छपाई खर्च १० लाखापेक्षा जास्त असल्याने व्यवस्थापन समितीचे सभेची खर्चास मान्यता मिळालेनंतर मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

सन २०१४-१५ चे अंदाज पत्रकात साईलीला अंक छपाई खर्च खाते रु.६२,५०,०००/- ची तरतूद करणेत आली असून, त्यातून सदर खर्च करता येईल. प्रकाशनांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब खालील बाबींवर निर्णय होणेस सादर.

१) साईलीला द्वैमासिक अंकाचे प्रस्तावीत छपाईस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२३,००,०००/- (अक्षरी रुपये तेविस लाख) चे खर्चास मान्यता असावी.

२) प्रस्तावित छपाई खर्च रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) पेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालयाचे मंजूरीसाठी प्रस्ताव दाखल करणेस मान्यता असावी.

३) प्रस्तावित छपाईकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेकामी येणा-या खर्चास मान्यता असावी.

४) विहीत पद्धतीने ई-निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५७** **संस्थानचे वेबसाईटसाठी स्वतंत्र वेब सर्व्हरवर भाडेतत्वावर घेणेत आलेल्या जागेचे (Web Space) नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५२.

**प्रास्ताविक :**श्री साईभक्तांना संस्थान विषयी माहिती-सेवा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानने स्वतःची अधिकृत वेबसाईट (website) url :- www.shrisaibabasansthan.org या नावाने दिनांक २१ नोव्हेंबर, १९९८ पासून सुरु केलेली आहे. या वेबसाईटसाठी आवश्यक असणाऱ्या वेबसर्व्हर होस्टींगचे काम Institute of Advanced Studies, Nagpur ही संस्था पाहत असून, संकेतस्थळ सुरळीत सुरु ठेवणेसाठी ०१ एप्रिल, २०१२ ते दिनांक ३१ मार्च, २०१३ या कालावधीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेचे दिनांक ०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५२ नुसार People Connect Managed Servers या कंपनीकडे असलेल्या खालील स्वतंत्र वेबसर्व्हरवर संस्थानच्या संकेतस्थळासाठी जागा (Space) भाडेतत्वावर खरेदी करण्यात आलेली आहे. याकामी People Connect Managed Servers यांना संस्थानमार्फत दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि.३१ मार्च २०१४ पर्यंतचे कालावधीसाठी रुपये ९५,०००/- मात्र दोन टप्यांत अदा करण्यात आलेली आहे.

संस्थानची वेबसाईट होस्ट करणेकामी सदर कंपनीमार्फत खालील Configuration असलेले सर्व्हर वापरात होते.

Intel / AMD P4 2.4 GHZ of Higher,1 GB RAM,
Windows 2003 WEB SERVER OS,
HDD Capacity 80GB
Monthly Bandwidth allocation-1500 GB

परंतु दि.२१/०५/२०१४ रोजीचे पत्रानुसार Institute of Advanced Studies, Nagpur यांनी पूर्वीपेक्षा जास्त क्षमता असलेला सर्व्हर संस्थानचे वेबसाईट होस्टींग करीता वापरण्यास सुरुवात केली आहे. नविन सर्व्हरचे Configuration खालील प्रमाणे.

Processor :- Core 2 duo 2.6 ghz x 2
Storage :- Dual Hard drive, Secondary for Backup-250 GB x 2
Operating System :- Windows 2008 Server OS 64 Bit.
Ram:- 4 GB Memary
Network :- 100 MBPS Network Port.
Bandwidth :- 750 GB Monthly Bandwidth

संस्थानचे वेबसाईटवर विविध बँकेमार्फत पेमेंट गेटवेव्दारे देणगी स्विकारणेची सुविधा, श्री साईभक्तांसाठी वेबसाईटवर ऑनलाईन दर्शन सुविधा, तसेच संस्थानची विविध माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या सर्व्हरव्दारे भक्तांसाठीच्या सर्व सुविधा अतिशय सुरळीत चालू आहे. संस्थानचे वेबसाईटच्या Hosting ची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर संपुष्टात आली आहे. संस्थानची वेबसाईट व पेमेंट गेटवे सुविधा साईभक्तांसाठी सुरळीत चालू ठेवणे आवश्यक असून, सदर जागेचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

**मागणी:** Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून उपरोक्त वेबसर्व्हरवर घेण्यात आलेल्या जागेचे पुढील दिनांक ०१ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३१ मार्च, २०१५ या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनिकरण करणे साठी दरपत्रक प्राप्त झाले असून, त्यांनी एक वर्षासाठी रु.९५,०००/- (करासहीत) पर्यंतचा खर्च कळविलेला आहे. सदर रक्कम त्यांना मागील प्रमाणेच दोन टप्यात अदा करता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :** Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत People Connect Managed Services Mumbai या कंपनीकडून संस्थान वेबसाईटसाठी घेण्यात आलेल्या स्वतंत्र वेबसर्व्हरवरील जागेचे (Web Hosting) चे दिनांक ०१ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३१ मार्च, २०१५ या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनीकरण करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रुपये ९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत People Connect Managed Services Mumbai या कंपनीकडून संस्थान वेबसाईटसाठी घेण्यात आलेल्या स्वतंत्र वेबसर्व्हरवरील जागेचे (Web Hosting) चे दिनांक ०१ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३१ मार्च, २०१५ या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनीकरण करणेस व याकामी येणाऱ्या रु.९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.५८ लाडू पॅकींग मशिन देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रास्ताविकः-** दिनांक १५.८.२०१३ पासून प्रत्येक साईभक्तांला दर्शन लाईनमधून दोन लाडूचे पॅकेट मोफत देण्यात येत आहे. तसेच तीन लाडूचे एक पॅकेट रक्कम रु. २०/- याप्रमाणे विक्री काऊटर वरुन विक्री करण्यात येत आहे. भक्तांना दर्शन लाईन मध्ये व विक्रीसाठी पुरेशा प्रमाणात लाडु तयार करणेकरीता दोन लाडू कॉन्ट्रक्टरची दोन स्वतंत्र किचनमध्ये व्यवस्था केलेली आहे. दररोज सरासरी ५० हजार लाडू पॅकेट दर्शन लाईनमध्ये व २० हजार लाडू पॅकेटाची विक्री करण्यात येत आहे.

श्री अन्सीलरी इंडस्ट्रीज, मुंबई द्वारा श्री जी. वाय. कदम व त्यांचे कुंटुंब हे साईभक्त साईच्या दर्शनासाठी आले असता त्यांना दर्शन लाईनमध्ये लाडुचे पॅकेट मिळाले. लाडूचे पॅकेट पाहिलेनंतर त्यांनी लाडू पॅकींग करणेकरीता एक अत्याधुनिक मशिन देणगी देणेची उपरोक्त संदर्भिय लेखी पत्राने इच्छा व्यक्त केली आहे.

**मागणीः-** श्री अन्सीलरी इंडस्ट्रीज, मुंबई यांनी विविध खाद्य पदार्थ पॅकींगसाठी त्यांचे पत्रानुसार १२०० मशिन बनविलेले आहे. तसेच वेगवेगळया कंपन्यांच्या उत्पादन पॅकींगकरीता आम्ही उत्पादीत केलेल्या पॅकींग मशिन्स देश/विदेशात कार्यरत असल्याचे कळविले आहे. प्रस्तुत साईभक्ताच्या पत्रानूसार संस्थानचेवतीने प्रसादालय स्टाफ मशिनची उपयुक्तता,गुणवत्ता व देणगी पश्चात सर्व्हीस सेट-अपची खातरजमा करणेस प्रशासकिय अधिकारी, श्री उत्तमराव गोंदकर, श्री ए.जी. जगताप, सहाय्यक अभियंता, श्री संजय शिंदे, लिपीक, श्री नवनाथ मते, लिपीक हे त्यांचे कंपनीमध्ये समक्ष गेले होते. त्यावेळी इतर उत्पादनांच्या पॅकींग मशिन बनविणेची कार्यवाही चालू होती. संस्थानला देणगी स्वरुपात देण्यात येणाऱ्या मशिनची श्री अन्सीलरी इंडस्ट्रीज, मुंबई यांनी अंदाजे रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) एवढी किमंत कळविलेली आहे. सदरचे मशिन देणगी स्विकारणेस व श्री अन्सीलरी इंडस्ट्रीज, मुंबई यांना सदर रक्कमेची देणगी पावती देणेकामी मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- श्री अन्सीलरी इंडस्ट्रीज, मुंबई द्वारा श्री जी. वाय. कदम यांचेकडून अंदाजे रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी रु.पाच लाख मात्र) किमंतीचे लाडू पॅकींग मशिन देणगी स्वरुपात स्विकारणेस व त्याप्रमाणे देणगी पावती करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय प्रशासकीय मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५९ नाष्टा पाकिट उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे विक्रीचे दरात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद**:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रास्तविक :-** सन १९८९-१९९० पासून साईभक्तांचे सोईसाठी नाष्टापाकीटे तयार करुन विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर नाष्टापाकीटामध्ये खालीलप्रमाणे पदार्थ देण्यात येतात.

१) पुरी नग - ०५ अंदाजे वजन - १२५ ग्रॅम
२) कडधान्य भाजी अंदाजे वजन - ०५० ग्रॅम
३) बर्फी वडी अंदाजे वजन - ०२५ ग्रॅम
**एकूण वजन - २०० ग्रॅम**

नाष्टापाकीटाची विक्री सुरु करतांना रु.२.५० प्रमाणे विक्री करण्यात आलेली आहे. सन २००४ मध्ये प्रती पाकीटास रु.४.२५ खर्च येत असल्याने व सुट्टया नाणी व अपुर्णांकीत रक्कम या अडचणीबाबत विचार होऊन मा.व्यवसस्थापन समिती दिनांक १७/११/२००४ चे सभेतील निर्णय क्रं.११५ अन्वये दिनांक १ जानेवारी २००५ पासून नाष्टापाकीटाची किंमत रु.२.५० ऐवजी रु.३.०० करण्यात आलेली होती. त्यानंतर नाष्टापाकीटाचा उत्पादन खर्च वाढल्याने मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२५५ अन्वये नाष्टापाकीटाची किंमत रु.३.०० ऐवजी रु.४.०० करण्यात आलेली आहे. तेव्हांपासून आजतागायत नाष्टापाकीटाची किंमत प्रती पाकीटास रु.४/- घेण्यात येत आहे.

सध्या सर्वच किराणा मालाचे व मजुरीचे दरात वाढ झाल्यामुळे नाष्टापाकीटाचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. माहे एप्रिल-१३ ते मार्च-१४ या आर्थिक वर्षात नाष्टापाकीट तयार करणेकामी झालेल्या खर्चाचा सर्व समावेशक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| महिना/वर्षे | प्रती पाकीटास येणारा खर्च रु. पै. | महिना/वर्षे | प्रती पाकीटास येणारा खर्च रु. पै. | एकूण | एकूण महिने | प्रती पाकीट वार्षिक सरासरी पडलेला दर |
|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल-१३ | १०.७२ | ऑक्टोबर-१३ | १०.५५ | | | |
| मे-१३ | ९.९८ | नोव्हेंबर-१३ | ११.५३ | | | |
| जुन-१३ | १०.१३ | डिसेंबर-१३ | १०.७६ | | | |
| जुलै-१३ | १०.३७ | जानेवारी-२०१४ | १०.७४ | | | |
| ऑगस्ट-१३ | ११.१८ | फेब्रुवारी-२०१४ | १२.३३ | | | |
| सप्टेंबर-१३ | १०.८८ | मार्च-२०१४ | ११.०१ | | | |
| **एकूण =** | **६३.२६** | **एकूण =** | **६६.९२** | **१३०.१८** | **÷ १२** | **= रु. १०.८४** |

उपरोक्तप्रमाणे प्रती नाष्टापाकीटास सरासरी **रु.१०.८४** इतका खर्च येत असून संस्थानकडून साई भक्तांच्या सेवेसाठी फक्त रु.४.०० या सवलतीचे अल्पदरात विक्री करण्यात येत आहे, संस्थानला प्रती पाकीटामागे **रु.६.८४** इतकी जादा तुट येते.

साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणानूसार प्रती दिनी ८००० ते १५,००० नाष्टापाकीटाची विक्री होत असते. त्यानूसार माहे एप्रिल-२०१३ ते मार्च-२०१४ या १२ महिन्यात खालीलप्रमाणे नाष्टापाकीटांची विक्री झालेली आहे.

| महिना/वर्षे | नाष्टापाकीटे विक्री संख्या | महिना/वर्षे | नाष्टापाकीटे विक्री संख्या | १ वर्षातील नाष्टापाकीटे विक्री संख्या |
|---|---|---|---|---|
| एप्रिल-१३ | २,८०,३६९ | ऑक्टोबर-१३ | ३,०६,९४९ | |
| मे-१३ | २,९४,४२८ | नोव्हेंबर-१३ | २,८७,२५८ | |
| जुन-१३ | २,९४,६८९ | डिसेंबर-१३ | ३,५३,९९४ | |
| जुलै-१३ | २,८६,७०७ | जानेवारी-२०१४ | ३,४३,२२८ | |
| ऑगस्ट-१३ | २,६३,०९१ | फेब्रुवारी-२०१४ | २,८६,३६१ | |
| सप्टेंबर-१३ | २,७१,६४४ | मार्च-२०१४ | २,८०,६६१ | |
| **एकूण =** | **१६,९०,९२८** | **+ एकूण =** | **१८,१८,४५१** | **= ३५,४९,३७९** |

= एकूण पाकीट विक्री संख्या ३५,४९,३७९ ÷ ३६५ दिवस = ९,७२४ प्रती दिनी सरासरी

| | |
|---|---|
| १ वर्षातील एकूण नाष्टापाकीटे विक्री संख्या | ३५,४९,३७९ |
| प्रती नाष्टापाकीटास होणारी तुट रु. x | रु. ६.८४ |
| **सन २०१३-२०१४ या वर्षातील नाष्टापाकीटाचे निर्धारीत विक्रीतून एकूण झालेली वार्षिक तुट रुपये =** | **२,४२,७७,७५२/-** |

कॅन्टीन विभागाकडील दिनांक ०५/०५/२०१४ रोजीचे चहा, कॉफी, दुधाचे दरवाढीबाबतचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी नाष्टापाकीटाचेही दर रु.४ ऐवजी रु.५/- करणेबाबत सुचना केलेली आहे. त्यानूसार नाष्टापाकीटाचे प्रती नग विक्री किंमतीत रु.१/- (रु.४/- ऐवजी रु.५/-) ने वाढ केल्यास वरील होणारी तुट अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/- ते ४०,००,०००/- ने कमी होईल म्हणजेच साईभक्तांना नाष्टापाकीटाचे स्वरुपातून वार्षिक रु.२,०२,७७,७५२/- (अक्षरी रु.दोन कोटी दोन लाख सत्याहत्तर हजार सातशे बावन्न मात्र) रक्कमेची आर्थिक सवलत दिली जाणार आहे.

**मागणीः-** प्रस्तावित केलेप्रमाणे सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** नाष्टापाकीटाचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असल्यामुळे व नाष्टापाकीटे बनवून विक्री करतांना संस्थानला होणाऱ्या तुटीचा खर्च यावर विचार होवून नाष्टापाकीटाचे विक्रीचे दरात वाढ करणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, अन्न पाकिटांच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे त्यांच्या विक्रीचे दरात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.६० सन २०१३- २०१४ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामध्ये दररोज अंदाजे ३५,००० ते ४०,००० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून उत्सवामध्ये ही संख्या वाढून ८०,००० ते ९०,००० पर्यंत जाते. दररोज सुमारे सरासरी ९००० अन्नपाकीटे व अंदाजे २५ ते २६ हजार मोतीचूर लाडूंची विक्री होत असून ७० ते ७५ हजार मोतीचूर

लाडू दर्शनलाइनमधून दर्शन घेणाऱ्या साईभक्तांना मोफत वाटप करण्यात येतात. त्याकामी लागणारा किराणा माल, धान्य-कडधान्य व डाळी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येतात. सदर माल मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो, निवडला जातो. गहू व हरबराडाळ दळण्यात येत असुन दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळणकांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. वातावरणातील बदलामुळे ही वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते.

मा. व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्र.५६० अन्वये सन २००७-२००८ या वर्षात आलेली प्रत्यक्ष घट-तुट खर्ची टाकणेत आलेली होती. मात्र सदरील घट-तुटीस मान्यता देतांना मा.श्री.अभय शास्त्री, मा.श्री.ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील कलावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्र.५६० नूसार मान्यता मिळालेली आहे.

१) सन २००७-२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिण्यानंतर प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिस्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनुसार दरवर्षी प्रसादालयातील आर्थिक वर्षामध्ये एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालात प्रत्यक्ष आलेल्या घट-तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती. खालील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.त्रीसदस्य समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

<u>सन २०१३-२०१४ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशील.</u>

| अ.नं. | मालाचा तपशिल | दि.०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ अखेर | | घट तुटीचे प्रमाण | मान्य घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष झालेला खर्च | प्रत्यक्ष आलेली घट-तुट | | |
| | | किग्रॅ.मध्ये | किग्रॅ.मध्ये | किग्रॅ.मध्ये | किग्रॅ.मध्ये |
| **१** | गहू | १३६३२१०.००० | २८०७५.००० | २.०५९ | ३.००० |
| २ | **तांदूळ** | ९०००0१.५०० | ६२६८.००० | ०.६९६ | १.००० |
| **३** | **तूरडाळ** | २०२२२०.५०० | १४४२.००० | ०.७१३ | १.००० |
| **४** | हरबराडाळ | ७५९३२४.४०० | १०१७३.००० | १.३३९ | २.००० |
| **५** | मुगडाळ | १६९९६.३५० | १३८.००० | ०.८११ | १.००० |
| **६** | गुळ | २५७८१.३०० | १६६.००० | ०.६४३ | १.००० |
| **७** | रवा | २६२३७.५०० | १८३.००० | ०.६९७ | १.००० |
| **८** | शेंगदाणे | ४५१७०.८०० | ४००.००० | ०.८८५ | १.००० |
| **९** | मिरची | १५६२८.५०० | ४७०.००० | ३.००७ | ४.००० |
| **१०** | हळद | ९६९४.७५० | ३११.७५० | ३.२१५ | ४.००० |
| **११** | मोहरी | ५२३७.५५० | ८२.२५० | १.५७० | २.००० |
| **१२** | जिरे | ५८६७.९०० | १०२.५०० | १.७४६ | २.००० |
| **१३** | मसाला | २९८९.४५० | ५६.७५० | १.८९८ | २.२५० |
| **१४** | धनेपावडर | १३४५३.००० | २९१.००० | २.१६३ | २.५०० |
| **१५** | खोबरेवाटी | १४६०४.४०० | ९५.०० | ०.६५० | १.००० |
| **१६** | हिरवी विलायची | ४९१९.५३५ | ४१.७५० | ०.८४८ | १.००० |
| **१७** | हरबरा | ७७६४५.७०० | ७०२.००० | ०.९०४ | १.००० |
| **१८** | वाटाणा | ५६४२४.००० | ४७६.७५० | ०.८४४ | १.००० |
| **१९** | मुग | ७४७९९.०५० | ६८६.००० | ०.९१७ | १.००० |
| **२०** | मठ | ८९५५२.००० | ७९१.००० | ०.८८३ | १.००० |
| **२१** | मेथी | ८०.३५० | १.६५० | २.०५३ | २.२५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२२** | सुंठ | २६०.१०० | १३.००० | ४.९९८ | ५.२५० |
| **२३** | मैदा | ६२८३५.००० | २६९.००० | ०.४२८ | ०.५०० |
| **२४** | भगर | ४५७.००० | ७.००० | १.५३१ | २.००० |
| **२५** | साबुदाणा | २५२२३.००० | २२८.००० | ०.९०३ | १.२५० |
| **२६** | कच्चे पोहे | ७७९.००० | ७.५०० | ०.९६२ | १.००० |
| **२७** | भाजके पोहे | २३०५.००० | ६५.००० | २.८१९ | ४.००० |
| **२८** | डाळ्या | ५९९.००० | ६.००० | १.००१ | १.२५० |

तरी उपरोक्तप्रमाणे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या घट-तुटीच्या अहवालास प्रशासकीय मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३- २०१४ या आर्थिक वषामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.६१** **थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेचे स्पेअरपार्ट खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद**:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रास्तविक:-** श्री साईप्रसादालयात इंधन खर्चात कपात व्हावी या उद्देशाने प्रसादलाडू बुंदी तळणेकामी तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सन २००९ मध्ये थर्मेक्स मेक थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली. यंत्रणा कार्यान्वीत केलेमुळे खालील प्रकारे फायदा झालेला आहे.

१. प्रतीदिन २६० किलो एल पी गॅसची बचत
२. कर्मचाऱ्यांना काम करतांना उष्णतेचा त्रास होत नाही.
३. तळलेली बुंदी एकसारख्या तापमानामुळे करपत नाही तसेच व्यवस्थितरीत्या तळली जाते.
४. तापमानाचे ॲटोमॅटींक नियंत्रण असल्यामुळे तुप कमी लागते व गॅसची बचत होते.
५. कुठल्याही प्रकारचा आवाज, धुर निघत नाही.

प्रस्तुत यंत्रणा सन २००९ पासून अहोरात्र कार्यान्वीत आहे. यंत्रणा देखभालीचे काम इकडील तांत्रिक कर्मचारी करतात मात्र वार्षिक पद्धतीने दुरुस्तीचे काम थर्मेक्स इंडीयाची अधिकृत सर्व्हिस एजन्सी मॅक्सथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देणेत आलेले आहे.

सततच्या वापरामुळे दि.१४/०५/२०१४ रात्री २.३० पासून यंत्रणेचा सिक्वेन्स कंट्रोलर, Model No.LGB-21.330A2EM (इलेक्ट्रॉनिक परदेशी बनावटीचा स्पेअर पार्ट) नादुरुस्त झालेमुळे यंत्रणा बंद पडलेली आहे. इकडील तंत्रज्ञांमार्फत यंत्रणा दुरुस्तीत प्रयत्न करण्यात आला तथापि यंत्रणा दुरुस्त होऊ शकली नाही. त्यामुळे दि.२०/०५/२०१४ रोजी सर्व्हिस एजन्सीला फोन करुन त्वरीत सर्व्हिस टेक्नीशियन बोलविण्यात आले. दि.२१/०५/२०१४ रोजी सर्व्हिस टेक्निशियन यांनी यंत्रणा तपासली असता यंत्रणेचा गॅस बर्नरचा परदेशी (जर्मन) बनावटीचा स्पेअरपार्ट सिक्वेन्स कंट्रोलर खराब झालेचे आढळून आले. यंत्रणा ब्रेकडाऊन विरहीत सतत कार्यरत राहणेकरीता तसेच इम्पोंटेड पार्ट मिळणेस वेळ लागत असल्याने खालील इंम्पोर्टेड गॅस बर्नर (Model No.LBI-608BLU 350P) चे स्पेअरपार्ट स्टॉक मध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे इमेल दरपत्रकानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Part No | Name of Sparepart | QTY. | Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | P21ESP1230 | Air Pressure Switch | 1 | 7393.00 | 7,393.00 |
| 2 | P21ESP2340 | Gas pressure Switch | 1 | 7570.00 | 7,570.00 |
| 3 | P21ESP2350 | Gas valve Dungs | 1 | 32134.00 | 32,134.00 |
| 4 | P21ESP2360 | Coil Dungs SV 507 | 1 | 51499.00 | 51,499.00 |
| 5 | P21ESP2370 | Gas Valve Dungs SV 507 | 1 | 32152.00 | 32,152.00 |
| 6 | P21ESP1120 | Motor 300 W Simil | 1 | 28114.00 | 28,114.00 |
| 7. | P21ESP1170 | Fan | 1 | 4082.00 | 4,082.00 |
| 8 | P21ESP1160 | Ignition Electrode | 1 | 1628.00 | 1,628.00 |
| 9 | P21ESP1200 | Ignition Cable | 1 | 820.00 | 820.00 |
| 10 | P21ESP1640 | Ignition Transformer | 1 | 10638.00 | 10,638.00 |
| 11 | P21ESP2030 | Front Disc | 1 | 5067.00 | 5,067.00 |
| 12.. | P21ESP2020 | Rear Disc | 1 | 2112.00 | 2,112.00 |
| 13. | P21ESP2400 | Firing Head | 1 | 56292.00 | 56,292.00 |
| 14 | P21ESP2040 | Blast Tube | 1 | 13950.00 | 13,950.00 |
| 15 | P21ESP1530 | Control Box Lands LGB- 21 | 1 | 32137.00 | 32,137.00 |
| 16 | | Control box Base | 1 | 3730.00 | 3,730.00 |

| | | |
|---|---|---|
| | Vat 12.5% | 36,164.75 |
| | Total | 3,25,482.75 |
| | **Grant Tatal** | **3,25,483.00** |

**मागणी:-** उपरोक्त स्पेअरपार्ट मार्केटमध्ये अन्यत्र उपलब्ध होणेस अडचण येते त्यामुळे थर्मेक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करता येतील. त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,२५,४८३/- चे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी वरीलप्रमाणे स्पेअरपार्ट मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,२५,४८३/- चे खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्य) समीतीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसालयामधील थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेचे स्पेअरपार्ट, थर्मेक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.३,२५,४८३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.६२** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये रिक्त असलेले सहाय्यक शिक्षक व पुर्णवेळ विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक यांची भरती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये रिक्त असलेल्या सहा.शिक्षक व पूर्णवेळ विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक यांची शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील नेमणूकांबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे सादर करण्यात आला होता. (Page- ७)

**Point No- 5:** The applicant submits that due to increase in the strength of the divisions and strength of the students, five posts of Assistant Teacher are required having H.S.C. D.Ed. qualification in Science stream. The reservation worked out for the said posts are SC category one post, O.B.C. category two posts and Open category two posts.

**Point No- 6:** The applicant submits that for 8th to 10th standard i.e. secondary division, one post requiring B.A.B.Ed. Teacher from SC/ ST/ VJ/ NT has fallen vacant requiring B.A.B.Ed. (English) special qualification and also one post of Lab Assistant as the strength of the students from 8th to 10th standard is more than 300 students. Thus, there are total six posts of Teachers and one posts of Lab Assistant are required to be filled in on urgent basis in order to avoid the loss to the students for want of Teacher.

**Point No- 7:** The applicant submits that a decision in that regard is taken in the meeting of the Committee held on 7.2.2013. For ready reference copy of the decision of the Committee in meeting held on 7.2.2013 in annexed hereto and marked at EXHIBIT-C.

**Point No- 8:**Applicant submits that the school in question is not receiving any grant from the State Government and the staffing pattern is prescribed on the basis of need and increase in the number of students. Due to good reputation earn by the school, there is increase in the strength of the students due to which the above said posts of six teachers (five on the establishment of primary section and one on the establishment of secondary section) and one posts of Lab Assistant are required to be filled in on urgent basis.

संदर्भ क्र.२ नुसार मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे दि.१३/०४/२०१४ रोजी खालील प्रमाणे निकाल दिलेला आहे. (Page- ४)

**Point No-10:** Considering the reasons assigned in the applications, we permit the Ad hoc Committee to cause an advertisement, inviting applications from deserving and eligible candidates for the posts, in question and conduct recruitment process, permissible by law.

**Point No-11:** The Committee is at liberty to contact the subject Experts in the filed, viz. Dr. Sudhir Gavhane ; Dr. Dinkar Borikar; Dr. Pandharipande (Vice chancellor of BAMU university); Kishore Gadhavepatil, Advocate High Court.

**Point No-12:** From above referred names, three persons should be nominated on the panel on their willingness and appropriate decision shall be taken by the Committee. Both the CA Nos. 15692/2013 & 15693/2013 are disposed of in aforesaid terms.

तरी भरती प्रक्रीया सुरु करणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये रिक्त असलेले सहाय्यक शिक्षक, पुर्णवेळ विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक यांची मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे भरती प्रक्रिया सुरु करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.६३ कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त असलेल्या शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त असलेल्या शिक्षक व प्रयोग शाळा सहाय्यक यांच्या नेमणूकांबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि. ०७/०२/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.१०५ नुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे सादर करणेत आला होता.

**1)** The applicant submit that due to increase in the strength of the divisions and strength of the students, two posts of Full Time Lecturer/ Teacher in Physics and Chemistry are required having M.Sc. B.Ed. qualification. The reservation worked out for the said posts are SC/ST category.

**2)** The applicant submit that one post of part time in Environment Science subject requiring M.Sc.B.Ed. qualification is required to be filled in.

**3)** The applicant submit that Two post of Lab Assistant from SC/ST category requiring B.Sc. (Bio) qualification and I.T. (B.C.S.) from SC/ST category required to be filled in on urgent basis as the strength of the students is increased. Thus, There are total two posts of Full time Teacher in Physics and Chemistry from SC/ST category requiring M.Sc.B.Ed. qualification, one part - time post in Environment Science requiring M.Sc. B. Ed. qualification, two post of Lab Assistant from SC/ST category requiring B.Sc. (Bio) and I.T. (B.C.S.) qualification required to be filled in on urgent basis in order to avoid the loss to the students for want of Teacher.

**4)** The applicant submit that a decision in that regard is taken in the meeting of the Committee held on 7.2.2013. For ready reference copy of the decision of the Committee in meeting held on 7.2.2013 is annexed here to and marked at **EXHIBIT-C.**

वरील मुद्यावर मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे दि. १३/०३/२०१४ चे निकाल पत्रामध्ये खालीलप्रमाणे निकाल दिला आहे.

**1)** By CA Nos.15692/2013 and 15693/2013, the committee has requested to permit it to fill up respective posts on the establishment of Saibaba junior college and Secondary School run by the Sansthan.

**2)** Considering the reasons assigned in the applications, we permit the Ad hoc committee to cause an advertisement, inviting application from deserving and eligible candidates for the posts, in question and conduct recruitment process, permissible by law.

**3)** The committee is at liberty to contact the subject experts in the filed, viz.Dr. Sudhir Gavhane; Dr. Dinkar Borikar; Dr. Pandharipande (Vice Chancellor of BAMU university); Kishore Gadhave Patil, Advocate High court.

**4)** From above referred names, three persons should be nominated on the panel on their willingness and appropriate decision shall be taken by the committee. Both the CA Nos.15692/2013 & 15693/2013 are disposed of aforesaid terms.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांनी नियुक्त केलेल्या कमिटीचे प्रतिनीधी यांना देणेकामीचे मानधन रक्कम, प्रवास खर्च तसेच रिक्त पदे भरणेकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेकामी अंदाजे रु. १,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी मा.उच्च न्यायालयाने सुचविलेल्या मान्यवरांशी संपर्क साधून भरती प्रक्रिया सुरु करणेस तसेच मान्यवरोचे मानधन व वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी अंदाजे रु. १,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली सहाय्यक शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक हि पदे भरणेकामी मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे भरती प्रक्रिया सुरु करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच, याकामी प्रथमतः वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, योग्य व लायक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत यावेत, या जाहिरातीकामी व मुलाखतीसाठी आमंत्रित करणेत आलेल्या मान्यवरांचे मानधन देणेकामी येणाऱ्या रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.६४ कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोगशाळेकरीता लॅब मटेरियल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ.११वी व इ.१२वी कला व वाणिज्य शाखेच्या प्रत्येकी दोन तुकडया आहेत. इ.११वी/ इ.१२वी कला व वाणिज्य शाखेची एकूण प्रवेश क्षमता ६४० आहे. सन २०१३-१४ मध्ये इ.११ वी विज्ञान शाखेची तिसरी तुकडी सुरु करण्यात आली असून नैसर्गिक वाढीने २०१४-१५ मध्ये इ.१२ वी विज्ञान शाखेची तिसरी तुकडी सुरु होईल. इ.११ वी विज्ञान शाखेत २४० विद्यार्थी प्रवेश क्षमता असून इ.१२ वी विज्ञान शाखेत २४० विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. इ.११वी व १२वी विज्ञान शाखेचे एकूण ०६ तुकडयातील ४८० विद्यार्थी असतील.

सन २०१४-१५ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण १४ वर्ग तुकडयामधील विद्यार्थी प्रवेश क्षमता ११२० असणार आहे.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रयोग शाळेकरीता इ.११ वी व इ.१२ वी विज्ञान शाखेच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विज्ञान विषयांच्या प्रयोगशाळेत विद्यार्थ्याची दैनंदिन सराव, प्रात्यक्षिकपरीक्षा घेण्यासाठी वार्षिक लॅब मटेरियल खरेदी करावयाचे आहे.विज्ञान शाखेच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या प्रयोगशाळेकरीता सोबतचे यादीत नमुद केलेप्रमाणे लॅब मटेरियल खरेदी करावयांचे आहे.त्यास एकूण अंदाजे खर्च खालीलप्रमाणे येणार आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **रक्कम** |
|---|---|---|
| १ | A) Physics Laboratory Requirement No 1 to 33 | 69931.00 |
| २ | B) Chemistry Laboratory Requirements No 1 to 53 | 50050.00 |
| ३ | C) Biology Laboratory Requirements No 1 to 31 | 30575.00 |
| | **Total Amount Rs.** | **150556.00** |

उपरोक्त प्रमाणे प्रयोशाळा लॅब मटेरियल खरेदी कामी एकूण रु. १,५०,५५६/- (अक्षरी रुपये- एक लाख, पन्नास हजार, पाचशे छपन्न) मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. विज्ञान विषयांच्या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना दैनंदिन सराव, प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी वार्षिक लॅब मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे वार्षिक प्रयोशाळा लॅब मटेरियल खरेदी कामी अंदाजे रु. १,५०,०००/- मात्र पर्यंतच्या खर्चास तसेच प्रयोशाळा लॅब मटेरियल प्रचलीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोगशाळेकरीता वार्षिक लॅब मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.६५ कनिष्ठ महाविद्यालयाकरीता उत्तरपत्रिका छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** कनिष्ठ महाविद्यालयातील इ.१२ कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत ५८१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच इ.११ वी माहे जून २०१४ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत ७२० विद्यार्थी प्रवेश घेतील.या वर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात चाचणी व वार्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांच्या घेण्यात येणाऱ्या परीक्षासाठी उत्तरपत्रिकांची आवश्यकता आहे. त्याकरीता खालील प्रमाणे उत्तरपत्रिकांची छपाई करणेआहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | छपाई संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | उत्तर पत्रिका ( पुरवणी ) २ पानी<br>७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | १०००० प्रती | ५५०/- प्रती हजारी | ५५००.०० |
| ०२ | उत्तर पत्रिका ( पुरवणी ) ४ पानी<br>७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | ७००० प्रती | १०५०/- प्रती हजारी | ७३५०.०० |
| ०३ | उत्तर पत्रिका ८ पानी<br>७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | १५००० प्रती | २१००/- प्रती हजारी | ३१५००.०० |
| ०४ | उत्तर पत्रिका १२ पानी<br>७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | ६००० प्रती | २७००/- प्रती हजारी | १६२००.०० |
| ०५ | उत्तर पत्रिका १६ पानी<br>७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | १२००० प्रती | ३१५०/- प्रती हजारी | ३७८००.०० |
| अक्षरी रुपये - अठयान्नव हजार तीनशे पन्नास मात्र | | | **एकुण रक्कम -** | **९८३५०.००** |

वरीलप्रमाणे उत्तरपत्रिकांची प्रचलीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस तसेच त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९८,३५०/- (अक्षरी रुपये- अठयान्नव हजार तीनशे पन्नास) मात्र खर्चाचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे उत्तरपत्रिकांची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ९८,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.६६ कन्या विद्या मंदिर विद्यालयात रिक्त असलेल्या शिक्षक व प्रयोगशाळा सहा.यांच्या नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** कन्या विद्या मंदिर विद्यालयात रिक्त असलेल्या शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या नेमणूकांबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे सादर करणेत आला होता.

1) The applicant submits that due to increase in the strength of the divisions and strength of the students, two posts of Assistant Teacher are required having H.S.C.(Science) D.Ed. (T.E.T.) qualification for 5th to 7th primary section. The reservation worked out for the said one posts are NT or ST category and one post for open category.
2) The applicant submits that one post of I.T. Instructor is required having B.C.A. or M.C.S. qualification for 5th to 7th primary section. The reservation worked out for the said post is NT or ST category.
3) The applicant submits that the post of Sanskrit Teacher is required to be filled in on urgent basis for 8th to 10th standard i.e.secondary section having B.A.(Sanskrit) B.Ed.(T.E.T.) from Open Category.
4) The applicant submits the post of Lab Assistant is requiring B.Sc. (IT & Science Lab– IT knowledge essential) from Open category (non reservation).
5) The applicant submits that a decision in that regard is taken in the meeting of the Committee held on 7.2.2013. For ready reference copy of the decision of the Committee in meeting held on 7.2.2013 is annexed hereto and marked at EXHIBIT-C.

वरील संदर्भीय प्रस्तावातील मुद्यावर मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे दि.२/५/२०१४ चे निकाल पत्रामध्ये खालीलप्रमाणे निकाल दिला आहे.

1) By CA Nos.15695/2013, the committee has requested to permit to fill up respective posts on the establishment of Shri Saibaba Kanya Vidya Mandir Shirdi run by the Sansthan.
2) The applicant Committee has requested to fill up two posts of Teachers requiring H.S.C. (Science) D.Ed; (TET) from Nomadic Tribes or Scheduled Tribes and Open Category (One Post NT or ST and one Post open), one post of I.T. Instructor requiring B.C.A. or M.C.S. qualification from N.T./S.T. category, one post of Teacher having B.A.(Sanskrit), B.Ed. (TET) from Open category and one post of Lab Assistant requiring B.Sc. (IT & Science Lab-IT knowledge essential) qualification from Open category on the establishment of Saibaba Girls Schools Marathi Medium through the procedure in vogue, namely, public advertisement, interview, written examination and selection.
3) In the light of the emergent situation, we allow the committee to carry such selection process, however, for that purpose expert, particularly, Principal of local college and eminent person in educational field shall be appointed as a member. Application (No.15695/2013) allowed as above.

मा.न्यायमुर्ती खंडपीठ औरंगाबाद यांचे उपरोक्त आदेशान्वये नगर कॉलेज अहमदनगर येथील प्राध्यापक विषय विभागप्रमुख यांना शिक्षक भरती प्रक्रियेत कमिटी (एकूण ३ मेंबर्स) करिता आमंत्रित करता येईल. तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देणे, कमिटी मेंबर्स मानधन, जाणे-येणे वाहनखर्च याकामी रु.१,००,००० इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. तरी कमिटी (एकूण ३ मेंबर्स)आमंत्रित करणेकामी व खर्चास मंजुरी असावी ही विनंती कृपया मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार भरती प्रक्रिया सुरू करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, कन्या विद्या मंदिरामध्ये रिक्त असलेली शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक हि पदे भरणेकामी मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे भरती प्रक्रिया सुरु करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच, याकामी प्रथमतः वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, योग्य व लायक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत यावेत, याकामी येणाऱ्या रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.६७ परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्याने ग्रंथपाल पदी कायम करणे व विहीत पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** माध्यमिक शाळा संहितेन्वये पदवीधर ग्रंथपालाची अर्हता असलेली जाहीरात देवून अर्ज मागवून जाहितीने प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून उमेद्‌वाराच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. तसेच दि.२०/०८/२०१० रोजी निवड समितीद्वारे उमेदवारांच्या मुलाखती घेवून सदरच्या ग्रंथपाल

पदावर श्री शेजवळ सुनिल उत्तमराव यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तीनही शाळेंकरीता एकत्रित मध्यवर्ती ग्रंथालय असुन प्रशासनाच्या सोयीकरीता ग्रंथपाल पद कन्या विद्या मंदिर आस्थापनेकडे वर्ग केलेले आहे.

सदर पदाची नेमणूक करतांना दि.२५ नोव्हेंबर २००५ या आकृतीबंधाच्या शासन निर्णयानुसार सुरुवातीचे ३ वर्ष २५०० रूपये मानधन देण्यात येईल व त्यानंतर वेतनश्रेणी दिली जाईल या शासन निर्णयातील तरतुदी प्रमाणे दि.१ फेब्रुवारी २०१२ पासून ग्रंथपाल पदाची नेमणूक केलेली आहे.

दि.२३ ऑक्टोबर २०१३ या सुधारीत शासन निर्णयान्वये दि.२५ नोव्हेंबर २००५ या शासन निर्णयाची अंमलबजावणी शासनस्तरावर झालेली नाही व या नियमांचा वापर करून केलेल्या ग्रंथपाल पदांची वेतनश्रेणी (निष्प्रभावीत) रद्द करण्यात आलेली आहे, ती येथुन पुढे लागू राहणार नाही.

त्याऐवजी दि.३ ऑगस्ट २००६ या शासन निर्णयान्वये पुर्णवेळ व अर्धवेळ ग्रंथपाल नेमणेबाबत निकष व दि.२३ ऑक्टोबर २०१३ अन्वये खाजगी विनाअनुदानित शाळा मध्ये सदर पदाची नेमणूक करताना माध्यमिक शाळा संहितेनुसार करावयाचे आहे. त्यानुसार ग्रंथपाल पदाकरिता 'दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी व सदर पदाचे वेतन दिले जाते.'

वरिल नियमाप्रमाणे ग्रंथपाल शेजवळ सुनिल उत्तमराव यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी दि.१ फेब्रुवारी २०१४ रोजी पूर्ण झालेले आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता बी.ए. बी.लीब सायन्स्,एम.लीब सायन्स् आहे.

तसेच पदवीधर ग्रंथपाल पात्रता असणाऱ्या ग्रंथपालास शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग पा.नं.३६८ अन्वये व सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी नुसार विहीत वेतनश्रेणी ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन ४३०० त्यांना देय होत आहे. वरील नियमानुसार त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी माहे दि.१ फेब्रुवारी २०१४ नुसार पुर्ण झालेला आहे.

तरी पदवीधर ग्रंथपाल पदाची असलेली वेतनश्रेणी ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन ४३०० त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने देण्यास मा.त्रिसदस्सीय समितीचे निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाल्याने कायम करणे व विहीत पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत शैक्षणिक संकुलाकडील इतरही पदांचा एकत्रित सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.६८ On Consignment Basis वरील Stent चे सम प्रमाणात वापराबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयोलॉजी विभागात लागणारे विविध प्रकारचे Stent साठी सन २०१२-१३ या वर्षाकरिता On Consignment Basis वर दि.२६/११/२०१२ रोजी एकुण १५ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार ते आपणास लागेल त्याप्रमाणे Stent चा पुरवठा करत आहेत.

केंद्र शासनाने सदर Stent च्या किंमती यांचे दि.२१/०२/२०१३ रोजीचे परिपत्रकान्वये दर कमी केलेले होते. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Type of Coronary Stents | | Ceiling Rate |
|---|---|---|---|
| 1. | DRUG ELUTING CORONARY STENTS | All DCGI and FDA approved Drug Eluting Stents<br>All DCGI and CE approved Drug Eluting Stents<br>All DCGI approved Drug Eluting Stents | Rs.25,000/- |
| 2. | BARE METAL CORONARY STENTS | COBALT Stents (including coated and other stents)<br>All DCGI and FDA approved<br>All DCGI and CE approved<br>All DCGI Approved | Rs.12,000/- |
| 3. | BARE METAL STAIN-LESS STELL STENTS | Rs. 10,000/- the rates were already notified vide OM of even number dated 7 th February 2013 | |

याकामी सर्व पुरवठाधारकांना दि.१७/०४/२०१३ चे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे सदरील परिपत्रकातील दराप्रमाणे दर कमी करणेबाबत सांगण्यात आले होते, त्यानुसार पुरवठाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कंपन्यांनी चर्चा वाटाघाटीत दर कमी केले तरी स्टेंट हॉस्पिटलमध्ये पोहोच करणेसाठी अनेक वेळा येणे-जाणे करावे लागते, यामुळे कंपन्यांना जास्त खर्च येतो. यासाठी पर्याय म्हणुन सध्या वापरत असलेल्या सर्व स्टेंटधारकांचे स्टेंट साधरणतः ५% पर्यतच्या फरकाने कार्डीयालॉजीस्ट समान वापर करत असतील, तर सर्व पुरवठाधारक स्टेंटचे दर कमी करुन देण्यास तयार आहेत, अशी माहिती पुरवठाधारकांनी दिली. यावर कार्डीयालॉजीस्ट यांचेबरोबर समक्ष चर्चा करुन सध्या वापरत असलेल्या पुरवठाधारकांचे स्टेंटस् समान वापरण्यात येतील, असे सांगीतले. प्रसंगी माहे डिसेंबर

२०१२ ते मार्च २०१३ कालावधीतील स्टेन्ट वापराचा तक्ता सर्वांना पुरविण्यात आला. चर्चा वाटाघाटीअंती या पुरवठाधारकांचे स्टेंटस् साधरणत: ५% पर्यतच्या फरकाने वापरण्यात यावे, याबाबत वैद्यकिय संचालक यांनी त्रैमासिक आढावा घेऊन नियंत्रण ठेवावे व CGHS Circular/ २१/०२/२०१३ मध्ये नमुद केलेले सर्व करांसहीत दर रु.२५,०००/-, १२,०००/-, १०,०००/- हे दि.१८/०४/२०१३ पासुन लागु करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी दि.१८/०४/२०१३ पासुन करणेबाबत दि.१८/०४/२०१३ परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानंतर दि.०१/०८/२०१३ ते दि.३१/०१/२०१४ या सहा महिन्यात वापरलेल्या Stent चा तपशील कॅथलॅब विभागाकडुन प्राप्त झालेला आहे. तो सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. तसेच सदर वापरामध्ये डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना दि.३०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये वापरण्यामध्ये असलेल्या तफावतीबाबत विचारणा करण्यात आलेली होती. त्यावर दोन्ही डॉक्टरांनी त्यांचा खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

**डॉ. हरिष बजाज-**

01. Coronary artery disease:- has different morphology of stenosis, length of lesion, diameter of stenosis, calcification, location (ostia, bifurcation leftmain) tortuosity which requires stents with either thick/thin struts, markers at ends, cobalt chromium or metal stents, flexible balloon, stent opening from middle or sides of balloon etc.
02. Supply of stents is very irregular; we have complained to store/ Medical Director Office at times, when dollar rates fluctuated upto 20-30% costs, stents of various brands were not available almost for 2-5 months.
03. Self paid patients demand specific stents & we have perfomed around 500 patients who are not under scheme or have not received any charity. Such patient needs stents/ balloon which are used in metrocities, by famous cardiologist.

**डॉ. गौरव वर्मा-**

01. All stents has different structure inflation method, trackability & results hence we cannot use any stent in different lesions.
02. Coronary artery disease have different types of lesion like some are long , calcific lesion which requires good fine quality stents with good trackability some lesion are tight lesion which require stiffer stents hence we try to use the appropriate stent. According to the lesion.
03. Over last 5 Years we have experienced that some stents are better for long term restenosis & have lesser acute thrombosis rates, hence we try to use the best stents according to our knowledge & experience.
04. There is also issues with the stocks in our stores as same stents are always short in supply & some have plenty in store. Hence this is also a reason for variability.

प्रत्येक वर्षी आपण वेगवेगळया प्रकारचे व वेगवेगळया कंपनींचे Stent ठेवत असतो कारण सर्वच कंपन्यांच्या सर्वच साईज येत नाही. त्यामुळे प्रत्येक प्रकारामध्ये कमीतकमी ५ ते ६ कंपन्यांचे Stent हे ठेवावे लागतात. त्यामुळे कुठल्याही कंपनीचे साईज वेळेत उपलब्ध होऊ शकते. ठराविक कंपनीचे Stent ठेवल्यास वेळेवर साईज उपलब्ध होणार नाही. तसेच प्रत्येक पुरवठाधारक हा जास्तीत जास्त प्रत्येक साईजचे ४ ते ५ नग ठेवत असतात. एका दिवशी सदर साईज वापरल्या गेल्यातर दैनंदिन कामकाजात मोठी अडचण येऊ शकते. शिवाय ठराविक कंपन्यांची Monopoly पण होऊ शकते. त्यामुळे ठराविक कंपनीचे Stent ठेवणे उचित होणार नाही.

औषध भांडारात बऱ्याच वेळा बऱ्याच साईजे्स उपलब्ध नाही असे होत नाही. फक्त काही वेळा काही कंपनीच्या ठराविक साईज उपलब्ध नसतात. परंतु त्या फार कमी कालावधीसाठी असतात नंतर त्या साईज उपलब्ध होतात. परंतु जी पाहिजे ती साईज ही कोणत्या न कोणत्या कंपनीची उपलब्ध असते पण जर डॉक्टरांनीच ठराविक कंपनीची मागणी केली तर साईज कमी पडु शकतात.

तसेच काही कंपनीचे Stent मागील ४ ते ५ महिन्यात चांगल्या प्रकारे वापरत होते. परंतु त्यानंतर उपलब्ध असून देखील वापरले गेले नाही असे देखील होते. वास्तविक सदर कंपन्यांचे साईज उपलब्ध असतांना देखील वापरणे गरजेचे आहे.

परंतु डॉक्टरांनी वापरणे बंद केल्यामुळे कंपनीने Stent परत घेऊन गेलेले आहे. जर यापुर्वी तेच Stent भरपुर प्रमाणात वापरत होते तर मध्ये अशा प्रकारच्या स्टेटचा वापर बंद होणे हे वस्तुस्थितीशी सुसंगत वाटत नाही असे मत आहे.

काही ठराविक साईज हया ठराविक कंपन्यांकडे असतात म्हणूनच मा व्यवस्थापन समिती सभेत ५ ते १०% कमी किवा जास्त प्रमाणात वापर करावा असे धोरण ठरलेले आहे.

परंतु मागील ६ महिन्याच्या अहवाल बघता काही साईजस् हया खुप कमी प्रमाणात तर काही खुप जास्त प्रमाणात वापरलेचे दिसून येते. यामुळे M/s. Critical Care Systems, Pune यांनी खप कमी झालेला असल्यामुळे Stent परत घेऊन गेलेले आहे.

वार्षीक खरेदीमध्ये निवड करतांनी कॅथलॅब विभागातील डॉक्टरांनीच कंपन्यांची शिफारस केलेली असते व त्याच कंपन्यांचे Stent/ Balloon वार्षीक खरेदी मध्ये निवडलेले असतात. परंतु तेच पुन्हा फक्त विशिष्ट कंपनीचे Stent/ Balloon जास्त प्रमाणात तर काही कमी प्रमाणात वापरतात ही मोठी विसंगती आहे. शिवाय उपलब्ध Stent बद्दल कुठलीही तांत्रीक तक्रार कॅथलॅब विभागाकडुन आज तागायत आलेली नाही. उपभांडार विभागात एकाच साईजचे दोन ते तीन प्रकारच्या कंपनीचे Stent पाहिजे त्या साईजमध्ये बऱ्याच वेळा उपलब्ध असतात परंतु कॅथलॅब मध्ये केसेस चालू असतांना कॅथलॅब विभागातील कर्मचारी फक्त विशिष्ट कंपनीच्याच Stent ची मागणी करत असतात असा देखील आज पर्यंतचा अनुभव आहे. तसेच राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झाल्या पासून Paid stent ची संख्या वाढलेली आहे जी यापुर्वी खुपच कमी प्रमाणात होती हे देखील वस्तुस्थितीशी सुसंगत वाटत नाही.

दि.१७/०४/२०१३ चे ठरावानुसार दि.१८/०४/२०१३ ते दि.३१/७/२०१३ पर्यंत वापरलेल्या स्टेन्टचा तक्ता मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे माहितीस्तव सादर केला होता. त्यावर चर्चा होऊन नोंद घेण्यात आलेली आहे.

सर्व Stent च्या सर्व पुरवठाधारकांच्या किंमती हया सारख्याच आहेत त्यामुळे यामध्ये आर्थिक नुकसान होत नाही. दि.१७/०४/२०१३ रोजीचे सभेत सर्व प्रकारचे Stent हे ५% कमी/ जास्तीच्या फरकाने वापरण्यात यावे अशी चर्चा झालेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.५१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयोलॉजी विभागात लागणारे विविध प्रकारचे On Consignment Basis वरील स्टेन्ट समप्रमाणात वापरले जात नाहीत, असे उपरोक्त प्रस्तावावरुन निदर्शनास येत आहे. याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू स्टेन्ट कार्डीओलॉजीस्ट समप्रमाणात का वापरत नाहीत, याची चौकशी करावी व यास कोण जबाबदार आहे, याचा अहवाल सभेपुढे सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६९** **तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (एप्रिल- २०१४)**

**प्रस्ताव-** **(अ) व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु. १,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा. त्रिसदरस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णंसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल शिर्डी व मुंबई येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे / केमिकल / सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु.४७,३९९/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- एप्रिल मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु.४७,३९९/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. वार्षिक पुरवठा आदेशातील जी औषधे पुरवठाधारकांनी पुरवठा केलेली नाही ती तातडने दुसऱ्या पुरवठाधारकाकडून खरेदी करुन जास्तीची फरकाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसूल केलेली आहे.

**मागणी :-**

| Sr. no. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. | Requirement |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 936 | 30/04/2014 | 1379.00 | RGJY |
| 2 | M/s. Kustubh Enterprises, Mumbai | 517 | 09/04/2014 | 46020.00 | RGJY |
| | **Total Amt. in Rs.** | | | **47399.00** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य

कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात.

त्यानूसार सदर खरेदीच्या बीलाची रक्कम रु. ४७,३९९/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५१९ (अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(ब) व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** १) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र.२५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बीले अदा करणेत यावी व रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा. त्रिसदरस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र.३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णंसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल शिर्डी, नाशिक व पुणे येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे/ केमिकल/ सर्जिकल साहीत्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु. २७,६४२/- मात्र खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे- एप्रिल मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- चे तरतूदी व्यतीरिक्त रक्कम रु.२७,६४२/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. वार्षिक पुरवठा आदेशातील जी औषधे पुरवठाधारकांनी पुरवठा केलेली नाही ती तातडने दुसऱ्या पुरवठाधारकाकडून खरेदी करुन जास्तीची फरकाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसूल केलेली आहे.

**मागणीः-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. | Requirement |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 930 | 25/04/2014 | 488.00 | RGJY |
| 2 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 929 | 22/04/2014 | 3394.00 | RGJY |
| 3 | M/s. Surya Surgi Pharma, Nashik | 16 | 04/04/2014 | 4190.00 | RGJY |
| 4 | M/s. Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik | 49 | 04/04/2014 | 11595.00 | RGJY |
| 5 | M/s. V. V. & Company, Pune | 43 | 07/04/2014 | 2250.00 | RGJY |
| 6 | M/s. V. V. & Company, Pune | 1008 | 07/04/2014 | 2125.00 | RGJY |
| 7 | M/s. Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | 612 | 07/04/2014 | 3600.00 | RGJY |
| | **Total Amt. in Rs.** | | | **27642.00** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात.

त्यानूसार सदर खरेदीच्या बीलाची रक्कम रु. २७,६४२/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५१९** **(ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७०** **श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यू. विभागातील Adult Ventilator बायबॅक (Buyback) करुन नवीन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील आय.सी.सी.यु विभागात अत्यवस्थ रुग्ण दाखल झालेली असतात. त्यांचे उपचारासाठी Ventilator ची आवश्यकता असते. सध्या आय.सी.सी.यु विभागात सन २००० या वर्षात Siemens Company चे एक व Drager Company चे एक असे एकुण दोन Ventilator आहे. त्यापैकी Siemens Company चे मशिन हे वारंवार बंद पडते तसेच Siemens Company ने देखील त्याचे उत्पादन बंद केले आहे. त्यामुळे त्याचे Spare Part बाजारात उपलब्ध होत नाही. त्यामुळे आय.सी.सी.यु विभागाने दि. २९/०६/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये एक नग नवीन Ventilator मशिनची मागणी केलेली आहे. सदर Ventilator ची किंमत रु.७४६७५०/- इतकी होती, सध्या सदर मशिनची घसारा वजा जाता किंमत रु.२५०४६/- इतकी आहे.

सदर Ventilator खरेदीकामी M/s. Inter Medics, Mumbai यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी ईमेलद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यानी दि.३०/१०/२०१३ चे ईमेलद्वारे सदर Ventilator चे दर कळविलेले आहे. परंतु सदर मशिनचे Specification हे दि.२०/०४/२०१४ रोजी तपासुन औषध भांडार विभागाकडे प्राप्त झालेले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Adult Ventilator | 1 | 1250000.00 | 1250000.00 |
| **Total Amt. in Rs.** | | | | **1250000.00** |

उपरोक्त ०१ नग Adult Ventilator खरेदीकामी अंदाजे रु.१२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Adult Ventilator हे सन २००० या वर्षात खरेदी केलेले असून, सदर Adult Ventilator ची घसारा वजा जाता दि. ३१/०३/२०१३ अखेर किंमत रु. २५,०४६/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त नसल्यामुळे संस्थान अधिनियम, २००४ मधील कलम १७ (०४) अन्वये खरेदीपूर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे नवीन Adult Ventilator खरेदी करणेस व जुनी Adult Ventilator बायबॅक (Buyback) करणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे Adult Ventilator विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.१२,५०,०००/- इतक्या रक्कमेच्या खर्चास व जुने Adult Ventilator बायबॅक (Buyback) करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.७१** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- १ या विभागाकरीता Needle Holder (Curved Golden Handle 10") खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी- I या विभागाने दि.०२/०४/२०१४ रोजीचे मागणी पत्रकान्वये Scanlan कंपनीच्या Needle Holder (Curved Golden Handle 10") ०२ नगांची मागणी केलेली आहे. सदर विभागाकडे Needle Holder नसल्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहे. कारण सदरचे Needle Holder घेतल्यामुळे ऑपरेशन नंतर करावयाचे Sutures हे लवकर होतील शिवाय सदर Sutures मुळे Tissue Damage होणार नाही त्यामुळे रुग्ण लवकरात लवकर बरा होणेस मदत होईल.

उपरोक्त Needle Holder (Curved Golden Handle 10”) खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. B.L.Lifescience Pvt. Ltd., Pune यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.१४/०४/२०१४ रोजीचे ई-मेल पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Needle Holder, Curved Golden Handle 10” / 25.4 cm | 02 No. | 81,070.00 | 162140.00 |
| **Total Amt. in Rs.** | | | | **162140.00** |

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी- I यांचे दि.०२/०४/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि.०५/०४/२०१४) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** तरी वरीलप्रमाणे Needle Holder (Curved Golden Handle 10”) ०२ नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,६२,१४०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.-१ या विभागाकरीता ०२ नग Needle Holder (Curved Golden Handle 10") विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,६२,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७२ श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- १ या विभागाकरीता LED Light Source with Lamp खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी LED Light Source with Lamp ची आवश्यकता आहे कारण सध्या त्यांच्याकडे असलेले LED Light Source with Lamp हा सन २००६ मध्ये खरेदी करण्यात आलेला होता. सदर LED Light Source with Lamp हा खुप जुना झालेला असून त्यांच्या Light ची तीव्रता कमी झालेली असल्यामुळे त्यात स्पष्टपणे दिसत नाही. त्यामुळे त्यांनी दि.०३/०४/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग LED Light Source with Lamp ची मागणी केलेली आहे.

सदर LED Light Source with Lamp खरेदीकामी अंदाजे रु.३,४७,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. १ या विभागाचे दि.०३/०४/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि.०५/०४/२०१४) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** तरी सदरचा ०१ नग LED Light Source with Lamp विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३,४७,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- १ या विभागाकरीता ०१ नग LED Light Source with Lamp विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,४७,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७३ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता Lead Neck Coller खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **प्रस्ताविक**:- श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात सध्या दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी सध्या त्यांचेकडे ०३ Lead Neck Collar उपलब्ध आहेत. परंतु शस्त्रक्रिया करतांना ऑपरेशन थिएटरमध्ये ५ ते ६ कर्मचारी काम करत असतात, त्यामुळे सध्या असलेले Collar कमी पडत आहे, त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहे.

याकामी अंदाजे खर्चासाठी मे. अनिता मेडीकल सिस्टीमस प्रायव्हेट लिमीटेड, मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी एकुण रु. ३४,८३९/- इतका खर्च अपेक्षित आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Zerolead Thyroid Shield . 50 mm pb | 06 | 5806.50 | 34839.00 |
| | | | Total Amt. Rs. | 34839.00 |

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालय कॅथलॅब विभाग यांचे दि. २१/०३/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार प्राप्त दि. ०५/०४/२०१४)

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीरतसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी कॅथलॅबमध्ये सर्जन व इतर कर्मचाऱ्यांना Cathlab मशिन मुळे Radiations होऊ नये म्हणून खरेदी करणे गरजेचे आहे.

तरी कॅथलॅब विभागाकरीता ६ नग Lead Neck Collar विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.३४,८३९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागामध्ये दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी आवश्यक असलेले ०६ नग Lead Neck Coller विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३४,८३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **द्वारावती भक्तनिवास हाऊसकिपींग कामासंबंधी प्राप्त झालेल्या ई-निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास विभागाचे इमारतीमध्ये ८० ए.सी. व २३६ नॉन ए.सी. अशी एकुण ३१६ खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी खाली केलेनंतर त्यांची साफ-सफाई तसेच हाऊस किंपीग व व्दारावती विभागाचे इतर परिसराची स्वच्छता इत्यादी कामे आऊट सोर्सिग पध्दतीने करुन घेतली जातात.

संस्थानच्या व्दारावती भक्तनिवास विभागाकडे मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि.पुणे ही कंपनी दि.०१/०४/२०१० पासून स्वच्छता व हाऊसकिंपीगची कामे आऊटसोर्स पध्दतीने सध्या काम करत आहे.

त्यांना उपरोक्त कामासाठी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७/०४/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.३५३ व संस्थान जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावती ८४१/२०१३ दि.१८/०५/२०१४ अन्वये स्वच्छतेसाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी, केमिकल व प्रतिदिनी ७६ कर्मचाऱ्यांसह दरमहा सर्व करांसह रुपये-८,३०,०००/- ( अक्षरी रुपये- आठ लाख, तिस हजार) मात्रचा कार्यादेश देण्यात आलेला असून त्याकामाची मुदत दि.३०/०४/२०१४ अखेर संपुष्टात आलेली आहे.

सन २०१४-१५ या वर्षाकरीता व्दारावती भक्तनिवास विभागाचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक हाऊसकिपीग कामासाठी ई-निविदाची जाहीरात देऊन ई -निविदा मागविण्यास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०२/२०१४ रोजीचा विषय नं.१२, निर्णय क्रं. १६३ अन्वये सविस्तर चर्चा होऊन सध्या व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता / हाऊसकिंपीग ( आऊट सोर्सिंग ) काम करत असलेले मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांची मुदत दि. ३०/०४/२०१४ अखेर संपुष्टात येत असल्याने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता/ हाऊसकिंपीग काम करुन घेणेसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकंडून निविदांची मागणी करणेत यावी. याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये-१,२०,००,०००/- ( अक्षरी रुपये- एक कोटी, वीस लाख ) मात्र खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत आहे त्याच अटी/शर्तीवर मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना मुदतवाढ देणेत यावी व दरम्यानचे कालावधीत याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठास अर्ज करणेत येऊन मा.खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरलेले आहेत.

**०१)** उपरोक्त निर्णयास अनुसरुन हाऊस किपींग कामासाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत विविध वर्तमान पत्रातून व श्री साईबाबा हॉस्पीटल ई.डी.पी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या संकेतस्थळावर ई-निविदाबाबतची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली.

**०२)** महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदामध्ये तांत्रिक बीडचे ( Technical Bid ) कागदपत्र ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.२५/०३/२०१४ रोजी सांय. ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. तद्नंतर स्कॅन केलेले कागदपत्राचे व इतर मागणी केलेले कागदपत्राच्या सत्यप्रती (Soft copy) शिर्डी कार्यालयात दि.२८/०३/२०१४ रोजी सांय.०५.०० वाजेपर्यंत सादर करावेत, अशी जाहीरात प्रसिध्दी मध्ये देण्यात आलेली होती.

**०३)** निविदा विक्री दि.१०/०३/२०१४ ते दि.२५/०३/२०१४ या कालावधीत संस्थानचे वेबसाईटवर टाकुन विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये उपरोक्त कालावधीत एकुण ५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहेत

**ई-निविदाधारकांची माहिती :-**

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | निविदा जमा झाल्याचे ठिकाण | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रिलायन्स एन्टरप्रायझेस, कॅम्प पुणे | शिर्डी कार्यालय | २१७४०/२२/०३/२०१४ |
| ०२ | मे. उपशोत युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई | शिर्डी कार्यालय | २१७३८/२२/०३/२०१४ |
| ०३ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. कॅम्प पुणे | शिर्डी कार्यालय | २१७५३/२२/०३/२०१४ |
| ०४ | मे.संजय मेन्टनन्स सर्व्हीसेस प्रा.लि.मुंबई | शिर्डी कार्यालय | २१८४९/२५/०३/२०१४ |
| ०५ | मे.बी.एस.अे.कॉर्पोरेशन लि.कॅम्प, पुणे | शिर्डी कार्यालय | २२१२४/२८/०३/२०१४ |

**०४)** वरील ०५ ई-निविदा टेंडरधारकांचे निविदा रक्कम रुपये- १,०००/- व बयाणा रुपये- १,००,०००/- इतक्या रक्कमेचे डी.डी.लेखाशाखा विभागामार्फत संस्थान खाते जमा करुन प्रत्येक कंपनीच्या नांवे वेगवेगळया जमा पावतीची कार्यवाही करण्यात आलेली आहेत.

**०५)** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचे कामाची मुदत दि.३०/०४/२०१४ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावती/२०७/२०१४ दि.१४/०४/२०१४ अन्वये दि.०१/०५/२०१४ पासुन आहे त्याच अटी/शर्तीवर नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत कामाची मुदतवाढ देण्यात आलेली आहेत.

**०६)** जा.नं.एसएसएस/वशी-विधी/१६३/१४ दि.०९/०४/२०१४ रोजी संस्थान वकिलामार्फत व्दारावती भक्तनिवास व परिसर स्वच्छता हाऊसकिंपीग (आऊट सोर्सिंग) काम करुन घेणेसाठी येणाऱ्या खर्चाचे रक्कमेस मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी मा.कोर्टात सिव्हील अर्ज दाखल करण्यात आलेला असून अद्याप पावेतो मा.कोर्टाची मान्यता मिळालेली नाहीत.

**०७)** उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदांच्या हार्ड कॉपी निविदा धारकांनी व्दारावती भक्तनिवास कार्यालयात दिनांक २८/०३/२०१४ रोजी सादर केल्या आहेत. दिनांक ३१/०३/२०१४ रोजी उपरोक्त निविदाधारकांनी दिलेले हाऊसकिंपीग कामासंबंधीचे तांत्रिक लिफाफे (लिफाफा क्रं. ०१) मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने समक्ष उघडणेत आलेल्या आहेत. निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. सर्व निविदाधारकांचे कागदपत्रे असून, Nit Document मधील अटी/शर्ती अ.न १२ निविदाधारकांचे हाऊसकिपींगचे क्षेत्रात मागिल २ वर्षापासून १० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असावी, अशी अट आहे. त्यामुळे फक्त मे. रिलायन्स एन्टरप्राईझेस, पुणे यांचे मागिल दोन वर्षापासून १० कोटीपेक्षा कमी उलाढाल आहे. वर्षाच्या वार्षिक उलाढालीची माहिती दि.०९/०६/२०१४ रोजीच्या पत्राव्दारे लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेले आहे. सोबत कागदपत्राचा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

तसेच निविदाधारकांचे Technical Doucument मध्ये दिलेल्या अटी/ शर्तीनुसार कॅग रिपोर्ट प्रमाणे निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन Technical Scores देण्यात येऊन ज्या कंपनीला ७० व त्यापेक्षा जास्त गुण मिळेल अशा कंपनीचे बीड ऑफ कोटेशन उघडण्यात येईल. त्यानुसार निविदाधारकांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गुण मिळालेले आहेत. त्याचा सविस्तर गुणाचा तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र/ अपात्र |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रिलायन्स एन्टरप्रायझेस, कॅम्प पुणे | ४२ | अपात्र |
| ०२ | मे. उपशोत युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई | ६२ | अपात्र |
| ०३ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. कॅम्प पुणे | **८५** | **पात्र** |
| ०४ | मे.संजय मेन्टनन्स सर्व्हीसेस प्रा.लि.मुंबई | **७५** | **पात्र** |
| ०५ | मे.बी.एस.अे.कॉर्पोरेशन लि.कॅम्प, पुणे | ५९ | अपात्र |

सबब ७० व ७० पेक्षा जास्त गुण मिळालेले उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०३ व ०४ अशा दोन निविदाधारकांचे बीड ऑफ कोटेशन (प्राईज बीड) आजचे सभेसमोर उघडणेत येऊन त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

निर्णय क्र.५२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच, नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत सध्या हाऊसकिपींग/ स्वच्छतेचे आऊट सोर्सिंग पध्दतीने काम करत असलेले मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांना प्रत्येक महिन्यास मुदतवाढ देणेत यावी.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईबाबा हॉस्पीटल आयसीसीयु वार्डकरीता बेडस्‌ची संख्या वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम-२१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करणे", अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसें दिवस वाढत आहे व जास्त असल्याने, रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता, आयसीसीयु मध्ये दाखल होणाऱ्या अत्यव्यस्थ, अपघात झालेले रुग्ण, हार्ट अॅटक व इत्यादी सिरीयस रुग्णांना आयसीसीयु मध्ये दाखल करणेसाठी बेड कमी पडत आहे. अशा रुग्णांना बाहेरील रुग्णालयात रेफर करावे लागते. त्यासाठी सध्याच्या न्युरो ओटीतील Recovery रुमचा तसेच ऑर्थो ओटीमधील ऑर्थो Recovery व Minor ओटीचा वापर जास्त प्रमाणात होत नसल्याने हे दोन्ही विभाग एकत्रित करुन, तेथे ०८ बेडचा आयसीसीयु वार्ड तयार करुन मिळणेबाबत दि.२७/०५/२०१४ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये इकडील विभागास कळविले आहे. त्यानुसार याबाबत दि.०९/०६/२०१४ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटलचे वैद्यकीय संचालक, डॉ. राव यांचे समवेत राऊंड घेऊन पाहणी करणेत आली.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा हॉस्पीटल येथे न्युरो ओटीतील Recovery रुम तसेच ऑर्थो ओटीमधील ऑर्थो Recovery व Minor ओटी हे दोन्ही भाग एकत्रित करुन, तेथे १० ते १२ बेडचा आय सी सी यु वार्ड तयार करता येईल.

**न्युरो ओटीमध्ये खालील कामे करावी लागतील.**

पॅसेज मधील अॅल्यु. दरवाजा शिफ्ट करणे.
पेशंटचे नातेवाईकांकरिता पूर्वेकडील बाजुने नविन दरवाजा टाकून रॅम्प बनविणे.

**ऑर्थो. ओटीमध्ये खालीलप्रमाणे कामे करावी लागतील.**

ऑर्थो रिकव्हरी व मायनर ओटीची भिंत काढणे.
दोन्ही टॉयलेट काढणे व नव्याने एक टॉयलेट योग्य ठिकाणी करणे.
बाहेरील बाजुने दरवाजा करणे व रॅम्प करणे.

तसेच वरील दोन्ही ठिकाणी नव्याने रंगकाम करणे. टाईल्स दुरुस्ती करणे, वीट बांधकाम करणे इ. कामे करावी लागणार आहे. याकरिता सदर कामे करणेसाठी रु.३,३६,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** तरी श्री साईबाबा हॉस्पीटल येथील न्युरो ओटीतील Recovery रुम तसेच ऑर्थो ओटीमधील ऑर्थो Recovery व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करुन, तेथे १० ते १२ बेडस्‌चा आयसीसीयु वार्ड तयार करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.३,३६,०००/- मात्रचे खर्चास व सदर कामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.५२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल येथील न्युरो ओटीतील Recovery रुम, ऑर्थो ओटीमधील ऑर्थो Recovery व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करुन, तेथे १० ते १२ बेडस्‌चा आयसीसीयु वार्ड तयार करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

**तसेच याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.५२६** **मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** संस्थानमध्ये विविध विभागांमधील विविध खरेदी/ कामांसाठी दरपत्रके/ कोटेशन्स/ निविदा/ ई-निविदा मागविणेत आल्यानंतर संबंधीतांना सभेसमोर बोलावून चर्चा/ वाटाघाटी करणेत येऊन, निम्नतम दरधारकास सदरचा कार्यादेश दिला जातो. परंतु या कार्यपध्दतीमध्ये निर्णय घेण्यास बराचसा कालावधी लागतो. तसेच त्या वस्तुचा/ कामाचा दर्जा मिळत नाही. याकरिता यापुढे जाहिरातीमध्ये व दरपत्रके/ कोटेशन्स/ निविदा/ ई-निविदा मागणी करताना "दरांबाबत चर्चा/ वाटाघाटी केल्या जाणार नाहीत, आपण अंतीम दर द्यावेत व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार समितीला राहील." असा स्पष्ट उल्लेख करणेत यावा.

तसेच, हा निर्णय अस्थायी समितीने घेतलेला असून पुढे शासनाकडून स्थायी समिती अस्तित्वात आलेनंतर सुध्दा या निर्णयाची अंमलबजावणी करणेत यावी. जर स्थायी समितीला या निर्णयामध्ये फेर-बदल करावयाचा असेल तर त्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणे अनिवार्य राहील.

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ सर्व प्रशासकीय अधिकारी/ वैद्यकिय संचालक/ मुख्यलेखाधिकारी)

---

वरील निर्णय क्र. ४५० ते ५२६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (कुंदनकुमार सोनवणे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी